वर्ष २१, अंक १०, ६ रुपये, शहर आवृत्ती, पृष्ठे १२ + लोकरंग

नागपूर, मुंबई, पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

रविवार लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

नागपूर, रविवार, १०.०५.२०२६

WWW.LOKSATTA.COM



लोकरंग
निसर्गयात्री

तापमान

कमाल ४०.४° से | किमान २४.२° से

हवामानाचा अंदाज
आकाश अंशतः ढगाळलेले राहील.



सोमनाथ : अखंड श्रद्धेचे महापर्व

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विशेष लेख... पान २



'अग्नी'ची यशस्वी चाचणी

एकाच वेळी अनेक लक्ष्यांवर मारा करण्याची क्षमता असलेल्या प्रगत 'अग्नी' क्षेपणास्त्राची शनिवारी ओडिशाच्या एपीजे अब्दुल कलाम बेटावर यशस्वी चाचणी करण्यात आली. या यशस्वी चाचणीमुळे भारताने एकाच क्षेपणास्त्र प्रणालीद्वारे अनेक सामरिक लक्ष्यांवर मारा करण्याची आपली क्षमता पुन्हा सिद्ध केली आहे.

उपोषणकर्त्या कर्मचाऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू

नांदेड : नियमित वेतन मिळावे, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसलेल्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि.८) घडली. कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबीयांनी प्रशासनाच्या अनास्थेमुळे मृत्यू झाल्याचा आरोप केला आहे. शहरातील नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयात माणिक उद्धवराव निलेवाड हे सन २००६ पासून चतुर्थश्रेणी पदावर कार्यरत होते.

लेफ्टनंट जनरल सुब्रमणी नवे 'सीडीएस'

नवी दिल्ली : देशाचे पुढील संरक्षण दलप्रमुख (सीडीएस) म्हणून लेफ्टनंट जनरल (निवृत्त) एन. एस. राजा सुब्रमणी यांचे नाव निश्चित झाले आहे. याबरोबरच केंद्र सरकारने व्हाइस ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन यांची पुढील नौदलप्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. सरकारने एका निवेदनामार्फत यासंबंधी माहिती दिली. - पान ४

भारतीय वनसेवा परीक्षेमध्ये मराठी टक्क्यात वाढ

नागपूर : केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या भारतीय वनसेवा परीक्षेचा निकाल शुक्रवारी रात्री जाहीर झाला. २०२५च्या अंतिम निकालात महाराष्ट्राने यंदाही ठसा उमटवला आहे. राज्यातील तब्बल २० उमेदवारांनी यश मिळवले असून, गेल्या काही वर्षांत भारतीय वनसेवेत मराठी अधिकाऱ्यांची वाढती उपस्थिती पुन्हा अधोरेखित झाली. - पान २

दुसरी, तिसरी, चौथी, सहावीसाठी नवीन पाठ्यपुस्तके

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तकनिर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळातर्फे (बालभारती) उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या पाठ्यपुस्तकांपैकी काही इयत्तांची पाठ्यपुस्तके शैक्षणिक वर्ष २०२६-२७मध्ये बदलणार आहेत. त्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावी या इयत्तांना नवीन पाठ्यपुस्तके लागू होणार असून, पाचवी, सातवी, नववी आणि अकरावी या इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांचे यंदा शेवटचे वर्ष आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, नवा बदल लागू होणार असून, इयत्ता पाचवी, सातवी, नववी आणि अकरावी या इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांचे यंदा शेवटचे वर्ष आहे .

'बालभारती'च्या संचालक अनुराधा ओक यांनी याबाबतची माहिती दिली. इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी व सहावीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमासाठी 'शिकू मराठी आनंदे,' तसेच हिंदी, उर्दू, गुजराती, कन्नड, सिंधू, तेलुगू, तमिळ आणि बंगाली या इतर माध्यमांसाठी 'करू मैत्री मराठीशी' ही मराठी भाषेची अनिवार्य पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, असेही प्रसिद्धीपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

इयत्ता सहावीसाठी हिंदी सुलभ भारती, हिंदी सुगम भारती, तसेच सुगम भारती (कन्नड संयुक्त) तारुफे उर्दू, सिंधू भारती, तेलुगू सरल भारती, गुजराती साहित्य परिचय ही *(पान ३ वर)*

आठवी ते बारावीसाठी स्वाध्यायपुस्तिका



'बालभारती'तर्फे राज्यातील शिक्षणतज्ज्ञ, अनुभवी शिक्षकांनी मराठी आणि इंग्रजी माध्यमातील इयत्ता आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांच्या वैशिष्ट्यपूर्ण व दर्जेदार स्वाध्याय पुस्तिकांची निर्मिती केलेली आहे. या स्वाध्याय पुस्तिकांच्या दर्शनी किमतीवर ४० टक्के सूट देण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या स्वाध्याय पुस्तिकांचा वापर करण्याचे आवाहन अनुराधा ओक यांनी केले.



मातृदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

तमिळनाडूत राज्यपाल राजी

बहुमताचा आकडा पार; विजय यांचा आज मुख्यमंत्रीपदी शपथविधी

एक्स्प्रेस वृत्त

चेन्नई : तमिळगा वेत्री कझागमचे (टीव्हीके) प्रमुख विजय यांनी शनिवारी संध्याकाळी राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांची भेट घेऊन १२० सदस्यांच्या पाठिंब्याचे पत्र सोपवले. यामुळे गेले दोन दिवस पाठिंबा देणाऱ्या आमदारांच्या संख्याबळावरून सुरू असलेले नाट्य अखेर संपुष्टात आले. रविवारी सकाळी दहा वाजता चेन्नई येथील नेहरू स्टेडियमवर विजय यांचा मुख्यमंत्रीपदाचा शपथविधी सोहळा होईल. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यावेळी उपस्थित राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राज्यपालांची तीन दिवसांत तीन वेळा भेट विजय यांनी घेऊनही टीव्हीकेला बहुमताचा आकडा जुळवता आला नव्हता. त्यानंतर राज्यपालांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. शनिवारी सायंकाळी व्हीसीके व आयएमयूएल या पक्षांनी पाठिंब्याचे पत्र सोपविल्यानंतर २३४ सदस्य असलेल्या तमिळनाडू विधानसभेत सत्तारूढ सदस्यांचे संख्याबळ बहुमतापार गेले. गेले दोन दिवस बहुमताची जुळवाजुळव करण्यासाठी टीव्हीकेची धावपळ सुरू होती. व्हीसीकेने शनिवारी सकाळी होणारी पत्रकार परिषद पुढे ढकलली. त्यामुळे अनिश्चितता वाढत गेली. अखेर दुपारी त्यांच्या पाठिंब्याने *(पान ४ वर)*




टीव्हीकेचे प्रमुख विजय यांना तमिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी शनिवारी सरकार स्थापनेचे आमंत्रण दिले.

'एएमएमकेच्या पत्राचा वाद'

एएमएमकेचे एकमेव आमदार एस.कामकाज यांच्या पाठिंब्याच्या पत्रावरून वाद झाला. पक्षाचे प्रमुख दिनकरन यांनी असा कोणताही पाठिंबा दिला नसल्याचे स्पष्ट केले. आम्ही अण्णा द्रमुकबरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रकरणी पोलिसांत तक्रार करण्यात आली आहे.

केरळमध्ये वेणुगोपाल यांच्या नावाला आमदारांची पसंती



नवी दिल्ली : केरळमध्ये काँग्रेसच्या नेतृत्त्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीला बहुमत मिळाल्यावर मुख्यमंत्री निवडीसाठी वरिष्ठ नेत्यांचा खल सुरू आहे. काँग्रेस सरचिटणीस खासदार के.सी.वेणुगोपाल यांना जवळपास ४३ आमदार व सर्व खासदारांचा पाठिंबा आहे. विधानसभा निवडणूक त्यांनी लढवली नसल्याने त्यांच्याकडे पद देण्याबाबत पक्षश्रेष्ठींना निर्णय घ्यावा लागेल. व्ही.डी.सतीशन व रमेश चेन्नीथला हे अन्य दोन नेते मुख्यमंत्रीपदाचे प्रबळ दावेदार मानले जातात. १४० सदस्य असलेल्या केरळ विधानसभेत काँग्रेसचे ६३ आमदार आहेत. - पान ४

सुवेंदू अधिकारी यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ

कोलकात्यातील ब्रिगेड परेड मैदानावर भाजपचे शक्तिप्रदर्शन

पीटीआय, कोलकाता

पश्चिम बंगालमध्ये सत्तेत येण्याचे भाजपचे स्वप्न शनिवारी पूर्ण झाले. सुवेंदू अधिकारी यांनी येथील ऐतिहासिक ब्रिगेड परेड मैदानावर मुख्यमंत्रीपदाची शनिवारी शपथ घेतली. शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह राष्ट्रीय लोकशाही आघाडी शासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते.

राज्यपाल आर.एन.रवी यांनी सुवेंदू यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी जनसमुदायातून 'जय श्री राम' अशी घोषणाबाजी करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यासपीठावर जाण्यापूर्वी वाहनातून खाली उतरत उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये जाऊन अभिवादन केले.

नंदीग्राम आणि भवानीपूर अशा दोन मतदारसंघातून विजयी झालेल्या सुवेंदू अधिकारी यांची शुक्रवारीच भाजप विधिमंडळ नेतेपदी निवड करण्यात आली. अधिकारी यांच्यानंतर पाच मंत्र्यांनी शपथ *(पान ४ वर)*



सुवेंदू अधिकारी यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

ज्येष्ठ कार्यकर्त्याचा सत्कार

शपथविधी सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ९८ वर्षीय भाजप कार्यकर्ते माखनलाल सरकार यांचा सत्कार करत त्यांचे आशीर्वाद घेतले. सरकार यांना १९५२ मध्ये जनसंघाचे संस्थापक श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्यासमवेत काश्मीर येथे तिरंगा फडकावत असताना अटक झाली होती. भाजपच्या स्थापनेनंतर १९८० मध्ये सरकार यांनी पश्चिम दिनाजपूर, जयपायगुडी आणि दार्जिलिंग जिल्ह्यांमध्ये समन्वयक म्हणून काम केले. सलग सात वर्षे ते जिल्हाध्यक्ष होते.

मुख्यमंत्र्यांकडून आढावा : मुख्यमंत्रीपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर सुवेंदू अधिकारी यांनी मुख्य सचिव दुष्यंत नरिला, पोलीस महासंचालक सिद्धार्थनाथ गुप्ता व इतर अधिकाऱ्यांची बैठक घेत कायदा आणि सुव्यवस्थेचा आढावा घेतला. कोलकात्याचे पोलीस आयुक्त अजय नंद हेदेखील बैठकीला उपस्थित होते.

पंजाबच्या उद्योगमंत्र्यांना ईडीकडून अटक

पीटीआय, नवी दिल्ली

आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने शनिवारी पंजाबचे उद्योगमंत्री संजीव अरोरा यांच्या निवासस्थानी छापे टाकले आणि त्यानंतर त्यांना अटक केली.

आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याच्या (पीएमएलए) फौजदारी कलमांखाली गुन्हा दाखल झाल्यानंतर अरोरा यांच्याशी संबंधित असलेल्या काही ठिकाणांवर ईडीने छापे टाकले. अरोरा यांचे शासकीय निवासस्थान, दिल्लीतील दोन ठिकाणे आणि गुरुग्रामच्या उद्योग विहारमधील हॅम्पटन स्काय रियल्टी लिमिटेड नावाच्या कंपनीचा त्यात समावेश होता. अरोरा यांची चौकशी करण्यात आली, मात्र तपासादरम्यान ते असहकार्य करत असल्याने त्यांना अटक करण्यात आल्याचे ईडी अधिकाऱ्यांनी सांगितले.

मान यांच्याकडून निषेध

पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी संगरूर येथे पत्रकार परिषदेत या छाप्यांचा निषेध केला आणि भाजपप्रणीत केंद्र सरकारवर राजकीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ईडी आणि सीबीआयसारख्या यंत्रणांचा 'शस्त्र' म्हणून वापर करत असल्याचा आरोप केला.

फळे पिकवण्यासाठी बनावट इथिलिनचा विषारी खेळ!

उत्तरप्रदेशमध्ये पाच कोटींचा साठा जप्त

महेश बोकडे, लोकसत्ता

नागपूर : देशाच्या वेगवेगळ्या भागात फळे पिकवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या 'इथिलिन रायपनर'च्या नावाखाली कर्करोगजन्य रसायनयुक्त बनावट उत्पादनांची विक्री होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

नागपुरातील कंपनीच्या तक्रारीनंतर पोलिसांनी उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथे कारवाई करत पाच कोटी रुपयांचा बनावट इथिलिनचा साठा जप्त केला. फळे लवकर पिकवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रसायनांबाबत आहारतज्ज्ञांकडून नेहमीच शंका उपस्थित केली जाते. परंतु आता बाजारात बनावट आणि मानवी *(पान ३ वर)*



देशातील काही भागांत आमच्या कंपनीच्या नावाने बनावट रसायन तयार होत असल्याचे आढळले. त्यानंतर २०१९ मध्ये गाझियाबाद, २०२४ मध्ये पाँडिचेरी आणि आता २०२६ मध्ये पुन्हा गाझियाबाद येथे बनावट रसायन तयार करणाऱ्या कारखान्यांवर स्थानिक पोलिसांच्या मदतीने छापे टाकण्यात आले. या प्रकरणांत एकाच कुटुंबातील आरोपी सहभागी आहेत. हे बनावट रसायन मानवी आरोग्यास घातक आहे. - **राजेश सेलारका**, मे. लॉगफ्रेश बायोटेक्नॉलॉजी प्रा. लि., नागपूर

शरद पवार गटाच्या प्रवक्त्यांवर शाईफेक

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर शाईफेक करण्यात आल्याची घटना लोणी काळभोर परिसरातील म्हातोबाची आळंदी गावात शनिवारी घडली. पिस्तुलाच्या धाकाने जिवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची तक्रारही लवांडे यांनी केली. याप्रकरणी लोणी काळभोर पोलिसांकडून १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

विकास लवांडे (वय ५४) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 'लवांडे

शाईफेकीमागील कारण काय?

'मी प्रवचनकार आहे. वारकरी संप्रदायातील कथित घुसखोरांची नावे मी जाहीर केली होती. तेव्हापासून मला धमक्या येत होत्या. मी महाराष्ट्रभर फिरून प्रवचन करतो. गोरक्षकांकडून माझ्या जिवाला धोका आहे. या प्रकरणातील आरोपींना अटक होत नाही, तोपर्यंत मी आंदोलन करणार आहे,' असे विकास लवांडे यांनी सांगितले.

एका दशक्रिया विधीसाठी लोणी काळभोर परिसरातील म्हातोबाची आळंदी *(पान ४ वर)*

साखरसम्राट 'ओंकार' शुगर विरोधात राज्यात रोष

सुहास सरदेशमुख, लोकसत्ता

छत्रपती संभाजीनगर : शेतकऱ्यांच्या उसाचे रास्त व किफायतशीर दर दिल्याचे साखर आयुक्तालयात नोंदवून, विक्रमी गाळपाची जाहिरात करताना 'महाशक्ती' पाठीशी असल्याचे सांगणाऱ्या 'ओंकार शुगर प्रा. लि.' या बाबूराव बोत्रे पाटील यांच्या नेतृत्वातील कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम खरोखर टाकली का, याची आता चौकशी होणार आहे. साखर आयुक्त तानाजी कोलते यांनी या वृत्तास दुजोरा दिला. एका बाजूला ही प्रक्रिया सुरू असतानाच राज्यातील विविध भागातील शेतकऱ्यांचा रोष वाढला असून 'बोत्रे पाटील' यांच्या विरोधात 'एफआरपी'साठी आंदोलने केली जात आहेत.

गाळप हंगाम संपल्यानंतर साखर आयुक्तालयामार्फत रास्त व किफायतशीर दर किती दिला व किती शिल्लक राहिला याचा एक अहवाल केला जातो. या अहवालानुसार *(पान ४ वर)*

'ओंकार शुगर प्रा. लि.' या बाबुराव बोत्रे पाटील यांच्या नेतृत्वातील कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम खरोखर टाकली का, याची चौकशी होणार आहे .



'ओंकार शुगर'चे व्यावस्थापकीय संचालक सोळंके यांनी परळीत आंदोलकांशी चर्चा केली.

गाळपाचे आकडे, अदा केलेली एफआरपी

- **१०४२.६० लाख** मेट्रीक टन ऊस गाळप १५ एप्रिलपर्यंत करण्यात आले.
- **४०,३३९ कोटी** रुपये वाहतूक व तोडणी गृहीत धरून साखर कारखान्यांनी देणे अपेक्षित.
- **३९,७६३ कोटी** रुपये रास्त आणि किफायतशीर दराची किंमत
- **३९,०३६ कोटी** रुपये वाहतूक व तोडणीसह अदा केलेली देयके
- **१३०३ कोटी :** उर्वरित ऊस देयक
- **९६.७७ टक्के :** एकूण एफआरपीच्या अदा केलेली रकमेचे शेकडा प्रमाण :
- **११३ कारखान्यांनी** शंभर टक्के रक्कम अदा केली आहे.
- **८० ते ९९ टक्के** ऊस देयके अदा केलेल्या साखर कारखान्यांची संख्या ७७ आहे.


मध्य प्रदेशातील पाच वाघांच्या मृत्यूनंतर दक्षतेच्या सूचना

व्याघ्रसंवर्धन व्यवस्थेबाबत धोक्याची घंटा

राखी चव्हाण, लोकसत्ता

नागपूर : मध्य प्रदेशातील कान्हा व्याघ्रप्रकल्प परिसरात 'कॅनाईन डिस्टेंपर' विषाणूमुळे पाच वाघांचा मृत्यू झाल्यानंतर देशातील व्याघ्रसंवर्धन व्यवस्थेबाबत धोक्याची घंटा वाजली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय व्याघ्रसंवर्धन प्राधिकरणने (एनटीसीए) देशभरातील सर्व व्याघ्रप्रकल्पांसाठी सतर्कतेच्या नव्या सूचना प्रसिद्ध करत प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविण्याचे आदेश दिले.

मध्य प्रदेशातील सरही वनपरिक्षेत्रात वाघीण आणि एका बछड्यात असामान्य हालचाली आढळल्यानंतर त्यांना तातडीने उपचारांसाठी ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर नमुने जबलपूर येथील 'स्कूल ऑफ वाइल्डलाइफ फॉरेन्सिक *(पान ४ वर)*



यापूर्वीच्या घटना

गुजरातमधील गीर अभयारण्यात २०१८ साली 'कॅनाईन डिस्टेंपर'या विषाणुमुळे २७ सिंहांचा मृत्यू झाल्याचे प्रसिद्ध करण्यात आले. प्रत्यक्षात हा आकडा खूप जास्त असल्याचे भारतीय वनसेवेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्यानी सांगितले. मध्य प्रदेशातील पन्ना व्याघ्रप्रकल्पात २०१५ मध्ये याच विषाणूमुळे एका वाघिणीचा मृत्यू झाला. तर २०१२ ते २०१७ दरम्यान भारतीय पशुवैद्यकीय संशोधन संस्थेने तपासलेल्या नमुन्यांमध्ये ११ वाघ, १७ बिबट आणि ५४ सिंहांना या विषाणूची लागण झाल्याचे स्पष्ट झाले होते.

सोमनाथ : अखंड श्रद्धेचे महापर्व

– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री



सोमनाथ मंदिर भारतातील केवळ एक प्राचीन मंदिर नसून भारताच्या अभेद्य संस्कृतीचे आणि धैर्याचे मूर्तिमंत प्रतीक. अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर उभे असलेले हे ज्योतिर्लिंग केवळ श्रद्धेचे केंद्र नाही, तर आक्रमण, पुनर्बांधणी, आत्मसन्मान, राज्यकारभार आणि राष्ट्रीय पुनर्जागरण असा इतिहास आणि वर्तमान आहे. २०२६ मध्ये आपण साजरे करीत असलेले 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' हे नव्या पिढीसमोर आत्मविश्वासाने, अभिमानाने आणि संतुलित भावनेने मांडणारा वळणबिंदू आहे.

१०२६ मध्ये गझनीने सोमनाथवर सर्वप्रथम आक्रमण केले. हे आक्रमण धर्मयुद्ध तर होतेच, पण ती व्यापारमार्ग आणि सोमनाथमध्ये असलेल्या संपत्तीवर लक्ष केंद्रीत करणारी आक्रमक कारवाईसुद्धा होती. गुजरातच्या गीर सोमनाथ जिल्ह्याच्या वेरावलजवळील त्या काळी पश्चिम किनारपट्टीवरील महत्त्वाचे बंदर होते, प्रभास पाटण. याच प्रभास पाटण येथे सोमनाथ मंदिर होते. हे मंदिर फोडणे म्हणजे संपूर्ण व्यवस्था नष्ट करणे होते.

औरंगजेबाच्या १७०६च्या आदेशानंतर, सोमनाथवर अनेक वेळा आक्रमण करण्यात आले, मूर्ती फोडल्या गेल्या. पण एवढे होऊनही सोमनाथ यात्रेचा मार्ग नष्ट झाला नाही आणि त्यावरील श्रद्धाही कमी झाली नाही. सोमनाथचा इतिहास प्रतिकार आणि पुनरुत्थान दोन्हींचा एकत्रित इतिहास आहे.

सोमनाथ-महाराष्ट्राचे नाते

सोमनाथ आणि महाराष्ट्राचे नाते इतिहासाने जोडलेले आहे. अलाउद्दीन खिलजीसारखे आक्रमक गुजरातकडे सरकले आणि सौराष्ट्र-सोमनाथवर हल्ले करणे त्यांच्यासाठी सोपे झाले. महाराष्ट्रातील राजनीतिक स्थैर्य कोसळले की पश्चिम किनाऱ्याला धोका वाढतो, हा पहिला ऐतिहासिक धडा येथेच दिसून आला. शिवरायांनी उभारलेले हिंदवी स्वराज्य, नंतर छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज, महाराणी ताराबाई यांच्या संघर्षातून टिकून राहिले. पुढे पेशवाईच्या काळात या स्वराज्याने दक्षिण ओलांडून उत्तर-पश्चिम भारतापर्यंत पाय रोवले. मराठा फौजा कृष्णा-गोदावरी पार करत गुजरातकडे गेल्या आणि काही दशकांतच काठियावाड परिसरातील मोगल सामर्थ्य जवळजवळ निष्प्रभ झाले. या बदलत्या शक्तीसंतुलनात सोमनाथ पुन्हा भारतीय राजसत्तेच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली आले.

जेव्हा सोमनाथ ब्रिटिश राजवटीच्या अधिपत्याखाली गेले...

ईस्ट इंडिया कंपनीने १९ व्या शतकात मराठा साम्राज्य मोडीत काढण्यास सुरुवात केली, तेव्हा सोमनाथ परिसरातील देवस्थान जमिनी आणि महसूल हा करारांमधील महत्त्वाचा मुद्दा बनला. गायकवाड आणि कंपनी सरकार यांच्यात जो काही तह, करार झाला, त्यात या प्रदेशातील धार्मिक जागा आणि त्यांचे महसुली हक्क यावर अनेक कलमे लावली होती. शेवटी महसुली नियंत्रण कंपनीकडे गेले. प्रतीकात्मकदृष्ट्या पाहिले तर, सोमनाथ मराठा राजवटीकडून ब्रिटिश राजवटीकडे गेले.



मराठा साम्राज्य आणि सोमनाथ : श्रद्धा, सत्ता आणि नेतृत्व!

मराठा साम्राज्याचा सोमनाथशी संबंध सांस्कृतिक, आर्थिक आणि सामरिक या तीन स्तरांवर आहे. सांस्कृतिक स्तरावर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर हा सर्वात मोठा अध्याय. इंदूरच्या होळकर घराण्याची ही राणी, जी महाराष्ट्रातील मराठा राजवटीचा भाग होती, त्यांनी १७८३मध्ये सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराचा निर्णय घेतला. जवळपास शतकभर भग्नावस्थेत असलेले हे मंदिर त्यांनी स्वतःच्या खजिन्यातून पुन्हा उभे केले. इतकेच नव्हे, समुद्र लाटांच्या धक्क्यांपासून, तसेच भविष्यातील नौदल गोळीबारापासून संरक्षण मिळावे, म्हणून नवीन मंदिर थोडे आतल्या बाजूला उभे केले. यातून होळकर यांचे दूरदर्शी नेतृत्व दिसून येते.

स्वातंत्र्योत्तर भारत आणि २०२६चे स्वाभिमान पर्व!

स्वातंत्र्यानंतर भारताने हा सर्व इतिहास लक्षात घेऊन काम करणे सुरू केले. जुनागढ भारतात समाविष्ट झाल्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी सोमनाथ पुनर्बांधणीचा संकल्प घेतला. हा संकल्प केवळ धार्मिक नव्हता, तर राष्ट्रीय स्वाभिमानाचा होता. पंडित नेहरू, महात्मा गांधी यांचा मात्र याबाबत वेगळा दृष्टिकोन होता. राज्याने थेट मंदिराशी ओळख जोडू नये, धर्मनिरपेक्ष चौकट राखावी, हा त्यांचा आग्रह होता. के. एम. मुन्शी आणि सरदार पटेल यांनी मात्र भारतीय राज्य धर्मनिरपेक्ष राहील, पण जुन्या स्मृती कायम ठेऊन, असे स्पष्ट केले होते. १९५१ मध्ये उभे राहिलेले आधुनिक सोमनाथ मंदिर हा त्याचाच परिपाक होते.

२०२६ मध्ये सोमनाथ स्वाभिमान पर्वाने याला नवा अर्थ दिला आहे. ८ ते ११ जानेवारी २०२६ दरम्यान विविध धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम, अखंड मंत्रजप, व्याख्यानमाला, प्रदर्शने आणि यात्रांमधून एकच संदेश दिला गेला आणि तो म्हणजे भारताला कोणीही कितीही वेळा तोडण्याचा प्रयत्न केला, तरी त्याचा आत्मा टिकून राहतो.

या सर्व प्रक्रियेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सहभाग आणि नेतृत्व विशेष उल्लेखनीय आहे. पंतप्रधान मोदी यांनी १०-११ जानेवारीला सोमनाथ येथे जाऊन या पर्वात थेट सहभाग घेतला, कार्यक्रमांना संबोधित केले. सोमनाथ स्वाभिमान पर्वाने आपल्याला पुन्हा आठवण करून दिली, की इतिहास हे फक्त हिशेब मांडणारे पुस्तक नाही; तो राष्ट्राचा सामूहिक मानस आहे.

महमूद आणि औरंगजेबापासून, अहिल्याबाई आणि गायकवाडांपासून, पटेल-मुन्शी ते थेट आजच्या नेतृत्वापर्यंत. सोमनाथच्या घंटानादात आजही एकच ध्वनी घुमतो आणि तो म्हणजे आक्रमण होऊ शकतात, सत्ताबदल होऊ शकतात, वाद होऊ शकतात; पण जो समाज आपल्या स्मृतीचा, श्रद्धेचा आणि स्वाभिमानाचा धागा तुटू देत नाही, त्याला इतिहास संपवू शकत नाही. २०२६ चे स्वाभिमान पर्व ही त्या अढळ सत्याची, हजार वर्षे चाललेल्या भारतीय जिद्दीची घोषणा आहे. आणि भारताच्या नेतृत्वाने ती जाणीवपूर्वक, सन्मानाने आणि उत्तरदायित्त्वाने देशासमोर मांडली, यासाठी पंतप्रधान मोदी यांचे अभिनंदन करावेच लागेल.



महापारेषण जनसंपर्क विभागाला 'आयएसओ'

मुंबई : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट कामांबद्दल आयएसओ नामांकन मिळाले आहे. जनसंपर्क विभागामध्ये महाराष्ट्रात 'आयएसओ' नामांकन मिळविणारा हा पहिला विभाग ठरला आहे. जनसंपर्क क्षेत्रात तब्बल १५ पुरस्कार पटकाविण्याचा विक्रमही महापारेषणच्या जनसंपर्क विभागाच्या नावावर आहे. भविष्यात जनसंपर्क विभाग सातत्यपूर्ण अभिनव कामगिरी करून महापारेषणचे नाव उंचावेल, असा विश्वास महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी व्यक्त केला.

दिनदर्शिका

रविवार, १० मे २०२६

भारतीय सौर १० वैशाख शके १९४८
मिती वैशाख
कृष्णपक्ष १५ : ०७ पर्यंत.
नक्षत्र : धनिष्ठा २४ : ५० पर्यंत.
चंद्र : मकर १२ : १३ पर्यंत.
सूर्योदय : ०६ : ०८
सूर्यास्त : १९ : ०३

- **मेष :** नातेसंबंध सुधारतील.
- **वृषभ :** कामात वेळ जाईल.
- **मिथुन :** द्विधारनंतर उत्साह वाढेल.
- **कर्क :** कामे सकाळीच उरका.
- **सिंह :** प्रयोग करणे टाळा.
- **कन्या :** धाडसी निर्णय घेऊ नका.
- **तूळ :** समीकरण जुळून येईल.
- **वृश्चिक :** करार पूर्ण होतील.
- **धनू :** जबाबदारी वाढेल.
- **मकर :** गुंतवणूक कराल.
- **कुंभ :** द्विधारनंतर दिवस शुभ.
- **मीन :** वादग्रस्त विषय टाळा.

शुभ राशी : मेष, मकर



भारतीय वनसेवा परीक्षेमध्ये मराठी टक्क्यात वाढ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या भारतीय वनसेवा परीक्षेचा निकाल शुक्रवारी रात्री जाहीर करण्यात आला. २०२५च्या अंतिम निकालात महाराष्ट्राने यंदाही ठसा उमटवला आहे. राज्यातील तब्बल २० उमेदवारांनी यश मिळवले असून, गेल्या काही वर्षांत भारतीय वनसेवेत मराठी अधिकाऱ्यांची वाढती उपस्थिती पुन्हा अधोरेखित झाली.

देशभरातून एकूण १४८ उमेदवारांची भारतीय वनसेवेसाठी निवड करण्यात आली आहे. लेखी परीक्षा नोव्हेंबर २०२५ मध्ये घेण्यात आली होती, तर एप्रिल २०२६ मध्ये व्यक्तिमत्त्व चाचणी पार पडली. केंद्र सरकारने भारतीय वनसेवेसाठी १५० रिक्त पदांची माहिती आयोगाला दिली होती. त्यापैकी १४८ उमेदवारांची अंतिम शिफारस करण्यात आली. दोन जागा पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने रिक्त ठेवण्यात आल्या आहेत.

बसवराज केंपावाड यांनी देशात प्रथम क्रमांक मिळवला असून अंशुमान कुमार सिंह आणि सिद्धार्थ यांनी अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान पटकावले. महाराष्ट्रातील यशस्वी उमेदवारांमध्ये निखिल लक्ष्मणराव जोशी, सुमती यशवंत कदम, सुशांत उत्तम वडावकर, मोहिनी अशोक जाधव, सोहम नामदेव शेंडे, शुभम जयसिंग पाटील, विनायक शंकर धुमाळ, अक्षय विजय बार्हे, रोहित संजय पवार, अक्षय हरिभाऊ पवार, अभिषेक योगिराज काटे, कबीर राहुल कांबळे आणि सारंग रामदास असवार आदींचा समावेश आहे.

'व्हॉट्सॲप समूहा'तून मार्गदर्शन

गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय पोलीस सेवा, भारतीय वनसेवा, भारतीय प्रशासकीय सेवेतील अनेक आजी-माजी अधिकारी उमेदवारांकडून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करून घेत आहेत. त्यांनी 'व्हॉट्सॲप समूह' तयार केला आहे. यात भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी महेश भागवत, भारतीय वनसेवेतील सेवानिवृत्त अधिकारी सुनील लिमये, महाराष्ट्रातील उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर, अहमदाबाद येथील भारतीय महसूल सेवेतील नितीश पाथोडे, भारतीय वनसेवेतील अधिकारी उदय आव्हाड, मध्यप्रदेशातील भारतीय वनसेवेतील अधिकारी श्रेयस श्रीवास्तव, ज्ञान प्रबोधिनीचे विवेक कुळकर्णी यांचा समावेश आहे.


> दरवर्षी पहिल्या पाचमध्ये महाराष्ट्रातील उमेदवाराचा समावेश असतो. यावेळी तो नाही, पण भारतीय वनसेवा परीक्षेत यश मिळवणाऱ्या मराठी उमेदवारांचे प्रमाण नक्कीच वाढले आहे. एकूण उत्तीर्ण उमेदवारांपैकी सुमारे १५ टक्के उमेदवार मराठी आहेत. आम्ही करून घेत असलेल्या मुलाखतीचा सकारात्मक परिणाम होत असल्याचा आनंद आहे.
>
> – **महेश भागवत,** पोलीस महासंचालक, तेलंगणा.

> महाराष्ट्रातील २० उमेदवार भारतीय वनसेवेत आले याचा आनंद आहे. जंगल, वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनासाठी त्यांनी मनापासून काम करावे, एवढीच अपेक्षा. शेवटपर्यंत त्यांनी जनतेचे सेवक म्हणूनच काम करावे, असाच आमचा सल्ला राहील.
>
> – **सुनील लिमये,** सेवानिवृत्त प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक

प्रस्तुत

लोकसत्ता मार्ग यशाचा



डिजिटल गेमिंगचे अद्भूत विश्व

भारतातील गेमिंग क्षेत्र आता केवळ खेळण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. या क्षेत्रात करिअरच्या विपुल संधी निर्माण झाल्या आहेत. तरुण डेव्हलपर्स या क्षेत्रात नवनवीन प्रयोग करत करताना दिसतात. गेमिंगच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर भारताचे नाव उंचावण्यात यांचा मोठा हातभार लागतोय. हे डेव्हलपर्स स्वतःच्या कल्पकतेने, 'युनिटी' आणि 'अनरिअल इंजिन' सारख्या प्रगत सॉफ्टवेअर्सचा सुलभतेने वापर करून उच्च दर्जाचे ग्राफिक्स आणि गेम्स विकसित करतात. या नव्या डेव्हलपर्सचे वैशिष्ट्य म्हणजे ते भारतीय पौराणिक कथा, स्थानिक लोककथा आणि भारतीय पात्रांचा आपल्या गेम्समध्ये सर्जनशीलतेने समावेश करतात. अशा गेम्सना जागतिक बाजारपेठेत मोठी पसंती मिळताना दिसते.

या डेव्हलपर्सनी पारंपरिक मनोरंजनाच्या चौकटी मोडून गेमिंगला एक प्रगल्भ व्यावसायिक स्वरुप प्राप्त करुन दिलेय. अशाच काही प्रतिभावंतांनी काही महिन्यांपूर्वी झालेल्या **'एक्सबॉक्स गेम कॅम्प एशिया'** या उपक्रमात आपल्या नव्या गेम्सनी उपस्थितांना आश्चर्यचकित करुन सोडले. हा उपक्रम मायक्रोसॉफ्ट एक्सबॉक्सने आयोजित केला होता. या उपक्रमात भारत, सिंगापूर, मलेशिया यांसारख्या देशांतील तरुणांनी भाग घेतला.

भारतात गेमिंग स्टार्टअप्सची संख्या झपाट्याने वाढताना दिसते. बंगळुरू, पुणे आणि हैदराबाद ही शहरे गेम डेव्हलपमेंटची प्रमुख केंद्रे म्हणून नावारुपाला आली आहेत. गेल्या काही वर्षांत 'गेम खेळणाऱ्या देशापासून' 'गेम निर्मितीतील सर्जनशील देशापर्यंत' भारताने विस्मयकारक प्रगती केली आहे. डिजिटल क्रांती आणि स्वस्त इंटरनेटमुळे हे क्षेत्र आता एक प्रतिष्ठित आणि उच्च वेतनश्रेणीचे करिअर क्षेत्र बनले आहे.

भारतात सध्या ९०० पेक्षा जास्त गेमिंग कंपन्या कार्यरत आहेत. 'ई-स्पोर्ट्स' आणि 'फॅन्टसी गेम्स'च्या वाढत्या लोकप्रियतेमुळे या बाजारपेठेचा आकार अब्जावधी डॉलर्सवर पोहोचलाय. भारत आता जगातील सर्वात मोठी गेमिंग बाजारपेठ मानली जाते. जागतिक कंपन्या त्यांचे 'डेव्हलपमेंट सेंटर्स' भारतात उभारत असल्याने २०२६ मध्ये या क्षेत्रात रोजगाराच्या विपुल संधी निर्माण होण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवलीय.

चित्रकला, कथाकथन (स्टोरीटेलिंग), कोडिंग किंवा गणिताची आवड असणारे विद्यार्थी या क्षेत्रात उत्तम करिअर करु शकतात. 'नित्यूनतन आभासी (व्हर्च्युअल वर्ल्ड) जगाची निर्मिती करण्यात रस आणि तांत्रिक कौशल्ये' या दोन गुणांच्या बळावर या क्षेत्रात यश मिळणे सुलभ जाते.

या क्षेत्रात यश मिळवण्यासाठी मुलभूत गणिताच्या संकल्पना सुस्पष्ट असल्यास कोडिंग सोपे जाऊ शकते. मात्र गेमिंगचे डिझाइन (अभिकल्प) आणि आर्ट (कला) या क्षेत्रातील करिअर कोणत्याही ज्ञानशाखेचे विद्यार्थी करु शकतात.

या क्षेत्रात येण्यासाठी पुढील काही तंत्रकौशल्य आत्मसात केल्यास संधी लवकर मिळू शकते-

(१) सी प्लस प्लस, जावा यासारख्या प्रोग्रॅमिंग भाषा
(२) युनिटी थ्रीडी किंवा अनरिअल इंजिनचे ज्ञान
(३) पात्रांची रचना, संहिता लिहिणे आणि व्हिज्युअल इफेक्ट्स
(४) तार्किक कारणमीमांसा करण्याचे कौशल्य, सांघिक कार्याची सवय.

अभ्यासक्रम आणि शिक्षण संस्था

(१) नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन (एनआयडी) मधील बॅचलर ऑफ डिझाइन इन **'ॲनिमेशन फिल्म डिझाइन'** हा एक महत्त्वाचा अभ्यासक्रम. चित्रकलेतून कथा सांगण्याचे आणि धावत्या चित्रांच्या (मूव्हिंग इमेजेस) माध्यमातून विद्यार्थ्यांना गोष्ट सांगण्याचे आणि विद्यार्थ्यांना भारतीय उपखंडातील कथा सांगण्याची परंपरा, विविध कलाप्रकार आणि संगीत-ध्वनी यांचा सुयोग्य वापराचे तंत्र शिकवले जाते. पारंपारिक चित्रकला आणि ॲनिमेशनच्या मूलभूत कौशल्यांची सांगड घातली जाते. अत्याधुनिक डिजिटल ॲनिमेशनच्या तंत्रकौशल्याचे ज्ञान प्रदान केले जाते. यामुळे विद्यार्थी मूळ ॲनिमेशन कलाकृती आणि ग्रॅफिक कादंबऱ्यांची निर्मिती करू शकतात. हा अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना चित्रपट निर्मिती संस्था, दूरचित्रवाहिन्या, स्वतंत्र ॲनिमेशन आणि गेमिंग स्टुडिओ, युझर इंटरफेस/ युझर एक्सपिरिअंस (वापरकर्ता अनुभव डिझाइन) आणि ई-लर्निंग कंपन्या, यामध्ये रोजगाराच्या संधी मिळतात. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या काही विद्यार्थ्यांनी स्वतःचे स्टुडिओ सुरू केले आहेत.

या अभ्यासक्रमाचा कालावधी चार वर्षांचा आहे. कला, वाणिज्य, मानव्यशास्त्र, विज्ञान अशासारख्या कोणत्याही शाखेतील १२ उत्तीर्ण विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम करता येतो. यासाठी गुणांची कोणतीही अट ठेवण्यात आलेली नाही. तंत्रशिक्षण मंडळाचा १० वीनंतरचा तीन वर्षे कालावधीचा, शासन मान्यताप्राप्त संस्थेतून पदविका अभ्यासक्रम आणि एचएससी व्होकेशनल अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांनाही या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळू शकतो.

(२) एनआयडी मधील मास्टर ऑफ डिझाइन इन 'टॉय अँड गेम डिझाइन' हा अभ्यासक्रम 'खेळ' (प्ले) या संकल्पनेवर भर देतो. शिक्षण, मनोरंजन आणि मानवी विकास या क्षेत्रांतील गरजा आणि संधी लक्षात घेऊन हे खेळ तयार केले जातात. हा विषय डिझाईनच्या विविध ज्ञानशाखांना एकत्र आणतो. त्याद्वारे खेळाच्या सर्जनशील वापरातून



वेगवेगळ्या समस्यांवरील उपाय शोधणे शक्य होते. सध्या 'खेळ' या संकल्पनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. त्यामुळे खेळणी, खेळ आणि 'गेमिफिकेशन' (खेळाचे तंत्र) यांचा वापर आता शिक्षण, तंत्रज्ञान, कॉर्पोरेट क्षेत्र, आरोग्य सेवा आणि हस्तकला अशा विविध क्षेत्रांत वाढला आहे.

या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या प्रकल्पांवर काम करण्यास प्रोत्साहन दिले जाते. यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश होतो-

(१) **डिजिटल आणि बोर्ड गेम्स** – संगणकावरील खेळ
(२) **खेळणी आणि खेळण्याच्या जागा** – नाविन्यपूर्ण खेळणी आणि मुलांसाठी खेळण्याच्या जागांची निर्मिती
(३) **शैक्षणिक साहित्य**– शिक्षणासाठी उपयुक्त खेळकर साधने
(४) **परस्परसंवादी अनुभव**– तंत्रज्ञानाचा वापर करून अनुभव देणारे प्रकल्प
(५) **क्रीडा साहित्य** – खेळांसाठी लागणारी उपकरणे. हा अभ्यासक्रम गांधीनगर कॅम्पसमध्ये करता येतो

(३) एनआयडी मधील मास्टर ऑफ डिझाइन इन डिजिटल गेम डिझाइन हा विषय संगणकशास्त्र, ललित कला आणि सामाजिक व मानवी वर्तनशास्त्राचा मेळ घालतो. विद्यार्थ्यांचे संवाद कौशल्य, सांघिक काम करण्याची वृत्ती आणि सर्जनशील विचार करण्याच्या क्षमतेवर विशेष भर दिला जातो.

<u>हा अभ्यासक्रम पुढील कौशल्ये विकसित करतो</u>

(१) **डिजिटल आर्ट्स आणि मीडिया**– डिजिटल माध्यमातून कलाकृती तयार करणे
(२) **खेळांचा इतिहास आणि सिद्धांत** – खेळांची रचना आणि त्यामागील विचार
(३) **टूडी आणि थ्री डी ग्रॅफिक्स** – द्विमितीय आणि त्रिमितीय चित्रे व मॉडेल्स तयार करणे
(४) **स्टोरीटेलिंग (कथा सांगण्याची कला)**– खेळातील पात्रांची मांडणी आणि कथेची गुंफण.

या क्षेत्रातील तज्ज्ञ गेम डिझाइनर्स आणि कलाकारांकडून मार्गदर्शन मिळते. ऑनलाइन आणि इंटरनेट-आधारित मल्टिप्लेयर (बहुखेळाडू) गेम्स, शैक्षणिक आणि धोरणात्मक गेम्स, डिजिटल रेंडरिंग, लेखन, संगीत आणि ध्वनीनिर्मिती, तसेच युजर-इंटरफेस डिझाइन या विषयांचे शिक्षण दिले जाते. हा अभ्यासक्रम गेम निर्मिती सोबतच गेम मॉनेटायझेशन (खेळातून उत्पन्न) वर लक्ष केंद्रित करतो. डिझाईन संशोधनाच्या वाटाही दाखवतो. गेम डिझाइन स्टुडिओचे कार्य, या उद्योगातील व्यवसाय प्रारूप आणि स्वतंत्रपणे काम करणाऱ्या डेव्हलपर्सचे या क्षेत्रातील योगदान या विषयांचे ज्ञान विद्यार्थ्यांना प्रदान केले जाते.

हा अभ्यासक्रम गांधीनगर कॅम्पसमध्ये करता येतो. एनआयडीतील दोन्ही पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम कोणत्याही विद्याशाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी करु शकतात. यासाठी कोणत्याही गुणांची अट ठेवण्यात आलेली नाही.

(४) एमआयटी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन – पुणे, या संस्थेत गेम डिझाइन या विषयातील बॅचलर ऑफ डिझाइन हा अभ्यासक्रम करता येतो. या अभ्यासक्रमात गेम आर्ट, डिझाइन आणि प्रोडक्शन (निर्मिती) आणि प्रोग्रामिंग हे विषय शिकवले जातात. कॉन्सेप्ट डिझाइन, एन्व्हायरमेंटल डिझाइन, टू डी आर्ट, थ्री डी आर्ट, स्टॉरेटेजी (व्यूहरचना), गेम सायकॉलॉजी (मानसशास्त्र), लेव्हल डिझाइन आणि प्रोग्रामिंग यांचे ज्ञान प्रदान केले जाते.

संपर्क संकेतस्थळ : www. mitid. edu. in

(५) आयसीएटी डिझाइन अँड मीडिया कॉलेज, चेन्नई/ बंगळुरू/ हैदराबाद – ही संस्था या क्षेत्रात १९९५ सालापासून शिक्षण-प्रशिक्षण देत आहे.

अभ्यासक्रम –

(१) **पदवीस्तरीय**– गेम ॲण्ड आर्ट डिझाइन, गेम डिझाइन ॲण्ड डेव्हलपमेंट, गेम प्रोग्रॅमिंग. या सर्व अभ्यासक्रमांचा कालावधी प्रत्येकी चार वर्षे
(२) **पदव्युत्तर पदवी**– गेम टेक्नॉलॉजी. या अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षे.
(३) **एक वर्ष कालावधीचे प्रोफेशनल पोस्ट ग्रॅज्युएट अभ्यासक्रम**– गेम टेक्नॉलॉजी, ग्रेम प्रोग्रॅमिंग आणि गेम डिझाइन या विषयात करता येतात.

संकेतस्थळ : www. icat. ac. in

– सुरेश वांदिले

प्रथिनांसह कर्बोदकेही शरीरासाठी आवश्यक

आरोग्य वार्ता

मुंबई : उच्च-प्रथिनेयुक्त आहार दीर्घकालीन आरोग्याची खात्री देऊ शकत नाही. म्हणूनच शरीरातील प्रथिनांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी त्यांची कर्बोदकांबरोबर सांगड घालणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

प्रथिने मुळातच भूक शमवण्यासाठी असतात, ज्यामुळे कॅलरीच्या सेवनात नैसर्गिक घट होते. तसेच, फॅट्स किंवा कर्बोदकांच्या तुलनेत प्रथिने पचवण्यासाठी शरीराला अधिक ऊर्जा खर्च करावी लागते. यामुळेच सहसा उच्च-प्रथिनेयुक्त आहार आणि जलद वजन कमी होणे यांचा संबंध जोडला जातो. परंतु प्रथिनांबरोबर कर्बोदके आणि निरोगी फॅट्सची सांगड घालणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे रक्तातील साखर स्थिर राहण्यास मदत होते आणि पोट जास्त काळ भरलेले राहते, असे तज्ज्ञांनी सांगितले. जर एखादी व्यक्ती उच्च-प्रथिनेयुक्त आहारावर असेल, तर कर्बोदकांचे सेवन अधिक महत्त्वाचे ठरते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शरीरासाठी कमीत कमी प्रक्रिया केलेली आणि सकस कर्बोदके नेहमीच फायदेशीर ठरतात. ज्या कर्बोदकांवर अति-प्रक्रिया केलेली असते आणि ज्यातून कोणतेही पोषण मिळत नाही, त्यांचे सेवन कमीत कमी करावे, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला. त्यासाठी भरपूर फळे आणि भाज्या यांचा समावेश असलेला संतुलित आहार घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

संशोधनानुसार, प्रत्येक जेवणात सुमारे ०.३ - ०.४ ग्रॅम/किलो (बहुतेक प्रौढांसाठी साधारण २०-४० ग्रॅम) प्रथिने स्नायूंच्या संश्लेषणास चालना देतात. दिवसभर प्रथिनांचे सेवन समान रीतीने विभागणे आवश्यक आहे, असे आरोग्य तज्ज्ञांनी सांगितले.





आता भारत सरकार, रेल्वे नावाने सातबारा

महसूल अभिलेखांतील त्रुटी, वाद दूर करण्यासाठी निर्णय

नागपूर : रेल्वे जमिनींच्या मालकीबाबत महसूल अभिलेखांतील त्रुटी, अतिक्रमणे व वाद दूर करण्यासाठी राज्य सरकारने मूळ सर्वेक्षण नकाशे व भू-अभिलेखांची पडताळणी करून 'भारत सरकार, रेल्वे' या नावाने स्वतंत्र सातबारा उतारे तयार करण्याचा निर्णय घेतला. शासनाच्या महसूल व वन विभागाने ७ मे २०२६ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे.

रेल्वे मार्ग, स्थानके आणि रेल्वेच्या मालकीच्या जमिनी महसूल अभिलेखांमध्ये नियमित करण्यात येणार आहेत. गेल्या काही वर्षांत रेल्वे विस्तार, अतिरिक्त मार्ग आणि विविध पायाभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणावर खासगी जमिनींचे संपादन करण्यात आले. मात्र, या संपादनाच्या नोंदी महसूल अभिलेखांमध्ये वेळेवर अद्ययावत झाल्या नाहीत. त्यामुळे अनेक रेल्वे जमिनी ग्राम नमुना क्रमांक ७/१२, मालमत्ता पत्रिका आणि ग्राम नकाशांमध्ये योग्य मालकी हक्कांशिवाय नोंदवल्या गेल्या आहेत.

अनेक ठिकाणी रेल्वेच्या जमिनी रस्ते, पायवाटा किंवा इतर वापरांसाठी दर्शविण्यात आल्याने मालकी हक्कांबाबत गोंधळ निर्माण झाला आहे. परिणामी अतिक्रमणे, न्यायालयीन वाद आणि अनधिकृत ताब्यांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. मूळ सर्वेक्षण नकाशे आणि भू-अभिलेखांची पडताळणी करून 'भारत सरकार, रेल्वे' या नावाने स्वतंत्र सातबारा उतारे तयार केले जाणार आहेत. आवश्यक त्या ठिकाणी स्वतंत्र सर्वेक्षण क्रमांक, गट क्रमांक आणि शहर सर्वेक्षण क्रमांक देण्यात येतील. शहरी भागांमध्ये रेल्वे स्थानके, रेल्वेमार्ग आणि इतर रेल्वे मालमत्तांसाठी स्वतंत्र मालमत्ता पत्रिका उघडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सातबाऱ्यातील बदल अद्ययावत

सातबारा दुरुस्ती मोहीम रेल्वे विस्तारासाठी संपादित केलेल्या जमिनींच्या नोंदी महसूल अभिलेखांमध्ये नव्याने समाविष्ट केल्या जातील. ज्या ठिकाणी सातबाऱ्यावर बदल नोंदवले गेले नाहीत, ते तातडीने अद्ययावत केले जाणार आहेत. रस्ते किंवा पायवाटा म्हणून चुकीने वर्गीकृत झालेल्या रेल्वे जमिनींच्या नोंदी योग्य पडताळणीनंतर दुरुस्त केल्या जातील. जुन्या नकाशांतील ठिपक्यांच्या सीमांऐवजी स्पष्ट आणि कायमस्वरूपी सीमांकन करण्याची प्रक्रियाही राबवली जाणार आहे.

सुमारे १५० वर्षांपासून राज्यात रेल्वे धावते आहे. त्या काळापासून रेल्वेच्या जमिनींच्या नोंदी अस्तित्वात आहेत. त्या नोंदी आता अद्ययावत केल्या जाणार आहेत.
- अमन मित्तल, वरिष्ठ विभागीय वाणिज्य अधिकारी

सहा हजार कोटींची सरकारी जमीन खासगी विकासकांच्या घशात

मीरा-भाईंदर जमीन प्रकरणावरून वडेट्टीवार यांची सरकारवर टीका

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : मीरा-भाईंदर येथील सुमारे सहा हजार कोटी रुपयांची सुमारे २५४.८८ एकर जमीन खासगी कंपन्यांच्या नावे करण्यासाठी संगनमताने प्रयत्न झाल्याचा आरोप काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी शुक्रवारी नागपूर येथे पत्रकार परिषदेत केला.

ठाणे जिल्ह्यातील ही जमीन मूळतः मिठागरांसाठी वापरात होती आणि राज्य सरकारच्या मालकीची होती. मात्र १९४८ पासून या जमिनीच्या अभिलेखात वारंवार फेरफार करण्यात आले. त्यानंतर 'मीरा रिअल इस्टेट डेव्हलपमेंट' आणि अन्य संबंधित कंपन्यांनी मालकी हक्काचा दावा करत जमीन आपल्या नावे करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये सुमारे १८९ एकर जमीन एका कंपनीच्या, तर ६५ एकर जमीन दुसऱ्या कंपनीच्या नावे दाखविण्यात आल्याचा दावा वडेट्टीवार यांनी केला.

या प्रकरणात ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी १८ नोव्हेंबर २००२ रोजी संबंधित कंपन्यांचा दावा फेटाळून जमीन महाराष्ट्र सरकारकडे वर्ग करण्याचे आदेश दिले होते. मात्र, त्यानंतर कोकण विभागीय आयुक्तांनी ८ ऑक्टोबर २०१० रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाविरुद्ध निर्णय देत संबंधित कंपनीच्या बाजूने निकाल दिला. या निर्णयानंतर प्रकरण न्यायालयात गेले.

मुंबई उच्च न्यायालयाने ३० एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या निकालात केंद्र सरकारचे अपील फेटाळून ही जमीन 'मीरा सॉल्ट वर्क्स'च्या मालकीची असल्याचे मान्य केले. या निर्णयावर आक्षेप घेत वडेट्टीवार यांनी राज्य सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सरकारी वकील झोपले होते का? सरकारने सक्षम वकील नेमून न्यायालयात भक्कम बाजू मांडली असती, तर निकाल खासगी कंपनीच्या बाजूने लागला नसता, असे ते म्हणाले.

राज्य सरकारने जाणीवपूर्वक वेळकाढूपणा केल्याने सरकारी जमीन खासगी विकासकांच्या घशात घालण्याचा प्रयत्न झाला, असा आरोपही त्यांनी केला. राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत असताना जनतेची संपत्ती वाचवण्याऐवजी सरकार विकासकांना फायदा करून देत आहे. या प्रकरणात सरकारची भूमिका संशयास्पद आहे, असेही ते म्हणाले.

...अन्यथा काँग्रेस सर्वोच्च न्यायालयात जाणार



सरकार आता सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (एसएलपी) दाखल करण्याची भाषा करत असले, तरी त्यामागे केवळ देखावा तर नाही ना, असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. सरकारने तातडीने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करून नामांकित वकिलांमार्फत भक्कम बाजू मांडली पाहिजे. अन्यथा काँग्रेस स्वतः या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय घेईल, असा इशाराही त्यांनी दिला.

वारकरी संप्रदायात शिरलेल्या हिंसक प्रवृत्तींचा काळा चेहरा उघड

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर आळंदीत झालेल्या शाईफेक प्रकरणाचाही वडेट्टीवार यांनी निषेध केला. ही घटना निंदनीय असून वारकरी संप्रदायात घुसखोरी केलेल्या हिंसक प्रवृत्तींचा काळा चेहरा यानिमित्ताने समोर आला आहे, असे ते म्हणाले.

अशोक खरातला न्यायालयीन कोठडी, पुन्हा नाशिकला रवानगी

राहाता : शिर्डीतील जमीन खरेदी प्रकरण व फसवणूक गुन्ह्यातील मुख्य आरोपी अशोक खरात याच्या पोलीस कोठडीची मुदत संपल्याने त्याला शनिवारी राहाता न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर खरातची रवानगी नाशिक कारागृहात करण्यात आली.

शिर्डीतील जमीन व्यवहारात फसवणूक आणि सावकारी प्रकरणात खरात आरोपी आहे. खरात पोलीस कोठडीत असताना त्याची शिर्डी पोलिसांकडून पाच दिवस चौकशी करण्यात आली. चौकशीत खरातने सुरुवातीला पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे दिली. मी शिर्डीतील गोंदकर यांच्या चार एकर जमिनीचा कायदेशीर व्यवहार केल्याची कबुली खरात याने शिर्डी पोलिसांना चौकशीत दिली असून, मला माझ्या साक्षीदारानेच फसवल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे या व्यवहाराशी संलग्न असलेले प्रभाकर गुंजाळ व सचिन वाणी या साक्षीदारांना शिर्डी पोलिसांनी ताब्यात घेत त्यांचे जबाब नोंदवून घेतले आहेत. अशोक खरातची शिर्डी पोलिसांकडून मागील पाच दिवसांपासून विविध कागदपत्रे, आर्थिक व्यवहार आणि संबंधित व्यक्तींचे जबाबाची सखोल पडताळणी केली. आज त्याला पुन्हा न्यायालयासमोर उभे केले. पोलिसांनी न्यायालयात सांगितले की, खरातची पत्नी कल्पना ही फरार असल्याने तिचा शोध घेणे महत्त्वाचे आहे तर जमीन खरेदी फसवणुकीबाबत अनुषंगिक तपास करण्याचा असल्याने दोन दिवसांची पोलीस कोठडी मिळावी. मात्र, न्यायालयाने खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.



'कांद्याला १५०० रुपये अनुदान द्या'

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : सध्या कांद्याला मातीमोल दर मिळत असल्याने राज्यातील शेतकरी आर्थिक आणि मानसिकदृष्ट्या कोलमडल्याचे चित्र आहे. दर कोसळत असल्याने उत्पादन खर्चही निघत नाही. यात शासनाने हस्तक्षेप करून क्विंटलला १,५०० रुपये अनुदान जाहीर करावे, अन्यथा राज्यभर आंदोलन करू, असा इशारा महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी दिला आहे.

कांद्यावरील निर्यात निर्बंध हटवून हमीभाव जाहीर करण्याची गरज असल्याचे दिघोळे यांनी सांगितले.

दुसरी, तिसरी, चौथी, सहावीसाठी नवीन पाठ्यपुस्तके

(पान १ वरून) पुनर्मुद्रण (जुन्या अभ्यासक्रमाची) वैकल्पिक पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

इयत्ता पाचवी, सातवी व आठवीच्या एकात्मिक आणि नियमित पाठ्यपुस्तकांमधील आशय मूल्यमापन योजना समान आहे.

तसेच, ही दोन्ही प्रकारची पाठ्यपुस्तके प्रचलित अभ्यासक्रमावर आधारित आहेत. ही पाठ्यपुस्तके भांडारात शिल्लक असून, विक्रीसाठी उपलब्ध आहेत, अशी माहिती ओक यांनी दिली.

प्रात्यक्षिक नोंदवहीचा वापर बंधनकारक

इयत्ता नववी ते बारावीसाठी विषय योजना व मूल्यमापन योजनेनुसार विद्यार्थ्यांनी या इयत्तांसाठी 'बालभारती'ने तयार केलेल्या प्रात्यक्षिक नोंदवहीचा वापर करणे बंधनकारक राहील. कोणत्याही शैक्षणिक संस्थेने खासगी प्रकाशकांच्या प्रात्यक्षिक नोंदवहीचा वापर करण्याचे बंधन किंवा सक्ती विद्यार्थ्यांवर करू नये, असे अनुराधा ओक यांनी स्पष्ट केले.

फळे पिकवण्यासाठी बनावट इथिलिनचा विषारी खेळ!

(पान १ वरून)

आरोग्यास घातक इथिलिनची विक्री होताना दिसत आहे. नागपूरस्थित मेसर्स लॉगफ्रेश बायोटेक्नॉलॉजी प्रा. लि. ही कंपनी फळे आणि भाज्या पिकवण्यासाठी तसेच काही औद्योगिक वापरासाठी सरकारने निश्चित केलेल्या नियमांनुसार इथिलिन रायपनरची देशभर विक्री करते.

गेल्या काही महिन्यांपासून बाजारात मोठ्या प्रमाणावर बनावट इथिलिन विक्री होत असल्याची माहिती कंपनीला मिळाली. त्यानंतर कंपनीने स्वतःच्या पातळीवर तपास करत उत्तर प्रदेशातील गाझियाबाद जिल्ह्यातील हापूड एमआयडीसी परिसरातील मॉडर्न इंटरप्राइजेस या कारखान्यात बनावट इथिलिन तयार केले जात असल्याचे उघडकीस आणले. कंपनीने उत्तर प्रदेश पोलिसांच्या मदतीने संबंधित कारखान्यावर छापा टाकला. या कारवाईत देशातील विविध नावाजलेल्या कंपन्यांच्या नामांकित उत्पादनांच्या नावाने तयार करण्यात आलेले बनावट इथिलिनची पाकिटे, पाउच, स्टिकर्स, पॅकिंग मशिन्स आणि मोठ्या प्रमाणावर तयार माल आढळला. तो जप्त करण्यात आला. त्याची किंमत सुमारे पाच कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते.

तपासात या बनावट इथिलिनमध्ये मोठ्या प्रमाणावर कॅल्शियम कार्बाइड असल्याचा संशय पोलिसांना आहे. हे रसायन मानवी आरोग्यास अत्यंत घातक असून, त्यामुळे कर्करोगासह विविध गंभीर आजारांचा धोका वाढू शकतो. अशा रसायनांचा वापर करून पिकवलेल्या फळे आणि भाज्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

नियंत्रित प्रमाण सुरक्षित

फळे कृत्रिमरीत्या पिकवण्यासाठी इथिलिन गॅसचा वापर केला जातो. इथिलिन हे फळांमध्ये नैसर्गिकरीत्या निर्माण होणारे हार्मोन असून ते पिकण्याची प्रक्रिया वेगवान करते. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाच्या नियमानुसार फळे पिकवताना इथिलिनचे प्रमाण कमाल १०० पीपीएमपर्यंतच असावे. नियंत्रित प्रमाणातील इथिलिन सुरक्षित मानले जाते, अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाचे संयुक्त आयुक्त किशोर जयपूरकर यांनी दिली.






जलस्रोतांना पाणथळ म्हणून मान्यता नाकारण्यास कांदळवन विभागाचाच विरोध

जयेश सामंत, निखिल अहिरे, लोकसत्ता

ठाणे जिल्हास्तरीय पाणथळ सनियंत्रण समितीने विविध पाणथळ जागांविषयी सादर केलेल्या सविस्तर अहवालामुळे नवी मुंबई आणि ठाणे परिसरातील महत्त्वाच्या पाणथळीच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे .



ठाणे : नवी मुंबई आणि ठाणे परिसरातील विविध जलस्रोतांना पाणथळ म्हणून मान्यता नाकारण्याची शिफारस करणाऱ्या ठाणे जिल्हास्तरीय पाणथळ सनियंत्रण समितीच्या अहवालावर आता राज्याच्या कांदळवन विभागानेच गंभीर आक्षेप घेतला आहे. संबंधित सर्व स्थळे जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील असून फ्लेमिंगो आणि इतर स्थलांतरित पक्ष्यांचे महत्त्वाचे अधिवास असल्याने त्यांना पाणथळ (संवर्धन व व्यवस्थापन) नियम २०१७अंतर्गत अधिसूचित करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट मत कांदळवन विभागाने आपल्या अधिकृत पत्रव्यवहारात नोंदवले आहे.

ठाणे जिल्हास्तरीय पाणथळ सनियंत्रण समितीने काही दिवसांपूर्वी सादर केलेल्या अहवालात फ्लेमिंगो पॉइंट, टी. एस. चाणक्य तलाव, लोटस तलाव, ज्वेल ऑफ नवी मुंबई, गणेश मंदिर तलाव, गोठीवली खदान, जिजामाता बोट खाडी आणि निळजे तलाव या जागा पाणथळ संवर्गात मोडत नसल्याची शिफारस केली होती. या समितीने संबंधित स्थळांचे उपग्रह नकाशे, अभिलेख, विकास आराखडे आणि पूर्वीच्या जमीन वापराचा आधार घेत हे निष्कर्ष नोंदवले होते. काही ठिकाणी पूर्वी मिठागर, भातशेती किंवा जलनिस्सारण प्रकल्प असल्याने ती नैसर्गिक पाणथळ नसल्याचे समितीचे म्हणणे होते.

कांदळवन विभाग उत्तर कोकणचे विभागीय वन अधिकारी डी. पी. खाडे तसेच ठाणे वनविभागाच्या उपवनसंरक्षक सचिन रेपाळ यांनी यावर आक्षेप घेत ठाणे जिल्हाधिकारी आणि जिल्हा पाणथळ सनियंत्रण समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्याशी पत्रव्यवहार करून आक्षेप नोंदवला. या पत्रांमध्ये ठाणे खाडी परिसरातील अनेक तलाव, जलस्रोत आणि खाडी भाग हे स्थलांतरित पक्ष्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद केले आहे.

कांदळवन विभागाने संरक्षणाची मागणी केलेली स्थळे

विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग उत्तर कोकण यांनी आपल्या पत्रात टी. एस. चाणक्य तलाव, एन. आर. आय. तलाव, डी. पी. एस. तलाव, ज्वेल ऑफ नवी मुंबई तलाव, लोटस तलाव, गणेश मंदिर तलाव, गोठीवली तलाव, जिजामाता बोट खाडी आणि निळजे तलाव या सर्व स्थळांना पाणथळ जागा म्हणून अधिसूचित करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय आणि कार्यकारी कार्यवाही तातडीने करण्यात यावी, अशी विनंती प्रशासनाला केली आहे.

पत्रव्यवहारातील मुद्दे

- ठाणे खाडी परिसरातील ६५.२१ चौ.कि.मी. क्षेत्राला रामसर दर्जा प्राप्त, दरवर्षी लाखो स्थलांतरित पक्ष्यांचे आगमन
- टी. एस. चाणक्य तलाव, एन. आर. आय. तलाव परिसर , डी. पी. एस. तलाव आणि ज्वेल ऑफ नवी मुंबई तलाव हे फ्लेमिंगोचे नियमित अधिवास
- ठाणे खाडी परिसर या संपूर्ण परिसंस्थेचा भाग म्हणून नवी मुंबईतील विविध तलाव आणि पाणथळ जागांकडे पाहणे आवश्यक
- या जलस्रोतांचे संवर्धन करणे ही केवळ स्थानिक नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यावरणीय जबाबदारी
- राष्ट्रीय पाणथळ कायद्यानुसार संबंधित स्थळांची नोंद 'तलाव' आणि 'भरती-ओहोटीच्या प्रभावाखालील चिखलयुक्त सपाट क्षेत्र' संवर्गात
- केवळ पूर्वीचा जमीन वापर किंवा मानवनिर्मित स्वरूप या निकषांवर पाणथळ दर्जा नाकारणे अयोग्य
- जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वाची आणि स्थलांतरित पक्ष्यांचे सातत्याने अधिवास झालेली क्षेत्रे पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील मानून त्यांचे संरक्षण करणे आवश्यक
- शहरीकरणाच्या वाढत्या दबावात नवी मुंबई आणि ठाणे परिसरातील उरलेल्या नैसर्गिक जलस्रोतांचे अस्तित्व धोक्यात येत असल्याने या भागांना कायदेशीर संरक्षण गरजेचे

नवी मुंबईसह ठाणे, डोंबिवलीतील पाणथळ जागांविषयीच्या या अहवालाला राज्याचा वन विभाग आव्हान देईल. पाणथळ सनियंत्रण समितीत कांदळवन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे म्हणणे विचारात घेण्याची आवश्यकता होती. नवी मुंबई महापालिकेने विकास आराखड्यात या जागांना पाणथळ जागांचे आरक्षण ठेवले आहे. असे असताना ठाणे पाणथळ सनियंत्रण समिती असा अहवाल कसा देऊ शकते? कांदळवन बफर क्षेत्राचे संरक्षण करण्याची जबाबदारी या विभागाची असताना त्यांचे मत विचारात न घेताच असा अहवाल कसा तयार होऊ शकतो, याची विचारणा केली जाणार आहे.

- गणेश नाईक, वनमंत्री

तमिळनाडूत राज्यपाल राजी

(पान १ वरून) विजय यांचे मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

शनिवारी दुपारनंतर राज्यपाल केरळला जाणार असल्याची चर्चा सुरू होती. त्यांच्याकडे त्या राज्याचाही पदभार आहे. त्यामुळे विजय यांची भेट होणार की नाही याबाबत अनिश्चितता असताना सायंकाळी विजय यांनी राज्यपालांना भेटून पाठिंब्याचे पत्र सोपवले.

व्हीसीकेप्रमुख थोल थिरुमव्हलमन तसेच आयएमयूएलचे राष्ट्रीय अध्यक्ष के.एम.कादर मोईनुद्दीन यांनी टीव्हीकेला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. आयएमयूएलने सुरुवातीला पाठिंब्यास नकार दिला होता. मात्र माजी मुख्यमंत्री एम.के.स्टॅलिन यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी निर्णय बदलला.

टीव्हीकेला बहुमताचा आकडा पार करण्यात यश मिळाल्यावर राज्यभर पक्ष कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. द्रमुक तसेच अण्णा द्रमुक वगळता १९६७ नंतर प्रथमच एखाद्या पक्षाला राज्यात सरकार स्थापन करण्यात यश आले आहे.

शरद पवार गटाच्या प्रवक्त्यांवर शाईफेक

(पान १ वरून) गावात आले होते. दशक्रिया विधी आटोपल्यानंतर ते सकाळी दहाच्या सुमारास निघाले. म्हातोबाची आळंदी गावातील स्मशानभूमीजवळ मोटारीत प्रवेश करताना लवांडे यांना आरोपींनी अडवले. आरोपी दोन वेगवेगळ्या मोटारींतून आले होते. त्यांपैकी दोघांनी त्यांना पिस्तुलाचा धाक दाखविला. त्यांना मोटारीतून बाहेर खेचले. लवांडे यांच्या मोटारीचे चालक संतोष गडदे यांना शिवीगाळ केली, असे लवांडे यांनी फिर्यादीत म्हटले आहे.'

'आम्ही तुला जिवंत सोडणार नाही. आमच्याकडे दोन पिस्तुले आहेत. गोळीबार करून तुला संपवून टाकू. आमच्या गुरूच्या अपमानाचा बदला घेणार आहोत,' अशी धमकी आरोपींनी दिल्याचे लवांडे यांनी फिर्यादीत म्हटले आहे. 'या प्रकरणात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहे,' अशी माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, घटनेनंतर विकास लवांडे आणि कार्यकर्त्यांनी आरोपींच्या अटकेची मागणी करून लोणी काळभोर पोलीस ठाण्यासमोर आंदोलन सुरू केले. पोलीस ठाण्याच्या परिसरातील बंदोबस्तात वाढ करण्यात आली.

चित्रफीत समाजमाध्यमात

लवांडे यांच्यावर शाईफेक करण्यात आल्याची चित्रफीत समाजमाध्यमात प्रसारित करण्यात आली. 'आमच्या गुरुवर्यांबद्दल लवांडे यांनी आक्षेपार्ह विधान केले. त्यांना घुसखोर, धर्मांध म्हटले. आमच्या गुरुवर्यांचा अपमान सहन करणार नाही,' असे शाईफेक करणारे म्हणत असल्याचे चित्रफितीत दिसते.

पश्चिम आशियात परिस्थिती जैसे थे!

युद्धसमाप्तीच्या प्रस्तावावर इराणच्या उत्तराची प्रतीक्षा

वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, कैरो



होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यावरून गुरुवारी आणि शुक्रवारी इराण-अमेरिकेने एकमेकांवर हल्ले केल्यानंतर शनिवारी या सागरी भागात तुलनेने शांतता राहिली. युद्धसमाप्ती आणि शांतता चर्चेसाठी अमेरिकेने दिलेल्या प्रस्तावावर इराणने अद्याप उत्तर दिलेले नाही. इराणकडून आपल्याला काही तासांमध्ये प्रतिसाद अपेक्षित आहे, असे अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांनी शुक्रवारी सांगितले होते. मात्र, एक दिवस उलटून गेल्यानंतरही इराणकडून कोणतीही हालचाल दिसत नाही.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प पुढील आठवड्यात बहुप्रतिक्षित चीन दौऱ्यावर जात आहेत. त्यापूर्वी पश्चिम आशियातील संघर्ष कमी करण्यासाठी त्यांच्यावर मोठा दबाव आहे. या युद्धामुळे जागतिक इंधन बाजारात बरीच उलथापालथ झाली असून त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेलाही धोका निर्माण झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर, चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्याशी चर्चा करताना ट्रम्प यांच्याकडे ठोस मुद्दा असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने ते इराणवर चर्चेसाठी दबाव वाढवत आहेत. इराणला दिलेल्या प्रस्तावामध्ये अणुकार्यक्रमावरील चर्चेचाही समावेश आहे.

इराणच्या माध्यमांनी दिलेल्या वृत्तांनुसार, शुक्रवारी इराणी सैन्य आणि अमेरिकेच्या नौदलाच्या जहाजांमध्ये संघर्ष झाला. त्यानंतर परिस्थिती निवळल्याचे सांगण्यात आले असले तरी अशा प्रकारचा संघर्ष पुन्हा होण्याची भीती आहे. अमेरिकी नौदलाची नाकेबंदी भेदून इराणच्या बंदरांकडे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन इराणी जहाजांवर हल्ला करून त्यांना माघार घेण्यास भाग पाडल्याचे अमेरिकी लष्कराने सांगितले. मात्र, या हल्ल्यांनंतरही शस्त्रसंधी अबाधित असल्याचे ट्रम्प यांनी सांगितले आहे.

नाकेबंदीमुळे नुकसान नाही?

इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याच्या प्रत्युत्तरादाखल अमेरिकेने गेल्या महिन्यात इराणी बंदरांची नाकेबंदी केली आहे. मात्र, आणखी चार महिने तरी या नाकेबंदीमुळे इराणचे नुकसान होणार नाही, असे सीआयए या अमेरिकेच्या गुप्तचर संस्थेने सूचित केले आहे. या प्रकरणाची माहिती असलेल्या एका अमेरिकी अधिकाऱ्याने ही माहिती दिली आहे. यामुळे ट्रम्प यांच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. दुसरीकडे, सीआयएच्या विश्लेषणासंबंधी केले जाणारे दावे खोटे असल्याचे एका वरिष्ठ गुप्तचर अधिकाऱ्याने सांगितले.

सरकार स्थापनेसाठी काँग्रेसमध्ये सल्लामसलत

नवी दिल्ली : केरळमध्ये मुख्यमंत्रीपदाचा निर्णय काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे घेतील अशी माहिती पक्षाच्या सरचिटणीस आणि केरळच्या प्रभारी दीपा दासमुन्शी यांनी शनिवारी दिली. यासंबंधीचा निर्णय लवकरच घेतला जाईल, असे त्या म्हणाल्या. केरळमध्ये ४ मे रोजी झालेल्या मतमोजणीत पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. मात्र, मुख्यमंत्रीपदाचा निर्णय अद्याप झालेला नाही.

खरगे यांच्या निवासस्थानी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक बोलावण्यात आली होती. तीन तास चाललेल्या या बैठकीत राज्यात सरकार स्थापनेसंबंधी चर्चा झाली. राज्यात मुख्यमंत्रीपदासाठी तीन दावेदार आहेत. खरगे यांनी बोलावलेल्या बैठकीत राहुल गांधी, दीपा दासमुन्शी हे नेते उपस्थित होते. त्याशिवाय केरळचे प्रदेशाध्यक्ष सनी जोसेफ यांच्यासह मुख्यमंत्रीपदाचे दावेदार असलेले के. सी. वेणुगोपाल, व्ही. डी. सतीशन आणि रमेश चेन्निथला हेही उपस्थित होते.

पक्षनेतृत्वाने पाठवलेल्या अजय माकन आणि मुकुल वासनिक या केंद्रीय निरीक्षकांनी गुरुवारी पक्षाच्या आमदारांशी चर्चा करून त्यांचे मत जाणून घेतले.

लेफ्टनंट जनरल सुब्रमणी नवे 'सीडीएस'

नौदल प्रमुखपदी व्हाइस ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन

पीटीआय, नवी दिल्ली





देशाचे पुढील संरक्षण दलप्रमुख ('सीडीएस') म्हणून लेफ्टनंट जनरल (निवृत्त) एन. एस. राजा सुब्रमणी यांचे नाव निश्चित झाले आहे. देशाच्या सैन्यदलांची पुनर्रचना करण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी करणे आणि तिन्ही दलांमधील समन्वय वाढवणे या त्यांच्यावरील प्रमुख जबाबदाऱ्या असतील. याबरोबरच केंद्र सरकारने व्हाइस ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन यांची पुढील नौदलप्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. सरकारने एका निवेदनामार्फत यासंबंधी माहिती दिली.

विद्यमान 'सीडीएस' जनरल अनिल चौहान हे ३० मे रोजी निवृत्त होत आहेत. त्याच दिवशी लेफ्टनंट जनरल (निवृत्त) सुब्रमणी पदाची सूत्रे स्वीकारतील. ते लष्करी व्यवहार विभागाचे सचिव म्हणूनही काम पाहतील अशी माहिती संरक्षण मंत्रालयाने शनिवारी दिली. पाकिस्तान आणि चीनच्या विषयांचे तज्ज्ञ म्हणून त्यांची ख्याती आहे. ते गेल्या वर्षी जुलैला लष्कर उपप्रमुख पदावरून निवृत्त झाले. सध्या ते राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयाचे लष्करी सल्लागार आहेत.

आपल्या ४० वर्षांच्या कारकिर्दीत लेफ्टनंट जनरल सुब्रमणी यांनी देशभरात विविध लढाया आणि भौगोलिक क्षेत्रांमध्ये कर्तव्य बजावले आहे. तसेच अनेक उच्चपदेही भूषवली आहेत. त्यांनी ब्रिटनच्या ब्रॅंकनेलमधील जॉइंट सर्व्हिसेस कमांड अँड स्टाफ कॉलेज, नवी दिल्लीचे राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालय, राष्ट्रीय संरक्षण अकादमी आणि भारतीय लष्करी अकादमीमध्ये शिक्षण पूर्ण केले आहे. ते १४ डिसेंबर १९८५ रोजी गढवाल रायफल्सच्या आठव्या बटालियनमध्ये रुजू झाले. लेफ्टनंट जनरल सुब्रमणी यांना पश्चिम आणि उत्तर सीमांवरील लष्करी कारवायांची सखोल जाण आहे, असेही संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे.

विद्यमान नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी हे ३१ मे रोजी निवृत्त होत असून त्याच दिवशी व्हाइस ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन पदभार स्वीकारतील. ते सध्या नौदलाच्या पश्चिम विभागाचे प्रमुख आहेत. नौदलप्रमुख म्हणून नौदलाचे आधुनिकीकरण करण्यावर नव्या नौदलप्रमुखांचा भर असेल. दूरसंचार आणि इलेक्ट्रॉनिक युद्धनीतीचे तज्ज्ञ म्हणून ते १ जुलै १९८७ रोजी नौदलात रुजू झाले. त्यांनी खडकवासला येथील राष्ट्रीय संरक्षण अकादमी, ब्रिटनच्या श्रीव्हनहॅम येथील जॉइंट सर्व्हिसेस कमांड अँड स्टाफ कॉलेज, कारंजाचे कॉलेज ऑफ नेव्हल वॉरफेअर, अमेरिकेच्या न्यूपोर्ट येथील यूएस नेव्हल वॉर कॉलेज येथे त्यांनी प्रशिक्षण घेतले आहे.

तिसरे संरक्षण दलप्रमुख

लेफ्टनंट जनरल (निवृत्त) एन. एस. राजा सुब्रमणी हे देशाचे तिसरे संरक्षण दलप्रमुख असतील. देशाचे पहिले 'सीडीएस' जनरल बिपीन रावत यांचा डिसेंबर २०२१मध्ये हेलिकॉप्टर अपघातात मृत्यू झाला होता. त्यानंतर नऊ महिन्यांनी जनरल चौहान यांनी सप्टेंबर २०२२मध्ये संरक्षण दलप्रमुखपदाची जबाबदारी स्वीकारली. ते ३० मे रोजी निवृत्त होत आहेत.

सुवेंदू अधिकारी यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ

(पान १ वरून)

घेतली. यात ज्येष्ठ नेते व माजी प्रदेशाध्यक्ष दिलीप घोष यांचा प्रथम समावेश होता. पाठोपाठ अंगमित्रा पॉल, अशोक कीर्तनिया, खुदीराम टुडू व निशिथ प्रामाणिक यांना शपथ देण्यात आली. मंत्रिमंडळ रचनेत जातीय व विभागीय संतुलन ठेवण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे. ब्राह्मण, इतर मागासवर्गीय, आदिवासी, मतुआ आणि राजवंशी समुदायाला प्रतिनिधित्व देण्यात आले.

सुवेंदू अधिकारी हे ब्राह्मण समुदायातून येतात. तर दिलीप घोष इतर मागासवर्गीय समुदायाचे प्रतिनिधित्व करतात. पॉल या कायस्थ असून, कीर्तनिया मतुआ समाजाचे प्रमुख नेते आहेत. टुडु हे आदिवासी असून, प्रामाणिक हे उत्तर बंगालमध्ये प्रभावी असलेल्या राजवंशी समुदायातून येतात. यातील दोघे जण उत्तर बंगाल तर तिघे दक्षिण बंगालमधून येतात. मंत्रिमंडळाच्या पहिल्या यादीत कोलकाता शहरातील एकही सदस्य नाही.

सोमवारी मंत्रिमंडळ विस्तार होण्याची शक्यता असून, त्याच दिवशी पहिली बैठक होईल असे सूत्रांनी नमूद केले. ब्रिगेड परेड मैदान हे ऐकाकाळी डाव्याचे वैचारिक प्रभावक्षेत्र मानले जात. तृणमूल काँग्रेसच्या सत्तेनंतर त्यांच्या शक्तिप्रदर्शनाचे केंद्र होते. तेथेच भाजपने शपथविधी सोहळा आयोजित करत विरोधकांना शह दिला. हजारो भाजप कार्यकर्ते या मैदानावर सकाळपासूनच उपस्थित होते. राज्यातील विधानसभेच्या २९४ पैकी २०७ जागा भाजपने जिंकल्या.

शोभनदेव चट्टोपाध्याय विरोधी पक्षनेते

बॅलीगंजचे आमदार शोभनदेव चट्टोपाध्याय यांच्या नावाची घोषणा तृणमूल काँग्रेसने केली आहे. असिमा पात्रा व नयना बंडोपाध्याय यांची विरोधी उपनेतेपदी निवड करण्यात आली. फिरहाद हकीम हे मुख्य प्रतोद असतील. २९४ सदस्य असलेल्या पश्चिम बंगाल विधानसभेत तृणमूल काँग्रेसचे ८० सदस्य आहेत.

मोदींच्या कार्यकाळात ९ राज्यांत पक्षाचे पहिल्यांदाच मुख्यमंत्री

तृणमूल काँग्रेसची १५ वर्षांची राजवट संपवून भाजपने पश्चिम बंगालमध्ये सत्ता प्राप्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २०१४ मध्ये केंद्रात सत्तेवर आल्यानंतर भाजपने ९ नव्या राज्यांमध्ये सत्ता स्थापन केली आणि तिथे भाजपला मुख्यमंत्रीपद मिळाले. यात महाराष्ट्र, हरियाणा (२०१४), आसाम, अरुणाचल प्रदेश (२०१६) मणिपूर २०१७, त्रिपुरा २०१८, ओडिशा (२०२४), बिहार (२०२६) या राज्यांचा समावेश आहे.

हंगेरीमध्ये पीटर माग्यार यांचा शपथविधी

बुडापेस्ट : हंगेरीचे उजवीकडे झुकणारे मध्यममार्गी नेते पीटर माग्यार यांनी शनिवारी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. पीटर माग्यार यांच्या तिसा पक्षाने १२ एप्रिलला झालेल्या पार्लमेंटच्या निवडणुकीत कट्टरवादी व्हिक्टर ओर्बान यांच्या फिडेस पक्षाचा दारुण पराभव केला होता. माग्यार यांच्यासमोर अनेक वर्षांपासून मंदावलेल्या अर्थव्यवस्थेला उभारी देणे आणि ओर्बान यांच्या कार्यकाळात मित्रदेशांशी दुरावलेले संबंध पुन्हा सुरळीत करणे ही प्रमुख आव्हाने आहेत. त्यासाठी त्यांना युरोपीय महासंघाचे सहकार्य हवे आहे.

व्याघ्रसंवर्धन व्यवस्थेबाबत धोक्याची घंटा

(पान १ वरून)

अँड हेल्थ' येथे तपासणीसाठी पाठवण्यात आले. तपासणीत 'कॅनाईन डिस्टेंपर' या संसर्गाची पुष्टी झाली. उपचार सुरू असतानाच 'टी-१४१' वाघीण आणि तिच्या चार बछड्यांचा मृत्यू झाला. यापूर्वी तीन बछड्यांचे मृतदेहही परिसरात आढळून आले होते. मध्य प्रदेशातील या घटनेनंतर देशभरातील व्याघ्रप्रकल्पात खळबळ उडाली.

राष्ट्रीय व्याघ्रसंवर्धन प्राधिकरणाने 'कॅनाईन डिस्टेंपर'च्या प्रतिबंधासाठी नव्या सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. मध्य भारतातील वाघांच्या मृत्यूंचा उल्लेख करत 'कॅनाईन डिस्टेंपर' संसर्गाबाबत सतर्कता वाढवण्याच्या सूचना दिल्या आहेत. व्याघ्रप्रकल्प आणि संवेदनशील अधिवासांभोवती 'इम्युनायझेशन बफर' तयार करण्यासाठी श्वानांचे मोठ्या प्रमाणावर लसीकरण करण्याच्या सूचना दिल्या. पशुसंवर्धन विभाग व स्थानिक प्रशासनाच्या समन्वयाने विशेष मोहीम राबवणे, बफर क्षेत्रातील पाळीव जनावरांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणे, संशयित प्रकरणांचे नमुने तातडीने तपासणीसाठी पाठवणे आणि वनकर्मचाऱ्यांना रोगनियंत्रण प्रशिक्षण देण्याचे निर्देशही देण्यात आले. राष्ट्रीय व्याघ्रसंवर्धन प्राधिकरणाने सर्व राज्यांना या उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करून नियमित 'केलेल्या कारवाईचा अहवाल' सादर करण्यास सांगितले.

मोहफुले, तेंदुपत्ता यानिमित्ताने गावकऱ्यांचा जंगलातील वावर वाढला आहे. ते शिकार किंवा सुरक्षेकरिता श्वान घेऊन जातात. ते पाणवठ्यावर गेले आणि त्याच पाणवठ्यावर नंतर वाघ किंवा इतर मांसाहारी प्राणी गेल्यानंतर संसर्गासाठी ते कारणीभूत ठरते. शिवाय वनरक्षक त्यांच्या कार्यक्षेत्रापासून दूर राहात असल्याने गस्तीकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे.

- अजय दुबे, ज्येष्ठ वन्यजीवतज्ज्ञ, मध्य प्रदेश.

श्वानांचे लसीकरण

महाराष्ट्रातील ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पात गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने परिसरातील गावांमध्ये पाळीव जनावरांबाबत लसीकरण मोहीम राबवली जाते. हा संपूर्ण खर्च ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाच्या फाऊंडेशनमधून करण्यात येतो. कान्हा व्याघ्रप्रकल्पातील घटनेनंतर मध्य प्रदेश वन विभागाने बफर क्षेत्रातील गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर लसीकरण मोहीम हाती घेतली. आतापर्यंत ८४ गावांतील १२ हजारांहून अधिक जनावरांचे व श्वानांचे लसीकरण करण्यात आले.

साखरसम्राट 'ओंकार' शुगरविरोधात राज्यात रोष

(पान १ वरून) ओंकार शुगरच्या राज्यातील १४ साखर कारखान्यांनी ५५ लाख ९४ हजार ४९२ लाख मेट्रिक टन उसाचे गाळप केले. ओंकार शुगरकडून १३४३ कोटी ७८ लाख रुपयांचे रास्त व किफायतशीर देणी अपेक्षित होती. त्यापैकी १०७ कोटी १५ लाख ९६ लाख रुपयांची देणी बाकी असल्याचे अहवाल साखर आयुक्तालयात आहेत. मात्र यावर शेतकऱ्यांचे आक्षेप आहेत. कागदोपत्री पैसे दिले असे अहवाल तयार केले गेले. प्रत्यक्षात रक्कम अदाच केली गेली नाही असे आक्षेप शेतकरी प्रतिनिधींनी घेतला होता. या विरोधात मंत्रालयातही बैठक घेण्यात आल्यानंतर प्रत्येक कारखान्यातील सभासदापर्यंत पैसे मिळाले नाही, याची तपासणी केली जाणार आहे.

थकीत ऊस देयके बाकी असणाऱ्या प्रत्येक कारखान्याने रक्कम जमा केली की नाही हे तपासण्याचे निर्देश प्रादेशिक साखर संचालकांना दिले आहेत. ओंकार शुगर समूहाकडून किती देयके बाकी आहेत, याची माहिती नुकतीच सुनावणी दरम्यान घेण्यात आली. त्यामुळे देयके अदा करण्याच्या प्रक्रियेला वेग दिला असल्याचे दिसून येत आहे.

परळीच्या वैद्यनाथ साखर कारखान्यावर आंदोलन करणारे किसान सभेचे अजय बुरांडे म्हणाले, 'पहिल्या टप्प्यात कारखाना प्रशासनाने २९५० रुपये प्रति टन दराने शेतकऱ्यांना पैसे अदा केले. पण जानेवारीनंतर कोणालाही पैसे दिले नाहीत. त्यामुळे आंदोलनाला बसलो आहोत. आता फक्त १८०० रुपये प्रति टन दराने रक्कम खात्यावर टाकली जात आहे. हा शेतकऱ्यांवर अन्याय आहे. मशागतीसाठीही ऊस उत्पादकांकडे पैसे नाहीत. ही शेतकऱ्यांची साखर समूहाकडून झालेली फसवणूक आहे' केवळ परळी नाही तर निलंगा तालुक्यातील अंबुलगा साखर कारखान्यावरील शेतकऱ्यांनी आमची रक्कम अदा करा असे म्हणत आंदोलन केले. सांगली साखर कारखान्यावर व्यवस्थापकांच्या अंगावर जाण्यापर्यंत आंदोलन झाले. सोलापूर जिल्ह्यात 'ओंकार' शुगरचे चार कारखाने आहेत. या जिल्ह्यातही आंदोलने सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडे अनेक तक्रारी आल्यानंतर ओंकार शुगरच्या सहा कारखान्यातील 'एफआरपी' बाबत सुनावणी झाली आहे, तर उर्वरित कारखान्यांची सोमवारी सुनावणी होणार आहे. 'एकूणात केलेले गाळप आणि अदा केलेली एफआरपी लक्षात घेता काही टक्केच रक्कम देणे शिल्लक होते. ती रक्कमही अदा करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे म्हणणे ओंकार शुगरकडून साखर आयुक्तालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, शेतकरी मात्र आता या साखर कारखाना प्रशासनावर विश्वास राहिला नाही, असे सांगत आहेत. ऊस खरेदी करण्यासाठी जाहीर केलेले दर देणे तर दूरच उलट उसाची किफायतशीर किंमतही कारखाना अदा करू शकत नसल्याचे चित्र राज्यभर दिसून येत आहे.

राज्यात सहकारी बँकाकडून कर्ज

शेतकऱ्याची रक्कम थकवली जात असेल तर ज्या बँकांकडून साखर कारखान्यांनी कर्ज घेतले आहे, त्या बँकांची स्थिती अधिक खालावलेली असू शकते, असा दावा केला जात आहे. या साखर समुहाचे काही कारखाने तेलंगणामध्ये 'ट्रायडंट' या नावाने सुरू आहेत. ओंकार शुगर या साखर समूहास राज्यात 'सहकारी' बँकेने अधिक सहकार्य केले आहे. कर्नाटक आणि तेलंगणातील कारखान्यास राष्ट्रीयीकृत बँकाने कर्ज दिले आहे. कोल्हापूरमधील कारखान्यासाठी वारणा शेतकरी बँकने कर्ज दिले आहे.

नागपूर-दोहा विमानसेवा पुन्हा सुरू

कतार एअरवेजची आठवड्यातून पाच दिवस सेवा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : कतार एअरवेजने २१ मेपासून दोहा-नागपूर-दोहा विमानसेवा पुन्हा सुरू करण्याची घोषणा केली. या मार्गावरील तिकीट नोंदणीही सुरू करण्यात आली आहे. आठवड्यातून पाच दिवस ही सेवा उपलब्ध राहणार आहे.

इराण-अमेरिका तणावाच्या पार्श्वभूमीवर ही सेवा २८ फेब्रुवारीपासून तात्पुरती स्थगित करण्यात आली होती. मध्य पूर्वेतील अस्थिर परिस्थितीमुळे अनेक विमान कंपन्यांनी आपले उड्डाण वेळापत्रक बदलले होते. मात्र आता परिस्थिती तुलनेने स्थिर झाल्यानंतर कतार नागरी विमान वाहतूक प्राधिकरणाकडून आवश्यक मंजुरी मिळाल्यानंतर ही सेवा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सुरुवातीला सप्टेंबरपासून सेवा सुरू करण्याचा विचार होता; मात्र लवकर सुधारलेल्या परिस्थितीमुळे कंपनीने २१ मेपासूनच उड्डाणे सुरू करण्याचा निर्णय घेतला.

कतार एअरवेजचे 'क्यूआर-५९०' हे विमान दोहाहून रात्री १०.२५ वाजता उड्डाण करून नागपुरात पहाटे २.५० वाजता पोहोचेल, तर 'क्यूआर-५९१' हे परतीचे विमान नागपुरातून पहाटे ४.५० वाजता दोहासाठी रवाना होईल. ही सेवा शुक्रवार आणि रविवारी उपलब्ध नसेल.

इंधन अधिभारामुळे भाडेवाढ

इंधन दर वाढल्याने 'फ्यूल सरचार्ज'मध्ये मोठी वाढ झाली. त्याचा थेट परिणाम विमान भाड्यावर झाला असून या मार्गावरील तिकिटांच्या दरात सुमारे ४५ टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात आली. यामुळे प्रवाशांना वाढीव खर्च सहन करावा लागणार आहे. या मार्गावरील तिकीट दर ३४,७०० रुपयांपासून १,३१,०५४ रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आले आहेत.

तीन दिवसीय विश्वशांती परिषद १५ मेपासून

श्रीलंकेचे मंत्री विजयदासा राजपक्षे यांच्या हस्ते उद्घाटन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : जागतिक शांतता, बौद्ध विचारांचा प्रसार आणि विविध देशांतील सांस्कृतिक देवाणघेवाणीला प्रोत्साहन देण्यासाठी शहरात १५, १६ आणि १७ मे रोजी 'विश्वशांती परिषदे'चे आयोजन करण्यात आल्याची माहिती भंते प्रशिलरत्न गौतम यांनी दिली.

संघकाया फाउंडेशन, इंडो एशियन मेत्ता फाउंडेशन, ग्लोबल युनायटेड एज्युकेशनल अँड सोशल सोसायटी आणि शताब्दी बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय परिषदेचे उद्घाटन १५ मे रोजी रेशीमबाग येथील सुरेश भट सभागृहात होणार आहे. श्रीलंकेचे मंत्री विजयदासा राजपक्षे उद्घाटन करतील. यावेळी बांगलादेश, दक्षिण कोरिया आणि श्रीलंकेतील संघनायक विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

परिषदेत श्रीलंका, म्यानमार, थायलंड, दक्षिण कोरिया, नेपाळ, भूतान, जपान, व्हिएतनाम, बांगलादेश आणि लाओस येथील प्रमुख धार्मिक नेते उपस्थित राहणार आहेत. विविध धर्मांचे धर्मगुरू, विद्वान, सामाजिक कार्यकर्ते तसेच राजकीय नेतेही परिषदेत सहभागी होणार आहेत. १६ मे रोजी सिव्हिल लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृह येथे 'कल्चर एक्सचेंज प्रोग्राम' अंतर्गत श्रीलंका, बांगलादेश, भारत आणि म्यानमार येथील कलाकारांकडून नृत्य आणि गायनाचे सादरीकरण केले जाईल. १६ आणि १७ मे रोजी सायंकाळी ७ वाजता उत्तर नागपुरातील इंदोरा मैदान येथे संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सराफा दुकानातून ४२ लाखांचा ऐवज लंपास

नागपूर : एमआयडीसी परिसरातील एका सराफा दुकानाचे शटर फोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम, असा तब्बल ४२ लाख १० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली. मनोज दयाशंकर शाहा (५६) यांचे एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत डाम ले-आऊट, आयसी चौक परिसरात मोनाली स्टील आणि मोनाली ज्वेलर्स नावाने दुकान आहे. गुरुवारी रात्री त्यांनी नेहमीप्रमाणे दुकान बंद केले. शुक्रवारी पहाटे चार अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यांनी दुकानातील सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केली.

Hinduja Housing Finance Limited

हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

कार्पोरेट कार्यालय : पहिला मजला, श्रीजी कॉम्प्लेक्स, चर्च रोड, न. एसबीआय स्वयेअर, यवतमाळ, जिल्हा-यवतमाळ-445001

शुध्दीकरण

सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, दिनांक **09 मे 2026 रोजी लोकसत्ता, नागपूर आवृत्तीमध्ये** प्रकाशित ताबा सूचनेत कर्जदार **श्री अल्लाहबक्ष घोंगडे +1, MH/YAV/YAVA/A000000157** यांचा ताबा दिनांक चुकून **06/05/2026** असा प्रकाशित झाला आहे. कृपया तो ताबा दिनांक **08/05/2026** असा वाचावा. सूचनेतील इतर सर्व अटी व शर्ती अपरिवर्तित राहतील.

स्थान: यवतमाळ, दिनांक: 10/05/2026 — **प्राधिकृत अधिकारी, हिंदुजा हाउसिंग फायनान्स लि.**

मध्य रेल्वे

नागपूर मंडळ

खुली निविदा सूचना क्र.: डीआरएमडब्ल्यूएनजीपी-50-2026, 06.05.2026

कामाचे नाव: नागपूर मंडळात कार्यरत असलेल्या एसबीसीएम/एफआरएम यांच्याकरिता शोल्डर आणि क्रिब बॅलस्टची पुनर्प्राप्ती आणि सहायक कामे. अंदाजित मूल्य: रु. 1,93,64,229.91. **इसारा ठेव:** रु. 3,87,300/- **निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:** 27.05.2026 रोजी 15.00 वाजता. वरील कामासाठी ई-टेंडरिंग आणि ऑनलाइन सहभागासंबंधी संपूर्ण तपशील आणि सूचना रेल्वेच्या **www.ireps.gov.in** या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (वर्क्स)

धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा शिक्षापात्र गुन्हा आहे. 205

हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

HINDUJA HOUSING FINANCE

कॉर्पोरेट ऑफिस: नं. १६७-१६९, दुसरा मजला, अण्णा सलाई, सैदापेट, चेन्नई – ६०० ०१५ आणि शाखा कार्यालय - हिंदुजा हाउसिंग फायनान्स "यमुनायतन" जोशी, दुसरा मजला, २२५-बी, पश्चिम उच्च न्यायालय रस्ता, गोकुलपेठ, नागपूर, महाराष्ट्र ४४००१० E-mail ID: auction@hindujahousingfinance.com

परिशिष्ट IV [नियम 8 (1) पहा] प्रत्यक्ष ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लि. चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (सदर अधिनियम) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 (सदर नियम) मधील नियम 3 सह वाचण्यात येणा-या अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 (2) अंतर्गत सूचना जारी केली ज्यात खाली नमूद केल्यानुसार संबंधित कर्जदार व सह-कर्जदारास संबंधित सूचनेत नमूद रकमेचा संबंधित सूचनांच्या दिनांकापासून 60 दिवसांच्या आत परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते. संबंधित कर्जदार / मालमत्ता धारक संबंधित थकबाकी रकमांची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने याद्वारे त्यांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8 सह वाचण्यात येणा-या सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद मालमत्तेचा क्र. **Other Cri.M.A. No 88/2026 ,** च्या दिनांक **7/3/2026** च्या आदेशानुसार, **कोर्ट बेलिफ** यांच्या सहाय्याने **Jt. C.J.S.D. & A.C.J.M., नागपूर ,** यांनी पारित केलेल्या **पंचनामा आणि इन्व्हेंटरी दि. 05.05.2025** रोजी **वास्तविक / प्रत्यक्ष ताबा** घेतलेला आहे. संबंधित कर्जदार / मालमत्ता धारक व सर्वसामान्य जनतेस याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो हिंदुजा हाऊसिंग फायनान्स च्या खाली नमूद रकमेच्या भाराधीन असेल.

कर्जदार सह-कर्जदार यांचे नाव आणि खाते क्र.	मागणी सूचना दिनांक आणि रक्कम	ताबा दिनांक
1. श्री. गणेश ठाकुर (कर्जदार) आणि 2. सौ. दिपाली ठाकुर, (सह-कर्जदार) MH/NGR/NPUR/A000000747	**05/07/2025 रु. 8,60,272/- (रुपये आठ लाख साठ हजार दोनशे बहात्तर फक्त) 05/07/2025 पर्यंत**	**05.05.2026**

जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा सोबतच त्यावरील बांधकाम बेअरिंग फ्लॅट नं. 405 चौथा मजला 'ई-रोजगोल्ड" या नावाने ओळखली जानारी बिल्डिंग, रा."सारा वॅली" सुरावर्डी येथे स्थित, (संपुर्ण क्षेत्रफळ फ्लॅट / अपार्टमेंट 500 चौ. फुट) 2638.45 चौ.मी पैकी, 2944.90 चौ.मी बेअरिंग बांधकाम वर उल्लेख केलेल्या गोष्टीवर प्लॉट व जमीन कवरिंग कार्पेट एरिया - 39.200 चौ.मी, बिल्ट अप एरिया - 44.66 चौ.मी खुला बाल्कनी एरिया 3.945 चौ.मी पी.एच नं. 5, खासरा नं. 75/1,75/2,76/1,76/2, मौजा- सुरावर्डी, रा "सारा वॅली" सुरावर्डी ता- नागपूर (ग्रामीण) आणि जि. - नागपूर आणि **प्लॉटच्या चतुर्सिमा:-** पुर्वेस: खसरा नं. 74 ची जमीन, पश्चिमेस: खसरा नं. 77 ची जमीन, उत्तरेस: खसरा नं. 78 ची जमीन, दक्षिणेस: खसरा नं. 71 ची जमीन, **फ्लॅट च्या चतुर्सिमा:-** पुर्वेस: लॉबी आणि फ्लॅट नं. 408, पश्चिमेस: खुली जमीन, उत्तरेस: फ्लॅट नं. 406, दक्षिणेस: जिना आणि फ्लॅट नं. 404

याशिवाय, कृपया लक्षात घ्यावे की आपण सदर सूचनेच्या दिनांकापासून 30 दिवसांचे आत हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लि. च्या थकबाकीची परतफेड न केल्यास हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लि. द्वारे आपणांस आणखी सूचना माहिती न देता वरील अधिनियम, नियमातर्गत तरतूद केल्यानुसार सदर अनामत मत्तेची प्राधिकृत अधिकारी म्हणून निम्नस्वाक्षरीकारांनी निश्चित केलेल्या आरक्षित किमतीस विक्री करण्यात येईल.

1) रितेश गवई (RLM)-7081828333, 2) रुषिकेश उभाळे (ALM)-9823244498, 3) राहुल निकुरे (CLM)-9405473208, 4) मिथलेश देहरिया (CRM)-8226009399

दिनांक : 10/05/2026, ठिकाण : नागपुर — **स्वा/- प्राधिकृत अधिकारी, हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

यूको बैंक (भारत सरकार का उपक्रम) आपका विश्वसनीय बैंक — **UCO BANK** (A Govt. of India undertaking) Honours Your Trust

शाखा : इतवारी, 1158, भारतीय निवास लॉज, सैनी ट्रॅव्हल्स जवळ, सेन्ट्रल एव्हेन्यु गांधीबाग,नागपूर-440032 ई-मेल : itwari@ucobank.co.in

परिशिष्ट-IV (रुल (1) **सांकेतिक ताबा सुचना** (अचल संपत्ती करीता)

ज्याअर्थी, सेक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल अॅसेटस अॅण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट 2002 (2002 चा नं.54) च्या अंतर्गत खालील हस्ताक्षरकर्ता हे युको बँक, घोगली शाखा चे अधिकृत अधिकारी आहे. तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स 2002 चे सेक्शन 13(2) चा सोबतच वाचला जाणारे रुल 3 च्या अंतर्गत कर्जदार **श्री अनिल सुखदेवराव उंबरकर आणि श्रीमती लता अनिल उंबरकर** यांना डिमांड नोटिस **दिनांक 17/01/2025** नोटीस मध्ये नमुद केलेली रक्कम **रु.17,44,103.68 (रु.सतरा लक्ष चौरेचाळीस हजार एकशे तीनआणि पैसे अडुसष्ट फक्त) +** न आकारलेले व्याज 60 दिवसांच्या आत वरील देय रक्कम परतफेड करण्याची ताकीद दिली होती.

कर्जदार आणि /किंवा जमानतदार हे उपरोक्त रकमेची परतफेड करण्यात अपयशी ठरल्याने कर्जदार सर्वसामान्य जनतेला या द्वारे सुचना देण्यात येत आहे कि अधिकृत अधिकारीने उपरोक्त कायद्याच्या उपकलम (4) सह वाचल्या जाणा-या रुल 8 अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील वर्णन केलेल्या अचल संपत्तीचा **ताबा 06/05/2026** ला घेतला आहे.

कर्जदार यांना विशेषत: आणि सर्व जनतेला सामान्यत: या सुचने/नोटीस द्वारे खालील संपत्ती बाबत कोणत्याही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे. आणि या संपत्ती संदर्भात कोणतेही व्यवहारासाठी युको बँक, इतवारी शाखा कडून सदर्हू रक्कम **रु.17,44,103.68 (रु.सतरा लक्ष चौरेचाळीस हजार एकशे तीनआणि पैसे अडुसष्ट फक्त) +** न आकारलेले व्याज आणि त्यावर व्याज इत्यादी आकारले जाईल.

सुरक्षित मालमत्तेची परतफेड करण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, अधिनियमाच्या उपकलम 13 मधील तरतुदीसाठी कर्जदाराचे लक्ष आमंत्रित केले जाते.

अचल संपत्तीचे वर्णन

निवासीय अपाटमेंट नं.403, अंदाजे एरिया 54.643 स्के.मि., बिल्ट अप एरिया आणि 91.125 स्के.मि. सुपर बिल्ट अप एरिया चवथा माळा, "श्री साईताज पॅलेस" जागेचा सर्व भाग आणि तुकडा महानगरपालिका घर नं.716 (जुने) 1055/ए अंदाजे एरिया 366.60 स्के.मि. जागेचा उर्वरित भाग खसरा नं.130 मौजा बिनाकी, सिटी सर्व्हे नं.1805, शिट नं.374/53, मौजा बिनाकी, महानगरपालिका घर नं.1055/ए, वार्ड नं.42, प्रेमनगर, बिनाकी नागपूर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यास च्या क्षेत्रामध्ये तह. आणि जि.नागपूर 6.100 प्रतिशत अविभक्त हिस्सा आणि व्याज जागेच्या सारख्या प्लॉटमध्ये.

चतु:सिमा: पुर्वेस-गल्ली आणि पाठराबे आणि मौंदेकर यांची जागा, पश्चिमेस-रोड, उत्तरेस-रोड, दक्षिणेस-रोड

स्थळ : नागपूर
दिनांक : 10.05.2026 — अधिकृत अधिकारी, युको बँक

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

Annexure-A

निविदा सूचना

1) निविदा क्र. टीआरडी-बीएसपी-310-26-27-4 दिनांक: 30/04/2026

काम: आरडीएसओ मानक क्र. IS/RDSOT/0001:2023 **दिनांक 22.03.2023** नुसार ऑलिव्हियर-जी प्रणाली वापरून बिलासपूर विभागात विद्युत प्रवाह संकलन चाचणीसाठी रूट डेटा मॅपिंग करणे.

निविदा किंमत: ₹ 29,32,232.00/- **अनामत रक्कम:** ₹ 58,700.00/- **निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ:** 01/06/2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत.

(2) निविदा क्र. टीआरडी-बीएसपी-311-26-27-5 दिनांक: 01/05/2026

काम: बिलासपूर विभागात आरडीएसओ मार्गदर्शक तत्त्वांनुसार, ओव्हरहेड स्ट्रक्चर्स (आरओबी/एफओबी) आणि गर्डर ब्रिजेसखाली, जिथे ओएचई पासून वर्टीकल क्लिअरन्स कमी आहे, तिथे विश्वसनीयता आणि सुरक्षितता सुधारण्यासाठी 25 केव्ही उच्च व्होल्टेज इन्सुलेटेड कोटिंग्स प्रदान करणे.

निविदा किंमत: ₹ 2,00,05,125.00/- **अनामत रक्कम:** ₹ 4,00,100.00/- **निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ:** 02/06/2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत.

पात्रता निकष आणि इतर तपशीलवार माहितीसाठी, कृपया आमच्या **www.ireps.gov.in** या वेबसाइटला भेट द्या. निविदा सूचना वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (क.वि), दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, बिलासपूर (छत्तीसगड) यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर देखील पाहता येईल.

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (क.वि.)
सीपीआर/**10/AM/98** — **द.पू.म. रेल्वे, बिलासपूर**

South East Central Railway @secrail

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

परिशिष्ट-अ

कामाचे वर्णन: यासाठी ई-लिलाव-

1. "**खरसिया (केएचएस)** रेल्वे स्थानकाच्या सीमाभिंतीजवळ सामान्य संरचनांचा वापर करून व्यावसायिक जाहिरात कामासाठी (नॉन-डिजिटल) 'आउट ऑफ होम (ओओएच)' जाहिरातीचा परवाना, एकूण 200 चौरस फूट क्षेत्रफळासाठी 5 वर्षांच्या कालावधीसाठी, परवानाधारकाच्या खर्चाने."
2. "**उसलापूर (यूएसएल)** रेल्वे स्थानकावरील विविध प्लॅटफॉर्मवर साइनबोर्ड/बॅकलिट, पिलर किऑस्क आणि ग्लो साइनबोर्ड/बॅकलिट या स्वरूपात व्यावसायिक जाहिरात (नॉन-डिजिटल) प्रदर्शित करण्यासाठी परवानाधारकाच्या खर्चाने पाच (05) वर्षांच्या कालावधीकरिता परवाना." प्रकाशित करण्यात आला आहे.

सदर हे कॅटलॉग आयआरईपीएस वेबसाइटवर (**https://ireps.gov.in**) **दिनांकित : 04.05.2026** रोजी आधीच प्रकाशित झाली आहे. तपशील खालीलप्रमाणे आहे-

कॅटलॉग क्र.	प्रवर्ग	लिलावाची तारीख आणि वेळ	लॉट क्र	लॉटचे वर्णन	कराराचा कालावधी
एडीव्हीटी-यूएसएल-केएचएस	जाहिरात - आउट ऑफ होम	20.05.2026 13.30 वा.	**एडीव्हीटी-बीएसपी-केएचएस-ओएच-194-26-1**	व्यावसायिक जाहिरात कामासाठी (नॉन-डिजिटल) 'आउट ऑफ होम (ओओएच)' जाहिरात, खरसिया (केएचएस) रेल्वे स्थानकाच्या सीमा भिंतीजवळ सामान्य संरचना वापरून, एकूण 200 चौरस फूट क्षेत्रफळावर परवानाधारकाच्या खर्चाने करण्यासाठी परवाना.	1826 दिवस
	स्टेशन परिसरात जाहिरात (नॉन-डिजिटल)		**एडीव्हीटी-बीएसपी-यूएसएल-ओएसएन-193-26-1**	उसलापूर (यूएसएल) रेल्वे स्थानकावरील विविध प्लॅटफॉर्मवर, परवानाधारकाच्या खर्चाने, साइनबोर्ड/बॅकलिट, पिलर किऑस्क आणि ग्लो साइनबोर्ड/बॅकलिटच्या स्वरूपात (नॉन-डिजिटल) जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी व्यावसायिक परवाना.	

CPR/10/97 — सहाय्यक वाणिज्यिक व्यवस्थापक (गुड्स -2), द. पू.म.रेल्वे, बिलासपूर

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

निविदा सूचना

निविदा क्र. आरएसओ-बीएसपी-26-27-ओटी-01 दिनांक: 07/05/2026

काम: विद्युत/ओपी विभागांतर्गत योग्य सुरक्षा बीआरजेएन, एसडीएल, बीजेआरआय, केजेझ, पीएनडी, यूएसएल आणि केएचएस यासोबत एलपीजी सिलेंडर बँकेपासून स्वयंपाकघरातील गॅस स्टोव्हपर्यंत धातूच्या केंद्रीकृत एलपीजी गॅस पाइपलाइनचा पुरवठा आणि स्थापना करणे.

निविदा मूल्य: रु. 33,96,889.60/-
ईएमडी रक्कम: रु. 68,000.00/-
निविदा सादर करणे: दि. 08/06/2026 रोजी 11.00 वाजेपर्यंत.

वरील कामांसंबंधी अधिक तपशील, पात्रता निकष आणि संपूर्ण माहितीसाठी, कृपया सिनि. डीईई (ओपी)/बिलासपूर यांच्या कार्यालयाशी संपर्क साधा किंवा आमची वेबसाईट **www.ireps.gov.in** यावर उपलब्ध असलेला निविदा कागदपत्र पहा/डाउनलोड करा.

सिनि. डीईई/ओपी
CPR/10/102 — **द.पू.म. रेल्वे, बिलासपूर**

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे @secrail

SMFG Grihashakti — Nayi Asha. Naya Vishwas.

एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कं. लि.

कॉर्पोरेट कार्यालय: 503 आणि 504, 5वा मजला, जी-ब्लॉक, इन्स्पायर बीकेसी, बीकेसी मेन रोड, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू.), मुंबई - 400051
नोंदणीकृत कार्यालय: कॉमर्सझोन आयटी पार्क, टॉवर बी, 1ला मजला, क्र. 111, माउंट पूनमल्ली रोड, पोरूर, चेन्नई - 600116, टीएन

स्थावर मालमत्ता याकरिता ताबा सूचना [(परिशिष्ट 4) नियम 8(1)]

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार हे **एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कंपनी लि.,** एक हाऊसिंग फायनान्स कंपनी [नॅशनल हाऊसिंग बँकेत (पूर्णपणे आरबीआयच्या मालकीची) नोंदणीकृत] (यापुढे "एसएमएफएफसी" म्हणून संदर्भित) यांचे **अधिकृत अधिकारी** आहेत त्यांनी सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 (54, 2002) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 3 सहवाचता निर्देशित कलम 13(12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, निर्देशित कायद्याच्या कलम 13(2) अंतर्गत खाली नमूद केलेली मागणी सूचना जारी केली आहे ज्यामध्ये कर्जदार (खाली नमूद केलेली नावे) असल्याने, तुम्हाला सदर निर्देशित सूचना मिळाल्याच्या तारखेपासून **60 दिवसांच्या** आत निर्देशित सूचनेत नमूद केलेली रक्कम आणि त्यावरील व्याज परत करण्याचे आवाहन केले आहे. खाली नमूद केलेल्या कर्जदारांनी रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, येथे नमूद केलेल्या कर्जदारांना आणि सर्वसाधारण जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी त्यांना सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 8 सहवाचता निर्देशित कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या **मालमत्तेचा ताबा** घेतला आहे. वर नमूद केलेल्या कर्जदारांना, विशेषत:, आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की, त्यांनी सदर मालमत्तेचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार हा येथे नमूद केलेल्या रकमेसाठी, अंतर्गत आणि त्यावरील व्याज यासाठी "**एसएमएफएफसी**" यांच्या शुल्काच्या विषयाधीन असेल.

अ. क्र.	कर्जदाराचे / जामीनदाराचे नाव / एलएएन	सुरक्षित मालमत्तेचे वर्णन (स्थावर मालमत्ता)	मागणी सूचना तारीख आणि रक्कम	ताबा तारीख
1	**एलएएन:- 6048395111667622 1. हातिम हुसैनी धोराजीवाला 2. इन्सिया हातिम धोराजीवाला 3. तस्लीम हुसैनी धोराजीवाला 4. हुसैनी भाई कासम भाई धोराजीवाला**	प्लॉट नं. 9 (दक्षिण भाग), प्रॉपर्टी नं. 1276 (कर पावतीनुसार), शेत सर्वेक्षण नं. 80 (विक्री करारानुसार), सर्वेक्षण नं. 80/1/अ (उताग-7 यानुसार), हबीब नगर नं. 1, डॉ. रहीम क्लिनिकजवळ, वाळगाव रोड, मौजे तरखेडा (हबीब नगर), प्रभाग- बडनेरा, तहसील आणि जिल्हा- अमरावती, महाराष्ट्र, भारत, पिन कोड - 444601.	**दि. 13.01.2026 रु. 48,88,432.63/-** (रु. अठ्ठेचाळीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार चारशे चौतीस आणि त्रेसष्ट पैसे फक्त) दि. 09.01.2026 रोजीनुसार	08.05.2026
2	**एलएएन:- 6048075106616930 1. वंदना अनिल लांडगे 2. सुरैय्या जबीन तेखार अहमद अन्सारी**	धारण जमीन लेआउट प्लॉट क्र. 10 एकूण मोजमापे 1717 चौरस फूट, म्हणजेच 159.57 चौरस मीटर जुना सर्वेक्षण क्र. 514/3 आणि नवीन सर्वेक्षण क्र. 374/3 येथे स्थित मौजे तिवासा, प्रगणे कुरहा ता. तिवासा, जि. अमरावती. ग्रामपंचायत तिवासा यांच्या हद्दीमधील (यापुढे 'विशयांकित मालमत्ता' म्हणून संबोधले जाईल) यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल. खालीलप्रमाणे सीमाबद्ध:- पूर्वेकडे: लेआउट रोड, पश्चिमेकडे: इतर लेआउट, उत्तरेकडे: लेआउट रोड, दक्षिणेकडे: प्लॉट क्र. 11.	**दि. 13.01.2026 रु. 6,85,530.29/-** (रु. सहा लाख पंच्याऐंशी हजार पाचशे तीस आणि एकोणतीस पैसे फक्त) दि. 09.01.2026 रोजीनुसार	08.05.2026

ठिकाण: अमरावती, महाराष्ट्र
दिनांक: 08.05.2026 — सही/- अधिकृत अधिकारी, एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कं. लि.

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

निविदा सूचना

अ.क्र. ई-निविदा सूचना क्र: 33 मेक- बीएसपी-एआय-रोलिंग-इन, दिनांकित: 30.04.2026

कामाचे नाव: खुल्या निविदेद्वारे टर्नकी तत्त्वावर बिलासपूर यार्ड येथील लाईन क्र. 4 यासाठी एआय-आधारित रेलिंग-इन एक्झामिनेशन (एआयआईएक्स) प्रणालीचा पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वयन. **निविदा मूल्य:** रु. 70,31,325/- (रुपये सत्तर लाख एकतीस हजार तीनशे पंचवीस फक्त) (सर्व खर्च आणि जीएसटीसह), **ईएमडी:** रु. 01,40,600/- (रुपये एक लाख चाळीस हजार सहाशे फक्त), **निविदा उघडणी: दि. 22.05.2026 रोजी 15.30 वाजता.** याव्यतिरिक्त, सर्व तपशील रेल्वेच्या **http://www.ireps.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. ई-निविदा वगळता, निविदा सादर करण्याची इतर कोणतीही पद्धत स्वीकारली जाणार नाही.

सिनि. कोचिंग डेपो ऑफिसर
CPR/10/89 — **द.पू.म. रेल्वे, बिलासपूर**

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे @secrail

OFFICE OF SALE/RECOVERY OFFICER, CONSTITUTED BY THE CENTRAL REGISTRAR AS PER THE MULTI-STATE COOPERATIVE SOCIETIES ACT, 2002, ATTACHED TO METRO MULTI-STATE URBAN COOPERATIVE CREDIT SOCIETY LTD., BAZARTAL, KARJAT, AT AND POST: 874, NEAR GIRLS SCHOOL, BAZARTAL, TALUKA-KARJAT, DISTRICT AHMEDNAGAR (AHILYANAGAR),MAHARASHTRA

To

Date: 05/05/2026

1. Shri Sumitkumar Sureshkumar Bhalotiya Age: 45, Occupation : BusinessProprietor of Spark Reality, PuneR/a: 21/32, Skymax Mall, Viman Nagar,Near Datta Mandir, Pune
2. Shri Youvraj Sadashiv GhugreAge: 37, Occupation: ServiceR/a : Ainapur, Palkar Galli, Tal. Gadhinglaj Dist. Kolhapur 410526
3. Mrs. Jyoti Shivkumar BhartiyaAge: 42, Occupation: Service R/a. Mudliyar Chowk, Shantinagar Nagpur 440002

WHEREAS, in Arbitration Reference No. ARB/01/2023 between the Award Holder (i.e. Metro Multistate UrbanCo-op. Credit Society Ltd. Karjat,Dist. Ahmednagar (Ahilyanagar)), on the one hand, and Judgment Debtors (i.e. yourselves viz. Shri Sumitkumar Sureshkumar Bhalotiya, Shri Youvraj Sadashiv Ghugre and Mrs. Jyoti Shivkumar Bhartiya, on the other, Award dated 27.12.2023 was passed. AND WHEREAS, since all of you, being Judgment Debtors, have failed to satisfy the said Award, the Award Holder, the Metro Multistate Urban Co-op. Credit Society Ltd. Karjat, Dist. Ahmednagar (Ahilyanagar), has applied for sale of the property, described in the Schedule, annexed here to;You are hereby informed that property described in the Schedule, annexed hereto, will be put to auction by Sale/Recovery Officer,the Metro Multistate Urban Co-op. Credit Society Ltd. Karjat, Dist. Ahmednagar (Ahilyanagar) at 11am O'clock on the (date)12 June at (place) Karjat, Dist Ahilyangar In the event of full and final payment of the amount under Award and of the costs of the auction, by you to the Award Holder, before initiation of auction, the auction shall stand cancelled.

Schedule

Sr. NO.	Description of propertyto be sold
1	All that pieces and parcels of the land bearing Plot Nos. 1,2,3,4,5,6,07,08,09,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23, 24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,41,42,43,56,57,58, 59,60,61,6 2,63,64,65,66,67,68,69,70,71,72 carved out of Survey Numbers 87/A/1 and 87/A/2, at Village-Shahapur, within the registration Sub-district Chikhaldara and within the registration District Amravati, as shown in attached layout.

Given under the hand and the seal of the Sale/Recovery Officer, the Metro Multistate Urban Co-op. Credit Society Ltd. Karjat, Dist. Ahmednagar (Ahilyanagar), This 05/05/2026.

Sale/Recovery Officer
(attached toMetro Multi-State UrbanCooperative
Credit Society Ltd.) 9423237925

किफ्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: 6वा मजला, केआयएफएस कॉर्पोरेट हाऊस, हॉटेल प्लॅनेट लँडमार्कच्याबाजूला, अशोक वाटिकाजवळ, बीआरटीएस, इस्कॉन - आंबळी रोड, बोडकदेव, आंबळी, अहमदाबाद, गुजरात - 380054.
**कॉर्पोरेट ऑफिस: सी-902, लोटस पार्क, ग्राहम फर्थ कंपाऊंड, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई - 400063, महाराष्ट्र, भारत, फोन क्र.: +91 22 61796400, ई-मेल: contact@kifshousing.com वेबसाइट: www.kifshousing.com, सीआयएन: यू65



समोरच्या बाकावरून

पी. चिदम्बरम

तीन राज्यांमधली उलथापालथ आणि बदल

नुकत्याच झालेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांपैकी केरळ, तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल या तीन राज्यांमध्ये निवडणुकांनंतर मोठे बदल घडले तर आसाम आणि पुदुचेरीमध्ये सत्ताबदल झाला नाही.

या निवडणुकांमध्ये जे काही झालं त्याबद्दल सरसकट एकच अनुमान व्यक्त करणे शक्य नाही. प्रत्येक राज्याची आर्थिक, सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी वेगळी. अर्थात केरळ त्याला अपवाद आहे. तिथे गेल्या अनेक दशकांपासून यूडीएफ आणि एलडीएफ या आघाड्यांनी आलटून-पालटून राज्यावर सत्ता गाजवली आहे. २०२१ मध्ये मात्र पिनराई विजयन यांच्या नेतृत्वाखालील एलडीएफ आघाडी दुसऱ्यांदा सत्तेवर निवडून आली आणि ही परंपरा खंडित झाली; काँग्रेसने (प्रदेश काँग्रेस कमिटी आणि काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या स्तरावर) एक नवीन नेतृत्व उभे केले आणि गेल्या पाच वर्षांत या पक्षाने नव्या जोमाने, एका खऱ्या विरोधी पक्षाच्या भूमिकेतून काम केले आहे. याचे फलित आता निवडणुकीच्या निकालातून दिसून आले आहे. राज्याचा कारभार नीट चालवण्याची जबाबदारी आता यूडीएफवर आहे. ते त्यांनी नीट चालवले तरच यूडीएफमधील घटक पक्ष एकसंध राहतील आणि धर्मनिरपेक्षता, आर्थिक प्रगती, समृद्धी आणि संघराज्यीय तत्त्वे पुढे नेतील.

अनपेक्षित निकाल

तमिळनाडूतील सध्याचे राजकारण गुंतागुंतीचे आहे. काँग्रेस आणि इतर धर्मनिरपेक्ष पक्षांच्या पाठिंब्यावर, डीएमके हा पक्ष २०२१ मध्ये भक्कम बहुमतासह सत्तेवर निवडून आला. आर्थिक विकास आणि कल्याणकारी उपाययोजना या दोन आघाड्यांवर त्यांनी निःसंशयपणे उत्तम कामगिरी केली. असे असले तरी, तेवढेच पुरेसे नसते. कधी कधी मतदारांच्या मनावर प्रभाव टाकणारे इतरही काही घटक असतात. या निवडणुकीतही हेच दिसून आले. यातील एक 'अज्ञात घटक' म्हणजे जोसेफ विजय यांचा राजकारणातील प्रवेश; विजय हे एक लोकप्रिय चित्रपट नायक आहेत. विशेषतः तरुणांमध्ये तसेच महिला वर्गात त्यांचे असंख्य चाहते आहेत. निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर झाल्यापासूनच राज्यात वेगळे वारे वाहू लागले होते; शेवटच्या दहा दिवसांमध्ये या वाऱ्याने वेग पकडला आणि त्याचे रूपांतर एका वादळात झाले. हे वादळ १०८ मतदारसंघांतून वेगाने पसरले, परंतु त्यापलीकडे मात्र पोहोचले नाही. अवघ्या दोन वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या एका राजकीय पक्षासाठी हे एक अत्यंत प्रभावी आणि लक्षवेधी पदार्पण ठरले. या पक्षाच्या बहुतेक उमेदवारांची नावे आणि चेहरे अपरिचित होते, आणि त्यातील फारच थोड्या उमेदवारांनी प्रत्यक्ष प्रचार केला. सर्वत्र उमेदवार म्हणून केवळ 'विजय' हेच नाव चर्चेत होते. विजय यांची मोजकी आणि संक्षिप्त भाषणे, व्हिडीओ मीम्स आणि त्यांच्या अनेक चित्रपटांतील गीते-यांतच त्यांचा संपूर्ण 'निवडणूक प्रचार' सामावलेला होता. साधे बहुमत मिळवण्यासाठी टीव्हीके पक्षाला ११ जागा कमी पडत होत्या. पण राष्ट्रपती राजवट टाळण्यासाठी आणि पुन्हा निवडणुका घेण्याची वेळ येऊ नये यासाठी, काँग्रेस (५), भाकप (२), माकप (२) आणि व्हीसीके (२) या पक्षांनी त्यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला.

पश्चिम बंगालमध्ये जे घडले त्यामुळे मात्र देशाच्या राजकारणाची दिशाच बदलू शकते. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि माकप या पश्चिम बंगालमधील धर्मनिरपेक्ष पक्षांनी गेल्या १० वर्षांत स्वतःला बळकट केलेल्या भाजपविरुद्ध स्वतंत्रपणे लढा दिला. शिवाय, पश्चिम बंगालमधील एसआयआर (मतदार याद्यांची सखोल आणि विशेष फेरतपासणी प्रक्रिया) मुळे मोठ्या संख्येने मतदारांची नावे वगळली गेली. हा लोकशाहीवर एक मोठा डाग आहे. इथे अनेक अशी उदाहरणे आढळतात, जिथे मुलगा किंवा मुलगी मतदार होते, परंतु त्यांचे वडील किंवा आई मात्र मतदार नव्हते. कुटुंबे 'मतदार' आणि 'अ-मतदार' अशा दोन गटांत विभागली गेली होती. न्यायव्यवस्था आणि तात्पुरत्या स्वरूपाच्या न्यायिक उपायांनी लाखो मतदारांचा विश्वासघात केला आणि हजारो नागरिक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहिले. एसआयआर (मतदार याद्यांची सखोल आणि विशेष फेरतपासणी प्रक्रिया) व्यतिरिक्त, सलग तीन कार्यकाळांचा बोजा ही तृणमूल काँग्रेसच्या गळ्यातील एक मोठी धोंड बनली होती.

भाजपचे वर्चस्व

तृणमूल काँग्रेसचा पराभव हा गंभीर घडामोडींचा संकेत आहे. भाजप हा एकमेव पक्ष म्हणून किंवा आघाडी सरकारांच्या माध्यमातून, पश्चिम भारत (महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा), हिंदी भाषिक पट्ट्याच्या मोठ्या भूभागावर (हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड वगळता), तसेच पूर्व आणि ईशान्य भारतावर सत्ता गाजवत आहे. लाक्षणिक अर्थाने सांगायचे तर, विंध्य पर्वतरांग ही भाजपच्या पाच दक्षिण भारतीय राज्यांमधील प्रवेशासाठी अडथळा ठरली आहे. केरळ आणि तमिळनाडूमध्ये प्रवेश करण्यासाठी भाजपने केलेले अफाट प्रयत्न तेथील मतदारांनी ठामपणे धुडकावून लावले आहेत (त्यामुळे भाजपच्या हाती अनुक्रमे केवळ तीन आणि एकच जागा आली आहे). तथापि, उर्वरित भारतावर मात्र जवळपास भाजपचे पूर्ण नियंत्रण आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत केवळ २४० जागा जिंकूनही भाजपने संसदेत खालील वादग्रस्त विधेयके मंजूर केली आहेतः

- वक्फ (सुधारणा) कायदा, २०२५;
- जम्मू आणि काश्मीर स्थानिक संस्था (सुधारणा) कायदा, २०२५;
- करविषयक कायदे (सुधारणा) कायदा, २०२५; आणि
- राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायदा, २०२५

इतर काही वादग्रस्त विधेयकेही लवकरच सादर होण्याची शक्यता आहे; यामध्ये लोकशाहीविरोधी अशा 'एक राष्ट्र, एक निवडणूक' (एक देश एक निवडणूक) विधेयकाचाही समावेश आहे. पुरेसे संख्याबळ नसतानाही, भाजपने 'संविधानातील १३१ वी सुधारणा' हे वादग्रस्त विधेयक सादर केले. सप्टेंबर २०२३ मध्ये मंजूर करण्यात आलेले महिला आरक्षणाचे विधेयक रद्द करून, त्याजागी नवीन विधेयक पुन्हा लागू करणे हा यामागील उद्देश होता. या नवीन विधेयकाचा खरा उद्देश मात्र मतदारसंघांची पुनर्रचना (डिलिमिटेशन) पुढे ढकलणे आणि प्रत्येक राज्यातील लोकसभा जागांची संख्या बदलणे हा होता. इंडिया आघाडीने हे विधेयक हाणून पाडले. भाजपने आपली विजयाची मालिका अशीच कायम ठेवली, तर संसदीय व्यवस्थेचा बाह्यविष्कार कायम ठेवून, प्रत्यक्षात मात्र एका हुकूमशाही राजवटीचा मार्ग प्रशस्त करण्यासाठी सरकार संविधानात सुधारणा करण्याचा प्रयत्न करेल. भाजपचे पुढील उद्दिष्ट हे 'एकात्मिक संविधान' (संघराज्यीय व्यवस्था संपुष्टात आणणे), 'हिंदुत्व' हीच प्रमुख विचारसरणी (धर्मनिरपेक्षता संपुष्टात आणणे), 'भांडवलशाही' हे आर्थिक प्रारूप (कल्याणकारी राज्याची संकल्पना संपुष्टात आणणे) आणि अंतिमतः 'एकपक्षीय राजवट' (लोकशाही संपुष्टात आणणे) हे असेल.

एक व्हा, प्रतिकार करा

विरोधी पक्षांनी ठामपणे प्रतिकार केलाच पाहिजे. भारताचे लोकशाही, संघराज्यीय आणि धर्मनिरपेक्ष स्वरूप टिकवून ठेवण्यासाठी, इतर राजकीय पर्याय जतन करणे अत्यावश्यक आहे. इंडिया आघाडीला २०२४ मध्ये अंशतः यश मिळाले असले, तरी त्याची गती कायम राखण्यात त्यांना अपयश आले. ही आघाडी सध्या संघर्ष करताना आणि डगमगताना दिसत असली, तरी भाजपला आव्हान देण्यासाठी उपलब्ध असलेले हे एकमेव साधन आहे.

या निवडणूक निकालांनंतर, पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी त्या इंडिया आघाडी बळकट करण्यासाठी काम करणार असल्याचे आश्वासन दिले आहे. एम.के. स्टालिन (डीएमके) यांनीही या आघाडीच्या विरोधात एकही शब्द उच्चारलेला नाही. भाजप हा माझा वैचारिक शत्रू आहे, हे टीव्हीकेच्या विजय यांचे विधान पाहता त्यांनाही या आघाडीत सामावून घेणे शक्य होऊ शकेल. या आघाडीतील घटक पक्षांमध्ये काही मूलभूत मतभेद आहेत, हे खरे आहे; परंतु हे मतभेद केवळ राज्यपातळीपुरतेच मर्यादित असावेत आणि राष्ट्रीय पातळीवर मात्र एकजूट साधली जावी. यासाठी जाणीव, संवाद आणि चिकाटी यांची आवश्यकता असेल.

लेखक भारताचे माजी अर्थमंत्री आहेत.
संकेतस्थळ : pchidambaram.in ट्विटर : @Pchidambaram_IN

सविस्तर

दयानंद लिपारे

साखर उद्योगातील कडवटपणा

शर्करा उद्योगाची स्थिती खडतर आहे. प्रतिटन साडेतीन चार हजार रुपये मिळत असूनही शेतकऱ्यांच्या ना चेहऱ्यावर हसू आहे, ना साखर कारखानदार समाधानी आहेत. ऊस शेती आणि साखर उद्योगाचा बिघडलेला तोल सावरण्याची, त्यास ताकद देण्याची जबाबदारी केंद्र सरकारची आहे.



साखरेचा गोडवा जिभेला आनंद देणारा खरा. याच साखरेच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या ऊस या कच्च्या मालाची आणि त्यापासून उत्पादित साखरेची आपल्या देशातील कथा गोडवा देण्याऐवजी अलीकडे कडवटपणा अधिक देणारी ठरू लागली आहे. साखर कारखानदारीत शिरलेले दोष त्यास कारणीभूत तद्वत केंद्र - राज्य सरकारचे धोरणही तितकेच जबाबदार आहे. नुकत्याच संपलेल्या (२०२५-२६) हंगामात ऊस उत्पादकांना एक लाख २२ हजार कोटी रकमेचा ऊस पिकवून कारखान्यांना गाळपासाठी घातला. इतकी भरभक्कम रक्कम मिळायची असतानाही धड शेतकरी खूश, ना साखर उद्योग. अशातच आगामी हंगामासाठी उसाच्या वाजवी व किफायतशीर दरामध्ये (एफआरपी) प्रति टन १०० रुपयांची वाढ केल्याने साखर उद्योगाचे अर्थचक्र आणखीनच खोलात रुतणार आहे. उत्पादन खर्च भरून येत नसल्याने उसाचे नगदी पीक घेऊनही शेतकऱ्यांच्या तोंडचा कडवटपणा जात नाही.

साखर उद्योग हा जागतिक स्तरावर आणि विशेषतः भारतातील एक प्रमुख कृषी आधारित उद्योग आहे. आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा उद्योग आहे. ग्रामीण भागाच्या अर्थकारणाची मोठी भिस्त याच साखर उद्योगाच्या गोडव्यावर अवलंबून आहे. देशात साधारणपणे ५० लाख हेक्टरवर उसाची लागवड केली जाते. पाच कोटी शेतकरी व त्यांचे कुटुंब प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे या उद्योगात गुंतलेले आहेत. साखर उत्पादनात ब्राझील जगात अग्रस्थानी आहे. या देशाने आपल्या उसाचा ५०-५५ टक्के हिस्सा इथेनॉल उत्पादनाकडे वळवण्याचे धोरण स्वीकारले आहे. यामुळे भारत नजीकच्या काळात जगातील आघाडीचा साखर उत्पादक म्हणून झेप घेईल. भारताचे उसाचे सरासरी वार्षिक उत्पादन सुमारे ४५० दशलक्ष टन असून साखरेचे उत्पादन सुमारे ३४-३६ दशलक्ष टन आहे. साखरेचा सर्वात मोठा ग्राहक असलेल्या भारताचा देशांतर्गत वापर सुमारे २९० लाख टन आहे. या आकडेवारीवरून उद्योगाचा आवाका, खोली लक्षात यावी. ऊस आणि साखर या दोहोंच्या उत्पादनाच्या बाबतीत वरच्या क्रमांकावर असलेल्या महाराष्ट्राच्या अर्थकारणाच्या दृष्टीने साखर कारखानदारीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

केंद्र सरकारने एक गोष्ट बाकी चांगली केली आहे. उसाला हमीभाव घेण्याचे धोरण १७ वर्षांपूर्वी स्वीकारले. उसाची पूर्वीची एसएमपीची (वैधानिक किमान दर) संकल्पना बदलून त्याजागी २२ ऑक्टोबर २००९ रोजी ऊस नियंत्रणआदेश, १९६६ मध्ये सुधारणा करून उसाच्या एफआरपीची (वाजवी आणि किफायतशीर दर) संकल्पना लागू केली. उसाची किंमत कृषी खर्च आणि किंमत आयोगाच्या शिफारशींच्या आधारे, राज्य सरकारांशी सल्लामसलत करून आणि साखर उद्योगातील संघटनांकडून अभिप्राय घेतल्यानंतर केंद्र सरकारकडून निश्चित केली जाते. एफआरपी पद्धतीमुळे शेतकऱ्यांना बिलासाठी हंगामाच्या अखेरपर्यंत किंवा साखर कारखान्यांकडून नफ्याबाबत कोणतीही घोषणा होण्याची वाट पाहावी लागत नाही. साखर कारखान्यांना नफा मिळो अथवा न मिळो शेतकऱ्यांना १४ दिवसांत देयके द्यावी लागतात. न दिल्यास कारखान्यांना महसुली जप्तीच्या (आरआरसी) कारवाईला तोंड द्यावे लागते.

गेल्या सात वर्षांपासून एफआरपीमध्ये वाढ होत आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ समितीने २०२६-२७ हंगामासाठी उसाच्या एफआरपीमध्ये प्रति टन १०० रुपये वाढ करण्याचा निर्णय जाहीर केला. हा दर १०.२५ सरासरी उतारा दरासाठी ३६५ रुपये प्रति क्विंटल असून तो गत हंगामापेक्षा २.८१ टक्क्यांनी जास्त आहे. या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची मर्जी राखण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे.

गेल्या काही वर्षांपासून देशात अतिरिक्त साठा मोठ्या प्रमाणात शिल्लक असल्याने उद्योगाची रक्कम त्यात मोठ्या प्रमाणात गुंतून राहिली आहे. एफआरपी देण्यास सुरुवात झाल्यापासून त्यात सातत्याने वाढ झाली आहे. एखाद्या वर्षी साखरेचे उत्पादन घटणार असा अंदाज असतो. अशा तुटीच्या वर्षांमध्येसुद्धा सरकारला एफआरपीमध्ये वाढ करावी लागली आहे. इतकेच काय तर साखरेच्या अतिरिक्त उत्पादनाच्या वर्षांमध्ये तो कमी केल्याचे उदाहरण सापडत नाही. २०१०-११ आणि २०१७-१८ या वर्षांमध्ये, अतिरिक्त उत्पादन झाले होते. तरीही उसाचा एफआरपी १३९१ रुपये प्रति टनावरून २५५० रुपये प्रति टनापर्यंत म्हणजे जवळपास दुप्पट झाला होता. आगामी साखर हंगामासाठी एफआरपी प्रति टन १०० रुपयांनी वाढ केल्याने पाच कोटी शेतकऱ्यांना दिलासा दिल्याचे केंद्र सरकारचे म्हणणे असले तरी ते अर्धसत्य आहे. खतांच्या सततच्या वाढत्या किमती, हवामानातील अनिश्चितता, डिझेल दरवाढ यामुळे शेतकऱ्यांचा ऊस उत्पादनाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. इंधन दरवाढ, मशागत, कापणी, वाहतूक खर्च वाढण्याची शक्यता आहे. प्रतिटन ३,६५० रुपयांचा एफआरपी उत्पादन खर्चापेक्षा १००.५ टक्के जास्त असल्याचा सरकारचा दावा व्यवहार्य नसल्याचे सांगत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष तथा माजी खासदार राजू शेट्टी यांनी उसाच्या योग्य व लाभदायक दरात वाढ करून तो ३,८५० रुपये प्रति टन करण्याची मागणी केली आहे. ती रास्त असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

साखर उद्योगाची रडकथा वेगळीच आहे. एफआरपी वाढीमुळे साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती आणखी बिकट झाली आहे. २०१८ पासून श्वास घेण्यासाठी दोन्ही मागण्यांबाबत तातडीने निर्णय घेतला नाही तर आगामी हंगामासाठी कारखान्यांची धुराडे पेटण्याची शक्यता कमी आहे.' अशी भीती राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी बोलून दाखवली आहे. 'शेतकऱ्यांना एफआरपी देण्यासाठी एमएसपी वाढण्याची गरज आहे. या संदर्भात केंद्र सरकारसोबत बोलणे सुरू आहे. वाढलेली एफआरपी आणि वाढत चाललेला उत्पादन खर्च यामुळे साखर कारखान्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. राज्यातील साखर कारखान्यांसमोर 'शॉर्ट मार्जिन'चे (अपुरा दुरावा) संकट उभे आहे. त्याचा फटका कारखान्यांबरोबरच ऊस बिलाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना बसण्याची दाट शक्यता आहे,' असे महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष पी. आर. पाटील सांगतात.

एकूणच शर्करा उद्योगाची स्थिती खडतर आहे. प्रतिटन साडेतीन चार हजार रुपये मिळत असूनही शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू नाही. अन ना साखर कारखानदार समाधानी आहेत. ऊस शेती आणि साखर उद्योगाचा बिघडलेला तोल सावरण्याची, त्यास ताकद देण्याची जबाबदारी केंद्र सरकारची आहे. भारतातील साखर कारखान्यांची वार्षिक उलाढाल एक लाख कोटीहून अधिक रुपयांची आहे. त्यातून सरकारला १५ हजार कोटी रुपये महसूल मिळत असल्याने परताव्याच्या रूपाने मदतीचा हात तत्परतेने देण्याची वेळ येऊन ठेपली आहे. खेरीज, उसाच्या दरात अलीकडे झालेल्या वाढीमुळे साखरेच्या दरात त्याच प्रमाणात वाढ न झाल्यास साखर उद्योग आणखी आर्थिक अडचणीत येऊ शकतो.


शेतकऱ्यांसाठी उसाची लागवड किफायतशीर होणे गरजेचे आहे. तद्वत, साखर उद्योगाला काही प्रमाणात आर्थिक फायदा होणे तितकेच गरजेचे आहे. या दोहोंची गोळाबेरीज जमली तर साखरेचा गोडवा खऱ्या अर्थाने वाढेल असे म्हणता येईल, पण त्याआधी केंद्र - राज्य सरकारची अडखळणारी पावले सकारात्मक पडायला हवीत.

dayanandlipare@gmail.com

चांदनी चौकातून

दिल्लीवाला

पश्चिम बंगालमध्ये चुकांची दुरुस्ती



भाजप झालेल्या चुका दुरुस्त करतो आणि विजय मिळवतो. पश्चिम बंगालमध्येही तसंच झालं. गेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपनं मोठ्या चुका केल्या होत्या. निवडणुकीच्या प्रचाराचं नियोजन नीट झालं नव्हतं. काही चुकांमुळे तर भाजपच्या प्रतिमेलाही धक्का लागू शकतो अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळं यावेळी प्रचाराच्या सुरुवातीपासूनच चुका होणार नाहीत याची दक्षता घेतली गेली. एसआयआर वगैरे गोष्टी तिथल्या सामान्य कार्यकर्त्यांने करायच्या नव्हत्या, त्यासाठी वेगळी यंत्रणा होती. कार्यकर्त्यांना-नेत्यांना फक्त प्रचार करायचा होता. भाजपनं सर्व शक्ती पणाला लावली होती. राज्याबाहेरून नेते-मुख्यमंत्री, कार्यकर्ते आणले गेले. पण, गेल्या वेळी बाहेरून आलेल्या नेते-कार्यकर्त्यांमुळे बंगाली विरुद्ध बाहेरचे असा वाद झाला, त्याचा ममता बॅनर्जींना मोठा फायदा झाला होता. यावेळी बाहेरून आलेल्या नेते-कार्यकर्त्यांना भाषा आणि समाजवार विभागलं गेलं. ओदिशा-छत्तीसगढच्या मुख्यमंत्र्यांना काही विशिष्ट भागातच प्रचारासाठी पाठवलं गेलं. आकर्षण ठरू शकतील असे योगी आदित्यनाथ आणि देवेंद्र फडणवीस यांनीही एखाद-दोन दिवस प्रचार केला. पण, त्यांनीही बंगालेतर लोकांमध्ये लक्ष केंद्रित केलेलं होतं. प्रमुख बंगाली मतदारांमध्ये बाहेरचे नेते-कार्यकर्ते पाठवले गेले नाहीत. गेल्या वेळी बाहेरच्या नेत्यांना बंगाली मतदारांच्या नियोजनात गुंतवल्याचा फारसा फायदा मिळाला नाही. यावेळी फक्त भाजपच्या बंगाली नेत्यांनी हे नियोजन केलं होतं असं सांगितलं जातं. भाजपनं यावेळी घेतलेली दक्षता म्हणजे तृणमूलमधून नेते आयात केले नाहीत. गेल्या वेळी तसे केले, त्यांचा उपयोग झाला नाही, त्यातील काही मंत्री बनून पुन्हा तृणमूल काँग्रेसमध्ये गेले. ही निवडणूक भाजपने स्वतःच्या नेते आणि कार्यकर्त्यांच्या बळावर लढवली. पश्चिम बंगालच्या भाजपच्या रणनीतीचा आणि प्रचाराचा ताबा केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी घेतला होता. गेल्या वेळी भाजप कैलाश विजयवर्गीय या अत्यंत आक्रस्ताळी नेत्यांवर अवलंबून होता. त्यांच्याकडं भाजपची जबाबदारी होती. त्यांच्याकडून व त्यांच्या चमूकडून खूप मोठ्या चुका घडल्या होत्या. त्यातून वातावरण बिघडण्याची भीती निर्माण झाली होती असं म्हणतात. यावेळी ते नव्हते. शहांनी आपले अत्यंत विश्वासू सुनील बन्सल यांना सलग दोन वर्षं पश्चिम बंगालमध्ये पाठवलं होतं. शेवटचे सहा महिने दुसरे विश्वासू केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव हेदेखील पश्चिम बंगालमध्ये ठाण मांडून होते. हे दोघेही न बोलता शहांसाठी काम फत्ते करणारे नेते आहेत. हेच काम बिहारमध्ये सलग साडेतीन वर्षं विनोद तावडे यांनी केलं होतं. भूपेंद्र यादव यांच्याकडं महाराष्ट्राचीही जबाबदारी दिली होती. यादव जिथं जातात, तिथं भाजपला यश मिळतं असं म्हटलं जातं. फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले तेव्हाही भूपेंद्र यादवच महाराष्ट्राचं काम पाहात होते. भाजपसमोर असलेलं मोठं आव्हान म्हणजे स्थानिक पातळीवर तृणमूल काँग्रेसच्या आक्रमक कार्यकर्त्यांच्या फळीला तोंड देणं. इथं भाजपला गोष्टी 'मॅनेज' करण्यात मोठं यश आलं असं म्हणतात. राजकारणात दाम आणि दंड दोन्हीचा प्रभावी उपयोग करून घेता येतो. भाजपसारख्या सूक्ष्म आखणी करणाऱ्या पक्षाला हे जमलं नसेल असं म्हणता येणार नाही. दुसऱ्या बाजूला रणनीतीची अंमलबजावणी करणाऱ्या नेत्यांनाही शिस्त पाळण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या होत्या. त्यातून गेल्या वेळी झालेला गोंधळ टाळला गेला. मुस्लीम मतदारांची संख्या ३० टक्क्यांपेक्षा जास्त असेल तर भाजपला जागा जिंकणं अशक्य असल्याचं मानलं गेलं होतं. गेल्या निवडणुकीत भाजपला त्याचा फटका बसला होता. यावेळी ही अडचणही मतदारसंघनिहाय विचार करून दूर केली गेली. काँग्रेस, डावे पक्ष, स्थानिक मुस्लीम उमेदवारांना मतदान झालं. भाजपच्या केंद्रीय नेत्यांनी प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात पश्चिम बंगालची पाहणी केल्यानंतर पक्षाला १७० जागा मिळू शकतात असा अंदाज बांधलेला होता. प्रत्यक्षात भाजपने दोनशे पार उडी मारली. भाजपच्या अजेंड्यावर जसं राम मंदिर होतं, तसं पश्चिम बंगालही होतं. यावेळी हा अजेंडा पूर्ण झाला. आता कदाचित मोर्चा पंजाबकडे वळू शकतो.

आयात मुख्यमंत्री!



काँग्रेसला अलीकडं सत्ता मिळणं कठीण झालेलं आहे, या पक्षातील कोणा नेत्याला मुख्यमंत्री होण्याची मनीषा असेल आणि ती काँग्रेसमध्ये पूर्ण होत नाही असं वाटत असेल तर त्यांनी भाजपमध्ये जावं. भाजपमध्ये बाहेरून आलेले नेते मुख्यमंत्री बनतात. अर्थात तिथंही वाट पाहावी लागते आणि शिस्तीत काम करावं लागतं. काँग्रेसमध्ये नेतेपदासाठी राहुल गांधींच्या भेटीसाठी तिष्ठत असतात. राहुल गांधी त्यांना भेट देत नाहीत. मुद्दा असा की, भाजपचे अनेक मुख्यमंत्री अन्य पक्षांतून आलेले आहेत. ताजं उदाहारण म्हणजे पश्चिम बंगालचे नवनियुक्त मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी हे तृणमूल काँग्रेसमधून आलेले आहेत. बिहारमध्ये अलीकडेच सत्तांतर झालं त्यात भाजपचे सम्राट चौधरी मुख्यमंत्री झाले. ते मूळचे लालूप्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाचे. सर्वात मोठं नाव म्हणजे हिमंता बिस्वा सरमा. हे तर काँग्रेसचे. कधी काळी राहुल गांधींच्या वर्तुळातले. पण, ते भाजपमध्ये आले. पाच वर्षं त्यांनी वाट पाहिली मग, त्यांना मुस्लीमद्वेषाचं बक्षीस म्हणून आसामचं मुख्यमंत्रीपद दिलं गेलं. दहा वर्षं तेच मुख्यमंत्री राहतील. आसाममध्ये हिमंतांच्या आधी सर्वानंद सोनोवाल मुख्यमंत्री होते. ते आसाम गण परिषदेतून भाजपमध्ये आले. कर्नाटकमध्ये माजी मुख्यमंत्री बसवराज बोम्मई हे मूळचे जनता दलाचे नेते. मणिपूरमध्ये माजी मुख्यमंत्री विरेंद्र सिंह हे काँग्रेसचे. अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री प्रेमा खांडू, त्रिपुराचे मुख्यमंत्री मणिक साहा हेही काँग्रेसचे. या आयात नेत्यांमध्ये मुख्यमंत्रीपदी सर्वात यशस्वी झाले ते हिमंत विस्वा सरमा. आता सुवेंद्र अधिकारी यांच्याकडं भाजप आशेनं बघतोय.

महिला आरक्षणासाठी कोणाची मदत मिळणार?



पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, महिलांचा रोष भोवला, अशी प्रतिक्रिया दिली होती. याचा दुसरा अर्थ मोदी पुन्हा एकदा महिला आरक्षणाच्या तरतुदीसाठी लोकसभा मतदारसंघांच्या फेररचनेचे घटनादुरुस्ती विधेयक आणू शकतात. त्यासाठी भाजपला संख्याबळाची जुळवाजुळव करावी लागेल. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसचा पराभव झाल्यामुळे आणि तमिळनाडूमध्ये काँग्रेसने द्रमुकशी काडीमोड घेतल्यामुळं इंडिया आघाडी किती एकसंध राहील आणि घटनादुरुस्ती विधयकाच्या मतदानावेळी काय होईल हे सांगता येत नाही. लोकसभेत दोनतृतीयांश बहुमतासाठी केंद्र सरकारला ३६२ संख्याबळ लागेल. एनडीएकडे आहेत २९२. म्हणजे आणखी ७० खासदारांचा पाठिंबा लागेल. वायएसआरसीपी-४, आप-३, शिरोमणी अकाली दल-१, शिवाय ठाकरे गट-९, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट-८, झारखंड मुक्ती मोर्चा-३ असे एकूण झाले २८. हे सगळे विरोधी पक्षातील वा कुंपणावरील. त्यातील किती गळाला लागतात हे बघायचे. द्रमुक-२२ आणि तृणमूल काँग्रेस-२८ हे झाले ५०. त्यातील किती जणांची मनधरणी करण्यात यश येतं हेही बघायचं. यातील कोणी मतदाना वेळी अनुपस्थित राहिलं वा मतदानात भाग घेतला नाही तर वाट आणखी सुकर होऊ शकते. राज्यसभेत केंद्र सरकारला हवेत १६३. एनडीएकडे आहेत १४४. गरज फक्त १९ च्या संख्याबळाची. इथं झामुमो-२, वायएसआरसीपी-७, बिजू जनता दल-६, भारत राष्ट्र समिती-३, बसप-१ हे झाले १९. शिवाय, तृणमूल काँग्रेस-१३ आणि द्रमुक-८. पश्चिम बंगालचे नवनियुक्त मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांना तृणमूल काँग्रेस आतून-बाहेरून माहीत आहे. त्यांचा प्रभावही आता महत्त्वाचा ठरू शकतो. त्यामुळं महिला आरक्षणासाठी कोणाची मदत मिळणार हाही सध्याचा कुतूहलाचा विषय बनलेला आहे.

नवीन यांची टीम कधी?



भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची वाजतगाजत निवड झाली तरीही अजून त्यांना स्वतःची टीम बनवता आलेली नाही. नवीन हे माझेही अध्यक्ष असं मोदींनी म्हणून साडेतीन महिने झाले आहेत. २० जानेवारीला नवीन अध्यक्षपदाच्या खुर्चीवर बसले. त्यानंतर संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन होतं. तेच दोन टप्प्यात चाललं. तोपर्यंत पाच राज्यांतील विधानसभेच्या निवडणुका आल्या. मग, नवीन यांचे या राज्यांत दौरे होत गेले. त्यानंतर मध्येच लोकसभा मतदारसंघांच्या फेरचनेचं घटनादुरुस्ती विधेयक आलं. त्यात नवीन गुंतले होते. ज्या दिवशी लोकसभेत हे विधेयक फेटाळलं जाणार हे निश्चित झालं त्या दिवशी नवीन यांचा मुक्काम अमित शहांच्या संसदेतील दालनात होता. तिथं 'एनडीए'च्या महिला खासदारांनी विधेयक फेटाळल्यानंतर काय करायचं याचं नियोजन झालं. नवीन शहांना वारंवार भेटत होते, त्यांची धावपळ सुरू होती. त्यानंतर नवीन हे आपच्या फुटीर खासदारांना विलीन करून घेण्यात गुंतले होते. हे काम अर्थातच अमित शहांनी केलं असेल पण, मान राष्ट्रीय अध्यक्षांना मिळणार हे तर उघडच. नवीन बिहारचे असल्यानं पश्चिम बंगालच्या निवडणुकीतही त्यांची भूमिका महत्त्वाची होती. पहिल्या टप्प्यात अख्ख्या पश्चिमेकडील मतदारसंघांमध्ये मतदान झालं. या भागांमध्ये हिंदी भाषिक मतदार लक्षणीय आहेत. इतके कष्ट केल्यानंतर नितीन नवीन यांना स्वतःची कार्यकारिणी बनवण्याला प्राधान्य द्यावं लागणार आहे. नवीन यांच्या नव्या चमूमध्ये कोण असेल याची उत्सुकता असेल. पंजाबमधील आगामी निवडणूक डोळ्यासमोर ठेवून दिल्लीतील कोणत्या नेत्याला समितीमध्ये स्थान मिळेल हे बघायचं. नवीन यांच्या नवीन कार्यकारिणीवर कदाचित महिनाअखेर शिक्कामोर्तब होऊही शकेल.

सत्यरंजन धर्माधिकारी



'एशियाटिक सोसायटी'ची निवडणूक

हिमनगाचे टोक फक्त!

महाराष्ट्रातील धर्मादाय संस्था व सार्वजनिक न्यासांच्या व्यवस्थापन आणि प्रशासनाचे सध्या वाभाडे निघत आहेत. संस्थांतर्गत वाद व मतभेद, बाह्य हस्तक्षेप आणि भ्रष्टाचार व अनियमितेचे प्रमाण बरेच वाढले आहे. सोबतीला त्यांच्या निवडणुकीचा मुद्दा गाजतो आहे. यात काही कायदेशीर आणि कार्यप्रणालीविषयक गंभीर बाबींकडे साफ दुर्लक्ष होते आहे. या लेखात त्याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

उदाहरणार्थ 'एशियाटिक सोसायटी' ही नोंदणीकृत सार्वजनिक न्यास म्हणजे ट्रस्ट आहे. महाराष्ट्राचा सार्वजनिक न्यास कायदा सार्वजनिक न्यासांना लागू होतो. खासगी न्यासांना केंद्रीय कायदा लागतो. राज्यांच्या कायद्याची पंचाहत्तरी (७५ वर्ष) २०२५ मध्ये झाली. त्या कायद्याअंतर्गत नियमावलीला या वर्षी ७५ वर्ष पूर्ण होतील. न्यासांचा व्यवहार स्वच्छ, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्यासाठी या कायद्याची योजना आहे. कायद्याचा हेतू आणि उद्देश न समजता सोयीस्कर अर्थ लावण्याकडे आज वाढता कल आहे. पदाधिकाऱ्यांना आपली भूमिका व आपले कर्तव्य याचा विसर पडल्यामुळे त्यांना विश्वस्त म्हणायचे का हा यक्षप्रश्न आहे. विश्वस्त म्हणजे ज्याच्यावर विश्वास ठेवता येईल असा आणि वैश्विकवृत्ती बाळगणारा. सार्वजनिक निधी व संपत्ती सांभाळणे आणि त्याचा विनियोग न्यासाच्या हेतूपूर्तीसाठी करणे हे अत्यंत जोखमीचे व जबाबदारीचे काम आहे.

कायद्यात 'पर्सन हॅविंग इंटरेस्ट' या शब्दांचा अर्थ जिला सार्वजनिक न्यासाच्या कार्यातून काही लाभ व फायदा मिळतो अशी व्यक्ती किंवा न्यासाचा विश्वस्त, असा आहे. कायदा या बाबतीत विश्वस्तांच्या कामकाजावर देखरेख व लक्ष ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करतो. हा कायदा संविधानातील अनुच्छेदांना अनुसरून आहे म्हणून टिकून आहे. संविधानातील नागरिकांच्या अनुच्छेद १९ (१) (क) अन्वये बहाल केलेल्या संस्था स्थापण्याच्या मूलभूत अधिकारात या कायद्याचा उगम आहे. मात्र यावर बंधने घालण्याचा अधिकारातसुद्धा त्याचा स्रोत सापडतो. शासनाला बंधने व नियंत्रणे आणण्याचा अधिकार अनुच्छेद १९(२)(क) द्वारा देताना असे बजावले आहे की नैतिक मूल्यांच्या पुरस्कारार्थ तो बजावता येईल. अधिकाराबरोबरच कर्तव्याची जाणीव करून देणारा हा कायदा बऱ्याच अर्थाने ऐतिहासिक आहे.

कायद्याच्या अंमलबजावणीचे स्वरूप मात्र नागरिकांच्या मूलभूत अधिकारात शासनाचा हस्तक्षेप असे आहे. ऐतिहासिक स्वरूपाच्या कार्यासाठी जिचा सर्वत्र गौरव होतो अशा एशियाटिक सोसायटीची स्थापना चौफेर ज्ञानसाधनेसाठी ब्रिटिश काळात स्थापली. त्याचे आताचे नाव 'द एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई' असे आहे. आज ती पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट म्हणून नोंदणीकृत आहे. पी.टी.आर. नं. इ-१०२०/मुंबई हा नोंदणी क्रमांक आहे. संस्थेच्या नियमानुसार कामकाज चालते. नियमावलीला मंजुरी मिळालेली ही स्वायत्त संस्था केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली आहे. नियंत्रण म्हणजे लुडबुड करण्याचा परवाना नव्हे. सार्वजनिक न्यास अनेक आहेत परंतु सगळ्यांच्या कामकाजात शासनाला रस नसतो. धार्मिक कार्याला, साहित्यसेवेला, रुग्णसेवेला तसेच शिक्षणाला वाहिलेल्या नामांकित संस्थांत केवळ शासकीयच नव्हे तर राजकीय हस्तक्षेपही आहे. निधी व अनुदान मिळविण्यासाठी सत्ताधारी व विरोधी पक्षीय पुढाऱ्यांची अरेरावीही खपवून घेतली जाते. मग स्वायत्तता नावालाच उरते. हेच चित्र थोड्याफार प्रमाणात एशियाटिक सोसायटीचे आहे.

या स्वायत्त न्यासाची निवडणूक (पदाधिकारी निवड पद्धतीनुसार) घोषित झाली. सभासद पदाधिकारी निवडतात. सभासदांना निवड करता यावी यासाठी नियमानुसार टप्पे घोषित करण्यात आले. पात्र सदस्यांची / सभासदांची मतदार यादी जाहीर करणे, तत्पूर्वी मतदानासाठी (झालेच तर) किंवा उमेदवारीसाठी निकष व अटी जसे किती कालावधीसाठी सभासदत्व असावे म्हणजे एका तारखेपर्यंत असावे म्हणजे मतदार यादीत नाव समाविष्ट होईल अन्यथा सभासदत्व वैध असेल पण मतदार म्हणून नोंदणी होणार नाही. मतदार यादी अंतिम होण्यापूर्वी आक्षेप घेता येतात. मग निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करता येतो. त्यातील टप्पे सर्वज्ञात आहेत. उमेदवारी अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख व वेळ, त्यांची छाननी व नाकारण्याची प्रक्रिया, नाकारल्यावर त्या कृतीला आव्हान देण्यासाठी मुदत व तदनंतर वैध नामांकन अर्ज प्रकाशित करणे, निवडणुकीतून माघार घेण्यासाठी संधी व वेळ आलीच तर मतदान व त्यासाठी तारीख आणि वेळ आणि सर्वात शेवटी निवडणुकीचे निकाल. कुठलीही निवडणूक असो त्यात सहभागी होण्याचा अधिकार हा कायदेशीर आहे. सामान्य आणि संवैधानिक तर अजिबात नाही. (ए. आय. आर. १९८२ एस. सी. ९८३, ज्योती बसू इतर वि. घोसाल आणि इतर).

मतदानाच्या टप्प्यावर पोहोचल्यानंतर मतदार यादीला आव्हान देऊन संपूर्ण प्रक्रिया खंडित करण्याची आज सवय जडली आहे. उलटा प्रवास कायद्याला मान्य नाही. एशियाटिक सोसायटीच्या निवडणुकीबाबतीत हेच घडते आहे. त्याला सरकार आणि काही प्रमाणात न्यायालय जबाबदार आहे, असे अत्यंत नम्रपणे म्हणावेसे वाटते. सत्ताधारी आणि विरोधी पक्ष, श्रीमंत घराणी आणि औद्योगिक समूह न्यासांच्या निवडणुकांमध्ये वारेमाप खर्च करतात. मग मतदान प्रक्रिया दूषित होते आणि न्यायालयीन प्रकरणे वाढतात. भांडणे, फोडाफोडी व विशिष्ट राजकीय आणि आर्थिक विचारसरणी लादण्यासाठी जाती-पाती व धार्मिक समूहांचे वर्चस्व हे नित्याचे आहे. काही संस्था सन्माननीय अपवाद आहेत. निवडणूक टाळून तेथे सर्व संमतीने पदाधिकारी निवडले जातात. शहाणी मंडळी समाजहित डोळ्यासमोर ठेवून संस्था राजकारणाचा अड्डा बनू देत नाहीत. निवडणूक अपरिहार्य असेल तर त्याचा अर्थ कायदा व नियम धाब्यावर बसवावेत असा खचितच नाही. सामंजस्य आणि परिपक्वतेचा अभाव ही निवडणुकीची वैशिष्ट्य झाली आहेत. एशियाटिक सोसायटीच्या बाबतीत तर कायदा आणि नियम वाऱ्यावर सोडले आहेत. प्रथम धर्मादाय आयुक्त व त्यांचे कार्यालय यांनी बंधनकारक निकाल-निवाडे बाजूला सारत निवडणुकीसंदर्भातील तक्रारींची दखल घेतली. मुंबई उच्च न्यायालयाने कायद्याच्या कलम ३७ ते ४१, ४१-अ यांचा अन्वयार्थ लावताना असे म्हटले की धर्मादाय आयुक्तांना यांचा आधार घेत वरील तक्रारींची दखल घेण्याचा अधिकारच नाही. एशियाटिक सोसायटीच्या बाबतीत याचा दाखला देत उच्च न्यायालयाच्या एका खंडपीठाने धर्मादाय आयुक्तांचा निकाल रद्दबातल केला. निवडणुकीला दिलेली स्थगिती उठविली. तरीदेखील नंतर धर्मादाय आयुक्तांनी मतदानाच्या तारखेच्या एक दिवसापूर्वी स्थगिती दिली. तिला आव्हान दिल्यानंतर उच्च न्यायालयाच्या एकलपीठाने हा आदेश ताबडतोब रद्द करायला हवा होता. मुळातच आपल्या अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन मतदानात हस्तक्षेप करणे हा उच्च न्यायालयाच्या आदेशांचा अवमान आणि न दुर्लक्षिण्यासारखा शिस्तभंग होता. मात्र, उच्च न्यायालयाच्या एका न्यायाधीशाने धर्मादाय आयुक्तांचे म्हणणे ऐकण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधला. ज्याच्या आदेशाला आव्हान देण्यात येते तो अधिकारी पक्षकार नसतो. गरज पडल्यास त्याची बाजू शासनाचे वकील मांडू शकतात. हजर राहण्याची अट नाही. धर्मादाय आयुक्तांच्या आदेशाची कायद्याच्या कसोटीवर छाननी करायची असते. आदेश व प्रक्रियेची वैधता तपासायची असते. धर्मादाय आयुक्तांशी संपर्क साधून त्यांचा खुलासा घेण्याची आगळीवेगळी कायद्यात नसलेली पद्धत अवलंबिल्यामुळे तातडीचा स्थगिती आदेश उच्च न्यायालयाने दिला नाही. त्यामुळे मतदानाची तारीख (१४ मार्च) जाहीर झाली असतानाही ते होऊ शकले नाही. उच्च न्यायालयाची चूक, ज्याला मतदान नको होते, त्याच्या पथ्यावर पडली. संपूर्ण आदर बाळगून असे म्हणावेसे वाटते की धर्मादाय आयुक्त स्वतंत्र अशी जिल्हा न्यायाधीश पदावरील व्यक्ती असते. तो शासनाचा प्रतिनिधी नव्हे. त्याने शासन व पक्षकार यांच्याकडे न पाहता आपली न्यायबुद्धी शाबूत ठेवत कोणाचाही मुलाहिजा न बाळगता प्रकरणे हाताळली पाहिजेत. त्याचे कायद्यातील स्थान पाहता तो फक्त वरिष्ठ न्यायालयांना आणि कायद्याची बांधिलकी मानणारा हवा. त्याचे या प्रकरणातील वर्तन तसे नाही. कडक शब्दात चुकांची जाणीव करून देत समज देण्याचे कार्य तेही मतदानाच्या तारखेपूर्वी उच्च न्यायालयाने पार पाडायला हवे होते. योग्य तो संदेश गेला असता आणि धर्मादाय आयुक्त व त्यांच्या कार्यालयाला, इतर सहकाऱ्यांना तसेच कनिष्ठ न्यायालयाच्या न्यायाधीशांना आपल्या पितृस्थानी असलेल्या उच्च न्यायालयाचा अनादर केल्याचा परिणाम उमगेल. वरिष्ठ-कनिष्ठ हे नातेच असे आहे की गैरसमजाला वावच नसतो. अपमान न करताही दुर्व्यवहाराची जाणीव करून देता येते. निवडणूक प्रक्रियेत एवढ्या विलंबाने आणि निर्णायक टप्प्यावर हस्तक्षेप करता येत नसतो हेच वरिष्ठ न्यायालयांच्या निकालाचे सार आहे. धर्मादाय आयुक्तपदी असलेल्या ज्येष्ठ न्यायिक अधिकाऱ्याला हे ज्ञात नसेल यावर कुणाचा विश्वास बसेल? कारण तदनंतर उच्च न्यायालयाने त्याने दिलेल्या आदेशात हस्तक्षेप केला आणि स्थगिती उठविली. मात्र उच्च न्यायालयात धर्मादाय आयुक्त व शासन यांनी ज्या हिरिरीने भाग घेतला तो प्रकार अनाकलनीय होता. राज्याचे महाधिवक्त्यांना त्यांच्यातर्फे उपस्थित केले गेले. मात्र आता प्रकरण परत धर्मादाय आयुक्तांकडे पाठवू नये. निवडणूक प्रक्रियेबाबतची तक्रार धर्मादाय आयुक्तांच्या कार्यकक्षेत, अधिकारात येत नसते. कलम ४१-अ हे प्रशासकीय अधिकार प्रदान करते व त्यात न्यायिक बाबी विचारात घेतल्या जाऊ शकत नाहीत. धर्मादाय आयुक्तपदी विराजमान होणाऱ्या व्यक्तीची उच्च दर्जाची कायदेशीर आणि नैतिक बैठक हवी. संवैधानिक मूल्यांशी समझोता न करणारी कर्तव्यदक्ष व्यक्ती या पदावर असायला हवी. हे पद संपूर्ण राज्यातील सार्वजनिक न्यास, धर्मादाय संस्थांवर देखरेख ठेवण्यासाठी निर्माण केले आहे. दबावाला बळी न पडता काम करणारी निष्ठावान व्यक्ती नसेल तर कायद्याचे राज्य या संकल्पनेला अर्थ उरत नाही.

न्यासांचे धर्मादाय संस्था, प्रार्थनास्थळे, सेवाभावी संस्था व इतर धार्मिक व धर्मादाय संस्था असे प्रकार कायद्यात अधोरेखित आहेत. देशातल्या न्यासांची संपत्ती काही लक्ष कोटींची आहे. महाराष्ट्रातील न्यास घेतले तरी कोट्यवधी रुपयांचे मूल्यांकन सहज होईल. या संपत्तीचे खरेदी-विक्री, विशिष्ट कालावधी पार केल्यानंतरचे भाडेकरार यांना धर्मादाय आयुक्तांची मंजुरी लागते. ती सहज मिळत नसते. त्यात सहजता व सुलभता आणण्यासाठी कायद्यात मोठ्या दुरुस्त्या करण्यात आल्या. तसेच या न्यासांकडे देणग्या, बँकेतील ठेवींवरील व्याज असे रोकडे उत्पन्नही भरपूर आहे. त्यामुळेच हितसंबंधीयांना सार्वजनिक न्यासांमध्ये शिरकाव हवा असतो. शासनाला आणि राज्यकर्त्यांना साहित्य आणि समाजसेवी संस्था यांच्यावर पकड घट्ट करण्यासाठी आपल्या मर्जीचे पदाधिकारी हवेत म्हणून नवीन सभासद करून गटबाजीला ऊत येईल अशी व्यवस्था केली जाते कारण संस्थांच्या स्थावर व जंगम मालमत्ता ताब्यात घेता येतात. त्यांचे बाजारभाव गगनाला भिडतात तेव्हा बक्कळ कमाई ठरलेली.

यात आणखी दुर्दैवाची बाब म्हणजे शासन मान्यतेशिवाय व फक्त ठरावीक गुंतवणुकीची परवानगी असतानाही सध्याच्या धर्मादाय आयुक्तांनी (क्र. ६१९ दिनांक २१ जुलै २०२५) स्वतःच्या अधिकारात एक परिपत्रक काढले. कायद्याच्या कलम ३५ आणि त्यातील परंतु पलीकडे जात एक आदेश जारी केला व सार्वजनिक न्यासांच्या विश्वस्तांना न्यासाच्या पैशाच्या पन्नास टक्केपर्यंत गुंतवणुकीचे दालन खुले केले. प्रकरणागणिक छाननी व नंतरच परवानगी अशी तरतूद असताना सरसकट शेअर बाजारात गुंतवणुकीची मुभा दिली. कायद्याच्या व न्यासांच्या उद्दिष्टांना हरताळ फासणारा हा आदेश अजूनही अमलात आहे. त्याला आव्हान देण्यात येणार नाही हे स्पष्टच आहे. परमार्थाची जागा स्वार्थाने आणि समाजोपयोगी कार्याची जागा लाभ व मोह यांनी फार पूर्वीच घेतली आहे. आचार्य विनोबा भावे म्हणतात त्याप्रमाणे:-

'दुकानावर चालणाऱ्या देवळांनी जगात दैवी संपत्तीचा उत्कर्ष होणार नाही. त्याचप्रमाणे व्याजबट्टा, शेअर्स किंवा श्रीमंतांचे दान यांच्या आधारावर जगणाऱ्या लोकोन्नतीकारक संस्थांनीही मानवी मूल्यांची प्रतिष्ठा वाढणार नाही.'

एशियाटिक हे हिमनगाचे फक्त टोक आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश
ranjandharmadhikari132@gmail.com

'द एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई'ची निवडणूक प्रक्रिया आणि व्यवस्थापन यामुळे ही ऐतिहासिक संस्था सध्या वादाच्या आणि त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेच्या भोवऱ्यात सापडली आहे. नोंदणीकृत सार्वजनिक न्यास असे 'द एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई'चे स्वरूप आहे. त्यासंदर्भात महाराष्ट्राचा सार्वजनिक न्यास कायदा काय सांगतो?


शाहू पाटोळे

हा बाबासाहेबांचा वैचारिक पराभव नाही का?



हिंदू धर्माचा त्याग करण्यामागे, जात सोडण्यामागे बाबासाहेबांचे जे वैचारिक अधिष्ठान होते, जी भूमिका होती; तिला वळसा घालून अनुयायांना परत जातीकडे नेण्यामागचे कोडे काय असावे? याच्यावर कुणी (असेल तर सुज्ञ) आंबेडकरी विचारवंत प्रकाश टाकू शकेल का?





''**बौद्ध समाजाचे** 'जात सांगा' अभियान'' ही बातमी ('लोकसत्ता', ६ मे) वाचली. तथागत बुद्धाच्या नंतर अडीच हजार वर्षांनी बौद्ध धर्मात (धम्मात नव्हे, आता धर्मातच !) पहिल्यांदाच जात नोंदविण्याचे 'ऐतिहासिक' कार्य सुरू केले जात आहे! जो धम्म वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था नाकारतो, त्या धम्मात जातीव्यवस्था निर्माण करून बौद्धानुयायी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी दोन्ही महामानवांच्या विचारांची प्रतारणा करीत आहेत, असं कुणालाही वाटत नाही का?

एक एप्रिल २०२६ पासून तब्बल १५ वर्षांनंतर जनगणनेस एकदाची सुरुवात झाली आहे. या जनगणनेमध्ये तब्बल ९० वर्षांनंतर देशातील सर्व जातींची माहिती संकलित केली जाणार आहे; पण त्यात अजून तरी ओबीसींचा समावेश करण्यात आलेला नाही. स्वातंत्र्योत्तर काळातील जनगणनांमध्ये १९५१ पासून फक्त अनुसूचित जाती आणि जमाती यांचीच फक्त नोंद केली जायची. इ. स. २०२६-२७ च्या जनगणनेत मात्र सगळ्याच धर्मांतील जातींची नोंद केली जाणार आहे. भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जातींची व्याख्या स्पष्ट करताना भारतीय राज्यघटनेचे अनुच्छेद ३४१ म्हणते की, 'ज्या जातीचा सदस्य हिंदू धर्माला सोडून अन्य दुसऱ्या धर्माला मानीत असेल, तर (अर्थात धर्मांतर केलेलं असल्यास) तो सदस्य अनुसूचित जातीचा मानला जाणार नाही.' राज्यघटनेच्या ३४१ या मूळ अनुच्छेदाद्वारे वा आदेशाद्वारे अनुसूचित जातींचे लाभ फक्त हिंदूंमधील पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य जातींतील सदस्यांनाच मिळू शकतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून १४ ऑक्टोबर १९५६ ला महाराष्ट्रातील तत्कालीन पूर्वास्पृश्य महार जातीच्या बहुसंख्य सदस्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. बौद्ध धर्मामध्ये जातीव्यवस्था नसल्याने धर्मांतरित झालेले महाराष्ट्रातील तत्कालीन बौद्ध आपसूकच अनुसूचित जातीच्या यादीतून बाहेर गेले. अनुसूचित जाती आदेश, दहा ऑगस्ट १९५० (The Constitution (Scheduled Castes) Order, 1950) मध्ये १९५६ साली एक सुधारणा करण्यात आली होती आणि त्याद्वारे शीख धर्मातील अस्पृश्य जातींचा समावेश अनुसूचित जातींच्या यादीत करण्यात आला. तेव्हापासून ते १९९० पर्यंत महाराष्ट्रातील बौद्धांना मात्र त्यांच्या मूळ जातीच्या आधारे सवलती मिळत होत्या.

सुमारे ३४ वर्षे १९९० पर्यंत महाराष्ट्रातील बौद्धांनी त्यांचा समावेश अनुसूचित जातींमध्ये करावा म्हणून सर्व स्तरावर लढा दिला आणि त्यांच्या लढ्याला यश आले. १९५० च्या The Constitution (Scheduled Castes) Orders (Amendment) ACT, 1990 द्वारे व्याख्या अधिक स्पष्ट करण्यात आली. त्या कायद्यात १९५६ नंतर पहिल्यांदाच सुधारणा करण्यात येऊन त्यात 'एनी पर्सन हू हॅज फ्रोफेस्ड बुद्धीझम (इन सर्टन केसेस)' हे वाक्य जोडण्यात आले. त्यामुळे महाराष्ट्रातील नवबौद्धांना अनुसूचित जातींच्या सवलती मिळण्यातील अडथळा दूर झाला. बौद्ध धम्मामध्ये किंवा तत्त्वज्ञानात जातीव्यवस्था नसल्याने बौद्धधर्मीयांना अनुसूचित जातींच्या सवलती मिळत नव्हत्या म्हणून कायद्यात सुधारणा केली. 'इन सर्टन कास्ट' अशी सुधारणा करीत असताना ती फक्त आणि फक्त महाराष्ट्रातील पूर्वाश्रमीच्या महार जातीत जन्मलेल्या लोकांसाठी होती. आहे. इतर पूर्वापार बौद्ध धर्मीयांसाठी नाही. महार जातीच्या सदस्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केलेला असला तरी, ते मूळच्या अनुसूचित जातीचे आहेत, त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला असला तरी त्यांची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक परिस्थिती (सोशल स्टेट्स) बदललेली नाही, दुर्दैवाने अद्यापही महाराष्ट्रातील जातवास्तव बदललेले नाही; म्हणून त्यांचा अनुसूचित जातीचा दर्जा भारत सरकारने कायम ठेवलेला आहे.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीच्या आणि धम्मचक्र प्रवर्तनाच्या हीरक महोत्सवी वर्षापासून अर्थात २०१६ पासून महाराष्ट्रातील बौद्ध धर्मातील काही अनुयायांनी आम्हाला 'दलित म्हणू नका बौद्ध म्हणा!' अशी मोहीम सुरू केली आहे. 'दलित म्हणू नका बौद्ध म्हणा!' या मोहिमेस १० वर्षे होत असताना त्याच बौद्धधर्मीयांमधून आत्ताच्या जनगणनेत २०२७ साली महाराष्ट्रातील बौद्धांनी धर्माच्या रकान्यात आपला धर्म 'बौद्ध' आणि जातीच्या रकान्यात 'महार' ही पूर्वाश्रमीची जात नोंदवावी अशी 'जनजागृती' करण्यासाठी अभियानाचे 'बिगुल' फुंकले आहे! शिवाय मातृभाषा 'पाली' नोंदवावी असेही काही गट सांगत आहेत. जे बाबासाहेब ''मी हिंदू म्हणून जन्मलो आहे, पण हिंदू म्हणून मरणार नाही.'' असे १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवल्यात म्हणाले होते, ज्या बाबासाहेबांनी १९३६ साली 'जातिव्यवस्थेचे निर्मूलन'मधून 'जातिनिर्मूलनाची' मूलभूत मांडणी केली आहे; त्याच बाबासाहेबांच्या अनुयायांनी आपल्या धर्मबांधवांना 'जनगणनेमध्ये आपली मूळ महार ही जात नोंदवा,' असे सांगणे म्हणजे बाबासाहेबांच्या विचारांचा पराभव नाही का? ज्या बौद्ध धर्मात जातीव्यवस्था नाही त्या धर्माला जातीव्यवस्थेकडे आणि भविष्यात नव्या वर्णव्यवस्थेकडे नेणे नाही का? महाराष्ट्रातील आणि देशभरातील अनेक तथाकथित पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य जातींचे लोक बाबासाहेबांपासून प्रेरणा घेऊन बौद्धधर्मीय झालेले आहेत; त्यांनी अशा वेळी काय करायचे? की त्यांनीही बौद्ध मांग, बौद्ध मातंग, बौद्ध चर्मकार, बौद्ध ढोर, बौद्ध वडार, बौद्ध कैकाडी, बौद्ध पारधी वगैरे; अशा प्रकारे आपापला धर्म बौद्ध आणि मूळ जाती नोंदवायच्या का? हे अभियान राबवून बाबासाहेबांच्या (नवबौद्धेतर धम्माचा स्वीकार केलेल्या जातींतील अनुयायांना) 'वैचारिक वाऱ्यावर' सोडले जाणार आहे का? बाबासाहेबांनी ज्या विचारांचा आयुष्यभर विरोध केला, ज्या कारणांसाठी धम्माचा स्वीकार केला त्या विरोधकांच्या सोबत अनुयायांनी, नेत्यांनी 'समरस' होणे (सर्वसामान्य आंबेडकरी जनांच्या मनात नसतानाही) एकवेळ समजू शकते! पण हिंदू धर्माचा त्याग करण्यामागे, जात सोडण्यामागे बाबासाहेबांचे जे वैचारिक अधिष्ठान होते, जी भूमिका होती; तिला वळसा घालून अनुयायांना परत जातीकडे नेण्यामागचे कोडे काय असावे? याच्यावर कुणी (असेल तर सुज्ञ) आंबेडकरी विचारवंत प्रकाश टाकू शकेल का? थोर विचारवंत प्रा. नरहर कुरुंदकरांनी बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या संदर्भात, 'दलितांना दलित म्हणून उरावयाचे आहे, की आपले दलितपण संपवायचे आहे?' असा प्रश्न उपस्थित केला होता. कुरुंदकरांच्या त्या प्रश्नाला आजचे अनुयायी हाच प्रतिसाद देणार आहेत का?

'जातीकडे चला!' या नव मोहिमेमागे ''आरक्षण उपवर्गीकरणाच'' कारण किंवा सरकारच्या पातळीवर होणाऱ्या अनाकलनीय घडामोडींची अनामिक भीती असण्याची शक्यता नाकारता येत नाही! सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सुरू करण्यात आलेला महाराष्ट्रातील जातींच्या उपवर्गीकरणाचा अहवाल अद्याप उघड झालेला नाही. उपवर्गीकरण करीत असताना कोणत्याही समितीला भारतीय राज्यघटनेच्या विरोधात जाऊन अनुसूचित जातींमध्ये महाराष्ट्रातील बौद्ध अनुस्युत नाहीत; असे म्हणताच येणार नाही. राज्यघटनेने दिलेले अधिकार असे एकाएकी काढून घेता येणार नाहीत; हे सद्यःस्थितीत वास्तव आहे. असो. 'अनुयायीच आपल्या नेत्याचे विचार मोडीत काढतात, किंवा वैचारिक पराभव करतात' या आशयाचा जागतिक वाक्प्रचार पुरोगामी महाराष्ट्रात प्रत्यक्षात येत असताना दिसतो आहे; एकुणात हे महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनवादी आणि आंबेडकरी विचारांच्या चळवळीच्या अनुषंगाने चिंताजनक आहे!

shahupatole@gmail.com

‘देऊळ बंद २’चा टीझर प्रदर्शित

लोकसत्ता प्रतिनिधी



श्रद्धा आणि अंधश्रद्धा, देव आणि नास्तिक यांच्यातील द्वंद्व अतिशय खेळकर पद्धतीने दाखवणारा ‘देऊळ बंद’ हा चित्रपट २०१५ मध्ये प्रदर्शित झाला होता. प्रवीण तरडे दिग्दर्शित हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला होता. आता जवळपास दशकभरानंतर या चित्रपटाचा सिक्वेलपट प्रदर्शित होणार आहे. यात शेतकरी स्त्रीची कथा केंद्रस्थानी असून चित्रपटाचा टीझर नुकताच अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिरात प्रदर्शित करण्यात आला.

एक सामान्य स्त्री थेट देवालाच परीक्षेला बसवते, तेव्हा काय होते? या उत्कंठावर्धक विषयावर आधारित आहे. पहिल्या चित्रपटात अभिनेता गश्मीर महाजनी मुख्य भूमिकेत होता, सिक्वेलपटात अभिनेत्री स्नेहल तरडे प्रमुख भूमिकेत असून ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी पुन्हा एकदा स्वामी समर्थांच्या भूमिकेत दिसणार आहेत. ‘देऊळ बंद २’चे लेखन आणि दिग्दर्शन प्रवीण विठ्ठल तरडे यांनी केले असून निर्मिती कैलाश वाणी, जयश्री कैलाश वाणी, कैवल्य वाणी आणि जुईली वाणी-सूर्यवंशी यांनी केली आहे. या चित्रपटात महेश मांजरेकर, प्रसाद ओक, मंगेश देसाई, ओम भूतकर, संस्कृती बालगुडे, जगन्नाथ निवंगुणे, सुनील अभ्यंकर, अतुल कुडले आणि प्रवीण तरडे महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत.

नवे ओटीटी व्यासपीठ ‘स्टेज’ची घोषणा

लोकसत्ता प्रतिनिधी



मुंबई : सध्याच्या डिजिटलच्या युगात मराठी प्रेक्षकांनाही डिजिटल मनोरंजनाची सवय लागलेली आहे. मात्र, त्या तुलनेत ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर अजूनही मराठीतला दर्जेदार आशय उपलब्ध होत नाही, अशी खंत अनेकदा प्रेक्षकांकडून व्यक्त केली जाते. या पार्श्वभूमीवर नवनवीन मराठी कलाकृती प्रेक्षकांसमोर आणण्याच्या उद्देशाने ‘स्टेज’ या नव्याकोऱ्या ओटीटी माध्यमाची घोषणा नुकतीच करण्यात आली.

‘आम्ही मराठीत प्रवेश करीत असल्याचा खूप आनंद आहे. आपल्याला बोलीभाषेतून गोष्टी सांगायला, पाहायला आणि ऐकायला आवडतात. घरी जेव्हा आपण कुटुंबीयांसोबत बोलतो तेव्हा कोणताही आडपडदा नसतो. अशाच प्रकारे कोणताही आडपडदा न ठेवता जेव्हा रसिकांशी भेट घेतली जाते तेव्हा त्यात एक आपलेपणा जाणवतो. आपल्या संस्कृतीसाठी काहीतरी करायला हवे या विचारातून आम्ही ‘स्टेज’ची स्थापना केली. इतर भाषांमध्ये यशस्वी झाल्यानंतर मराठीपर्यंत पोहोचण्याचा हा प्रवास खूप संघर्षमय आहे’, असे ‘स्टेज’चे सह-संस्थापक प्रवीण सिंघल यांनी सांगितले. १ मेपासून ‘स्टेज’ ही नवीन ओटीटी वाहिनी सुरू झाली आहे, अशी माहितीही त्यांनी दिली. ‘स्टेज’ ओटीटी मराठी आशय विभाग प्रमुख राजेश पाठक यांच्यासह मराठी कलाकार, दिग्दर्शक उपस्थित होते.

राशिभविष्य

१० ते १६ मे २०२६ • डॉ. स्मिता अतुल गायकवाड

मेष : मनोरंजन होईल

दिनांक १३, १४ हे दोन दिवस फारसे शुभ नाहीत. त्यामुळे या दिवसांत महत्त्वाच्या गोष्टींवर चर्चा करू नका. आपल्याला ज्या गोष्टी माहीत नाहीत अशा गोष्टींसंदर्भात चर्चा करावी लागेल, त्यामुळे शांत राहणे हा एकमेव पर्याय आहे. प्रत्येक गोष्टीत आपले तेच खरे करू नका. इतरांचेही ऐकण्याची मानसिकता ठेवा म्हणजे त्रास होणार नाही. अमावास्या तुमच्या राशीतूनच होत आहे. बाकी दिवसांचा कालावधी चांगला असेल. चांगल्या दिवसांमध्ये आलेले प्रस्ताव स्वीकारायला हरकत नाही. कारण हे प्रस्ताव आगामी काळासाठी चांगले असतील.

व्यवसायातील देवाणघेवाण वाढेल. नोकरदार वर्गाला कामाच्या संदर्भात गोष्टी सुरळीत चालल्या आहेत असे वाटेल. खर्च कमी कसा होईल ते पाहा. मित्र-मैत्रिणींसोबत मनोरंजन होईल.
घरगुती वातावरण चांगले राहील.
प्रकृतीच्या बाबतीत काळजी घ्या.
शुभ दिनांक : ११, १२
महिलांसाठी : कामाचा ताण येणार नाही याची दक्षता घ्या.

वृषभ : मानसन्मान मिळेल

१५ आणि १६ तारखेचे दोन दिवस अनुकूल कसे जातील ते पाहा. या कालावधीत वादविवाद टाळा. अमावास्या कालावधीत शांतता राखा. बाकी दिवसांचा कालावधी चांगला असेल. बाकी दिवसांमध्ये भाग्य स्थानातून लाभस्थानाकडे होणारे चंद्राचे भ्रमण अतिशय लाभदायक राहील. या चांगल्या कालावधीमध्ये आपण म्हणाल ती पूर्व दिशा असणार आहे.

आपले काम इतरांना पटणारे असेल. आपला फायदा करून घेण्याची वेळ आली आहे असे म्हणायला हरकत नाही. वेळेत काम पूर्ण झाल्याचा आनंद होईल. व्यवसायात गुंतवणूक वाढेल. नोकरदार वर्गाला कामाकडे लक्ष देता येईल. आर्थिक व्यवहार पूर्ण होतील. मित्र-मैत्रिणींशी सलोखा वाढेल. राजकीय क्षेत्रात मानसन्मान मिळेल. भावंडांना मदत कराल. घरगुती वातावरण आनंदाचे राहील. मानसिक समाधान लाभेल.
प्रकृती उत्तम राहील.
शुभ दिनांक : १०, १३
महिलांसाठी : वेळेत काम पूर्ण होईल.

मिथुन : दुहेरी लाभ होईल

दिनांक १० रोजीचा एकच दिवस सोडला तर बाकी दिवसांचा कालावधी चांगला असेल. अमावास्या कालावधी चांगला राहील. चांगल्या दिवसांमध्ये काही गोष्टी न ठरवतासुद्धा चांगल्या होतात, त्यामुळे कामातील उत्साह वाढतो. एका दगडात दोन पक्षी मारण्याचा डाव साध्य होतो. परिणामी आळस वाटत नाही. इतरांनाही मदत करण्याची भावना निर्माण होते. आपले काम चोख कसे होईल याकडे तुमचे लक्ष राहते. व्यावसायिकदृष्ट्या आवक वाढेल.

चांगल्या कामासाठी नोकरदार वर्गाला वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. आर्थिकदृष्ट्या दुहेरी लाभ होईल. राजकीय क्षेत्रातील ताणतणाव कमी होईल. नातेवाईकांचे सहकार्य व शुभेच्छा मिळतील. धार्मिक गोष्टींची आवड राहील.
प्रकृती चांगली राहील.
शुभ दिनांक : ११, १५
महिलांसाठी : सध्या तुम्ही म्हणाल ती पूर्व दिशा असेल.

कर्क : आहार सांभाळा

दिनांक ११, १२ हे दोन दिवस शुभ नाहीत, त्यामुळे या दोन दिवसांत महत्त्वाचे कोणतेही निर्णय घेऊ नका. शिवाय ज्या ठिकाणी चर्चा करण्याची इच्छा नसते, अशा ठिकाणी आपले मत न दिलेले चांगले. त्यामुळे पुढील गोष्टींचा अनर्थ टळू शकतो. नाहीतर विनाकारण मानसिक त्रास होऊ शकतो. म्हणून या दोन दिवसांत तोंडावर ताबा ठेवा. अमावास्या कालावधीत वृद्धांच्या तब्येतीची काळजी घ्या. बाकी दिवस चांगले असतील. चांगल्या दिवसांमध्ये शुभ गोष्टींची सुरुवात होईल. बऱ्याच दिवसांपासूनचे स्वप्न पूर्ण होईल. व्यवसायातून मिळणारे उत्पन्न नेहमीपेक्षा चांगले असेल.

नोकरदार वर्गाला कामाच्या बाबतीत मात्र काळजी घ्यावी लागेल.
काम वेळेत कसे पूर्ण होईल ते पाहा.
आर्थिक खर्च सांभाळणे अवघड होईल.
राजकीय क्षेत्रात हस्तक्षेप करू नका.
घरगुती वातावरण चांगले राहील.
आरोग्याची काळजी घ्या. आहार सांभाळा.
शुभ दिनांक : १३, १४
महिलांसाठी : चंचल वृत्ती राहील.

सिंह : विचार करून बोला

षष्ठ स्थानातून अष्टमस्थानाकडे होणारे चंद्राचे भ्रमण दुधात मिठाचा खडा टाकल्यासारखे असणार आहे. त्यामुळे असे वातावरण असले की डोक्यावर बर्फ, तोंडात खडीसाखर ठेवा. त्यामुळे तुम्हाला त्रास होणार नाही. कारण अशा दिवसांमध्ये कोणी काय करावे, काय करू नये याचे सल्ले देत बसू नका. बोलताना विचार करा. इतरांचा विचार करत बसण्यापेक्षा स्वतःच्या कामामध्ये प्रगती कशी होईल याकडे लक्ष द्या. कामाव्यतिरिक्त इतर गोष्टींना महत्त्वच देऊ नका. अमावास्या कालावधी ठीक जाईल. व्यवसायात भागीदारी करार सध्या थांबवणे योग्य राहील. नोकरदार वर्गाने कामापुरता संवाद ठेवणे योग्य राहील.

आर्थिकदृष्ट्या सक्षम बनाल. राजकीय क्षेत्रातील ताणतणाव कमी कसा होईल ते पाहा. कुटुंबासोबत असलेले मतभेद वेळीच दूर करा.
आध्यात्मिक गोष्टीत गुंतून राहा.
मानसिकता जपा. प्रकृतीची काळजी घ्या.
शुभ दिनांक : ११, १२
महिलांसाठी : तडजोड स्वीकारणे हिताचे राहील.

कन्या : शांत राहणे उत्तम

दिनांक ११, १२, १५, १६ अशा या चार दिवसांत कोणाच्या वाट्याला जाऊ नका. आपल्याला ज्या गोष्टी जमणार नाहीत अशा गोष्टींची जबाबदारी घेतल्यास त्रास होऊ शकतो. त्यामुळे न जमणाऱ्या गोष्टींची जबाबदारी घेऊ नका. इतरांच्या भावना समजून घ्या. एखादी गोष्ट पटली नाही तर सोडून द्या. पण त्या गोष्टीवर हुज्जत घालू नका. चांगले काम होण्यासाठी वेळ लागणार आहे ही गोष्ट लक्षात ठेवल्यास त्रास होणार नाही. शिवाय कोणतेही काम करताना दुसऱ्यावर अवलंबून राहू नका.

अमावास्या कालावधीत शांत राहणे उत्तम. व्यवसायात नवीन गुंतवणूक टाळा. नोकरदार वर्गाला आपले व इतरांचेही काम करावे लागेल. आर्थिकदृष्ट्या बचत करणे योग्य राहील. समाजमाध्यमांचा वापर जेवढ्यास तेवढा करा. कुटुंबाशी एकनिष्ठ राहा.
प्रकृतीची काळजी घ्या.
शुभ दिनांक : १३, १४
महिलांसाठी : तडजोड स्वीकारा.

तूळ : धरसोड वृत्ती टाळा

दिनांक १३, १४ हे दोन दिवस अनुकूल नाहीत. त्यामुळे या दोन दिवसांत जे चालले आहे ते चांगले समजून पुढे चला. त्यावर जास्त विचार करत बसू नका. आपले काम इतर कोणी करणार नाही, ते आपले आपल्यालाच करावे लागणार आहे हे तुम्हाला माहीत आहे. तर मग कशाला वेळ वाया घालवता? आळस झटका व कामाला लागा. धरसोड वृत्ती टाळा. बाकी दिवसांचा कालावधी चांगला असेल. चांगल्या कालावधीमध्ये नियोजित कामाला महत्त्व द्या. व्यावसायिकदृष्ट्या आवक वाढेल.

नोकरदार वर्गाला कामाच्या बाबतीत रोखठोक निर्णय घेता येणार नाही. त्यासाठी वरिष्ठांची परवानगी घ्यावी लागेल. आर्थिक व्यवहार जपून करा. राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या गोष्टीवर चर्चा होईल. मित्र-मैत्रिणींशी मनमोकळेपणाने बोलल्यामुळे हलके वाटेल. संतती सौख्य लाभेल. घरगुती वातावरण चांगले राहील. आरोग्य ठणठणीत राहील.
शुभ दिनांक : ११, १२
महिलांसाठी : बोलताना विचार करून बोला.

वृश्चिक : कामाला गती येईल

दिनांक १५, १६ या दोन्ही दिवसांचा कालावधी अनुकूल नाही. त्यामुळे या दिवसांत नको त्या गोष्टींचा व्याप वाढू शकतो. अशा वेळी संयम ठेवणे गरजेचे असते. तुम्ही काय करता ज्यावेळी बोलायचे आहे. त्यावेळी बोलत नाही आणि नको त्यावेळी बोलून बसता, त्यामुळे त्रासदायक वातावरण निर्माण होते. म्हणून बोलताना शब्द जपून वापरा. अमावास्या कालावधी चांगला कसा जाईल ते पाहा. बाकी दिवस चांगले असतील. चांगल्या दिवसांमध्ये नियोजन यशस्वी होईल. व्यवसायात पूर्वीपेक्षा सध्याची परिस्थिती चांगली असेल. नोकरदार वर्गाला नवीन कामाची सुरुवात करावी लागेल. कामाला गती येईल. तुमच्या कौशल्याला वाव मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानाची बाब राहील. नातेवाईकांच्या सुखदुःखात सहभागी व्हाल. भावंडांसाठी खर्च कराल. धार्मिक कार्याची आवड राहील. मानसिक, शारीरिक स्वास्थ्य उत्तम राहील.
शुभ दिनांक : १३, १४
महिलांसाठी : योग्य समतोल साधा.

धनू : सवलत मिळेल

या आठवड्यातील सर्व दिवस चांगले असतील. अमावास्या कालावधी ठीक राहील. असे ग्रहमान असते त्यावेळी बाकी राहिलेली कामे पूर्ण कशी होतील यासाठी प्रयत्न वाढवले पाहिजेत. कारण ज्यावेळी दिवस अनुकूल नसतात त्यावेळी प्रयत्न करूनही म्हणावे तसे यश मिळत नसते. सध्या मात्र कालावधी चांगला असल्यामुळे तुम्ही जे काम हाती घ्याल ते पूर्ण होणारे आहे. मग आळस करण्यात अर्थ नाही. आपले काम वेळेआधी कसे पूर्ण होईल याकडे लक्ष द्या. कोणत्याही कामाचे नियोजन करून काम केल्यास ते काम पूर्ण होईल. त्यामुळे नियोजन करून कामाला लागा. भागीदारी व्यवसाय सध्यातरी करू नका. नोकरदार वर्गाला कामाच्या संदर्भात चांगले प्रस्ताव येतील. आर्थिकदृष्टया सवलत मिळेल. समाजसेवेची आवड राहील. घरगुती वातावरण आनंदी असेल. पाहुण्यांचे आगमन होईल. ताणतणाव कमी झाल्यामुळे शारीरिक स्वास्थ्य चांगले राहील.
शुभ दिनांक : १२, १३
महिलांसाठी : अनेक माध्यमातून यश मिळेल.

मकर : नावलौकिक होईल

मागील काही दिवस ताणतणावाचे गेले असले तरी सध्याचे दिवस खूप चांगले आहेत. त्यामुळे कामातील उत्साह टिकून राहील. आपले काम इतरांनी करावे असे दरवेळी आपल्याला वाटत असते. सध्या आपल्याला कोणाकडून अपेक्षा नसतानासुद्धा समोरून चांगला प्रतिसाद मिळेल. ज्या गोष्टींची सुरुवात बऱ्याच दिवसांपासून होत नव्हती ती आता होईल. त्यासाठी वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. अनेक माध्यमातून येणारे प्रस्ताव चांगले असतील. चांगल्या कामासाठी उशीर झाला, पण काम अगदी चोख झालेल्याचा आनंद तुम्हाला असेल. अमावास्या कालावधीत वरिष्ठांच्या प्रकृतीची काळजी घ्या. व्यवसायात दगदग कमी होईल. नोकरदार वर्गाला कामाचे स्वरूप कळेल. सामाजिक कार्यात नावलौकिक होईल. आर्थिक भार हलका होईल. नातेवाईकांच्या कार्यक्रमानिमित्त भेटीगाठी होतील. भावंडांशी संपर्क साधाल. मानसिक समाधान लाभेल. आरोग्य उत्तम राहील.
शुभ दिनांक : १०, ११
महिलांसाठी : इतरांवर अवलंबून राहू नका.

कुंभ : काम वेळेत होईल

दिनांक १० रोजीचा एकच दिवस सोडला तर बाकी दिवसांचा कालावधी उत्तम राहील. अमावास्या कालावधीत धार्मिक स्थळांना भेट द्याल. काही वेळेला बराच संघर्ष करावा लागतो. काम करावेसे वाटत नाही. कारण वेळेत काम पूर्ण न झाल्यामुळे कामाचा उत्साह कमी होतो. सध्या तुमचे काम वेळेत पूर्ण होईल. उद्याचे कामही आजच करायचे असा तुमचा अट्टहास असेल. परिस्थितीनुसार निर्णय घेत जाणे हे योग्य राहील. निर्णय घेताना द्विधा अवस्था निर्माण होणार नाही याची काळजी घ्या. व्यावसायिकदृष्ट्या चढउतार असला तरी नफा चांगला मिळेल. नोकरदार वर्गाला नव्याने कामाची सुरुवात करता येईल. खर्च आवाक्यात ठेवण्याचा प्रयत्न करा. राजकीय क्षेत्रात माहीत नसलेल्या गोष्टींसंदर्भात चर्चा करू नका. नातेवाईकांशी संपर्क साधाल. शेजाऱ्यांना मदत कराल. जोडीदाराची मदत मिळेल. कौटुंबिक जीवन सुखाचे राहील. प्रकृती साथ देईल.
शुभ दिनांक : ११, १२
महिलांसाठी : सामूहिक गोष्टींची आवड राहील.

मीन : वायफळ खर्च टाळा

१० तारखेला दुपारनंतर दिनांक ११ व १२ हे संपूर्ण दोन दिवस अशा या अडीच दिवसांत कामासाठी उशीर होणार आहे, त्यामुळे धीर धरून काम करा. कोणावर अवलंबून राहिल्यास काम होणार नाही हे लक्षात ठेवा. त्यामुळे स्वतःहून पुढाकार घेऊन कामाची सुरुवात करावी लागेल. इतरांनी दिलेला सल्ला पटणारा नसेल, तुम्ही त्यांना प्रत्युत्तर करत बसू नका. वाद होऊ शकतात. न पटणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करायला शिका. स्वतःहून एखादी गोष्ट समोरच्याला सांगायला जाऊ नका. विचारल्यानंतर मोजक्या शब्दांत बोला. बाकी दिवसांचा कालावधी चांगला असेल. अमावास्या कालावधी धनस्थानातून होत आहे. व्यवसायात प्रगती होईल. नोकरदार वर्गाला कामासाठी जास्ती वेळ द्यावा लागेल. उधारीचे व्यवहार करू नका. जोडीदाराकडून सहकार्य मिळेल. कुटुंबासाठी वेळ द्यावा लागेल. मानसिकता जपा. प्रकृतीची काळजी घ्या.
शुभ दिनांक : १३, १४
महिलांसाठी : गोडीने संवाद साधा.

gsmita332@gmail.com

वर पाहिजे

मराठा 31 Chartered accountant नामांकित कंपनीत कार्यरत मुलगी अपेक्षा उच्चशिक्षित सुस्थापित परिवार जातीची अट नाही. 9082297694

0071034293-1

नाममात्र घटस्फोटीत वधू, बौद्ध, वय ३३, उंची ५'२, शिक्षण MMS finance, बँकेत नोकरी, उत्पन्न 8 lac मुंबईमध्ये स्वतःचे घर.

0071034347-1

वधू भंडारी, वय ४५, बोरिवलीस्थित, B.Com, पश्चिम रेल्वेत कायमस्वरूपी नोकरी, उंची ५'-५'', नाममात्र घटस्फोटीत, जातीची अट नाही, त्वरित विवाह. मोबाईल : 8668641662.

0071034301-1

वधू बौद्ध, डॉक्टर (B.D.S), वय ३२ वर्ष, उंची ५'२'', गव्हाळ, जि. सांगली, मुंबईत स्वतःची यशस्वी प्रॅक्टिस. अपेक्षाः सुशिक्षित, समजूतदार, अनुरूप वर. संपर्कः 9619494834

0071034284-1

वधू कऱ्हाडे ब्राह्मण, मध्यम, २८/ ५'-५''/ M.COM/ MBA, ५ लाख, मुंबईत दादरस्थित. अपेक्षा :- मुंबईचाच अनुरूप ब्राह्मणच असावा. मोबाइल :- 9167295534/ 9819485534.

0071033640-1

ब्राह्मण 39 घटस्फोटित MS, Electrical Engineering MNC कंपनीत उच्च पदावर कार्यरत युवती अपेक्षा उच्चशिक्षित युवक जातीची अट नाही. 8655228611

0071034292-1

96k, 35, M.sc. (Computer Science), नामांकित कंपनीत कार्यरत सुसंस्कारी कन्या. उच्चशिक्षित/ सुस्थापित परिवार. जातीची अट नाही. 8591301577

0071034294-1

वधू वय ५२, शिक्षण- B.Sc, B.ed, govt teacher, सॅलरी- ८५,०००, मिस्टर पेन्शन २७०००, आंतरजातीय लग्न, योग्य वर चालेल. 7517953198/ 9823207955.

0071033599-1

VB'Ful Fair Slim Edu LLB (47/5.5 cm) Maratha- Issuless Divorcee, Looking for a Groom, Cast No Bar Contact:- 9152736238.

0071033279-2

दादरस्थित 63 विधवा ब्राह्मण, 2 मुले विवाहित व परदेशीं स्थायिक, गाण्याची व शेतीची आवड, डहाणू मध्ये फार्म हाऊस, उत्पन्न 25 लाख, मनमिळाऊ सहवासाची अपेक्षा 88303 46234

0090399237-29

वधू- वय 27, शिक्षण बीकॉम, जात मराठा, मुलगी बँकेत जॉब करते. कुठली अट नाहीः 9371173867

0071033823-1

वधू-29, 5'2'', 96 कुळी मराठा, मुंबई, शिक्षण Doctor MBBS/MD. अपेक्षा- Medico / Non-Medico, स्वतःचे घर, उच्चशिक्षित. अनुरूप वराची अपेक्षा, जातीची अट नाही 7977493015, 8369815326.

0090402305-1

ठाणेस्थित 57 मराठा प्रथम वधू, शासकीय नोकरी आई वडील नाही, उत्पन्न 25 लाख स्वतःचा मोठा फ्लॅट, वयस्कर विश्वासू नात्याची अपेक्षा +91 79729 20162.

0090399237-28

विलेपार्लेस्थित 53 विना अपत्य विधवा ब्राह्मण, स्वतःचा व्यवसाय, उत्पन्न 25 लाख एकट्या राहतात कुठलीही जबाबदारी नाही, परदेशीं फिरण्याची आवड, निरोगी हौशी सहवासाची अपेक्षा, 7666912390

0090399237-27

वधु ब्राहमण 28/5'-2" गोरी स्लिम MBBS/MD PSYCHIATRY पुणे स्टायपेंड 90,000/- व्हेजिटेरियन एकटीच मुलगी अपेक्षा डॉक्टर / उच्चशिक्षित, उच्चवर्णीय माधुरी विवाहसंस्था पुणे 7796854315

0090402303-1

वधू- ४५, ५'-४'', बौद्ध घटस्फोटीत, SSC (मुंबईत स्वतःची दोन घरे भाड्यावर). अपेक्षा : नोकरी, वेलसेटल्ड कोकणस्थ, मराठी. पूर्ण माहिती वॉटस्अपवर फोटोसहित पाठवा. 8104947288.

0071031221-1

जातीची अट नाही

हिंदू, मराठा, ३६, ५'-७'', M.com, Freelancer, Event Manager, (Self Business), मुंबई स्थायिक, जातीची अट नाही. 9920492071.

0071032805-1

वधू पाहिजे

प्रथमवर- ९६ कुळी मराठा 32/ 5.'6" Civil Engineering, working in Saudi Arabia. अपेक्षा- पदवीधर, मनमिळाऊ, संपर्क- 8850199437

0071033933-1

१९८७ जन्म, ६ फूट, गोरा, BA प्रथमवर्ष उत्तीर्ण, महार मुलगा, आई-वडिलांचा एकुलता मुलगा, मुंबईत स्वतःचे घर. संपर्क : 7400388336/ 7977070486.

0071033562-2

***उच्चशिक्षित,** उच्चपदस्थ, प्रथमवर, *९६ कुळी कोकणस्थ मराठा *५७/५'८'', देखणा, निर्व्यसनी *M.B.A., LL.M, ICWA, CS, *Asst. General Manager-Bank, स्वतंत्र फ्लॅट. *अपेक्षाः Doctor/Advocate/CA. संपर्कः 9821302834

0071034283-1

वर आगरी, ५४, ५'-५'', ग्रॅज्युएट, विनाअपत्य, घटस्फोटीत, मासिक ५५०००/-, स्वतःचा 2BHK फ्लॅट. अपेक्षा अनुरूप, प्रथम, घटस्फोटीत, विधवा, जातीची अट नाही. संपर्क : 9850208539.

0071034339-1

वर- ३२, उंची ५'-४'', गोरा, Bcom, PG in event management, नोकरी MNC company Mumbai, 10 lack PA and other. (वडील तेलगू आई सीकेपी) मराठी अपेक्षा- ग्रॅज्युएट, अनुरूप, हिंदू, नोकरीची अट नाही. संपर्क- 9773288097.

0071032289-1

प्रथमवर- * लोहार/ ३३/ ५'-४''/ Pursuing MBA/ ५०,०००/- * सुतार/ २८/ ५'-२''/ B.Com., Banking Course/ ४५,०००/- * फुलमाळी/ ३२/ ५'-७''/ BA, Diploma/ ३५०००/-. ''सौभाग्य वधूवर केंद्र''- 9930502181.

0071027577-7



घटस्फोटित

(विनापत्य) * घटस्फोटीत- * ब्राह्मण/ ३६/ ५'-९''/ MBA/ १,२५,०००/-, * मराठा/ ४३/ ५'-७''/ MBA/ १,३०,०००/- * विधूर/ ४६/ ५'-५''/ मास्टर ऑफ फॅशन डिझायनिंग/ १,००,०००/-. ''सौभाग्य वधूवर केंद्र''- 8692932323.

0071027577-6

मॅरेज ब्युरो

उच्चशिक्षित वेलसेटल्ड सर्वजातीय महाराष्ट्रातील परदेशातील प्रथम/ पुनःर्विवाहाच्या स्थळांसाठी 47 वर्षांपासूनची माधुरी विवाहसंस्था (वयोगट 21 ते 75). पुणे 7796854315, डोंबिवली 9137977979/ कांदिवली 9920198251

0090401798-1

जीवनसाथी सुयोग्य निवडीसाठी प्रथमवर, पुनर्विवाहोत्सुक मुंबईतील/ परदेशातील उच्चवर्णीय स्थळांसाठी मेधा दामले- इंद्रवदन, सेनाभवनसमोर, दादर (प.). फोन- 022-24305607, वेळ- ११-५.

0071018927-1

सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, कोकण विभागातील, वधू-वरांची हाय प्रोफाईल स्थळे खात्रीपूर्वक मध्यस्थी करून लग्न जमवून देणार डॉक्टर, इंजिनियर, ऑफिसर, अधिकारी, सीए, आर्किटेक्ट, एम टेक, उत्तम व्यवसायिक, मोठे उद्योजक, एमबीए, वकील, परदेशात नोकरी डिप्लोमा ते पदवीधर मराठा, कुणबी, वैशवानी, भंडारी, आरमारी मराठा, गोमंतक, गुरव, घाडी इंटरकास्ट इच्छुक प्रथम, घटस्फोटित, विदुर, विधवा प्रत्यक्ष भेटूया भाऊ सावंत ठाणे- 9372181627/ 9892648835.

0071031563-1

शुभमुहूर्त विवाह मंडळ. https://shubhmuhurta.com १२ पर्यंत शिक्षण असलेल्या मुलींची मोफत नोंदणी. सर्व जातींची स्थळे (शहरभर ५० शाखा).
* अंधेरी 9892982493
* विलेपार्ले 9220342206
* जोगेश्वरी 9322102349
* कांदिवली 9969756084
* कांदिवली 9821406411
* मालाड 9833776942
* बोरीवली 9757095502
* भाईंदर 8928100852
* मीरा रोड 9529230473
* नालासोपारा 9702320959
* नालासोपारा 9324860518
* विरार 8788528928
* विरार 8087920719
* विरार 9869527512
* डहाणू 9168326658
* लालबाग 9224227938
* सायन 9833809324
* घाटकोपर 9870753241
* विक्रोळी 9930429916
* ठाणे 8097519381
* भांडुप 9869980417
* ठाणे 8108387522
* कळवा 9821527358
* कल्याण 9869868620
* कल्याण 9769526561
* डोंबिवली 9892133551
* ठाकुर्ली 9833364736
* बदलापूर 8369148757
* चेंबूर 8850249088
* ऐरोली 9769254327
* नवीन पनवेल 8888935775
* उरण 9769909142
* अलिबाग 9226766129
* पुणे 9075513357
* रोहा 8888935775
* रत्नागिरी 9420526622
* रत्नागिरी 9834090507
* सिंधुदुर्ग 9130070987
* (नवीन शाखेसाठी संपर्क) (9324860518/ 9869868620).

0071034279-1

लोकसत्ता जीवनसाथी
दोन जीवांच्या मीलनाचा मंगल मार्ग
विवाहोत्सुक मंडळींसाठी रविवार लोकसत्तामध्ये छोट्या जाहिरातींचे खास सदर

लग्नासाठी सर्व पोर्टल्स ट्राय केलेत पण, मनपसंत स्थळ काही मिळाले नाही.
पवित्रविवाहवर मॅट्रिमोनीवर नाव नोंदवा.
इथे आहेत पन्नास हजारांपेक्षा जास्त मुलामुलींची वेरिफाईड स्थळे.
चार दशकांची विश्वसनीय परंपरा, लाखो विवाह जुळविण्याचा अनुभव.
उद्योजक, उच्चपदस्थ अधिकारी, कारखानदार, CA, NRIs, डॉक्टर्स, इंजिनिअर्स, IITs, IIMs, पदविधर, उच्चशिक्षित स्थळे उपलब्ध.
पवित्रविवाह® www.pavitravivah.com
दादर ठाणे बोरीवली
810 810 9309

।।ज्योतिर्लिंग प्रसन्न।।
यशवंत वधूवर सूचक केंद्र
सेक्टर ३, नवीन पनवेल, नवी मुंबई.
सर्व जातीतील प्रथम, घटस्फोटीत, विधवा, विधुर व आंतरजातीय विवाहास तयार असलेली स्थळे उपलब्ध.
वेळ : स. १० ते २. संध्या. ४ ते ८. इंटरनेट सुविधा उपलब्ध
संचालकः विष्णू यशवंत सुरवसे yashwantvadhuvar.com
7498846847 9324201800

क्षत्रिय मराठा तावडे हितवर्धक मंडळ,मुंबई
मराठा वधूवर सूचक केंद्र/तिमाही भव्य मेळावे
केंद्राला ५७ वर्षे पूर्ण
www.tawdevivah.com
ऑनलाईन नाव नोंदणीसाठी आजच वेबसाईटला भेट द्या
लोअर परळ- ऑफिस क्र.१, पहिला मजला, फ्लॉरेन्स टॉवर, करी रोड-लोअर परळ ब्रिज नाका, मुंबई-१३ रोज दुपारी ४ ते रात्री ८ रविवार सकाळी १० ते दुपारी १ • संपर्क : ८४५४०३२१८७ / ८४५४०६०९६४
ठाणे - ४०७, पॅराडाइज टॉवर, ठाणे (प.), स्टेशन नजीक, अलोक हॉटेल समोर. रोज दुपारी ४ ते रात्री ८, रविवार सकाळी १० ते दुपारी १ • संपर्क : ९६१९९३०६८७ / ०२२-४५००६०९०
बोरीवली - १०८, पहिला मजला, अंबिका स्क्वेअर मॉल, स्टेशनसमोर, बोरीवली (पश्चिम). रोज दुपारी ४ ते रात्री ८ रविवार सकाळी १० ते दुपारी १ • संपर्क : ९८६९३६५४५८ / ८५९१८७७२९९

आनंद मराठा वधू-वर केंद्र®
• फक्त मराठा समाजासाठी • 27 वर्षांपासून कार्यरत
• नेमका ऑनलाईन सर्च • दरवर्षी 16000 नवीन नोंदणी
• मोबाईल ॲप/ घरपोच स्थळे • ऑनलाईन नोंदणीची सोय
• एक्सप्रेस इंटरेस्टची सुविधा • SMS/ ईमेलने मॅचिंग स्थळे
• 30000 यशस्वी बंधने • वार्षिक नोंदणी फी रु 2000/-
• मोफत पत्रिका गुणमिलन • संचालक : सुहास शिर्के, पुणे
www.anandmaratha.com 9921501133

बाई ते बाप्यापर्यंतच्या प्रवासाची गोष्ट

लोकसत्ता प्रतिनिधी

समलैंगिकता हा विषय मराठीत मोजक्या चांगल्या चित्रपटांमध्ये हाताळला गेला आहे. त्या चित्रपटांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यशही मिळवलं आहे. त्यापलीकडे जात लिंगबदलाची गोष्ट सांगण्याचा प्रयत्न दिग्दर्शक समीर तिवारी यांनी 'बाप्या' या चित्रपटातून केला आहे. स्त्रीच्या शरीरात अडकलेलं आपलं पुरुषमन ओळखून स्वत:त बदल घडवणाऱ्या शैलजाची गोष्ट या चित्रपटात आहे. हिंदीत 'चंदीगढ करे आशिकी' या अभिषेक कपूर दिग्दर्शित चित्रपटात एका पुरुषाने लिंगबदल करून स्वीकारलेल्या स्त्रीत्वाची गोष्ट पाहायला मिळाली होती, 'बाप्या'मध्ये त्याच्या उलटा प्रवास आहे, अशी माहिती समीर तिवारी यांनी 'लोकसत्ता'च्या कार्यालयाला दिलेल्या भेटीदरम्यान दिली. चित्रपटातील मुख्य कलाकार अभिनेत्री राजश्री देशपांडे, अभिनेता गिरीश कुलकर्णी आणि निर्मात्या मुक्तल तेलंग यांनीही यावेळी चित्रपटाविषयी मनमोकळ्या गप्पा मारल्या. 'बाप्या' हा चित्रपट मराठीत योग्य वेळी येतो आहे, अशा शब्दांत या चित्रपटातील प्रमुख भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री राजश्री देशपांडे यांनी आनंद व्यक्त केला.

'गेल्या वर्षी 'बाप्या' चित्रपटाचं चित्रीकरण पूर्ण झालं. त्यानंतर माझं कर्करोगाचं निदान झालं. वैयक्तिक आयुष्यात माझी स्तनाच्या कर्करोगाशी झुंज सुरू आहे, पण याच काळात एक लढवय्यी म्हणून मी एकंदरीतच आयुष्याकडे अधिक सकारात्मक दृष्टीने पाहायला शिकले', असं राजश्री देशपांडे यांनी सांगितलं.

बदलाचं वास्तव स्वीकारायला हवं

तुमच्या जवळच्यांचा पाठिंबा असेल तर कुठलाही बदल सहज स्वीकारता येतो, हे सांगताना राजश्री यांनी स्वत:चा अनुभवही सांगितला. 'प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात संकटं येतात, तेव्हा त्याच्या आजूबाजूला असणारी त्याची जिवलग माणसं त्या परिस्थितीत कशी प्रतिक्रिया देतात हे खूप महत्त्वाचं असतं. माझ्या आजाराविषयी समजल्यानंतर माझ्या आईची प्रतिक्रिया काय असेल, ती या गोष्टीला सामोरी जाऊ शकेल का? हा विचार माझ्या मनात होता. कठीण प्रसंगात तुमच्या कुटुंबाने, तुमच्या माणसाने तुमच्याबरोबर खंबीरपणे उभं राहणं अधिक गरजेचं असतं. तसंच, या चित्रपटात शैलजालाही तिच्या अंतर्मनात सुरू असलेला कोलाहल तिच्या जवळची मंडळी समजून घेऊ शकतील का? हा प्रश्न आहे. आपण स्त्रीच्या शरीरात अडकलेलो एक पुरुष आहोत हे तिला पक्कं माहिती आहे, पण घरचे तिला समजून घेत नाहीत. अशा वेळी ती स्वत: पुरुष होण्याची तिची इच्छा पूर्ण करते आणि मग आपल्या लोकांना सामोरी जाते. या चित्रपटात तिच्यासाठी तिची आणि अन्याची मैत्री खूप महत्त्वाची ठरली आहे. हे वास्तव समाजाने स्वीकारायला हवं असेल तर त्यांना विविध माध्यमातून त्याबद्दल शिक्षित करणं, जागृत करणं गरजेचं आहे. 'बाप्या'च्या माध्यमातून हे अधोरेखित करण्याबरोबरच नात्यांतली-मैत्रीतली ऊब, प्रेम तुम्हाला कुठल्याही अवघड गोष्टींमध्ये पुढे जाण्याचं बळ देतं हेही सांगण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे', असंही त्यांनी सांगितलं.



स्वबळावर उभा राहिलेला सिनेमा

'मी हिंदी आणि मराठी दोन्हीत पटकथा लिहिली होती. अनेक निर्मात्यांना भेटलो तेव्हा हिंदीतसुद्धा ही कथा उत्तम लिहिली गेली आहे, पण कथेतल्या व्यक्तिरेखा, त्यांचे संवाद यातला दमदारपणा मराठीत अधिक प्रभावीपणे जाणवतो आहे, असा अभिप्राय अनेकांकडून आला. त्यामुळे हा चित्रपट मराठीतच करायचा असा निर्णय आम्ही घेतला', असं दिग्दर्शक समीर तिवारी यांनी सांगितलं, 'तर या चित्रपटाची निर्मिती ही आम्ही स्वबळावर केली आहे,' असं निर्मात्या मुक्तल तेलंग यांनी स्पष्ट केलं. 'एका स्त्रीने तिच्यातली पुरुषत्वाची आस ओळखून लिंगबदल करत बदलाच्या दिशेने केलेल्या प्रयत्नांची ही गोष्ट आहे. हा विषय वेगळा असल्याने त्याच्या निर्मितीसाठी कोणीच तयारी दाखवली नाही. पण, हा विषय खूप महत्त्वाचा आहे. माणुसकी जपायलाच हवी, असा आग्रह धरणारा हा चित्रपट समाजापर्यंत पोहोचायलाच हवा, हे आम्ही पक्कं ठरवलं होतं. त्यामुळे आम्ही स्वतःच त्यासाठीचं आर्थिक बळ उभं केलं आणि या सगळ्यात आम्हाला चित्रपटातील कलाकारांनी भरभक्कम पाठिंबा दिला', असंही त्यांनी सांगितलं.

माझं उन्नयन होण्याची संधी दिसली...

'बाप्या'ची पटकथा ऐकली तेव्हा माझं स्वत:चं उन्नयन होण्याची संधी मला त्यात दिसली,' असं अभिनेते गिरीश कुलकर्णी यांनी सांगितलं. 'आपल्याकडे इतकं अज्ञान भरलेलं आहे की आपण मोठं होऊन जाणिवांचं भान येईपर्यंत आपल्या आवडीनिवडी एकदम पक्क्या झालेल्या असतात, सतत भेदाभेद करणं सुरू होतं. मी जर पुरुष असेन, तर मला स्त्रियांच्या बाबतीत अनेक समस्या जाणवायला लागतात. त्यांना कमी लेखतो, उंच असलो तर मला ठेंगण्या माणसांबद्दल अडचण वाटते. हे चांगलं ते वाईट अशा पक्क्या धारणा, चाकोऱ्या मी बांधून घेतो. आणि त्याच्या पलीकडच्या विश्वाला नाकारत राहतो. माझ्यामध्ये तिरस्कार वाढत राहतो, कुठल्याही तऱ्हेने मनात प्रेम उमलत नाही. आणि मग असा मी जगत राहतो, प्रस्थापित होतो. आपला बव्हंशी समाज हा असा घडलेला आहे. या अशा परिस्थितीत कला ही एकमेव आहे जी तुमचं उन्नयन करते, तुमच्या मनाला टोचणी लावते', असा विस्तृत विचार त्यांनी मांडला.

'बाप्या' या चित्रपटात दाखवल्याप्रमाणे एका स्त्रीला देह बदलून पुरुष व्हावंसं वाटतं आहे. अशा पद्धतीने लिंगबदल करून जगणारी माणसं आपल्या आजूबाजूला आहेत, आपल्याला ते दिसतं, पण आपण ते स्वीकारत नाही. आपण त्या गोष्टींचा तिरस्कार करतो, हे काहीतरी पाश्चिमात्त्य आहे, असं काही होत नसतं, असं आपण म्हणतो. पण, हे खरंतर आपलं अज्ञान आहे हेच आपल्याला मान्य नाही, या वास्तवाकडेही त्यांनी लक्ष वेधलं.

नव्याची स्वीकृती नसते...

'बाप्या' चित्रपटातली भूमिका का करावीशी वाटली, याबद्दलचा अनुभव विस्ताराने सांगताना गिरीश कुलकर्णी यांनी 'जो जे वांछिल तो ते पावो', 'हे विश्वचि माझे घर' हा करुणाभाव जपणारी आपली परंपरा आहे, पण वास्तवात आपण तसं जगत नाही आहोत, या आपल्या समाजाच्या दुटप्पी वर्तनावर बोट ठेवलं. 'या चित्रपटातला अन्या हाही याच समाजाचा प्रतिनिधी आहे. शैलजा पुरुष होऊन समोर येते, तेव्हा तोही पहिल्यांदा तिला नाकारतो, हेटाळणी करतो, तिथपासूनचा त्याचा प्रवास हा त्या आपल्या दोस्ताच्या पाठीशी उभं राहण्यापर्यंत होतो. माझं मैत्र हे तुमच्या शरीराशी नाही, तुमच्या आंतरिक अस्तित्वाशी माझं सहअस्तित्व आहे, तिथे काहीतरी धागा जोडला गेला आहे आणि ते प्रेम आहे, हे आपल्याला लक्षात आलं तर समाजातला विद्वेष कमी होत जाईल. हे सगळं अत्यंत सहज साधेपणाने, हसतखेळत एका कुटुंबाच्या गोष्टीतून सांगण्याचा प्रयत्न दिग्दर्शक समीर तिवारी यांनी केला आहे', असं त्यांनी सांगितलं.

'नवं काही घडलं की आपण हा अंत...' हा अंत म्हणून ओरड करत त्याचा तिरस्कार करतो. नव्याची स्वीकृती आमच्याकडे नाही. निव्वळ मला माहिती नाही म्हणून त्याचा तिरस्कार करणं योग्य नाही, आपण त्या विश्वात जाऊन त्याचा अनुभव घेतला पाहिजे. आता राजश्रीने जसा तिचा अनुभव सांगितला की ती त्या आजाराशी झुंजते आहे, पुढे काय होणार माहिती नाही, पण तिच्यापरीने ती लढते आहे. हा जो तिचा साक्षात अनुभव आहे तो तुम्हाला मान्य केलाच पाहिजे. तर हे सगळं सार मांडण्याचा प्रयत्न करणारी ही पटकथा माझ्या हातात पडली तेव्हा पहिल्यांदा मला हे आपल्याला जमेल का? अशी भीती वाटली. नंतर त्यावर दिग्दर्शकाबरोबर अनेक वेळा चर्चा झाल्या. या चित्रपटानिमित्ताने एकविचारी कलाकार एकत्र आले', असा अनुभवही त्यांनी सांगितला.

'राजा शिवाजी' यावर्षीचा सर्वाधिक कमाई करणारा मराठी चित्रपट

लोकसत्ता प्रतिनिधी

मराठी चित्रपटांसाठी यावर्षाची सुरुवात दणक्यात झाली होती. 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' हा हेमंत ढोमे दिग्दर्शित चित्रपट १ जानेवारीला प्रदर्शित झाला होता. वर्षाच्या पहिल्याच दिवशी प्रदर्शित झालेल्या या मराठी चित्रपटाने ३२ कोटींची कमाई करत यशाची पहिली झुळूक दिली होती. त्यानंतर चार महिन्यांनी प्रदर्शित झालेल्या 'राजा शिवाजी' या चित्रपटाच्या यशानेही पुन्हा एकदा मराठी चित्रपटसृष्टीला आनंदाचा धक्का दिला आहे. पहिल्या आठवड्याच्या अखेरीस या चित्रपटाने ५७.७० कोटी रुपयांचा टप्पा पार करत यावर्षीचा सर्वाधिक कमाई करणाऱ्या पहिल्या मराठी चित्रपटाचा मान मिळवला आहे.

रितेश विलासराव देशमुख दिग्दर्शित 'राजा शिवाजी' हा चित्रपट १ मे रोजी महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर प्रदर्शित झाला. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे थोरले बंधू संभाजी राजे यांच्यातील बंधूप्रेम, स्वराज्यनिर्मितीच्या ध्यासाने पेटून उठलेल्या महाराजांचे शौर्य, त्यांची युद्धनीती, अफझलखानाचा वध हा इतिहास भव्य स्वरूपात 'राजा शिवाजी' चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांना रुपेरी पडद्यावर अनुभवायला मिळतो आहे. हिंदी आणि मराठीत एकाच वेळी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाच्या मराठी आवृत्तीने प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी १२.४० कोटींची कमाई करत नवा विक्रम नोंदवला होता. आठवड्याभरात या चित्रपटाने कमाईच्या बाबतीत अर्धशतकाचा टप्पा ओलांडला आहे.



मराठीतील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांमध्ये चौथ्या क्रमांकाचे स्थान 'राजा शिवाजी'ने मिळवले आहे. आत्तापर्यंत 'सैराट', 'बाईपण भारी देवा', 'वेड' या चित्रपटांची सर्वाधिक कमाई करणाऱ्या मराठी चित्रपटांमध्ये गणना होते. 'सैराट'ने ११० कोटींची कमाई केली आहे, 'बाईपण भारी देवा' या चित्रपटाने ९२ कोटी तर रितेश देशमुख यांचेच दिग्दर्शन असलेल्या 'वेड' चित्रपटाने ७५ कोटींहून अधिक कमाई केली आहे. ट्रेड विश्लेषक तरण आदर्श यांनीही 'राजा शिवाजी' चित्रपटाने प्रदर्शनाच्या आठवड्यातच ५० कोटींहून अधिक कमाई केल्याबद्दल चित्रपटाचे कौतुक केले आहे. आता पुढच्या आठवड्यात हा चित्रपट कमाईच्या बाबतीत 'वेड' चित्रपटाला मागे टाकत आणखी नवा विक्रम नोंदवणार का? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

आयफोनवर चित्रित लघुपट प्रेक्षकांसमोर

मुंबई : सुप्रसिद्ध दिग्दर्शक सचिन कुंडलकर यांनी 'पॉण्डिचेरी' हा मराठी चित्रपट संपूर्णपणे मोबाइलवर चित्रीत केला होता. त्यानंतर तो प्रदर्शित करण्यात आला होता. मुंबई ॲकॅडमी ऑफ मुव्हिंग इमेज अर्थात ''मामि' चित्रपट महोत्सवाने मामि सिलेक्ट या उपक्रमांतर्गत आपली गोष्ट सांगण्यासाठी आयफोन १७ प्रो मॅक्स या फोनद्वारे लघुपट तयार करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. यांतर्गत अनेक होतकरू चित्रपटकर्त्यांनी तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या सल्ल्याने असे लघुपट तयार केले असून ते मामि महोत्सवाच्या यूट्यूब वाहिनीवर प्रेक्षकांना पाहायला मिळतील.

या विशेष उपक्रमासाठी प्रसिद्ध दिग्दर्शक श्रीराम राघवन, 'कोर्ट' या गाजलेल्या राष्ट्रीय पारितोषिक विजेत्या चित्रपटाचे दिग्दर्शक चैतन्य ताम्हाणे, दिबाकर बॅनर्जी आणि गीतू मोहनदास यांनी मार्गदर्शक म्हणून काम पाहिले.

या उपक्रमातील एक महत्त्वाचा लघुपट '११.११' हा श्रीला अगरवाल यांनी दिग्दर्शित केला आहे. श्रीला यांचा प्रवास अत्यंत रंजक आहे. सिंगापूरमधून चित्रपट निर्मितीचे शिक्षण घेतल्यावर त्यांनी बॉक्सिंगमध्ये कारकीर्द घडवण्यासाठी चित्रपटसृष्टी सोडली होती. राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक जिंकल्यानंतर एका दुखापतीमुळे त्यांना बॉक्सिंग सोडावे लागले, त्यानंतर त्या पुन्हा चित्रपट क्षेत्राकडे वळल्या. त्यांचा '११.११' हा लघुपट मुंबईच्या रात्रीच्या जीवनावर आधारित असून याचे संपूर्ण चित्रीकरण आयफोनवर करण्यात आले आहे.



मामि चित्रपट महोत्सवाचे संचालक शिवेंद्र सिंह डुंगरपूर म्हणाले की, गेल्या काही वर्षांतील या उपक्रमाच्या यशामुळे शेकडो तरुणांना स्वतःचे लघुपट बनवण्याची प्रेरणा मिळाली आहे. हे तंत्रज्ञान चित्रपट निर्मितीच्या कलेला एक नवीन वळण देत आहे.

रात्रीच्या वेळी कमी प्रकाशात चित्रीकरण करण्याची सोय, अवजड कॅमेऱ्यांना पर्याय ठरणारा आयफोन आणि कलावंतांचा सहजाभिनय टिपण्यासाठी सोयीचे ठरते ही या आयफोनची वैशिष्ट्ये आहेत.

सुभेदार गेस्ट हाऊस

रवींद्र पाथरे

धक्कातंत्राचं गारूड



अॅगाथा ख्रिस्ती माहीत नाही असा वाचनप्रेमी या जगात तसा दुर्मीळच. अनेक जागतिक खपाऊ रहस्यकथांची ही लेखिका... जिच्या अनेक रहस्यकथांवर नाटक-चित्रपटदेखील बनवले गेले आहेत. तिचे 'माऊसट्रॅप' हे नाटक १९५२ साली लंडनमधील रंगभूमीवर आलं आणि आज पंच्याहत्तरीकडे वाटचाल करत असतानाही ते तेवढ्याच तुफान प्रचंड गर्दीत सुरू आहे. करोनाचा अल्प काळ वगळता या नाटकाचे प्रयोग नित्य होत असतात. जागतिक रंगभूमीवर या नाटकाच्या प्रयोगांनी शब्दशः विक्रम केला आहे. असंख्य कलाकार या

नाट्यरंग

नाटकाच्या मांडवाखालून आजपर्यंत गेले आहेत. अॅगाथा ख्रिस्तीच्या बहुतेक पुस्तकांच्या करोडो प्रती जगभरात विकल्या गेल्या आहेत... आजही विकल्या जात आहेत. तिच्या 'माऊसट्रॅप'' या नाटकाचे प्रयोग जगभर सर्वत्र आजवर झालेले आहेत. त्यातला एक प्रयोग मुंबईतही झाल्याचं आठवतं. तर ते असो. आता हे नाटक मराठी रंगभूमीवर अवतरलं आहे... 'सुभेदार गेस्ट हाऊस' या नावानं! त्याचे लेखक आहेत शिरीष देखणे. आणि दिग्दर्शक आहेत विजय केंकरे. धि गोवा हिंदु असोसिएशन आणि सुकल्प चित्र संस्थेची ही निर्मिती आहे.

'माऊसट्रॅप'ला भारतीय... नव्हे मराठी रूपडं यात दिलं गेलं आहे.

चित्रा आणि विनय सुभेदार हे जोडपं त्यांना चित्राच्या आत्याकडून वारसाहक्काने मिळालेल्या वाड्याचं गेस्ट हाऊसमध्ये रूपांतर करतं आणि त्याची जाहिरातही करतं. खरं तर त्यांना गेस्ट हाऊस चालवायचा कसलाही अनुभव पदरी नसतो. तरीही ते आपल्याला जमेल तशी गेस्ट हाऊस चालवण्याची तयारी करतात. त्यानुसार त्यांच्याकडे काही जण बुकिंगही करतात. त्याप्रमाणे भयाण पावसातही एकेक जण गेस्ट हाऊसमध्ये येऊन दाखल होतो. अमित देसाई, मिसेस तिलोत्तमा टिकेकर, मेजर थोरात, सपना जगताप... आणि अचानक न ठरवता आलेले विजय बॅनर्जी! या प्रत्येक पाहुण्याची वृत्ती-प्रवृत्ती भिन्न असते. साहजिकच त्यांच्याशी वागता-बोलताना चित्रा आणि विनयची भंबेरी उडते. ते कसंबसं प्रत्येकाला आपल्या परीनं ॲडजस्ट करायचा प्रयत्न करतात.

अशात कोल्हापुरात एका मध्यमवयीन स्त्रीचा खून झाल्याची बातमी येते. आणि अचानक गेस्ट हाऊसमध्ये त्यासंबंधात चौकशी करण्यासाठी पोलीस येणार असल्याची खबर येते. चित्रा आणि विनयला आपला आणि गेस्ट हाऊसचा या खुनाशी काय संबंध, असा प्रश्न पडतो. पण तरीही इन्स्पेक्टर भोसले गेस्ट हाऊसवर येऊन दाखल होतात आणि सगळ्यांची चौकशी सुरू करतात. कारण ती खून झालेली स्त्री ही त्यांच्या गेस्ट हाऊसच्या जवळच राहणारी असते. चित्रा-विनयची तिच्याशी थोडीशी तोंडओळख असते. साहजिकच त्यासंदर्भात इन्स्पेक्टर भोसले यांना त्यांची चौकशी करायची असते. शिवाय त्यांच्या गेस्ट हाऊसमध्ये उतरलेल्यांपैकीच कुणीतरी खुनी असू शकतो असा त्यांना संशय असतो. आणि हा खुनी आणखीन एकदा खून पाडू शकतो अशीही शक्यता इन्स्पेक्टर भोसले यांना वाटत असते. त्यामुळे ते तिथं आलेल्या गेस्टसकट सर्वांनाच सावधगिरीचा इशारा देतात. परंतु त्यांच्या चौकशीत मात्र काहीच निष्पन्न होत नाही, तेव्हा ते भयंकर वैतागतात. यासंबंधात अधिक तपासासाठी पोलीस ठाण्याची मदत घेण्यासाठी इन्स्पेक्टर बाहेर गेलेले असतानाच माजी न्यायमूर्ती असलेल्या मिसेस तिलोत्तमा टिकेकर यांचा गेस्ट हाऊसमध्ये खून होतो. आणि सगळेच अडचणीत येतात. इन्स्पेक्टर प्रत्येकाची खोदून खोदून चौकशी करत असताना अमित देसाईचं संशयास्पद वर्तन चित्रा व विनयच्या लक्षात येतं. ते तसं इन्स्पेक्टरना सांगतात. पण अमित ते उडवून लावतो. तसंच मेजर थोरात यांचीही पार्श्वभूमी संशयास्पद असल्याची गोष्ट चित्रा इन्स्पेक्टरच्या निदर्शनास आणून देते. तिच्या या तर्कबुद्धीबद्दल इन्स्पेक्टर तिची तारीफ करतात. पण त्याचवेळी त्या स्त्रीच्या खुनाच्या घटनेच्या वेळी चित्रा आणि विनयची गेस्ट हाऊसवरची अनुपस्थितीदेखील इन्स्पेक्टर त्यांच्या लक्षात आणून देतात. त्यामुळे संशयाची सुई त्यांच्याकडेही वळते. विजय बॅनर्जीचं अकस्मात गेस्ट हाऊसवर येणं आणि संशयास्पद वागणं हेही इन्स्पेक्टरच्या डोळ्यांत येतं. सपना जगतापचं कोल्हापूरला विनाकारण येणं आणि मुक्काम वाढवणं हेही संशयाच्या घेर्‍यात येतं. अशा प्रकारे प्रत्येक जण संशयित खुनी असू शकतो, या निष्कर्षाप्रत इन्स्पेक्टर भोसले येतात.

अर्थात पुढे कोण खुनी निघतो, हे प्रत्यक्ष नाटकात अनुभवणंच योग्य.

लेखक शिरीष देखणे यांनी हा प्लॉट अत्यंत खुबीनं हाताळला आहे. प्रत्येकाची पार्श्वभूमी तपशिलांत मांडत त्यांच्या गेस्ट हाऊसमधल्या वर्तनव्यवहारांतून ते अडचणीत येतील अशी रचना त्यांनी केली आहे. अर्थात काहींना- म्हणजे मिसेस टिकेकर, मेजर थोरात यांना संशयाच्या जाळ्यात न अडकवता मोकळं सोडलं आहे. तरीही ते शेवटी संशयाच्या घेर्‍यात येतातच. वरकरणी सगळं व्यवस्थित सुरू असताना इन्स्पेक्टर भोसले उगीचच कुणाकुणाला नको ते प्रश्न विचारून भंडावून सोडत आहेत असं काही क्षणी वाटतं. अर्थात शेवटी खुनी कोण हे कळल्यावर त्याचं खून करण्यामागचं 'इन्टेन्शन' अगदीच पपलू वाटतं, ते सोडा. गैरसमज वा अपसमज हे खुनामागचं कारण स्वीकारार्ह नाही. लेखकानं या रहस्यनाट्यात सगळ्यांनाच संशयाच्या काट्यावर घेऊन नंतर भलताच खुनी निघणं हा फॉर्म्युला यातही आहेच. फक्त संशयित व्यक्ती कुठल्या कारणानं संशयास्पद ठरते, हे रहस्यनाट्यात महत्त्वाचं असतं. पण इथे शेवट स्वीकारार्ह करण्याइतकी कथाबीजाची तार्किक बैठक ठोस आढळत नाही. 'सुभेदार गेस्ट हाऊस'मध्ये सगळी पात्रं तपशिलांत रेखाटली गेली आहेत. फार भयप्रद वातावरणनिर्मिती न करता कथानक पुढं सरकतं.

दिग्दर्शक विजय केंकरे यांचा रहस्यनाट्यं हा हातखंडा विषय. त्यामुळे त्यांनी टप्प्याटप्प्यानं कथानकाचा टेम्पो चढता ठेवला आहे. अनावश्यक भीती निर्माण करण्याचं त्यांनी टाळलं आहे. मात्र इन्स्पेक्टर भोसले नको इतक्या पोलिसी खाक्यानं प्रकरण हाताळतोय हा समज प्रेक्षकांच्या मनात निर्माण होतो. आणि तो अनाठायी नाही हे शेवटाकडे स्पष्ट होतंच. बाकी गेस्ट हाऊसमधील अनेक गेस्ट, त्यांच्या वागण्या-बोलण्याच्या तऱ्हा, त्यातून निर्माण होणारा संशय अतिशय ठाय लयीत दिग्दर्शकानं नाटकात रेखाटला आहे. फक्त ज्या कारणासाठी खून होतो ते तितकेसे समर्थनीय नाही, एवढंच. असो. कलाकारांची निवड चपखल. त्यांना दिलेले व्यवहारही मनुष्यस्वभावास धरून. त्यामुळेच नैसर्गिक गतीनं नाटक पुढे सरकतं.



प्रदीप मुळ्ये यांनी वाड्याचं गेस्ट हाऊसमधील रूपांतर नेपथ्यातून तपशिलांत दाखवलं आहे. शीतल तळपदे यांनी प्रकाशयोजनेतून काळ-वेळ आणि वातावरण यांची नैसर्गिकरीत्या निर्मिती केली आहे. त्यातून पावसाळी वातावरण उत्तम प्रत्ययाला येतं. अजित परब यांच्या संगीतानं त्यात भर घातली आहे.

चित्रा सुभेदार झालेल्या मृण्मयी गोंधळेकर यांनी पहिल्या प्रथम गेस्ट हाऊस सुरू करणार्‍या यांची उडणारी तारांबळ आणि नंतर पोलिसी ससेमिरा मागे लागल्यामुळेची हतबलता व्यवस्थित व्यक्त केली आहे. विनयची नव्या गेस्ट हाऊसची व्यवस्था पाहताना उडणारी भंबेरी आणि पोलीस चौकशीचं शुक्लकाष्ठ मागे लागल्यावरही 'कर नाही त्याला डर कशाला?' वृत्ती सौरभ गोखले यांनी पोटतिडकीनं दाखवली आहे. शंतनू मोघेंचा इन्स्पेक्टर भोसले अंगयष्टीनं आणि वावरण्यातून खराखुरा वाटतो. मात्र त्याची चौकशीची पद्धत फारशी डोकॅलिटीनं होते आहे असं वाटत नाही. अर्थात त्यामागचं कारण शेवटाकडे उघड होतंच. तक्रारखोर मिसेस टिकेकर- विनिता दाते यांनी सहजगत्या साकारल्या आहेत... अगदी नॅचरल! रोहित देशमुख यांनी मेजर थोरात यांचा भारदस्तपणा आणि समतोल व्यक्तिमत्त्व उत्तम वठवलं आहे.

सना कुलकर्णी यांची सपना जगताप पहिल्यापासूनच संशयास्पदरीत्या वावरताना दिसते. तिनं कथन केलेली स्टोरीही खोटी आहे हे सहज कळतं. आनंद पाटील यांचा बंगाली विजय बॅनर्जी वाटतो खरा, पण त्यांच्या हालचाली आणि व्यवहार संशयग्रस्त राहिला आहे. साहजिकपणेच ते नाटकाची गरज भागवतात. अंगद म्हसकर यांचा अमित देसाई अनावश्यक उत्साही, अतिशयोक्त वागणारा-बोलणारा असल्याने लक्ष वेधून घेतो. आणि त्यामुळेच संशयाच्या घेर्‍यात सापडतो.

अॅगाथा ख्रिस्तीच्या 'माऊसट्रॅप'चं हे मराठी रूपडं प्रेक्षकांना धरून ठेवतं, हे मात्र नक्की.

संक्षिप्त

डॉ. पांडे वेकोलिचे व्यवस्थापकीय संचालक

नागपूर : डॉ. हेमंत शरद पांडे यांनी



गुरुवारी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडच्या (वेकोलि) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकपदाचा (सीएमडी) पदभार स्वीकारला. यावेळी वेकोलिचे संचालक, मुख्य सतर्कता अधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. डॉ. पांडे यांना वेकोलि आणि साऊथ ईस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडमध्ये ३७ वर्षे कामाचा अनुभव आहे. सीएमडीपदापूर्वी ते वेकोलिमध्ये संचालक (मानव संसाधन) होते.

'आयएमए'चा पदग्रहण समारंभ आज

नागपूर : इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (आयएमए) नागपूर शाखेतील नवीन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहन समारंभ रविवारी संध्याकाळी ५.३० वाजता आयएमए हाऊस येथील जे. आर. शॉ सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. समारंभात डॉ. सचिन गाठे अध्यक्ष म्हणून, तर डॉ. अंजली भांडारकर सचिव म्हणून पदभार स्वीकारतील. याशिवाय डॉ. अनिरुद्ध देवके (पुढचे अध्यक्ष-नियुक्त), डॉ. मनीषा राठी व डॉ. प्राजक्ता कडुसकर (उपाध्यक्ष), डॉ. मुकुंद गनेरीवाल (मानद कोषाध्यक्ष), डॉ. पल्लवी अलसी व डॉ. आदित्य परिहार (मानद संयुक्त सचिव) यांच्यासह इतर पदाधिकारीही विविध पदांची सूत्रे स्वीकारणार आहेत. कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, न्यायमूर्ती अनिल किलोर विशेष अतिथी असतील. आयएमएचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक अढाव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील.

सर्वोत्कृष्ट परिचारिका पुरस्कार सोहळा १२ ला

नागपूर : असोसिएशन ऑफ चॅरिटेबल हॉस्पिटल्स, नागपूर आणि मातृ सेवा संघ, सीताबर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन व सर्वोत्कृष्ट परिचारिका-ट्यूटर पुरस्कार सोहळा मंगळवार, १२ मे रोजी सकाळी ९ वाजता रंजन सभागृह, मातृ सेवा संघ येथे आयोजित करण्यात आला आहे. 'आपल्या परिचारिका, आपले भविष्य; सक्षम परिचारिका आपले प्राण वाचवतात' या विषयावर हा कार्यक्रम होणार आहे. परिचारिका आणि नर्सिंग ट्यूटर यांनी रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण आणि सामुदायिक आरोग्य क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा गौरव यावेळी करण्यात येणार आहे. विविध सेवाभावी रुग्णालये आणि आरोग्य संस्थांतील उत्कृष्ट परिचारिका व ट्यूटर यांचा सन्मानही केला जाणार आहे. कार्यक्रमाला महापौर नीता ठाकरे, शिक्षणतज्ज्ञ डॉ. वेदप्रकाश मिश्रा, डॉ. रूपा वर्मा प्रामुख्याने उपस्थित राहतील.

गांधी सागर तलाव सौंदर्यीकरणाची रखडपट्टी

सहा वर्षांपासून काम अपूर्णच; ३८ कोटी खर्च करूनही नागरिकांना प्रतीक्षाच

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी





नागपूर : गेल्या सहा वर्षांपासून मध्य नागपुरातील गांधीसागर तलावाचे काम अपूर्णच आहे. पहिल्या टप्प्यात ३८ कोटींचा खर्च करूनही नागरिकांना या तलाव परिसरात पर्यटनाचा आनंद घेण्यापासून वंचित राहावे लागत आहे. झालेल्या कामांच्या देखभालीसाठी निविदा काढूनही अद्याप कुणीही कंत्राटदार कंपनी पुढे आली नाही. त्यामुळे ३८ कोटींच्या कामांच्या सुरक्षिततेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

नागपुरातील ऐतिहासिक गांधीसागर तलावाच्या सौंदर्यीकरण कामाला २०२० मध्ये सुरुवात झाली होती. पहिल्या टप्प्यातील कामांसाठी ४९.८२ कोटी रुपयांच्या आराखड्याला राज्य सरकारने मंजुरी दिली होती. यात राज्य सरकारकडून ३७.३६ कोटी, तर महापालिकेचा १२.४६ कोटींचा हिस्सा आहे. २०२४ पर्यंत पहिल्या टप्प्यातील कामे पूर्ण झाल्याचा दावा महापालिकेने केला असून यावर ३८.१८ कोटींचा खर्च झाल्याचे माहिती अधिकार कार्यकर्ते अभय कोलारकर यांना दिलेल्या माहितीतून पुढे आले. परंतु आजही हा तलाव नागरिकांसाठी पूर्णपणे खुला झाला नसल्याचे गांधी सागर उद्यान कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष राजेश कुंभलकर यांनी सांगितले.

टप्पा-एक अंतर्गत संपूर्ण तलावाचे खोलीकरण, संरक्षण भिंतीचे मजबुतीकरण, तलावातील प्राचीन बुर्जचे संगोपन, पागे उद्यानाचे सौंदर्यीकरण, पूर्व- उत्तर बाजूच्या वॉकवेसह सुशोभीकरण व विद्युतीकरण करण्यात आल्याचा आणि यावर सुमारे ३८ कोटी खर्च करण्यात आल्याचा दावा महापालिकेने केला. परंतु तलावाच्या दक्षिण बाजूला लोकांना त्रास सहन करावा लागत आहे. एवढेच नव्हे, येथील 'वॉकिंग ट्रॅक'ही खचला असल्याचे कुंभलकर यांनी नमूद केले. केवळ पागे उद्यानाचे काम पूर्ण झाल्याने नागरिकांना किंचित दिलासा मिळाला. मात्र टप्पा दोनची कामे अद्यापही सुरू झालेली नाहीत, असे कुंभलकर म्हणाले.

पहिल्या टप्प्यातील कामे पूर्ण झाली असली तरी नागरिकांना लाभ होण्याऐवजी मनस्ताप सहन करावा लागत आहे. अद्यापही दक्षिण बाजूची कामे पूर्ण झालेली नाहीत. २०१९ मध्ये २७.९१ कोटींचे कार्यादेश दिलेल्या कंपनीने निकृष्ट दर्जाची कामे केली. यातील भ्रष्टाचाराच्या चौकशीची मागणी केली होती. तत्कालीन आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी चौकशीचे आदेशही दिले होते. परंतु चौकशी झालीच नाही. आता कामे वेगाने न केल्यास पुढील महिन्यात उपोषणावर बसणार आहे.

- राजेश कुंभलकर, अध्यक्ष, गांधी सागर उद्यान कल्याणकारी संस्था.

गडकरींच्या वक्तव्यावरही सल्लागार गंभीर नाही

विशेष म्हणजे, दुसऱ्या टप्प्यातील कामांसाठी अमिगो कन्सल्टंट या कंपनीला प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्त केले असल्याचे महापालिकेने नमूद केले. १५ दिवसांपूर्वी एका कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सल्लागार कंपन्या गुन्हेगार असल्याचे नमूद करीत रोष व्यक्त केला होता. यानंतरही सल्लागार कंपनी गंभीर नसल्याचे चित्र आहे.

दुसऱ्या टप्प्याचा आराखडाच नाही

महापालिकेने दुसऱ्या टप्प्याचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू असल्याची माहिती दिली. दुसऱ्या टप्प्यात खाऊ गल्ली नूतनीकरण, दक्षिण बाजूचे पदपथ, सुरक्षा भिंत, सामाजिक भवन, आदी कामे करण्यात येणार आहे.

६.६३ कोटींची प्रेक्षक दीर्घा

दुसऱ्या टप्प्यात संगीतमय कारंजे बघण्यासाठी नागरिकांसाठी सहा कोटी ६३ लाखांची प्रेक्षक दीर्घा तयार करण्यात येणार आहे. परंतु या कामाला अद्यापही मंजुरी मिळाली नसल्याचे महापालिकेने माहिती अधिकार अर्जाच्या उत्तरात नमूद केले आहे.

मुलगी जन्माला आल्याने पत्नीचा छळ; पतीकडून तिहेरी तलाक

तहसील पोलिसांत गुन्हा दाखल

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : मुलगी जन्माला आल्याच्या कारणावरून पत्नीचा मानसिक व शारीरिक छळ करून तिला तिहेरी तलाक दिल्याचा धक्कादायक प्रकार इतवारी-मस्कासाथ परिसरात उघडकीस आला. या प्रकरणी तहसील पोलिसांनी पती आणि सासूविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

इमरान रशीद शेख आणि त्याची आई सईदा बेगम, अशी आरोपींची नावे आहेत. फतीमा (बदललेले नाव) यांनी याप्रकरणी तक्रार दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फतीमा यांचा विवाह ३१ मे २०२४ रोजी इमरान याच्यासोबत झाला होता. ऑगस्ट २०२५ मध्ये त्यांना मुलगी झाली. त्यानंतर मुलगी झाल्याच्या कारणावरून पती आणि सासूकडून त्यांचा मानसिक व शारीरिक छळ सुरू झाला. २४ एप्रिलला इमरान याने फतीमा यांना मारहाण केली. याप्रकरणी फतीमा यांनी तहसील पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. मात्र, त्यानंतरही छळ सुरूच होता. इमरान याने पुन्हा मारहाण करून फतीमा यांना तिहेरी तलाक दिला. तत्काळ तोंडी तलाक देण्याची प्रथा कायद्याने गुन्हा घोषित करण्यात आली असतानाही हा प्रकार घडल्याने पोलिसांनी गंभीर दखल घेतली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मेंढे यांनी सांगितले की, महिलेच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता तसेच मुस्लीम महिला विवाह हक्क संरक्षण कायद्यान्वये पती आणि सासूविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू असून संबंधितांचे जबाब नोंदवून पुरावे गोळा केले जात आहे.

पतीचे दुसरे लग्न

- ३१ मे २०२४ रोजी जाफरनगर येथील एलन व्हिला येथे मुस्लीम पद्धतीने त्यांचा इमरान रशीद शेख याच्यासोबत विवाह झाला होता.
- फतीमा यांचे हे पहिले, तर इमरानचे दुसरे लग्न होते. पतीकडून मारहाण सुरु असताना त्याचा एक मित्र तेथे आला. त्यावेळी फतीमा यांनी त्याच्याकडे मदतीची विनंती केली. मात्र संबंधिताने कोणतीही मदत केली नसल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

वाहतूक पोलिसांच्या ताफ्यात 'ड्रग टेस्ट' मशीन

अमली पदार्थ सेवन करून वाहन चालवणाऱ्यांवर कारवाई

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : मद्यधुंद वाहनचालकांप्रमाणेच आता अमली पदार्थांचे सेवन करून वाहन चालवणाऱ्यांवरही वाहतूक पोलिसांकडून कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. शहरातील रस्ते सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी वाहतूक विभागाने अत्याधुनिक 'ड्रग टेस्ट मशीन' कार्यान्वित केली असून, 'विकेंड पार्टी' आणि पब परिसरात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे.

वाहतूक विभागाने या मोहिमेसाठी दोन अधिकाऱ्यांसह आवश्यक पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. संबंधित कर्मचाऱ्यांना मशीनच्या वापराबाबत तांत्रिक प्रशिक्षण आणि कार्यपद्धतीच्या सूचना देण्यात आल्या.

वाहन चालकांनी गांजा, अफू, हेरॉईन, कोकेन, सायकोट्रॉपिक ड्रग्ज यांसारख्या अमली पदार्थांचे सेवन केले आहे का, याची तपासणी या मशीनद्वारे करण्यात येणार आहे. तपासणीत दोषी आढळणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे वाहतूक विभागाने स्पष्ट केले.

शहरात अमली पदार्थांचे सेवन करून वाहन चालवणारे चालक आढळल्यास नागरिकांनी ११२ क्रमांकावर माहिती द्यावी. स्वतःच्या तसेच इतरांच्या सुरक्षिततेसाठी अमली पदार्थांचे सेवन करून वाहन चालवणे टाळावे, असे आवाहन पोलीस उपायुक्त (वाहतूक) लोहित मतानी यांनी केले.

अशी काम करते मशीन?

वाहन चालकाने अमली पदार्थांचे सेवन केले आहे का, याची प्राथमिक तपासणी 'ड्रग टेस्ट मशीन'द्वारे केली जाते. चालकाच्या तोंडातील लाळेचा नमुना या मशीनमध्ये घेतला जातो. त्यानंतर काही मिनिटांतच गांजा, कोकेन, हेरॉईन, अफू, सायकोट्रॉपिक ड्रग्ज आदी अमली पदार्थांचे सेवन झाले आहे की नाही, याचा अहवाल मशीनमध्ये दिसून येतो. तपासणीत चालक संशयित आढळल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. काही प्रकरणांत पुढील वैद्यकीय तपासणीसाठी रक्त किंवा अन्य नमुनेही घेतले जाऊ शकतात. वाहतूक पोलिसांकडून विशेषतः विकेंड पार्टी, पब आणि रात्रीच्या गर्दीच्या भागांत या मशीनचा वापर केला जाणार आहे.

बंगालमधील यशानंतर भाजपचा संघटन बळकटीकरणावर भर

दोन दिवसीय प्रशिक्षणाला सुरुवात; कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना नेत्यांचे मार्गदर्शन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : पश्चिम बंगालमधील ऐतिहासिक यशानंतर भाजपने २०२९ च्या विधानसभा निवडणुकीची तयारी आतापासूनच सुरू केली असून राज्यभरात पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान राबविण्यात येत आहे. नागपूर जिल्ह्यातील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांसाठी आयोजित दोन दिवसीय प्रशिक्षणाला शनिवारपासून सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी नेत्यांनी संघटन बळकटीकरणावर धडे दिले.

नागपूर जिल्ह्यातील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांसाठी बुटीबोरी येथील एका 'फार्महाऊस'वर दोन दिवसीय प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे. कार्यकर्ते, पदाधिकारी, महापालिकेतील नगरसेवकांचा येथे मुक्काम आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. उपेंद्र कोठेकर, डॉ. राजीव पोतदार, संजय फांजे यांनी शनिवारी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

पालकमंत्री बावनकुळे यांनी पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवणे, संघटन कौशल्य विकसित करणे आणि जनसंपर्क अधिक प्रभावी करण्यासोबतच केंद्र व राज्य सरकारच्या जनहिताच्या योजनांबाबत जनतेत जनजागृती करण्याबाबत मार्गदर्शन केले. आमदार डॉ. परिणय फुके यांनी प्रास्ताविकातून आगामी काळातील संघटनात्मक बळकटीकरण, बूथ स्तरावरील कार्यपद्धती तसेच कार्यकर्त्यांच्या प्रभावी प्रशिक्षणाबाबत माहिती दिली.

यावेळी शहर भाजपचे अध्यक्ष दयाशंकर तिवारी, खासदार माया इनावते, आमदार संजय भेंडे, माजी आमदार गिरीश व्यास, उपमहापौर लीला हाथीबेड, सत्तापक्ष नेते बाल्या बोरकर, माजी आमदार डॉ. मिलिंद माने, प्रा. अनिल सोले, संदीप जाधव, माजी महापौर अर्चना डेहनकर, बंटी कुकडे, धर्मपाल मेश्राम, श्रीकांत देशपांडे, श्रीकांत आगलावे, विष्णू चांगदे, भाजयुमोचे रितेश गावंडे तसेच पदाधिकारी व जिल्ह्यातील सर्वच विधानसभा मतदारसंघांतील मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

गडकरी, फडणवीसांची आज उपस्थिती

दोन दिवसीय प्रशिक्षणाचा रविवारी समारोप होणार आहे. या समारोपीय कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. ते नवनिर्वाचित नगरसेवक, महापालिकेतील पदाधिकारी तसेच पक्षातील पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतील, असे भाजपकडून सांगण्यात आले.



झालमुडी महोत्सवात खवय्यांची गर्दी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



नागपूर : पश्चिम बंगालमधील निवडणूक प्रचारादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे झालमुडी खाद्यपदार्थ देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला. नागपूरही त्याला अपवाद नव्हते. नागपुरात आयोजित 'झालमुडी महोत्सवा'त खवय्यांनी गर्दी करीत बंगाली खाद्यपदार्थांची चव चाखली.

शेफ विष्णू मनोहर आणि 'जिव्हाळा' संस्थेच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी बजाजनगर येथील विष्णुजी की रसोईमध्ये आयोजित या महोत्सवाबाबत नागपूरकरांत उत्सुकता दिसून आली. संध्याकाळी महोत्सव सुरू होताच झालमुडीत वापरण्यात आलेल्या मसाल्यांचा सुगंध परिसरात दरवळला आणि खवय्यांची पाऊले तिकडे वळली. काही वेळातच नागरिकांची मोठी गर्दी झाली. मुरमुरे, शेंगदाणे, चणे, उकडलेले बटाटे, टोमॅटो, कांदा, बंगाली मसाल्यांसह १६ विविध पदार्थांचा वापर करून विष्णू मनोहर यांनी झालमुडी तयार केली.

विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार संजय भेंडे यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी माजी खासदार अजय संचेती, भाजप नेते गिरीश व्यास, जिव्हाळा फाउंडेशनचे अध्यक्ष अविनाश संगवई यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

झालमुडी फक्त खाद्यपदार्थ नसून बंगालच्या संस्कृतीचा एक भाग आहे. 'एक भारत, श्रेष्ठ भारत'चा संदेश देण्याची संधी या महोत्सवातून मिळाल्याचे विष्णू मनोहर म्हणाले. संचालन विजय जत्थे यांनी केले.

'वारकरी चळवळीत प्रतिगामी विचारांच्या लोकांची घुसखोरी'

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

या घुसखोरांनी आपली नावे आणि आडनावे सोयीने बदलली असून, गावागावांत प्रवचन आणि कीर्तनांच्या माध्यमातून सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम सुरू केले आहे .



'हिंदू विरुद्ध हिंदुत्ववादी' : हिंदू आणि हिंदुत्ववादी हे एकसंघ नाहीत. ज्याप्रकारे गायीचे रक्त शोषण करणारी गोचीड कधीही गाय होऊ शकत नाही, त्याचप्रमाणे हिंदूंचे रक्त असले तरी हिंदुत्ववादी हे हिंदू होऊ शकत नाहीत, असे चंद्रकांत वानखेडे म्हणाले. संत ज्ञानेश्वर हिंदू होते; मात्र त्यांच्या आई-वडिलांना आत्महत्या करायला लावणारे हिंदुत्ववादी होते. संत तुकाराम हिंदू होते; पण त्यांच्या गाथा बुडवणारे हिंदुत्ववादी होते. छत्रपती शिवाजी महाराज हिंदू होते; पण त्यांच्या राज्याभिषेकाला विरोध करणारे हिंदुत्ववादी होते. महात्मा गांधी हिंदू होते; मात्र त्यांची हत्या करणारे हिंदुत्ववादी होते. संत-महापुरुषांना छळणारे मुस्लीम नव्हते, तर हिंदुत्ववादीच होते. वारकरी संप्रदायामुळे हिंदुत्ववादी विचारधारा मागे सारली गेली. त्यामुळेच हा प्रचंड आकस असल्याचे वानखेडे यांनी सांगितले.

नागपूर : महाराष्ट्रात पुरोगामी विचार देणाऱ्या आणि समाजप्रबोधन करणाऱ्या वारकरी संप्रदायात काही मनुवादी लोकांनी घुसखोरी केली आहे, असे मत संतसाहित्याचे भाष्यकार व समीक्षक डॉ. श्रीकांत तिडके यांनी व्यक्त केले.

प्रगतीशील लेखक संघ, नागपूरतर्फे 'वारकरी संप्रदाय आणि महाराष्ट्राचे राजकारण' या विषयावर बाबुराव धनवटे सभागृह, शंकरनगर येथे आयोजित व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. तिडके बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार, लेखक व शेतकरी आंदोलक चंद्रकांत वानखेडे होते.

वारकऱ्यांनी सामान्यांमध्ये जो सत्त्वजागृतीचा भाव निर्माण केला, तो इतका निखळ आणि खरा आहे की, तो विसरून चालणार नाही. त्यांच्यावर हल्ला होत असेल, तर तो महाराष्ट्राच्या धर्मावर झालेला हल्ला आहे. असा हल्ला आजच्या काळात सातत्याने होत असल्याचे तिडके म्हणाले.

संत एकनाथ, संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वर यांनी प्रबोधनाची आणि वारकरी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. चळवळीला वेगवेगळ्या काळात वेगवेगळी रूपे द्यावी लागतात. तुकडोजी महाराज आणि गाडगे महाराजांनी या चळवळीला आणखी वेगळे वळण दिले. 'मंदिरात जाऊ नका, आपल्या शेतात काम करा; तेथेच विठ्ठल भेटायला येईल,' असे सांगत तुकडोजी महाराजांनी या चळवळीला नवे रूप दिले. वारकरी संप्रदाय असाच वाढत राहिला तर पुरोगामी विचार आणखी बलशाली होतील, अशी भीती निर्माण झाली. त्यामुळे मनुवादी आणि प्रतिगामी विचारांच्या लोकांनी या संप्रदायात घुसखोरी केली. हे लोक नथुराम गोडसे यांचे गोडवे गातात आणि मुस्लिमांविरोधात चिथावणीखोर वक्तव्ये करतात. अशी भाषा बोलणारे लोक वारकरी होऊ शकत नाहीत, असे तिडके यांनी सांगितले.

या घुसखोरांनी आपली नावे आणि आडनावे सोयीने बदलली असून, गावागावांत प्रवचन आणि कीर्तनांच्या माध्यमातून सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम सुरू केले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अरुणा सबाने यांनी, तर संचालन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. प्रमोद मुनघाटे यांनी केले. याप्रसंगी कविवर्य नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित काव्यस्पर्धेत सहभागी कवींचे संमेलनही पार पडले. तसेच प्रमुख तीन विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

बौद्ध हा धर्म आहे, त्याला संवैधानिक जातीचा दर्जा नाही

निवृत्त न्यायमूर्ती सी.एस. थूल यांचे प्रतिपादन

लोकसत्ता प्रतिनिधी



नागपूर : जनगणना व संविधानाचा थेट संबंध आहे. जनगणनेच्या आधारेच कल्याणकारी योजना व त्यांचे नियोजन निश्चित करण्यात येते. आरक्षणाचे लाभ याच्याच आधारे ठरवण्यात येते. जनगणनेत धर्मासोबत जातीचाही उल्लेख करणे आवश्यक आहे. बौद्ध हा धर्म असून जात नाही. बौद्ध जातीला संवैधानिक दर्जा नाही. धर्म आणि जात यात फरक आहे, असे प्रतिपादन अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे माजी अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती सी.एस. थूल यांनी केले.

समता अधिवक्ता संघाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन केंद्र येथे 'बुद्ध आणि बाबासाहेब' या विषयावर आयोजित परिसंवादामध्ये ते बोलत होते. यावेळी निवृत्त न्यायाधीश आर.सी. चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार श्रीमंत माने प्रामुख्याने उपस्थित होते.

निवृत्त न्यायमूर्ती थूल पुढे म्हणाले, इंग्रजांच्या काळात जाती अनुसूचित करण्यात आल्या. त्या आजही कायम आहेत. यात 'बौद्ध' असा उल्लेख नाही. बौद्ध धर्म असून ती जात नाही. जात ही जन्मापासून असते. जनगणनेत धर्मासोबत जात लिहिणे महत्त्वाचे आहे. नवबौद्ध व बौद्ध लिहिल्यास अल्पसंख्याक ठरेल. त्यामुळे धर्म 'बौद्ध' लिहित जात 'महार' नमूद करायला हवे. जनगणनेच्या आधारेच योजना आणि नियोजन ठरते. नोकरी, शिक्षणातील आरक्षणाचे धोरण यावरून निश्चित होतात. कल्याणकारी योजनांच्या फायद्यासाठी संविधानातील तरतुदीनुसार माहिती द्यायला हवी.

निवृत्त न्यायमूर्ती चव्हाण म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लहान राज्याचे समर्थक होते. आज भाषिक वाद उद्भवत आहे. याबाबत डॉ. आंबेडकरांनी आधीच चिंता व्यक्त केली होती. बाबासाहेबांनी कल्याणकारी राज्याची कल्पना केली होती. परंतु आजचा युवक त्या उलट वागत आहे.

नवीन नागपूर उभारताना कुणावरही अन्याय नाही - बावनकुळे

अवकाळीमुळे नुकसानग्रस्तांना मदतीची प्रक्रिया सुरू

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : नवीन नागपूर उभारताना शेतकरी आणि स्थानिक रहिवाशांवर अन्याय होणार नाही, याबाबत सरकार पूर्ण काळजी घेत आहे, असे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदतीसाठी महसूल विभागाने आदेश काढल्याची पुस्तीही त्यांनी जोडली.

मिरा-भाईंदर जमीन वादप्रकरणी सरकार सर्वोच्च न्यायालयात जाणार

मिरा-भाईंदर येथील जमीन वादप्रकरणी काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या आरोपांवर बावनकुळे म्हणाले, संबंधित जमीन इंग्रजांच्या काळापासून ९९९ वर्षांच्या 'लीज'वर देण्यात आली होती. महसूल संहितेनुसार ती 'वर्ग २' ची जमीन आहे. उच्च न्यायालयाने ती मिरा साल कंपनीच्या नावाने देण्याचा निर्णय दिला असला तरी राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करणार असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

ते शनिवारी नागपूर विमानतळावर प्रसारमाध्यमांशी बोलत होते. नवीन नागपूरमधील जमीन अधिग्रहण आणि दरांबाबत सुरुवातीला स्थानिक शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती. योग्य मोबदला मिळेल की नाही, याबाबत शंका होती. मात्र सरकारने शेतकऱ्यांना योग्य दर देण्यासोबतच भूखंड देण्याचाही निर्णय घेतला आहे, असे त्यांनी सांगितले.

अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या भागांचे तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी आणि कृषी अधिकाऱ्यांनी तातडीने पंचनामे करून मदत द्यावी, असे निर्देश सरकारने दिले आहे. वेगळ्या आदेशाची आवश्यकता नाही. जिथे नुकसान होईल, तिथे तत्काळ सर्वेक्षण करून मदतीची प्रक्रिया सुरू केली जाईल, असे ते म्हणाले.

स्वस्तात गाड्या देण्याचे आमिष; लाखोंची फसवणूक

शोरूम व्यवस्थापकासह पाच जणांवर गुन्हा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : स्वस्त दरात दुचाकी आणि चारचाकी वाहने उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवत शहरातील अनेकांची लाखो रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी लकडगंज पोलिसांनी श्वेता चिचधरे, शोरूम व्यवस्थापक अविनाश कडू, घनश्याम चिचधरे, प्रणय धकाते आणि चेतन गाठीबांदे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला.

यवतमाळ येथील राजदीप खोब्रागडे यांच्या तक्रारीनुसार, चेतन गाठीबांदे याने त्यांची ओळख सीए मार्गावरील मास्कोट होंडा शोरूममधील श्वेता चिचधरे हिच्याशी करून दिली. यावेळी त्यांना कमी किंमतीत नवीन गाड्या मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले. सुरुवातीला राजदीप यांनी तीन ॲक्टिव्हा दुचाकींसाठी पैसे भरले. त्यापैकी दोन गाड्या मिळाल्याने त्यांचा विश्वास बसला. त्यानंतर त्यांनी मित्र, नातेवाईक आणि ओळखीच्या लोकांकडून पैसे गोळा करून आणखी १९ दुचाकी गाड्यांची नोंदणी केली. विविध तारखांना ऑनलाइन आणि रोख स्वरूपात त्यांनी सात लाख २६ हजार रुपये दिले. मात्र त्यानंतर गाड्या देण्यास टाळाटाळ करण्यात आली.

अशाच प्रकारे फसवणूक झालेल्या इतरांनीही पोलिसांत तक्रारी केल्या. लवकेश धोसेवान यांनी स्विफ्ट मोटारीसाठी दोन लाख रुपये दिल्याचे सांगितले. योगेश चांभारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दुचाकी, बुलेट आणि चारचाकी वाहनांसाठी सुमारे ११ लाख २५ हजार रुपये दिल्याचा दावा केला. अनुराग ढोलेकर यांनी अर्टिगा मोटारीसाठी एक लाख रुपये दिल्याचे सांगितले. तुषार इंगळे यांनी सहा दुचाकी आणि तीन चारचाकी वाहनांसाठी साडेपाच लाख रुपये दिल्याचा आरोप केला. मनोज भुते, रोहित पराते, प्रशांत निमजे, शुभम ढोके यांच्यासह अनेकांनी लाखो रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार केली. सुरुवातीला काही ग्राहकांना गाड्या देण्यात आल्याने इतरांचाही विश्वास बसला. त्यानंतर कमी किंमतीत वाहन मिळवून देण्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर पैसे जमा करण्यात आल्याचे पोलीस तपासात समोर येत आहे. अनेक व्यवहार शोरूममधील 'स्कॅनर'द्वारे 'ऑनलाइन' करण्यात आल्याचा दावा तक्रारदारांनी केला.

पोलिसांनी आर्थिक व्यवहार, बँक खात्यांची माहिती आणि शोरूममधील व्यवहारांची चौकशी सुरू केली आहे.

ज्येष्ठांचा अमृत महोत्सव उत्साहात

लोकसत्ता प्रतिनिधी



नागपूर : म्हाळगीनगर येथील लोकमंच ज्येष्ठ नागरिक मंडळातर्फे ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचा अमृत महोत्सव नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात ५१ हून अधिक ज्येष्ठांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॅप्टन प्रभाकर विंचूरकर होते. मुख्य अतिथी म्हणून डॉ. डी. बी. चौधरी उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिक समाजाचे खरे आधारस्तंभ असून त्यांच्या अनुभवातूनच समाजाची प्रगती होते, असे कॅप्टन विंचूरकर म्हणाले. डॉ. डी. बी. चौधरी यांनी आरोग्याची काळजी, आहारावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी भालचंद्र सबळ, मुरलीधर रागलकर, सुरेश वडाळकर, प्रकाश चन्ने, मीरा केळझरकर, पुष्पा विंचुरकर आणि प्रमिला विंचुरकर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. मंडळाचे सचिव डॉ. दीपक शेंडेकर यांनी प्रास्ताविक केले. संचालन माधवी थिगळे यांनी तर कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर टोंगे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला ईश्वर बानकर, अशोक पाचपोर, विश्वनाथ मोहाडीकर, नरेंद्र आंभोरे, अशोक बांडाणे, चंद्रशेखर पाध्ये, पुष्पा कनोजे, सुमन टेंभरे, पुष्पा टोंगे, प्रल्हाद शेंडे, नाना निकम, रमेश साठवणे, हरेश्वरर सहारे, किशोर कहाते, आदी उपस्थित होते.

अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण तातडीने लागू करा

लहूसेनाचे संविधान चौकात धरणे आंदोलन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



नागपूर : अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण तातडीने जाहीर करून त्याची अंमलबजावणी करावी. तोपर्यंत राज्यातील शासकीय आणि निमशासकीय भरती प्रक्रिया स्थगित करावी, अशी मागणी लहूसेना आणि इतर सामाजिक संघटनांनी केली. या मागणीसाठी संविधान चौकात धरणे आंदोलन करण्यात आले. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला.

आंदोलकांनी सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची मागणी केली. अनुसूचित जातीतील वंचित घटकांना सामाजिक न्याय मिळण्यासाठी उपवर्गीकरण आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता आणि बंधुभावाच्या विचारांची अंमलबजावणी करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा असल्याचे आंदोलकांनी सांगितले. उपवर्गीकरण निश्चित होईपर्यंत राज्यातील कोणतीही शासकीय भरती प्रक्रिया राबवू नये. शासनाने तातडीने वैज्ञानिक आणि अनुभवाधारित माहिती गोळा करून मागासलेपणाचे विश्लेषण करावे, अशी मागणीही करण्यात आली.

काही राज्यांनी उपवर्गीकरणाचा निर्णय घेतला असताना महाराष्ट्राने विलंब करू नये. बदर समितीचा अहवाल शासनाकडे सादर झाला असून, कोणत्याही दबावाला बळी न पडता तातडीने निर्णय घ्यावा. हे आंदोलन कोणत्याही समाजाच्या विरोधात नसून, अनेक दशकांपासून वंचित राहिलेल्या घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले.

आंदोलनात संजय कठाळे, राहुल हिवराळे, परिमल कांबळे, डॉ. कुंदनभूषण मार आणि इतर पदाधिकारी सहभागी झाले होते.

राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांतील दावेदारांना १२ कोटी

राष्ट्रीय लोकअदालतीत ३८ प्रकरणांचा निपटारा

नागपूर : राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरण आणि उच्च न्यायालय विधि सेवा उपसमितीतर्फे आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीत ३८ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. यात राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांतील दावेदारांना १२ कोटी ११ लाख ५५ हजार ६५४ रुपयांची भरपाई मंजूर करण्यात आली.

उच्च न्यायालय विधि सेवा उपसमितीचे अध्यक्ष न्या. अनिल एस. किलोर यांनी नागरिकांना लोकअदालतीच्या माध्यमातून आपले वाद, प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्याचे आवाहन केले. न्या. रजनीश आर. व्यास यांनी या लोकअदालत पीठाचे नेतृत्व केले.

मोटार अपघात दावे, जमीन संपादन, तसेच कौटुंबिक वाद अशा विविध स्वरूपाच्या एकूण २०० प्रकरणांची सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यापैकी ३८ प्रकरणांचा यशस्वी तोडगा काढण्यात आला. विशेष म्हणजे, राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांशी संबंधित वादांमध्ये दावेदारांना भरपाई मंजूर करण्यात आली. या प्रकरणांच्या यशस्वी निपटाऱ्यासाठी यवतमाळचे प्रकल्प संचालक बिजेवार, महाव्यवस्थापक निर्मल झाडे, राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरण सल्लागार संगित राव, ॲड. अनिश कथाने आणि ॲड. हरीश डांगरे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, विमा कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच ॲड. आयुषी डांगरे, ॲड. सी. ए. अँथनी, ॲड. अश्विनी आठल्ये, ॲड. स्विती बातिया, ॲड. कुणाल मिराचे आणि ॲड. डी. एन. कुकडे यांनीही लोकअदालतीत सहभाग नोंदविला.

पंजाब नॅशनल बँक
भारत सरकारचा उपक्रम
pnb punjab national bank
(A Govt. of India Undertaking)

सर्कल ऑफिस, नाशिक
वुडलँड टॉवर अपार्टमेंट, दुसरा मजला, गंगापूर रोड, नाशिक - 422 005
Email ID – conashiksamd@pnb.co.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

अ. क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचना कलम १३(२) प्रमाणे दि. ०८.०८.२०२२ ब) थकबाकी रक्कम क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१	**शाखा : अकोला (000900)** **कर्जदार:** **श्री.सुभाष नामदेव ससाणे** पत्ता १ : अकबर प्लॉट, वॉर्ड क्र. 20, अशोक नगर, क्वॉर्टर क्र. 138, अकोट रोड अकोला **श्री.सुभाष नामदेव ससाणे** पत्ता २ : निवासी डुप्लेक्स रो हाउस नं. 7, गुणवंत विहार भाग 2, न्यू माधुरी वाईन शॉपसमोर, डाबकी रोड, शेगाव रेल्वे क्रॉसिंगजवळ, ता. अकोला, जि. अकोला	प्लॉट क्रमांक २५, डुप्लेक्स क्रमांक ७, गुणवंत विहार भाग २, फील्ड सर्वे क्रमांक ९९-३, ग्रामपंचायत भोरड, ता. अकोला जिल्हा अकोला **क्षेत्रफळ एरिया :** **बांधकाम क्षेत्र: ५२.५६ चौ.मी.** **मालमत्ता मालकाचे नाव:** **श्री.सुभाष नामदेव ससाणे** **चतुःसिमा : उत्तर:** रस्ता, **दक्षिण:** डुप्लेक्स क्रमांक ८, **पूर्व:** डुप्लेक्स क्रमांक ६, **पश्चिम:** लेआउट रस्ता **मालमत्ता आयडी: PUNB1HA9556394**	अ) ०८.०८.२०२२ ब) रु. ११,५०,५८८.८२/- दि. ०८.०८.२०२२ रोजी + इतर व्याज क) २०.१२.२०२२ ड) सांकेतिक ताबा	१. अ) रु. ७.६५ लाख ब) रु. ०.७६ लाख (२५.०५.२०२६) क) रु. १.०० लाख	दि. २६.०५.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही
२	**शाखा : अकोला (००९००)** **कर्जदार :** **श्री. विजय काशीनाथ सकट** पत्ता : डुप्लेक्स रो हाऊस क्रमांक ८, गुणवंत विहार भाग २, न्यू माधुरी वाईन शॉपसमोर, डाबकी रोड, शेगाव रेल्वे क्रॉसिंगजवळ, अकोला .	प्लॉट क्रमांक २५, डुप्लेक्स क्रमांक ८, गुणवंत विहार भाग २, फील्ड सर्वे क्रमांक ९९-३, ग्रामपंचायत भौरडताळ आणि जिल्हा: अकोला जिल्हा: अकोला **क्षेत्रफळ एरिया :** **बांधकाम क्षेत्र: ५२.५६ चौ.मी.** **मालमत्ता मालकाचे नाव:** **श्री. विजय काशीनाथ सकट** **चतुःसिमा : उत्तर:** डुप्लेक्स क्रमांक ५ **दक्षिण:** प्लॉट क्रमांक २६, **पूर्व:** डुप्लेक्स क्रमांक ७, पश्चिम: लेआउट रोड **मालमत्ता आयडी: PUNB1HA9556188**	अ) ०८.०८.२०२२ ब) रु. ११,७८,६५७.३९/- दि. ०८.०८.२०२२ रोजी + इतर व्याज क) २०.१२.२०२२ ड) सांकेतिक ताबा	१. अ) रु. ७.६५ लाख ब) रु. ०.७६ लाख (२५.०५.२०२६) क) रु. १.०० लाख	दि. २६.०५.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही
३	**शाखा: बुलढाणा;** **सुंदरखेड रोड (१४१७१०)** **कर्जदार:** **श्री.अशोक रामदास जाधव** पत्ता : राहेरा, रोहिणखेड, तालुका: बुलढाणा, जिल्हा:बुलढाणा- पिन - 443001 **श्री.गणेश भाऊराव गोराडे** पत्ता : राहेरा, रोहिणखेड, तालुका: बुलढाणा, जिल्हा:बुलढाणा- पिन - 443001 **हमीदार:** **श्री. उमेश वासुदेव जाधव** पत्ता : राहेरा, रोहिणखेड, तालुका: बुलढाणा, जिल्हा:बुलढाणा- पिन - 443001 **मे.निकिता एजन्सी** पत्ता : पोस्ट सुंदरखेड , होंडा शोरुमजवळ, ख्रामगाव रोड, बुलढाणा -443001	पत्ता : प्लॉट क्रमांक ११ आणि त्यावरील सर्व घरांचे बांधकाम प्रस्तावित आहे जे गट क्रमांक ३५४, शिक्षक कॉलनीजवळ, चांडक लेआउटच्या मागील बाजूस, मौजे येळगाव, ग्रामपंचायत क्षेत्र, बुलढाणा-४४३००१. **क्षेत्रफळ एरिया :** **प्लॉटक्षेत्र: १८०.०० चौरस मीटर.** **बांधकाम क्षेत्र: २४२.७९ चौरस मीटर.** **मालमत्ता मालकाचे नाव-** **श्री. अशोक रामदास जाधव** **चतुःसिमा: उत्तर:** मंजूर लेआउट **दक्षिण:** प्लॉट क्रमांक १२ **पूर्व:** रस्ता, **पश्चिम:** प्लॉट क्रमांक १० **मालमत्ता आयडी:** **PUNBABA47449031**	अ) १२.०८.२०२४ ब) रु. १८,७३,९५२.९१/- दि. १२.०८.२०२४ रोजी + इतर व्याज क) १२.०६.२०२५ ड) सांकेतिक ताबा	१. अ) रु. ५२.७० लाख ब) रु. ५.२७ लाख (२५.०५.२०२६) क) रु. १.०० लाख	दि. २६.०५.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे
1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्रीही **२६-०५-२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वर www.pnbindia.in.** आणि **https://baanknet.in** वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मव्दारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताव्दारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया **www.pnbindia.in.** आणि **https://baanknet.com** ही वेबसाईट पाहावी

स्वाक्षरी/-
श्री. संतोष सिंह
अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)

दिनांक - १०.०५.२०२६
स्थळ - नाशिक

टीप : स्वैर भाषांतर; तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य

महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनांस लि.
Corporate Office:- Agasty Corporate Park, Piramal, Amiti Building, Unit No. 203, 2nd Floor, B Wing, Sunder Bung, Kurla West, Mumbai Mahrashtra 400 070 India.CIN – U65922MH2007PLC169791 Branch Office :- 7-A Patil Complex, 1st Floor, Near main S.T Bus Stand, Ganeshpeth, Nagpur 440009

ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी) नियम 8-(1)

ज्याअर्थी, सिक्युरिटाईजेशन आणि रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल असेट्स एंड एनफोर्समेंट ऑफ सिक्यूरिटी इंटरेस्ट ऍक्ट 2002 च्या अंतर्गत खालील हस्ताक्षरकर्ता हे **(महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनांस लि.)** चे अधिकृत अधिकारी आहे. तसेच सिक्यूरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स 2002 चे सेक्शन 13(12) च्या सोबतच वाचले जाणारे रुल 8 आणि 9 च्या अंतर्गत खालील उल्लेखित कर्जदारांना डिमांड नोटिस सुचना प्राप्तीनंतर 60 दिवसांचा आत भरपाई करण्याच्या उद्देश्याने सुचना मध्ये दर्शविलेल्या तारखेला दिली होती. कर्जदार रक्कमेची भरपाई करण्याकरीता असमर्थ सिध्द ठरल्यामुळे कर्जदार तसेच आम जनतेला याव्दारे सुचना देण्यात येते की, खालील दिलेल्या 13(4) सह वाचला जाणाऱ्या ॲक्ट कार्य क्र. 8 च्या अंतर्गत खालील हस्ताक्षरकर्त्याने खालील दिलेल्या संपत्तीचा **ताबा** खालील उल्लेखित तारखेला घेतला आहे. विशेष करुन खालील कर्जदार तसेच आम जनतेला या व्दारा वरील संपत्तीच्या विषयी काहीही घेणे देणे न करण्याकरीता जागृत केले जात आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रक्कमेवरील व्याजाचे आणि अन्य खर्चाचे देणेघेणे **महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनांस लि.** व्याजासह प्रभाराधिन राहिल.

अनु क्र	कर्जदार / जमानतदाराचे नाव	मागणी दिनांक आणि रक्कम ताबा दिनांक	सुरक्षित संपत्तीचे विवरण (अचल संपत्तीकरीता)
1.	**1741173 (X0AHWAD000001741173) - नागपूर** **श्री. सुनील दिलीप देशभ्रतार, कु. रोहिणी सुनील देशभ्रतार,** C/o प्रल्हाद गोला, पंचशील नगर, वॉर्ड क्र. १, रेल्वे क्रॉसिंग जवळ, सावनेर, रेल्वे क्रॉसिंग जवळ, नागपूर, महाराष्ट्र – ४४११०७ **सौ. नमिता गणेश इलामकर,** रा. खापा रोड, पंचशील नगर, व्ही.टी.सी. सावनेर, नागपूर – ४४११०७	मागणी सूचना दिनांक : 30-01-2026 रु. 2071587.91 ताबा दिनांक: 05-05-2026	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा बेअरिंग उत्तरेकडील भाग प्लॉट क्र. १९, क्षेत्रफळ अंदाजे ६२७.७५ चौ.फुट (म्हणजे ५८.३४ चौ.मी.), हा संपूर्ण जमीन खसरा क्र. ५०९, मौजा – सावनेर येथील एक भाग असून, परिषद घर क्र. ५१८ (०१०००५७६), वॉर्ड क्र. १, बी. नं. २१६, पी.एच. नं. ३४, मौजा सावनेर, नागपूर – ४४११०७ येथे स्थित आहे. चतु:सीमा पुढीलप्रमाणे : उत्तर : प्लॉट क्र. २०, दक्षिण : प्लॉट क्र. १९ चा उर्वरित भाग, पूर्व : १५ फूट रुंद रस्ता, पश्चिम : प्लॉट क्र. २०
2.	**1738737 (X0AHBDU000001738737) - बुलढाणा** **श्री. पवन भगवान मानकर, कु. मंगला भगवान मानकर, श्री. भगवान रामभाऊ मानकर, श्री. सागर हरिप्रसाद कोठारी** S/o भगवान मानकर मळा, पिंपळगाव काळे, ता. मलकापूर, जि. बुलढाणा, महाराष्ट्र – ४४३४०३	मागणी सूचना दिनांक : 30-01-2026 रु. 1059307.88 ताबा दिनांक: 05-05-2026	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा मौजे गाडेगाव, ता. मलकापूर, जि. बुलढाणा, ग्रामपंचायत वाकोडी हद्दीत स्थित, गट क्र. १५/४-सी, प्लॉट क्र. ११ व १२, एकूण क्षेत्रफळ ६४७.९९ चौ. मीटर, ज्यावर बांधलेले निवासी संकुल "मंगलम अपार्टमेंट" म्हणून ओळखले जाते. सदर संकुलातील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. एस-१, क्षेत्रफळ ५८.६५ चौ. मीटर (कार्पेट एरिया) तसेच प्लॉटमधील ५.०३% अविभाजित हिस्सा. चतु:सीमा पुढीलप्रमाणे : उत्तर : पॅसेज, दक्षिण : बाल्कनी, पूर्व : बाल्कनी व ७ लेआउट रोड, पश्चिम : फ्लॅट क्र. एस-२
3.	**1380608 (XSEMYAT01060249) - यवतमाळ** **श्री. संजय शंकर पवार, सौ. सुनीता संजय पवार** रा. C/o श्री. शाम हजारे, शिवाजी नगर, दारव्हा, ता. दारव्हा, जि. यवतमाळ, महाराष्ट्र – ४४५२०२	मागणी सूचना दिनांक : 30-01-2026 रु. 1396442.95 ताबा दिनांक: 06-05-2026	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा लेआउट प्लॉट क्र. ८-ए, फील्ड सर्व्हे क्र. २१६/२, कमला पार्क, आर्णी रोड, मौजा – बागवाडी, जी.पी. – साईखेडा, दारव्हा, ता. दारव्हा, जि. यवतमाळ – ४४५२०२ येथे स्थित. चतु:सीमा पुढीलप्रमाणे : उत्तर : प्लॉट क्र. ८-बी, दक्षिण : प्लॉट क्र. ७, पूर्व : निमकर यांची मालकी जमीन, पश्चिम : १२ मीटर रुंद लेआउट रस्ता
4.	**1736323 (X0AHNAG000001736323) - नागपूर बीओ** **श्री. चंद्रमणी भगवान मोहाबे, सौ. अश्विनी राजेंद्र रहाटे** रा. प्लॉट क्र. ७६, पोल क्र. ए.एम. ९/३, रामा नगर, रेल्वे क्रॉसिंग जवळ, ता. कामठी, जि. नागपूर पिन कोड – ४४१००१	मागणी सूचना दिनांक : 17-12-2025 रु. 1641935.48 ताबा दिनांक: 04-05-2026	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा व त्यावरील बांधकाम ग्रामपंचायत घर क्र. २३२ चा उत्तरेकडील भाग, पी.एच. क्र. १८, सी.टी.एस. क्र. १३७, शीट क्र. २, वॉर्ड क्र. १, मौजा – येरखेडा, ता. कामठी, जि. नागपूर येथे स्थित, एकूण क्षेत्रफळ ५२.५५ चौ. मीटर. चतु:सीमा पुढीलप्रमाणे : पूर्व : डॉ. राजेंद्र चौधरी यांचे घर, पश्चिम : रस्ता, दक्षिण : राजा कुरिल यांची उर्वरित जमीन, उत्तर : ओमप्रकाश कुरिल यांची मोकळी जमीन
5.	**702296 (XSEMNAG00592190) - नागपूर बीओ** **सौ. ज्योत्स्ना मुकुंद हनवटे, श्री. मुकुंद महादेव हनवटे, श्री. अभय मुकुंदराव हनवटे** सर्व रा. टाइप ७/३५/५, विद्युत विहार, के.टी.पी.एस. कॉलनी, कोराडी कॉलनी, नागपूर, महाराष्ट्र – ४४१११११	मागणी सूचना दिनांक : 20-11-2025 रु. 1240400.53 ताबा दिनांक: 05-05-2026	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा व त्यावरील बांधकाम प्लॉट क्र. २६, खसरा क्र. १८५, पी.एच. क्र. १२-अ, मौजा – बोखारा, ता. व जि. नागपूर येथे स्थित, एकूण प्लॉट क्षेत्रफळ १५०० चौ. फूट. चतु:सीमा पुढीलप्रमाणे : पूर्व : २० फूट रुंद रस्ता, पश्चिम : प्लॉट क्र. ४९, दक्षिण : प्लॉट क्र. २५, उत्तर : प्लॉट क्र. २७
6.	**1332548 (XSEMSAQ01034577) - सावनेर** **श्री. विजय त्र्यंबकराव रेडलावार, श्री. समीर विजयराव रेडलावार, सौ. सविता विजयराव रेडलावार** रा. प्लॉट क्र. ७४, घरकुल सोसायटी, बेसा, मिलिंद नगर, नागपूर, महाराष्ट्र – ४४००३७	मागणी सूचना दिनांक : 17-12-2025 रु. 399776.82 ताबा दिनांक: 04-05-2026	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा व त्यावरील बांधकाम प्लॉट क्र. ७४, घरकुल सहकारी सोसायटी, मौजा – बेसा, पी.एच. क्र. ३८, खसरा क्र. ९३/५, ता. व जि. नागपूर येथे स्थित, एकूण जमीन क्षेत्रफळ १००० चौ. फूट. चतु:सीमा पुढीलप्रमाणे : पूर्व : प्लॉट क्र. ७३, पश्चिम : प्लॉट क्र. ७५, दक्षिण : २० फूट रुंद रस्ता, उत्तर : प्लॉट क्र. ७१
7.	**980507 (XSEMNAG00808361) - नागपूर बीओ** **श्री. तारकेश्वर हरिशंकर चौबे, सौ. पुनम तारकेश्वर चौबे, सौ. कविता राजेंद्र बुटले** रा. सर्व्हे क्र. ६७, राजेंद्र बुटले, गुलमोहर नगर, भरतवाडा रोड, नागपूर, महाराष्ट्र – ४४०००८	मागणी सूचना दिनांक : 17-12-2025 रु. 664955.96 ताबा दिनांक: 04-05-2026	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा व त्यावरील बांधकाम प्लॉट क्र. १०१, धनलक्ष्मी हाउसिंग सोसायटी लि. (ग्रुप C-2), भारतवाडा रोड, कॉर्पोरेशन, वॉर्ड क्र. २१, शीट क्र. ५८, ४८, ५७, सिटी सर्व्हे क्र. १८३, पी.एच. क्र. १७, खसरा क्र. ६९, ता. व जि. नागपूर येथे स्थित, एकूण जमीन क्षेत्रफळ ६०० चौ. फूट. चतु:सीमा पुढीलप्रमाणे : पूर्व : प्लॉट क्र. १०२, पश्चिम : प्लॉट क्र. १००, दक्षिण : रस्ता, उत्तर : प्लॉट क्र. ११२
8.	**960205 (XSEMNAG00792059) - नागपूर बीओ** **श्री. विजय त्र्यंबकराव रेडलावार, श्री. समीर विजयराव रेडलावार, सौ. सविता विजयराव रेडलावार** रा. C/o श्री. सुनील बनैत, प्लॉट क्र. १५, आनंद गृहिती निर्माण, बेसा रोड, वैष्णवी ट्रेडर्सच्या वर, नागपूर – ४४००३४	मागणी सूचना दिनांक : 17-12-2025 रु. 978153.25 ताबा दिनांक: 04-05-2026	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा व त्यावरील बांधकाम मौजा – बेसा, पी.एच. क्र. ३८, ग्रामपंचायत बेसा, खसरा क्र. ९३/५, प्लॉट क्र. ७४, ता. व जि. नागपूर येथे स्थित, एकूण जमीन क्षेत्रफळ ९३ चौ. मीटर. चतु:सीमा पुढीलप्रमाणे : पूर्व : प्लॉट क्र. ७३, पश्चिम : प्लॉट क्र. ७५, दक्षिण : रस्ता, उत्तर : प्लॉट क्र. ७१
9.	**781013 (XSEMNAG00710591) - नागपूर बीओ** **श्री. मधुकर बाळाजी वाहुकर, सौ. मनीषा मधुकर वाहुकर, सौ. अक्षिनी समीर वाहुकर, श्री. आशीष मधुकर वाहुकर, श्री. समीर मधुकर वाहुकर** सर्व रा. पोस्ट – बेला, बाजार चौक, मुख्य रस्ता,

विनेशला 'कारणे दाखवा' नोटीस

'डब्ल्यूएफआय'च्या भूमिकेमुळे २६ जूनपर्यंत स्पर्धेत सहभागी होण्यास बंदी

पीटीआय, नवी दिल्ली

भारतीय कुस्ती महासंघ (डब्ल्यूएफआय) आणि ऑलिम्पिकपटू विनेश फोगट यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा तीव्र झालेला दिसून येत आहे. आशियाई कुस्ती पात्रता निकष बदलून आधीच 'डब्ल्यूएफआय'ने विनेशला रोखण्याची पावले उचलल्याची चर्चा असतानाच शनिवारी महासंघाकडून विनेश फोगटला शिस्तभंग आणि उत्तेजक द्रव्यविरोधी नियमांच्या उल्लंघनावरून कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. आहे.

'डब्ल्यूएफआय'ने तब्बल दोन वर्षांपूर्वीच्या प्रसंगावरून विनेशला पाठवलेल्या कायदेशीर नोटिशीवरून कुस्ती वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू झाली असून, विनेशला रोखण्यासाठी हरतऱ्हेने प्रयत्न केले जात असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. विनेशला या नोटिशीला उत्तर देण्यासाठी चौदा दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे.

निवृत्ती मागे घेण्यासंदर्भात विनेशने संयुक्त कुस्ती महासंघाला (यूडब्ल्यूडब्ल्यू) कल्पना दिली असली, तरी आता नियमांनुसार आवश्यक असलेला सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण न केल्यामुळे विनेशला २६ जून २०२६ पर्यंत देशांतर्गत स्पर्धांमध्ये खेळण्यास अपात्र ठरवण्यात आले आहे. या निर्णयामुळे दोन वेळा जागतिक कांस्यपदक विजेती असलेल्या विनेशचे पुनरागमन लांबणीवर पडले आहे. पॅरिस (२०२४) ऑलिम्पिकमधील अपात्रतेनंतर कुस्ती सोडलेल्या विनेशने आज, रविवारी गोंडा येथे सुरू होणाऱ्या राष्ट्रीय खुल्या मानांकन स्पर्धेतून पुनरागमन करण्याचे लक्ष्य ठेवले होते. या स्पर्धेत सहभागी होण्यासही सुरुवातीला विनेशला अडथळे आणण्यात आले होते. वादविवाद झाल्यानंतर अगदी अखेरच्या क्षणी विनेशची नोंदणी करण्यात आली होती.

आरोप काय

विनेशने १८ डिसेंबर २०२५ रोजी उत्तेजक चाचणीसाठी उपलब्ध न राहून नियमांचे उल्लंघन केले. तसेच, निवृत्तीनंतर पुनरागमन करताना नियमानुसार सहा महिने आधी माहिती देणे आणि त्या काळात चाचणीसाठी उपलब्ध राहणे अनिवार्य होते, जे विनेशने पाळले नाही, असे 'डब्ल्यूएफआय'ने म्हटले आहे. त्याचबरोबर पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ५० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत पोहोचल्यानंतर १०० ग्रॅम वजन जास्त भरल्यामुळे विनेश अपात्र ठरली होती. यामुळे भारताचे हक्काचे पदक निसटले आणि भारतीय कुस्तीच्या प्रतिमेला तडा गेला, असा आरोप महासंघाने दोन वर्षांनी केला आहे. विशेष म्हणजे पॅरिस ऑलिम्पिकसाठी विनेशने ५० किलो आणि ५३ किलो अशा दोन वजनी गटातून निवड चाचणीत भाग घेतला होता, जो नियमांच्या विरुद्ध असल्याचा आरोपही महासंघाने केला आहे. तेव्हा चाचणीत सहभागी करून घेतले जाईल यासाठी लेखी आश्वासनासाठी तिने स्पर्धा थांबवून धरल्याने इतर कुस्तीपटूंची गैरसोय झाल्याचा ठपकाही तिच्यावर ठेवण्यात आला आहे.

'डब्ल्यूएफआय'चे स्पष्टीकरण

निवृत्तीनंतर परतताना जागतिक उत्तेजक विरोधी संस्थेच्या (वाडा) नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. विनेशने सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण केलेला नाही, त्यामुळे ती २६ जून २०२६ पर्यंत कोणत्याही स्पर्धेत भाग घेऊ शकत नाही, असे महासंघाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, विनेशने यापूर्वी महासंघावर तिचे पुनरागमन रोखण्याचे आरोप केले होते आणि माजी अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या विरोधात लैंगिक शोषणाची तक्रार करणाऱ्या सहा कुस्तीपटूंमध्ये ती एक आहे.

पुढे काय...

- विनेश फोगटला आता नियमानुसार चौदा दिवसांत नोटिशीला उत्तर द्यावे लागेल आणि सर्व आरोपांचे लेखी स्पष्टीकरण करावे लागणार आहे. या उत्तरांवर समाधान वाटल्यास महासंघ कारवाई मागे घेऊ शकतो.
- विनेशच्या उत्तराने समाधान न झाल्यास महासंघ हे प्रकरण आपल्या शिस्तपालन समितीकडे पाठवेल. तेथे दोन्ही बाजू ऐकून अंतिम निर्णय घेण्यात येईल.
- महासंघाच्या निर्णयाविरुद्ध विनेशकडे भारतीय क्रीडा लवादाकडे किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर 'यूडब्ल्यूडब्ल्यू'च्या नियमांबाबत स्वित्झर्लंड येथील जागतिक क्रीडा न्यायालयाकडे दाद मागू शकते
- विनेशला महासंघ आकसापोटी कारवाई करत आहे असे वाटल्यास ती उच्च न्यायालयात याचिका दाखल करू शकते.

काय असतो सहा महिन्यांचा नोटीस कालावधी?

- एखाद्या आंतरराष्ट्रीय कुस्तीगिरास आपली निवृत्ती मागे घ्यायची असेल आणि आंतरराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय स्पर्धात्मक स्तरावर उतरायचे असेल, तर त्यापूर्वी स्पर्धा सुरू होण्याच्या सहा महिने आधी 'यूडब्ल्यूडब्ल्यू'ला लेखी कळवणे आवश्यक असते.
- या सहा महिन्यांच्या कालावधीत कुस्तीगिरास सरावाबरोबरच उत्तेजक चाचणीसाठी उपलब्ध राहण्यासाठी आपला ठावठिकाणा कळवणे आवश्यक असते.
- विनेशने डिसेंबर २०२५ मध्ये निवृत्तीचा निर्णय मागे घेताना या संबंधातील सर्व कार्यवाही पूर्ण केली असली, तरी त्याला सहा महिने झाले नसल्यामुळे तिला तोवर कुठल्याही स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. तिच्यासाठी जूनपर्यंतचा हा प्रतीक्षा काळ राहील.



विनेशची लढत राहण्याची तयारी

'डब्ल्यूएफआय'ने बजावलेल्या कारणे दाखवा नोटिशीनंतर कुस्तीगीर विनेश फोगटने सगळी परिस्थिती कमालीच्या संयमाने घेतली असून, 'एक्स' द्वारे तिने आपले म्हणणे मांडले आहे. काही झाले तरी आपण लढा लढत राहणार आहोत असे सांगताना विनेशने या वेळी थेट कायदेशीर भाषेचा नव्हे तर, कवितेचा आधार घेतला आहे. "जीवन एका खोल भोवऱ्यात अडकले आहे. जग माझ्या चारित्र्यात दोष शोधत आहे... आयुष्याने तुझे डोके नेहमी ताठ ठेवले आहे. कोणत्याही तलवारीमध्ये ते वाकवण्याची ताकद नाही !" या कवितेच्या ओळीतून विनेशने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

विजयासह गुजरात दुसऱ्या स्थानी



जयपूर : शुभमन गिलच्या (४४ चेंडूत ८४) शानदार फलंदाजीनंतर रशीद खान (४/३३) आणि जेसन होल्डरच्या (३/१२) गोलंदाजीने गुजरात टायटन्सने शनिवारी झालेल्या 'आयपीएल' सामन्यात राजस्थान रॉयल्सचा ७७ धावांनी पराभव केला. सलग चौथ्या विजयासह गुजरातने आता पाचव्या क्रमांकावरुन थेट दुसऱ्या स्थानावर झेप घेतली.

प्रथम फलंदाजी करताना शुभमन गिलने आपल्या डावाच्या सुरुवातीला डाव्या पायाला बसलेल्या धक्क्यावर मात करत शानदार खेळी केली. साई सुदर्शनच्या (५५ धावा) साथीने त्याने रचलेल्या ११८ धावांच्या सलामीमुळे गुजरातने राजस्थानसमोर ४ बाद २२९ धावांचे आव्हानात्मक लक्ष्य ठेवले. गिलच्या या खेळीत नऊ चौकार आणि तीन षटकारांचा समावेश होता. डावाच्या अखेरच्या षटकांत राहुल तेवातिया (नाबाद १४) आणि वॉशिंग्टन सुंदर (नाबाद ३७) यांनी तुषार देशपांडेच्या गोलंदाजीचा समाचार घेत तीन षटकारांसह २१ धावा कुटल्या.

आव्हानाचा पाठलाग करताना वैभव सूर्यवंशी (३६) आणि रवींद्र जडेजा (३८) वगळता त्यांचा एकही फलंदाज खेळपट्टीवर टिकू शकला नाही. त्यामुळे राजस्थानचा डाव १६.३ षटकांत १५२ धावांत संपुष्टात आला.

आजचे 'आयपीएल' सामने

चेन्नई सुपर किंग्ज वि. लखनऊ सुपर जायंट्स
- वेळ : दुपारी ३.३० वा.

रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु वि. मुंबई इंडियन्स
- वेळ : सायं. ७.३० वा.

- थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.

तिरंदाज साहिल जाधवला कांस्यपदक

पीटीआय, शांघाय

जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता साहिल जाधव याने शनिवारी झालेल्या दुसऱ्या टप्प्यातील तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत पुरुष गटातील कम्पाउंड प्रकारात कांस्यपदक पटकावले. आपल्या केवळ दुसऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळणाऱ्या साताऱ्याच्या २५ वर्षीय साहिलने मिळवलेले हे पहिलेच विश्वचषक पदक आहे.

कांस्यपदकासाठी झालेल्या लढतीत साहिलने डेन्मार्कच्या अनुभवी मार्टिन डॅम्सबो याचा १४७-१४४ असा पराभव केला. सुरुवातीला साहिल एका गुणाने पिछाडीवर होता. डेन्मार्कच्या ४० वर्षीय डॅम्सबोने पहिल्या फेरीत कमालीची अचूकता राखली होती. मात्र, दुसऱ्या फेरीत साहिलने जबरदस्त पुनरागमन तशीच अचूकता दाखवून दिली. पहिल्या फेरीतील पिछाडी भरून काढत साहिलने दुसऱ्या फेरीत ५९-५७ अशी आघाडी घेतली आणि ती



शेवटपर्यंत कायम राखली.

कांस्यपदकापर्यंतच्या प्रवासात साहिलने प्रथम अभिषेक वर्मा, नंतर उपांत्यपूर्व फेरीत माजी जागतिक विजेता ऑस्ट्रियाच्या निको विनर याच्यावर मात केली. मात्र, उपांत्य फेरीत साहिलची झुंज फ्रान्सच्या निकोलस गिरार्डविरुद्ध अवघ्या एका गुणाने कमी पडली होती.

या दुसऱ्या टप्प्यातील स्पर्धेत कम्पाउंड प्रकारात भारताचे हे एकमेव पदक ठरले आहे. एरव्ही या प्रकारात वर्चस्व गाजवणाऱ्या भारतीय संघातील इतर खेळाडूंना आणि संघाना या वेळी पदकापर्यंत पोहोचता आले नाही. आता भारताच्या नजरा रविवारच्या रिकर्व्ह प्रकारातील लढतींकडे आहेत, जिथे महिला संघ सुवर्णपदकासाठी खेळणार आहे.

आनंद तर नक्कीच आहे - साहिल

दुसऱ्या विश्वचषक स्पर्धेत कांस्यपदक मिळविल्यानंतर साहिलशी संपर्क साधला असता, त्याने कांस्यपदकाचा आणि भारताचा एकमेव पदक विजेता असल्याचा आनंद तर आहेच, पण सांघिक अपयशाची आणि अंतिम फेरी खेळू न शकल्याची खंतदेखील वाटते असे सांगितले. ''पहिल्या टप्प्यातील स्पर्धेत आंतरराष्ट्रीय पदार्पण करताना काही चुका झाल्या, त्या या वेळी सुधारल्या. त्याचा फायदा झाला. अंतिम फेरी खेळण्याची खूप इच्छा होती. पण, त्या एका क्षणी काय झाले कळले नाही. चूक झाली. पण, ते अपयश धरून बसलो नाही. नाही, तर माझ्या कांस्यपदकाच्या लढतीवर परिणाम झाला असता. त्यामुळे अपयश विसरून नेटाने सराव केला आणि पहिले पदक मिळविले,'' असे साहिल म्हणाला.

ग्रँडमास्टर अभिजीत गुप्ताची क्रीडा मंत्रालयाकडे धाव

'एआयसीएफ'कडून थकीत बक्षीस रकमेचे आश्वासन

नवी दिल्ली : भारताचा ग्रँडमास्टर अभिजीत गुप्ताने या वर्षाच्या सुरुवातीला जिंकलेल्या ओडिशा खुल्या स्पर्धेच्या विजेतेपदाची पारितोषिक रक्कम अद्याप न मिळाल्यामुळे संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणी त्याने क्रीडा मंत्रालयाकडे हस्तक्षेप करण्याची मागणी केल्यानंतर, अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाने (एआयसीएफ) हा प्रश्न मार्गी लावण्याचे आणि थकीत रक्कम देण्यासाठी आवश्यक कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

विजेतेपद मिळवून चार महिने उलटले तरी पैसे मिळाले नाहीत. महासंघाला वारंवार पत्रे लिहूनही प्रतिसाद न मिळाल्याने अखेर क्रीडा मंत्रालयाकडे दाद मागावी लागली, असे अभिजीत गुप्ता म्हणाला.

काय आहे नेमके प्रकरण

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ओडिशा संघटनेने या स्पर्धेचे आयोजन केले होते, त्यांच्यामध्ये अंतर्गत वाद सुरू आहेत. या वादामुळे त्यांचे बँक खाते गोठवण्यात आले असून, आयोजकांना खेळाडूंची देणी देता आलेली नाहीत.अभिजीत गुप्ताने 'एक्स'वरून क्रीडा मंत्रालयाला या विषयात लक्ष घालण्याची आणि खेळाडूंना त्यांच्या हक्काची बक्षीस रक्कम मिळण्यासाठी लक्ष घालण्याचे आवाहन केले होते.जानेवारीत जिंकलेल्या या स्पर्धेचे ५.५ लाख रुपये येणे बाकी असल्याचे अभिजीतने सांगितले.

यशस्वी, शफालीकडून नियमाचे उल्लंघन

नवी दिल्ली : भारतीय क्रिकेटपटू यशस्वी जैस्वाल आणि शफाली वर्मा यांना राष्ट्रीय उत्तेजक द्रव्य विरोधी संस्थेने (नाडा) उत्तेजक चाचणी चुकविल्याबद्दल नोटीस बजावली आहे. चाचणीसाठी उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्यावर ठावठिकाणा नियमाच्या पहिल्या उल्लंघनाचा ठपका ठेवण्यात आला आहे.

हे दोन्ही क्रिकेटपटू चाचणीसाठी 'नाडा'च्या नोंदणी असलेल्या खेळाडूंच्या यादीत समाविष्ट आहेत. दोन्ही क्रिकेटपटूंनी चाचणी चुकवण्याचे कारण स्पष्ट न केल्यामुळे ही नोटीस पाठवण्यात आली आहे. त्याची माहिती 'बीसीसीआय' आणि 'आयसीसी' यांना देण्यात आली आहे, असे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.



Sakshi COMMUNICATION

हे पत्र **मुद्रक आणि प्रकाशक विरेंद्र विद्याधर रानडे** यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकमत, प्लॉट नं. १९२, २०७ & २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक -२२३०४२१, २२३६८९७, फॅक्स क्रमांक २२३६९८६. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई- ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स-२२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी- ०२०-६७२४१०००, फॅक्स- ०२०६७२४११४७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : देवेंद्र गावंडे*** (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R Loksatta, RNI. No. MAHMAR/2006/18851. © दि. इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.



लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

लोकरंग

आपल्या प्रतिक्रिया व सूचना देण्यासाठी lokrang@expressindia.com ▮ WWW.LOKSATTA.COM ▮ रविवार, १० मे २०२६

निसर्ग कसा अनुभवावा याची संपूर्णतः भिन्न दृष्टी आधुनिक जगाला देणारा एक वटवृक्ष नुकताच (८ मे) १०० वर्षांचा झाला. निसर्गाची जी अद्भुतता त्यांनी स्वतः अनुभवली ती लाखो-करोडो लोकांपर्यंत पोहोचावी या विचाराने अक्षरशः झपाटलेलं सर डेव्हिड ॲटनबरो (किंवा ॲटंब्रह?) हे व्यक्तिमत्त्व आपल्यासोबत आहे याचा दिलासा वाटतो ते त्यांनी करून ठेवलेल्या भव्य कामामुळे. पृथ्वीतलावर इतक्या विविध प्रदेशांत, जंगलांत, सागरांच्या तळाशी, सूक्ष्मपासून अवाढव्य प्राण्यांपर्यंत, जिवंत ते नामशेष झालेल्या जीवांपर्यंत, जमिनीखालच्या बुरशीपासून गगनचुंबी वृक्षांच्या अधिवासात संचार करत, त्यांचा वैज्ञानिक अभ्यास, चित्रीकरण आणि नेत्रदीपक सादरीकरण करणारा तो बहुधा एकमेव निसर्गयात्री असावा...

निसर्गयात्री

अंजली चिपलकट्टी

"जगात किती प्रकारचे जीव आहेत हे कोणालाच (अजूनही) माहीत नाही, तुम्ही कुठेही जा, बघावं तिकडे जीवन आहे,''असं बोलत इंडोनेशियाच्या जंगलात चालता चालता प्रेक्षकांशी गप्पा मारणाऱ्या डेव्हिड ॲटनबरो या २६ वर्षांच्या तरुणाने त्यानंतरच्या ७४ वर्षांत या 'जीवन'-वैविध्यातील सुंदरतेला चित्रित केलं आणि हजारांहून अधिक निसर्ग माहितीपट बनवले. जगभरातल्या ५० कोटींपेक्षा जास्त लोकांनी ते पाहिले आहेत.

चित्रपटात रस असणाऱ्या बहुतांश लोकांना १९२२मध्ये बनवलेला 'नानूक ऑफ दि नॉर्थ' हा माहितीपट आवर्जून माहीत असतो. उत्तर ध्रुवीय प्रदेशात चित्रित केलेली आणि फिक्शन इतकीच खिळवून ठेवणारी ही जगातली पहिलीच निसर्गविषयक फिल्म (खरं तर डॉक्युड्रामा) होती. असं म्हणतात की, या फिल्मने निसर्ग कसा टिपावा याचे सौंदर्यशास्त्रीय मापदंड घडवले. पण ही फिल्म केवळ पूर्ण सत्यावर आधारित नव्हती तर ती 'घडवली' गेली (staged) म्हणूनच याला डॉक्युड्रामा असं म्हटलं गेलं. ॲटनबरो यांची खासियत अशी की त्यांनी हे सौंदर्यशास्त्रीय मापदंड आणि 'स्टोरी-टेलिंग'चा बाज आणखीन पुढच्या टप्प्यावर तर नेलेच, पण प्रेक्षकांना प्रत्यक्ष फिल्डवर नेऊन वैज्ञानिक निरीक्षणावर आधारित निसर्गाची गोष्ट सांगण्याची नवीन शैली विकसित केली. 'नॅचरल हिस्टरी' हा वेगळा फिल्म-प्रकार (genre) त्यांच्यामुळे जगभरात प्रसिद्ध पावला असं नक्की म्हणता येईल.

लहानपणापासून जीवाश्म जमवण्याचा ध्यास असलेल्या या माणसाने निसर्गवाचन सुरू करून ९० वर्षं लोटलीत. या काळात झालेल्या पर्यावरणीय ऱ्हासाचे ते प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. जीवाष्म जितकं प्राचीन, तितकं काळरेषेवर मागे जात आपण जणू त्या काळच्या पृथ्वीला स्पर्श करत आहोत, अशी खोल जाणीव अगदी लहानपणापासून असल्याचं त्यांनी नमूद केलं आहे.

१९५२मध्ये टेलिव्हिजन हे माध्यम अवतरून अवघी १० वर्षं झाली होती. तिथं दर्जेदार आशय देता यावा म्हणून धडपडणाऱ्या लोकांचा तो काळ होता. तेव्हा वयाच्या २५-२६व्या वर्षी डेव्हिडने बीबीसीतर्फे 'ॲनिमल डिसगाईज' आणि 'झू क्वेस्ट'सारख्या मालिका तयार केल्या. इंडोनेशिया, पॅराग्वाय, गियाना इथल्या जंगलांतून निर्भयपणे भ्रमंती करणारा खाकी कपड्यातला हा तरुण तिथल्या प्राण्यांशी समादराने वागतो यातला अस्सलपणा आणि त्याचं 'कॅन्डीड' चित्रीकरण प्रेक्षकांना भावलं. आपण जे करू बघतोय त्याला अभ्यासाची जोड हवी याची जाणीव होऊन डेव्हिड पुन्हा विद्यापीठात जाऊन सोशल ॲंथ्रोपॉलॉजी शिकला. नंतरच्या १० वर्षांत बीबीसीचा नियंत्रक आणि संचालक या पदावरून ब्रिटिश कला आणि संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या 'सिव्हिलायझेशन', 'द एसेन्ट ऑफ मॅन' आणि 'फ्लाइंग सर्कस' अशा विविध मालिका त्याने कल्पनेतून प्रत्यक्षात उतरवल्या. हे मोठंच काम होतं. याच काळात ब्रिटनमध्ये रंगीत टीव्हीचं आगमन झालं. इतक्या जोमदार कामानंतरही डेव्हिडची आतली अस्वस्थता वाढत गेली, कारण निसर्ग आणि जीवसृष्टीविषयी वाटणारी उत्कट ओढ! संचालकपद सोडून त्यानं स्वतःच्या आवडीला प्राधान्य द्यायचा निर्णय घेतला आणि 'लाईफ ऑन अर्थ'सारखं उत्तुंग काम उभं राहिलं.

'लाईफ ऑफ...' या मालिका चढत्या क्रमाने यशस्वी होत गेल्या. लाईफ ऑफ बर्ड्स मॅमल्स सोबत लिव्हिंग प्लॅनेट, ट्रायल्स ऑफ लाईफ, सॉंग ऑफ द अर्थ, सिक्रेट लाईफ ऑफ प्लांट्स, प्लॅनेट अर्थ... यादी मोठी आहे... प्रचंड गाजल्या.

साधारण २००० सालानंतर ॲटनबरो यांच्या निसर्ग कसा 'दाखवावा' याविषयीच्या भूमिकेत बदल झालेला दिसला. तोपर्यंत निसर्गाचं नयनरम्य, निर्मळ, डोळे दिपवणारं सौंदर्य, विविध जीवांच्या जादूई करामती दाखवण्यावर पूर्ण भर होता. 'स्टेट ऑफ द प्लॅनेट' आणि 'द ब्लू प्लॅनेट' या मालिकांमध्ये प्रथमच त्यांनी समुद्रात तरंगणारा प्लास्टिकचा कचरा, मानवनिर्मित प्रदूषण कॅमेऱ्यात टिपलं. माणूस निसर्गाचा ऱ्हास करतोय आणि यामुळे पुढ्यात आलेल्या जागतिक तापमानवाढीच्या संकटावर त्यांनी उघडपणे आपली भूमिका मालिकांमध्ये मांडायला सुरुवात केली.

जैवविविधता, त्याच्या संवर्धनाची गरज आणि उत्क्रांतीची वैज्ञानिक समज याबाबत लोकांमध्ये जागरूकता येण्यासाठी त्यांनी केलेल्या अफाट योगदानाचा सन्मान म्हणून वैज्ञानिक समुदायाने ४० हून अधिक प्रजातींना त्यांचे नाव दिलंय. यात फुलपाखरू, सरपटी प्राणी, घटपर्णी यांच्या नव्याने माहीत झालेल्या प्रजाती अशी विविधता आहे आणि वर्तमानातल्या आणि लाखो वर्षांपूर्वी नामशेष झालेल्या प्रजातींचाही समावेश आहे. जीवाश्मांच्या रूपात पृथ्वीच्या भूतकाळाशी स्वतःला जोडू पाहणाऱ्या या माणसाला ही खरी मानवंदना म्हणावी लागेल.

वाढत्या चॅनेलच्या गर्दीत दर्जेदार काही बघायला मिळणं दुरापास्त झालेल्या काळात आपण जगत आहोत. 'ॲड्रनलिन' आणि 'डोपामिन रश'च्या तावडीत सापडलेल्या नव्या-जुन्या पिढीला कधीही ॲटनबरो यांची कुठलीही फिल्म ताळ्यावर आणण्यासाठी, विचारप्रवृत्त होण्यासाठी उपयोगी ठरते.

मला व्यक्तिशः सगळ्यात आवडणाऱ्या त्यांच्या काही महत्त्वाच्या शैली सांगायला हव्यात. प्रेक्षकांना आपल्या इतकंच शहाणं समजून (non-condescending) लिहिलेली स्क्रिप्ट आणि हितगुज केल्यासारखं निवेदन. जे समोर दिसतंय त्याचं उगीचच वर्णन न करणं, शांतपणे चाललेल्या निसर्गातला नित्यक्रम दाखवताना मौन बाळगत प्रेक्षकांना स्पेस देणं यातून हे दिसतं.

चौकस बुद्धीने काही तपास चाललाय असे चढत्या उत्सुकतेचे घटनाक्रम, सहज शब्दांत केलेलं स्थानिक प्रदेशाचं, तिथल्या अधिवासाचं रसपूर्ण वर्णन, मग अचानक समोर येणारा चित्तथरारक प्रसंग... आता पुढे काय होणार असं श्वास रोखून धरायला लावणारे शॉट्स आणि त्याला साजेसं कथन यामुळे प्रेक्षक भावनिकरीत्या त्या अधिवासाचा भाग बनतो, अगदी चांगल्या फिक्शनमध्ये घडतं तसंच. त्या पर्यावरणात घडणारा संघर्ष, सलोखा आणि सहकार्य यातल्या नाट्यमयतेचा गोष्ट सांगण्यासाठी केलेला चपखल उपयोग प्रेक्षकांना खिळवून ठेवतो, निसर्गाची विशालता आणि खोली याबद्दल आदर उत्पन्न करतो. बहुतेक सर्व फिल्मचं निवेदन ते स्वतःच लिहितात. जीवसृष्टीचा, मानव-विज्ञानाचा आणि उत्क्रांतीचा नीट अभ्यास करून लिहिलेली, मोजक्या शब्दांची चोख संहिता, शांत लयीत, खेळकर आवाजात प्रेक्षकांशी गप्पा मारल्यासारखं बोलणं, आवाजातले चपखल चढ-उतार, विशिष्ट शब्दांवर दिलेला जोर किंवा पॉझ हे त्यांच्या निवेदनाची वैशिष्ट्यं निसर्गातलं नाट्य रसरशीतपणे समोर मांडतात. मेंदूच्या 'कॉग्निशन'ला

पान २ वर


महत्त्वाचे काही...

- प्राणी, दगड, जीवाश्म गोळा करण्याचा लहान वयात छंद.
- भूगर्भ आणि प्राणीशास्त्रात पदवीनंतर बीबीसी रेडिओत नोकरीसाठी प्रयत्न.
- तेथून नाकारल्यानंतर बीबीसी टीव्ही कंपनीत संधी.
- ब्रिटनमध्ये कलर टीव्ही सुरू करण्यात पुढाकार.
- 'द लाईफ ऑफ बर्ड्स' या माहितीपटासाठी २,५६,००० मैलांचा प्रवास.
- पृथ्वीला १० वेळा प्रदक्षिणेइतकी तीन वर्षे सर्वच खंडांमध्ये भ्रमंती.
- ब्रिटिश ॲकॅडमीकडून (बाफ्टा) आठ वेळा सन्मान.
- कृष्णधवल, रंगीत, एचडी, थ्रीडी आणि फोर के या बदलत्या तंत्रज्ञानातील कामासाठी पुरस्कार मिळविणारी जगातील एकमेव व्यक्ती.





पितांबरी® टूर्स आणि ट्रॅव्हल्स
जगभर फिरा, आपुलकी अनुभवा
भारतातील अद्वितीय ठिकाणांची सफर!



स्टॅच्यू ऑफ युनिटी आणि वडोदरा
मुंबई ते मुंबई, पुणे ते पुणे
(बाय रोड)
३ रात्री/४ दिवस
MAY- 27 to 30
JUNE- 10 to 13



महाबळेश्वर आणि वाई टूर
मुंबई ते मुंबई, पुणे ते पुणे
२ रात्री/३ दिवस
MAY- 29 to 31
JUNE- 26 to 28

अष्टविनायक दर्शन- २ रात्री/३ दिवस - मुंबई ते मुंबई (लवकरच पुण्यापासून सुरू)



MAY- 22 to 24 I JUNE- 10 to 12

श्री समर्थ रामदास स्थापित: ११ मारुती दर्शन - २ रात्री/३ दिवस - मुंबई ते मुंबई, पुणे ते पुणे



JUNE- 19 to 21 I JULY- 16 to 18

टूरमध्ये समाविष्ट: •एसी बस / गाडीमधून प्रवास व पर्यटन स्थळांची सफर •प्रिमियम हॉटेलमध्ये निवास •जेवणाची उत्तम सोय •गाईड व एन्ट्री तिकिटे

त्वरा करा! आजच आपली सीट बुक करा!

बुकिंग व अधिक माहितीसाठी संपर्क:
8657307352, 8657968481, 8657968479,
8828313131, 9702963400

पितांबरी टूर गाईड नेहमी तुमच्या सोबत.

Images are for illustration purposes only. Image Source : Google

शिवसृष्टी
आशियातील एकमेव ऐतिहासिक संकल्पना उद्यान
Abhay Bhutada FOUNDATION LET'S MAKE A DIFFERENCE

महिलांसाठी आणि १८ वर्षाखालील विद्यार्थ्यांसाठी मोफत प्रवेश देत आहे.

सर्वांसाठी VIDEO CONTEST
REGISTRATION : 10 मे पासून सुरू होत आहे.

शिवसृष्टीचा उत्कृष्ट व्हिडिओ तयार करा आणि आम्हाला पाठवा.

विजेत्या स्पर्धकांसाठी आकर्षक बक्षिसे



आणि इतर लक्झरी बक्षिसे

स्पर्धेत नोंदणी करण्यासाठी
या QR स्कॅन करून Google Form भरून सबमिट करा
shivsrusthi.com
वरती आपला स्लॉट आत्ताच बुक करा.
01 मे ते 27 जून 2026 पर्यंत
FOLLOW US ON
shivsrusthi.ambegaon.pune

शादी, उत्सव या त्योंहार ...
लिज्जत पापड हो हरबार ...
तिच गुणवत्ता
तोच स्वाद
आता नवीन
पॅक मध्ये



कुरकुरम् कुरकुरम्...
कुरकुरम् कुरकुरम्...

लिज्जत पापड
लिज्जत परिवाराचे दर्जेदार उत्पादन
सात स्वादिष्ट प्रकारा मध्ये उपलब्ध
•उडीद •उडीद स्पेशल •मुग •मुग स्पेशल
•लसूण •मिरची •पंजाबी स्पेशल

श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड
(खादी आणि ग्रामोद्योग आयोग द्वारा मान्य)
Website : www.lijjat.com ◆ Email : enquiry@lijjat.com



जादूई दिवस

■ अरुंधती देवस्थळे

भारतीय इंग्रजी प्रकाशनाचे तीन शिल्पकार

गुणवत्तेचं साहित्य परदेशांतून आणून, भारतीय किमतीत त्यांच्या आवृत्त्या काढून, देशभर पोहोचवण्यात आणि इंग्रजीमध्ये लिहिलं जाणारं कसदार भारतीय साहित्य अतिशय देखण्या स्वरूपात जगभरात पाठवण्यात 'पेंग्विन इंडिया'चं मोलाचं योगदान. पण तिथं हे सारं परिश्रमानं कुणी घडवलं?

कुठल्याही शहरातलं गणतीत घेण्याजोगं पुस्तकांचं दुकान वा वाचनालय डोळ्यासमोर आणून बघा, त्याच्या शेल्फवर नारिंगी, लालसर स्पाईन आणि त्यावर श्वेतश्यामल पेंग्विनचा लोगो असलेली पुस्तकं दिसतातच! देशाच्या उभ्या-आडव्या वैचारिक महावस्त्रात पुस्तकांचाही धागा जोडण्याची अद्भुत किमया घडवून आणणारे 'पेंग्विन इंडिया' चे शिल्पकार सुहृदांमध्ये असावेत हे माझ्यासारख्या किताबी किड्याचं भाग्यच!

१९८७ मध्ये पेंग्विन इंडियाच्या स्थापनेची अधिकृत बातमी आली आणि देशभर एक ताज्या उत्साहाची लहर पसरली. पेंग्विनचे जागतिक प्रमुख पीटर मेयर यांनी भारतासाठी निवडलेल्या टीममध्ये उच्चस्थानी एक त्रिमूर्ती होती. सुप्रसिद्ध लेखक पत्रकार खुशवंत सिंग, आधीपासूनच पेंग्विनचे भारतीय उपखंडातील वितरण सांभाळणारे महारथी झमीर अन्सारी आणि पेंग्विन इंडियाचे पहिले कर्मचारी तरुण पत्रकार, संपादक डेव्हिड देविदार या त्रयीने आपली टीम बांधून पेंग्विन इंडियाच्या यशासाठी, मजबूत पायाभरणीसाठी जे काही केलंय ते आता आठवताना ऊर अभिमानानं भरून येतो. जागतिक गुणवत्तेचं साहित्य परदेशांतून आणून, भारतीय किमतीत त्यांच्या आवृत्त्या काढून, देशभर पोहोचवलं आणि इंग्रजीमध्ये लिहिलं जाणारं कसदार भारतीय साहित्य अतिशय देखण्या स्वरूपात आंतरराष्ट्रीय पातळीवर नेलं. या सुरुवातीच्या परिश्रमांनी पेंग्विन इंडियाची मुळं देशात घट्ट रोवली गेलीच, पण भारतीय लेखकांना केवळ लेखनाच्या गुणवत्तेच्या जोरावर, साक्षेपी संपादकीय मार्गदर्शन मिळालं आणि सुरुचिपूर्ण रूपांत बाहेर येणारं पुस्तक देशभरच नव्हे, तर परदेशीही पोहोचण्याची संधी! या हाडाच्या पुस्तकप्रेमी त्रयीने प्रकाशनार्थ निवडलेले लेखक पुढे नोबेल, पुलित्झर, बुकर यांसारखे मानसन्मान कमावणारे ठरले. देशांतही क्रॉसवर्ड, साहित्य अकादेमीच नव्हे, तर राज्य पातळीवरले विविध पुरस्कार जिंकणारे ठरले. त्यांचे जागतिक भाषांत अनुवाद झाले आणि भारतीय इंग्रजी साहित्याचं सुवर्णयुग सुरू झालं. मागे वळून बघायची वेळ आलीच नाही आणि 'पब्लिशिंग इज अ जंटलमन्स प्रोफेशन' याचं उदाहरण निर्माण झालं.

माझं सुदैव की या तिघांबरोबर कामाची संधी मिळाली आणि त्यांच्यातलं माणूसपण अनुभवायला मिळालं. खुशवंत सिंगांवर वेगळं लिहिणार आहे, आत्ता झमीर भाई आणि डेव्हिडबद्दल. पेंग्विन इंडियाआधी १५ वर्षं पेंग्विनचं भारतीय उपखंडातील वितरण उंचे -पुरे झमीरभाई अत्यंत समर्थपणे सांभाळत होते. कामाला वाघ, पुस्तकं आणि माणसं दोघांचाही शौक, भारतभरच नव्हे तर जगभर मित्रांचं जाळं. फ्रँकफर्ट किंवा लंडन पुस्तक मेळ्यात फिरताना ते अगदी खुशीत दिसत- होम ग्राऊंडवर खेळणाऱ्या खेळाडूसारखे. दिवस अपॉईंटमेंट्सनी भरलेले आणि संध्याकाळच्या पार्ट्या. मद्य जाणकाराच्या आस्वादाने घेणारे. अतिशय स्पष्ट आणि स्वच्छ व्यवहार, इंग्रजी तसेच उर्दू साहित्याचा दांडगा व्यासंग आणि अतिशय मोठं मन! पेंग्विनचीच नव्हे तर ब्लूम्सबरी, रँडम हाऊस, हार्पर कॉलिन्सची पुस्तकं विकत घेऊन मित्रमैत्रिणींना वाटणं. अधिकार आहे म्हणून कधी कोणाला फुकट पुस्तकं देत नसत. पेंग्विन इंडियात काम करणाऱ्या पोरीबाळींचा घरातल्या ज्येष्ठावर असावा तसा त्यांच्यावर जीव. पुढे झमीरभाई अरविंदच्या मैत्रीमुळे स्कोलॅस्टिक इंडियात आले. लवकरच त्यांच्या अतिशय लोभस पत्नी कमर आमच्या भाभी बनल्या आणि मग फक्त कार्यालयात एकदिलाने काम करणारे सहयोगी नव्हे, तर आम्ही चौघे घट्ट मित्र बनलो. अनेकदा त्यांच्याकडे झाकीर बागमध्ये किंवा आमच्याकडे गुडगांवमध्ये जेवणं होत. त्यांचं पुस्तकांचं कलेक्शन राजधानीतल्या सोली सोराबजी आणि नटवर सिंग या नामवंत पुस्तकप्रेमींपेक्षा मोठं होतं. माझा त्याच्यावर कायम डोळा असायचा. ते कमर भाभींना म्हणायचे, ''सुदैवाने हिला उर्दू वाचता येत नाही म्हणून आपली ती तरी पुस्तकं सुखरूप आहेत.'' स्कोलॅस्टिकची वर्षं जशी व्यावसायिक आव्हानं आणि विजय यांनी रंगलेली, तशीच या दोघांच्या आणि आमच्या कॉमन मित्रमैत्रिणींच्या अथांग स्नेहाने भरलेली. झमीरभाईंची ऑस्ट्रेलियात आणि दुबईमध्ये असलेली दोन्ही मुलंही आमच्या घरची झाली. ऑस्ट्रेलियात पुस्तक व्यवसायात असलेल्या टुटूबरोबरही ऑस्ट्रेलियन पुस्तकांच्या लायसनिंगचे सहयोग केले, जे उभयपक्षी फायद्याचे ठरले. बोलणी


डेव्हिड देविदार


झमीर अन्सारी

करताना मात्र झमीरभाई निश्चून तिथे थांबत नसत, त्यांचा सपोर्ट असलाच तर तो स्कोलॅस्टिक आणि मला असे.

एकदा अरविंद आणि झमीर भाईंना एका बिझनेस लंचसाठी मौर्या शेरेटनच्या बुखारामध्ये जायचं होतं. हे ठिकाण माझ्या आवडीचं. पण मला आमंत्रण नव्हतं. मला त्याचं काही वाईट वगैरे मुळीचंच नव्हतं वाटलं. पण झमीरभाईंना माझ्याशिवाय तिथे जायला उगीचच अवघडल्यासारखं वाटत होतं. येताना ते तिथल्या बुकशॉपमधून माझ्यासाठी 'पातशहानामा'ची अतिशयच सुंदर प्रत, (कलेक्टर्स आयटम) घेऊन आले होते. ती मी एखाद्या अलंकारासारखी सांभाळून ठेवली आहे. त्यांनी भेट दिलेल्या पुस्तकांची गणती मी विसरले आहे. झमीरभाईंनी माझं उर्दू शायरीवरील प्रेम मीरनी समृद्ध केलं. लंडन, आमच्या मर्मबंधातली ठेव! कबीर, हुसेनसाब, स्टेफी ग्राफ, फेडरर, पिकासो आणि फ्रिडा काहलो हेही!

अल्पशा आजारानं कमर भाभी गेल्या आणि झमीरभाईंच्या आयुष्याची रयाच गेल्यासारखं झालं. अतिशय प्रेमळ मुला-नातवंडांनी त्यांना सावरण्याचा प्रयत्न केला. ऐंशीवर वय, प्रकृतीच्या अनेक तक्रारी होत्या म्हणून त्यांना दोघांकडे हवं तसं राहावं असं मुलांनी ठरवूनच टाकलं. भाईंना प्रवास आवडे, पण देशाबाहेर दीर्घ मुक्कामात ते तगमगत असत. मायदेशी निदान ८-१५ दिवस तरी परतण्याची संधी सोडत नसत. तुमच्याबरोबर मला पहाडांत घेऊन चला म्हणत. पण तीन वर्षांपूर्वी सगळंच संपलं... झमीरभाईंना डेव्हिडनं फार संयत, सुंदर श्रद्धांजली लिहिली होती. माझ्यावर ती वेळ येईल हे मी कधी कल्पिलं नव्हतं.


खुशवंत सिंग

डेव्हिड देविदार इतका उत्तम संपादक आणि अष्टपैलू प्रकाशक सीईओ अभावानेच पाहायला मिळतो. इंग्रजीत लिहिणाऱ्या गुणी भारतीयच नव्हे, तर काही जागतिक लेखकांसाठी ते एक वरदानच! जणूकाही जन्मजातच लाभलेलं भाषेवरचं प्रेम आणि असामान्य प्रभुत्व त्यांच्या सुरुवातीच्या पत्रकारितेतल्या लेखांमध्ये दिसत असे. खुशवंत सिंग, व्ही. एस. नायपॉल, रस्किन बॉन्ड, अरुंधती रॉय, झुम्पा लाहिरी, अमिताव घोष, देवदत्त पट्टनायक, विक्रम सेठ, अरविंद अडिगा, रामचंद्र गुहा, ए. पी. जे अब्दुल कलाम यांसारखे असंख्य लेखक त्यांनी पेंग्विनला मिळवून दिले. त्यांना मिळालेल्या आंतरराष्ट्रीय सन्मानांनी भारतीय लिखाणाकडे लोकांचं लक्ष वेधलं गेलं. इतकंच नव्हे तर टागोर, इस्मत चुगताई, मंटो, तस्लिमा नसरीन, अमृता प्रीतम यांसारख्या अनेक भारतीय उपखंडातल्या लेखकांचे इंग्रजीमध्ये दर्जेदार अनुवाद प्रसिद्ध करून, अतिशय देखण्या रूपात प्रकाशित करून त्यांना जागतिक स्तरावर उपलब्ध करून दिलं. अजोड कामगिरीइतकाच महत्त्वाचा त्यांचा विनय आणि निगर्वी, सुसंस्कृत वागणूक आहे. 'चांगल्या संपादकाचं कामच बोलतं' म्हणणारे डेव्हिड स्वतःबद्दल फार कमी आणि पुस्तकं वा लेखकांबद्दलच अधिक बोलतात. अमुक एका लेखकाला आपण कसं घडवलं, हिऱ्याला पैलू कसे पाडले याचे अनेक किस्से- कहाण्या या सुजाण जोहऱ्याच्या अनुभवांच्या कोशात असणार, पण त्या कधीही दुनियेसमोर स्वतःचं महत्त्व सिद्ध करायला, त्यांनी अगदी आडवळणानेही मांडलेल्या नाहीत.

पेंग्विन म्हणजे डेव्हिड असं समीकरण रूढ झालं होतं. ते गेलेच कधी सोडून तर त्यांची जागा घेणाऱ्याला बॅकलिस्टच इतकी ताकदीची मिळणार होती की पुनरावृत्त्यांच्या बळावर पुढली काही वर्षं विक्री व्यवस्थित चालणार होती, असं बोललं जायचं आणि ते खरंही ठरलं. २००४ मध्ये पेंग्विनने त्यांना वेगळ्या धावपट्टीवर खेळायला पाठवलं- कॅनडाचं नेतृत्व करायला. तिथे सहा वर्षं त्यांनी पेंग्विन इंटरनॅशनलचं नेतृत्व केलं. ही सगळी पदं केवळ गुणवत्ता आणि मेहनतीने कमावलेली. कॅनडाच्या इनिंगमध्ये डेव्हिड यांनी अमेरिकेचे खळबळजनक कादंबरीकार फिलीप रॉथ, खालेद हुसैनी, स्वीडनचे स्टिग लार्सन, नादिन गोर्डिमर, एलीस मन्रो, बेनझीर भुत्तोंची भाची फातिमा भुत्तो, झेडी स्मिथ, लंडनस्थित हिशम मटार, जोसेफ बॉयडन, जॉन रॅलस्टोन सॉल, जपानी कॅनेडियन पत्रकार, राजकारणी एड्रियन लुईस क्लार्कसनसारख्या बड्या नावांना आपल्या प्रकाशन यादीत आणलं होतं. वेगवेगळ्या संस्कृतीतले लेखक हेरून त्यांना आपल्यासाठी लिहायला जोडून घेणं हा त्यांचा हातखंडा! आम्ही पेंग्विनबरोबर कुमारांसाठी ७-८ पुस्तकांवर काम केलं, तोही सुखद अनुभव.

एकदा असं झालं की, आम्ही 'स्कोलॅस्टिक रायटिंग अवॉर्ड्सचा वार्षिक समारोह आयोजित केला होता, डेव्हिड प्रमुख पाहुणे. सहज-सुंदर वक्ता असणाऱ्या अरविंदला ऐनवेळी न्यू-यॉर्कला जावं लागलं. वक्तृत्व फारसं कधी जमलेलं नसल्यानं लेखक, चित्रकार, मुलं, शिक्षक आणि पालक बहुसंख्येत असणाऱ्या इंडिया इंटरनॅशनल सेंटरच्या गच्च भरलेल्या सभागृहांचं मला दडपणच आलं. मी डेव्हिडना बाजूला घेऊन तसं सांगितलं. 'काही नको घाबरूस' असं म्हणून फक्त ओळख करून देण्याचं काम माझ्यावर सोपवून, त्यांनी झमीरभाईंच्या साथीनं व्यासपीठाचा ताबा घेतला आणि 'पाहुणे' न राहता लेखकांचे, पुस्तकांचे किस्से सांगत मुलांशी मस्तच संवाद साधला. लेखन कसं करावं, काय वाचावं यावर टिप्स दिल्या. बालसाहित्य तसा डेव्हिड यांचा प्रांत नसूनही त्यांनी तो समारंभ एक सुंदर अनुभव करून टाकला.

केरळच्या पार्श्वभूमीवरली डेव्हिडची पहिलीच कादंबरी 'हाऊस ऑफ ब्लू मँगोज' आम्हा मूठभर मित्रांना त्यांनी प्रकाशित केलेल्या 'गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज'पेक्षा आवडलेली. त्यानंतरही त्यांनी दोन कादंबऱ्या लिहिल्या. भारतात परतून त्यांनी 'अलेफ बुक्स' नावाने प्रकाशन सुरू केलंय आणि पेंग्विनच्या जादूचा पुनर्प्रत्यय येऊ लागलाय. त्यांनी काढलेल्या पुस्तकांपैकी 'अ केस ऑफ इंडियन मार्व्हल्स' हा भारतीय कथांचा संग्रह संग्राह्य आहे. अनेक भारतीय भाषांतील लेखनाचे अनुवाद ते इंग्रजीमध्ये प्रसिद्ध करत आहेत. त्यांनी परममित्राकडून म्हणजे शशी थरूर यांच्याकडून लिहून घेतलेला लेखसंग्रह 'अ वंडरलँड ऑफ वर्डस्' तर भाषांवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकासाठी आनंदाचा ठेवाच. 'डेव्हिड देविदार इज द बेस्ट थिंग टू हॅपन टू पेंग्विन अँड टू इंडियन रायटिंग इन इंग्लिश' हे खुशवंत सिंगांचं मत सर्वांनाच पटण्यासारखं!

◆ arundhati.deosthale@gmail.com

निसर्गयात्री





▸ पान १ वरून / जागवण्याची अफाट ताकद या निसर्ग-पटांमध्ये आहे.

एक पोलर बेअरची मादी नराला कशी पळवतेय, मग चढावर त्याने दमून माघार घेतल्यावर तिचं त्याच्या मागे येणं, बर्फात लोळत त्याचं लक्ष वेधून घेणं हे समोर दिसतंय आणि त्यासोबत त्यांची माफक कॉमेंटरी यातून किती काय कळतं! वनस्पतींवर त्यांनी केलेले चित्रपट तर जादूई सफर घडवतात. आपल्या नजरेला कळणार नाही इतक्या हळू वेगाने हलणाऱ्या वनस्पतींची हालचाल टिपण्यासाठी आणि त्यातलं नाट्य समोर आणण्यासाठी त्यांनी किती क्लृप्त्या लढवल्या! त्यांच्या उत्क्रांतीचे टप्पे, परागीभवनाच्या क्रीडा, फुलांचे रंग, वास, पाझर सर्व एकत्र येऊन तुमची समज कुठल्याकुठे नेऊन ठेवतात.

वेगवेगळ्या अधिवासातले सूक्ष्मजीव-प्राणी-पक्षी-झाडं-झुडुपं, त्यांच्यातले नाजूक आणि गुंतागुंतीचे आंतरसंबंध याविषयी सांगताना त्याविषयीचा आदर आणि अचंबा सतत त्यांच्या कथनातून पाझरत असतो. आपणही याचा अविभाज्य भाग आहोत, आधुनिक माणसाने त्रयस्थ होऊन याकडे बघू नये अशी एक सुप्त कळकळ त्यातून पोचते.

ॲटनबरो यांनी कॅमेरा तंत्रज्ञानाचा किती सुयोग्य वापर केला याचे अगणित पुरावे माहितीपट बघताना दिसतात. त्यांनी समुद्राखालच्या जीवसृष्टीची जी अद्भुत सैर घडवली ती डोळे विस्फारणारी होती. वयाच्या नव्वदीत ते ग्रेट बॅरिअर रीफच्या समुद्रात पाणबुडीत नेऊन ठेवलं, त्यांनी निसर्गाचा आदर न राखल्याची खंत त्यांच्या मनात आहे.

विज्ञानावर 'प्रेम' करणाऱ्या त्यांच्या कामाचा लेखाजोखा घ्यायचा तर दुसरी बाजूही मांडायला हवी. ॲटनबरो यांच्या कामाची गंभीरपणे समीक्षा केलेल्या जॉर्ज मॉंबिओ हा इंग्लिश पर्यावरणवादी पत्रकार आणि जेरिन तान या सिंगापूरच्या प्रोफेसर या दोघांनी मांडलेल्या कैफियती पुरेशा प्रातिनिधिक आहेत. ज्या प्रकारे या फिल्म्स सुंदर



बसून १००० फूट खोलवर गेले आहेत. निसर्ग बघण्याचं अफाट वेड आणि ते लोकांपर्यंत पोचवण्याची तळमळ याशिवाय हे साध्य होणं अवघड. त्यांना अगणित पुरस्कार, सन्मान आणि विविध विद्यापीठांकडून मानद पदव्या मिळाल्या आहेत, प्रेक्षकांकडून भरभरून प्रेम मिळालं आहे. पण तरी इतक्या प्रयत्नांनंतर ज्या निसर्गाला आपण या आधुनिक माणसांसमोर विस्तीर्ण वनप्रदेश आणि जैववैविध्य दाखवतात, त्यामुळे जंगल परिसंस्था आणि वन्यजीव भरभराटीस येत आहेत असा विपुलतेचा आभास तयार होतो. प्रत्यक्षात संपूर्ण जग वेगाने होणाऱ्या पर्यावरणीय ऱ्हासाने ग्रस्त आहे हे सत्य या फिल्म्स मांडत नाहीत. निसर्गसौंदर्य भंग करणारं प्रदूषण, ऱ्हासाच्या खुणा दिसू नयेत म्हणून कॅमेराचा अँगल विशिष्ट प्रकारे 'ठरवून' लावावा लागतो.

पर्यावरणीय संकटाच्या काळात जणू 'सर्व आलबेल आहे' असा संदेश यातून सामान्यजनांना पोचला. फिरस्त्या ॲटनबरो यांना चोहोबाजूंनी चालू असलेल्या या पर्यावरणीय ऱ्हासाबद्दल माहीत असतानाही त्यांनी पहिली ५० वर्षं त्याबद्दल मौन बाळगलं. ही दशकं हवामान बदल नाकबूल करण्यात शक्तिशाली देशांच्या नेत्यांनी वाया घालवली आणि त्यावर तातडीने उपाय करण्याची शक्यता मावळली. या मौनाबद्दल विचारलं असता, पर्यावरण पडझडीबद्दल जर सतत भीती दाखवत राहिलो तर ते लोकांना कंटाळवाणं वाटेल असं त्यांनी आपल्या भूमिकेचं समर्थन केलं. मॉंबिओ बीबीसीत कार्यरत असताना हवामान बदलाचे परिणाम सक्रियपणे लोकांपर्यंत पोचवले पाहिजेत, ही त्यांची भूमिका सतत डावलली गेल्याचं सांगतात. याचा अर्थ हा केवळ अलिप्तपणा नव्हता तर हेतुपुरस्सर घेतलेला निर्णय होता. ॲटनबरो यांनी लोकांमध्ये जी विश्वासार्हता कमावली होती त्यातून हवामान बदलाबाबत जनमत ते घडवू शकले असते, म्हणून त्यांचे मौन हे जास्त हानीकारक ठरतं असं मॉंबिओ म्हणतात.

दुसरं असं की पर्यावरणीय संकटाबाबत थेटपणे भाष्य करण्यास सुरुवात केल्यानंतरही त्याचे विश्लेषण त्यांनी पद्धतशीरपणे अ-राजकीय राखलं. पर्यावरणाचे सर्वाधिक नुकसान करणाऱ्या व्यवस्था, उद्योग आणि राजकीय सत्ता याबाबत न बोलता, विनाशाची जबाबदारी 'सर्व मानवी समूहा'ची आहे अशी मांडणी केली- जी दिशाभूल करणारी आहे. 'आपण लोक', गरीब देशांतली वाढती लोकसंख्या आणि चीनमधल्या कारखान्यांमधून होणारं उत्सर्जन यांना जबाबदार धरण्यात आलं. चिनी कारखान्यातल्या बहुतांश वस्तू या इथल्याच पाश्चात्त्य लोकांसाठी बनत आहेत हे त्यात सांगितलं गेलं नाही. 'क्लायमेट चेंज - द फॅक्ट्स' (२०१९) या मालिकेमध्ये तेल कंपन्यांचा उल्लेख केवळ उपायाचा एक भाग म्हणून करण्यात आला- त्या कार्बन कॅप्चर तंत्रज्ञान कसे विकसित करत आहेत याचे वर्णन केले गेले. परंतु समस्या निर्माण करण्यात त्यांची मध्यवर्ती भूमिका, त्यांनी हवामान बदलाला दिलेला नकार, प्रदूषण रोखणाऱ्या धोरणांविरुद्ध त्यांचे सततचे लॉबिंग यावर कोणतेही भाष्य नव्हते. त्यांच्या मांडणीवर वसाहतवादी दृष्टीचा प्रभाव होता अशीही टीका झालीय. 'झू क्वेस्ट' मालिका ही मुळात पाश्चात्त्य प्राणिसंग्रहालयासाठी प्राण्यांचे नमुने मिळवण्याकरिता दक्षिण आशियायी प्रदेशांमधल्या सफरींचे चित्रीकरण आहे. पाश्चात्त्य प्रेक्षकांसमोरच्या प्रदर्शनासाठी जिवंत 'कच्चा माल' मिळण्याची ठिकाणं म्हणजे हे प्रदेश असं सूचन त्यात जाणवतं. शिवाय स्थानिक लोक फिल्ममधे कसे दिसले? तिथल्या पर्यावरणाचे जाणकार म्हणून नव्हे तर ते प्रासंगिक मार्ग दाखवणारे, पिछाडीला दुय्यमपणे वावरताना दिसतात. मूळ आदिवासी समूहांवर अनेक फिल्म करताना त्यांच्या जगण्याचं एक प्रकारे गौरवीकरण दिसतं, पण त्यात वसाहत काळातल्या त्यांच्या इतिहासाचा, त्यांचे जंगल अधिवास कसे नष्ट केले गेले याचा उल्लेख नसतोच. अनेकदा जंगलातल्या परिसंस्था दाखवताना तिथे शतकानुशतके राहणाऱ्या आदिवासी लोकांना, त्यांच्या ज्ञानाला, व्यवस्थापन कौशल्याला वगळून जणू त्या मानवी हस्तक्षेपविरहित आहेत असं सादर केलं गेलं.

इतकं अफलातून काम करणाऱ्या माणसावर असे आरोप करणं बरं नव्हे, असं अनेक भारतीय मनांना वाटत असणार. ॲटनबरो यांनी त्यांचे ज्ञान आणि निसर्ग-संवादक म्हणून केलेले काम यातून विलक्षण विश्वासार्हता कमावली. त्यांचा लोकांवरचा प्रभाव असामान्यच आहे. म्हणूनच अशी प्रभावी व्यक्ती जे बोलते आणि जे बोलत नाही त्या दोन्हीची जबाबदारी त्या व्यक्तीला स्वीकारावी लागते. त्यांनी बनवलेल्या माहितीपटांच्या मालिकेतून त्यांनी काय दाखवायचं टाळलं याची चर्चा झाल्याने व्यक्तीचा मोठेपणा कमी होत नाही, पण मर्यादा दिसतात आणि विज्ञानाला पुढे नेण्यासाठी ते आवश्यक आहे.

ॲटनबरो यांनी केलेल्या कामाचा वारसा निःसंशयपणे अतिशय मोलाचा आहे. ज्या निसर्गाच्या अद्भुततेला सर्वांसमोर सादर करण्यात त्यांनी आपलं आयुष्य वेचलं, त्याच्या संवर्धनासाठी सौंदर्यासोबत सत्य आणि सत्ता यातला दुभंग दिसणाऱ्या दृष्टीचा वारसाही पुढे जावा अशी शुभेच्छा व्यक्त करण्यास ही योग्य संधी आहे.

◆ anjalichip@gmail.com

@ पडसाद

आतड्याला पीळ पाडणाऱ्या 'काळ्या निळ्या रेषा'

'लोकरंग'मधील (५ एप्रिल) राजू बाविस्कर यांचा 'चित्रभाषेकडून शब्दांकडे' हा लेख वाचला. राजू बाविस्करांच्या 'काळ्या निळ्या रेषा' या आत्मवृत्ताचा उगम आणि प्रवास कसा झाला ते अतिशय हृदयद्रावक भाषेत त्यांनी मांडलेले आहे. खरं तर हा एका वंचित वर्गाचा अस्वस्थ उद्गार आहे. पुस्तकाचे शीर्षकही अतिशय समर्पक आहे. 'काळ्या निळ्या रेषा' म्हणजे अंगावर उठलेले वळ. समाजाच्या दुःखाचे प्रतिबिंब या पुस्तकात उमटलेले दिसते. शिक्षणाने माणूस मोठा होतो, पुस्तके ही आपल्याला प्रेरणा देतात या आंबेडकरांच्या विचाराने लेखक प्रेरित झालेला आहे. लेखकाने हा पुरस्कार सर्व वंचित माणसांना व वाचकांना समर्पित केला आहे, यातच लेखकाचे मोठेपण दिसून येते. आम्हा खान्देशवासीयांना त्यांचा सार्थ अभिमान आहे.

– **उर्मिला पाटील,** कल्याण

गदिमा आणि पांढरा चाफा

'लोकरंग'मधील (१२ एप्रिल) 'बालमैफल'मध्ये मेघना जोशी यांच्या 'गुण घेईन आवडी' या सदरात 'संयमी पांढरा चाफा' हा लेख वाचला. अंधेरीत छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल आहे, जेथे पांढऱ्या चाफ्याची अनेक झाडे आहेत आणि ती नेहमीच बहरलेली असतात. संध्याकाळी मी जेव्हा तेथे जातो तेव्हा झाडाखाली फुलांचा सडा दिसतो. लेखात लिहिल्याप्रमाणे अनेक लहान मुली कानाला फुलं अडकवताना दिसतात. पांढऱ्या चाफ्याबद्दल शिवाजी सावंतांनी एक घटना सांगितली आहे. ते एकदा ते ग. दि. माडगूळकरांसोबत एका गावी गेले होते. तेथे गदिमाचे भाषण झाल्यानंतर तेथील कॉलेजच्या प्राचार्यांनी त्यांच्या गळ्यात हार घातला तो पांढऱ्या चाफ्याच्या फुलांचा. सावंतांनी लिहिलंय की, 'आमच्या भागात त्याला 'मढेचाफा' म्हणतात. फक्त गुढीपाडव्याच्या दिवशीच त्याची माळ गुढीला चढवतात.'



– **प्रदीप राऊत,** अंधेरी

बदलाची सुरुवात स्वतःपासून

'लोकरंग'मधील (२६ एप्रिल) अतुल देऊळगावकर यांचा ''... तर, मी काय करू?'' हा लेख वाचला. आज प्लास्टिकचा कचरा हा मोठा प्रश्न झाला आहे. शहरं, लोकसंख्या वाढत आहेत आणि रोजच्या वापरात प्लास्टिकचे प्रमाणही. त्यामुळे रस्ते, नाले, समुद्रकिनारे आणि मोकळी ठिकाणे कचऱ्याने भरलेली दिसतात. हा कचरा फक्त घाण करत नाही, तर पर्यावरणालाही मोठे नुकसान पोहोचवतो. अशा वेळी काही ठिकाणी प्लास्टिकमुक्त उपक्रम सुरू झाले आहेत, ही चांगली बाब आहे. लोकांना ओला आणि सुका कचरा वेगळा ठेवायला सांगितले जाते. प्लास्टिकचा पुनर्वापर कसा करायचा हेही शिकवले जाते. जुन्या बाटल्यांपासून कुंड्या, सजावटीच्या वस्तू किंवा उपयोगी सामान तयार केले जाते. त्यामुळे कचरा कमी होतो आणि वस्तूंचा चांगला उपयोगही होतो. फक्त शासनाने प्रयत्न करून हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी सामान्य लोकांनीही जबाबदारी घ्यायला हवी. घरातील कचरा वेगळा देणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे या छोट्या गोष्टी प्रत्येकाने केल्या तर मोठा फरक पडू शकतो. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनीही यात भाग घ्यायला हवा. आपण सोयीसाठी प्लास्टिक वापरतो, पण त्याचे वाईट परिणाम पुढच्या पिढीला भोगावे लागू शकतात. म्हणून आता वापरा आणि फेका ही सवय बदलण्याची गरज आहे. शक्य तिथे पुन्हा वापर करता येईल अशा वस्तू वापरल्या पाहिजेत. स्वच्छ आणि सुंदर परिसर हवा असेल तर सुरुवात प्रत्येकाने स्वतःपासून करायला हवी.

– **फ्रँक मिरांडा,** वसई

देशाटनाचा दुहेरी ऐवज

सई केसकर

एखाद्या नवीन देशात फिरायला जाण्याच्या अनेक तऱ्हा असतात. नवीन जागा आपल्याला कशी 'दिसते' हे केवळ आपल्या दृष्टीवर अवलंबून नसतं; ते आपल्या दृष्टिकोनावरही तितकंच अवलंबून असतं. एकाच जागेची वेगवेगळ्या लेखकांनी लिहिलेली प्रवासवर्णनं वाचण्यात म्हणूनच गंमत असते. डॉक्टरकी करणारा एखादा तरुण मोटारसायकलवरून फिरायला जातो तेव्हा त्याच्या नजरेला काय दिसतं, ते 'मोटरसायकल डायरीज'मध्ये दिसेल. एखादी युद्ध वार्ताहर जेव्हा अमेरिकेतून चीनला येते तेव्हा तिला काय दिसतं ते 'ट्रॅव्हल्स विथ मायसेल्फ ॲण्ड अनअदर'मध्ये दिसतं (यातला 'अनअदर' कोण आहे, ते कळलं की ते पुस्तक वाचताना अजूनच मजा येते). मुळात एखादी जागा बघत असताना ती जागा जरी शतकानुशतकं स्थिर असली, ती आपण बघितलेली असली तरी इतरांच्या नजरेतून वेगळी वाटते. ती आपल्याला दिसली तशी त्यांना दिसली नाही अशी जेव्हा जाणीव होते; तेव्हा मग आपण लिहिणारी व्यक्ती कोण आहे याचाही विचार करू लागतो.

अलीकडेच 'राजहंस' प्रकाशनाने गिरीश कुबेर यांची दोन प्रवासवर्णनं प्रकाशित केलीत. ''साहेबी' जगात' आणि 'साहेबाच्या देशात' अशी ही दोन पुस्तकं. लोकसत्तामध्ये कुबेरांचं 'अन्यथा' नावाचं सदर सुरू आहे. त्यातील लेख ''साहेबी' जगात' या पुस्तकात तर स्वतंत्रपणे लिहिलेल्या प्रवासलेखांना 'साहेबाच्या देशात'मध्ये एकत्रित करण्यात आलेय. ''साहेबी' जगात हे युरोपमधील देशांचं प्रवासवर्णन, पण त्यात अमेरिकाही समाविष्ट करण्यात आलंय (याचं कारण पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणात सापडतं). आणि 'साहेबाच्या देशात' हे इंग्लंड आणि स्कॉटलंडचं प्रवासवर्णन आहे. कुबेरांच्याच भाषेत, पर्यटकांकडून नेहमीच्या 'टिक' करण्याच्या जागा सोडून अनेक वेगळ्या, सहसा कुणी जात नसलेल्या जागांचं या पुस्तकांमधून वर्णन येतं. त्यात ग्रीस, फ्रान्स असे नेहमीचे यशस्वी देश आहेतच. पण अतिअतिश्रीमंतांचा म्हणून ओळखला जाणारा मोनॅकोही आहे. आणि फ्रान्स आणि स्पेनच्या मधोमध, पिरनी पर्वतांच्या पल्याड वसलेली अशीच अतिश्रीमंतांचा कर रिचवणारी ॲंडोरा नावाची स्वतंत्र प्रिन्सिपालिटीदेखील आहे. एरवी 'टिक' करायच्या जागांमधील लुव्र, अथेन्सही आहे आणि सँतोरिनीदेखील आहे. लंडन आणि ऑक्सफर्ड हे 'नेहमीचेच' असले तरी फोर्ट विल्यमजवळ असलेली नेपच्यून स्टेअरकेसही आहे.

पुस्तक वाचायला घेतल्यावर पहिला धक्का बसतो तो कुबेरांच्या भाषेत झालेल्या बदलाचा. अग्रलेखांतून जे गिरीश कुबेर आपल्याला दिसतात ते या पुस्तकांत कधीतरीच दिसतात (अगदी दिसत नाहीत असे नाही). एरवीची रोखठोक भाषा सोडून कुबेरांची भाषा एक वेगळाच प्रेमळपणा घेऊन येते. त्यामुळे सुरुवातीची काही पानं हे नक्की कुबेरांचंच लेखन आहे का असा एक प्रश्न पडतो. पण आधी म्हटल्याप्रमाणे, सामान्य उच्च-मध्यमवर्गीय भारतीय नागरिक (तसं सामान्य कुणीच नसतं पण तरी!) युरोपला गेला की त्याच्या डोक्यात सगळ्यात पहिल्यांदा कोणती तुलना येते? प्रत्येक वस्तूच्या किमतीची. दुकानात काहीही दिसलं तर लगेच त्याला ११० ने गुणायचं, असं करायचा त्यांना शेवटपर्यंत कंटाळा येत नाही. इतका की परत येताना त्यांना ११० चा पाढाही पाठ झालेला असतो. कुबेर या बाबतीत वेगळ्या प्रकारची तुलना करतात. त्यांच्या लेखनातून, कधीतरीच जो अग्रलेखातला सूर दिसतो. जेव्हा त्यांना कोणत्याही पुलावर उद्घाटनाच्या पाट्या दिसत नाहीत किंवा माद्रिद हे नाव अरेबिक असूनही ते ख्रिश्चन स्पेननं अजून बदललं नाही हे त्यांच्या लक्षात येतं तेव्हा. किंवा लिस्बनमधल्या हुकूमशाहाने (सालाझार) स्वतःच एक पूल बांधून त्याला स्वतःचंच नाव दिलं होतं. त्या पुलाचं आता वेगळं नामकरण करण्यात आलं आहे. २५ एप्रिल १९७४ ला सालाझारची सत्ता उलथवून लावली म्हणून आता त्या पुलाचं नाव '२५ एप्रिल' असं झालं आहे!

'साहेबी' जगातलं '१८ मैलांची ग्रंथयात्रा' हे प्रकरण न्यू यॉर्कमधल्या स्ट्रॅन्ड बुकस्टोअर या पुस्तकांच्या दुकानावर लिहिलं आहे. ज्या पुस्तकप्रेमींनी न्यू यॉर्कवारी केली आहे त्यांना हे दुकान नक्कीच माहिती असणार. जगभरातील अनेक दुर्मीळ आणि वापरलेली पुस्तकं या दुकानात सापडतात. त्या दुकानाचं, तिथल्या कपाटांचं, तिथे दिसणाऱ्या लोकांचं वर्णन इतकं चपखल आहे की ते वाचताना आपण त्या दुकानातच आहोत असं वाटावं. 'हल्ली कुणी वाचत नाही' अशी तक्रार करणाऱ्या सगळ्यांच्या डोक्यावर पाय देऊन हे दुकान आजही फायद्यात चालू आहे. जेव्हा प्रवाह आपल्या विरोधात जाऊ लागतो तेव्हा कल्पकता कशी वापरली जाऊ शकते याचं हे एक उदाहरण आहे. असे पुस्तकांचे संदर्भ इतर प्रकरणांतही येत राहतात, पण एडिंबरामधल्या 'रायटर्स म्युझियम'चं वर्णनही आपल्याला ती जागा 'टिक' करण्याच्या यादीत टाकायला लावणारं आहे. एडिंबरा नगरपरिषदेनं रॉबर्ट बर्न्स, वाल्टर स्कॉट आणि रॉबर्ट स्टीव्हन्सन या तीन लेखकांच्या स्मरणार्थ हे संग्रहालय बांधलं आहे. खांबाला वळसे घालत जाणारा गोल जिना असलेल्या एका चिरेबंदी वाड्यात हे संग्रहालय. त्याच्या एका पायरीवर एलिझाबेथ मेल्व्हिल या कवयित्रीचे शब्द कोरले आहेत. त्या पायरीचा फोटोही पुस्तकात दिला आहे. लेखकानं (कोणत्याही काळात) कसं असावं, विशेषतः जेव्हा लेखकांनी लिहू नये अशी परिस्थिती तयार केली जाते तेव्हा लेखकांनी कसं वागावं हे दोन ओळींत इतक्या सहजपणे सांगणं कवितेलाच जमू शकतं याचा ते वाचून प्रत्यय येतो.

खाण्या-पिण्याच्या गोष्टींची दोन्ही पुस्तकात रेलचेल आहेच. पॅरिसला जाऊन पुरणपोळी किंवा उकडीचे मोदक खाऊ इच्छिणाऱ्यांचा कुबेर जमेल तितका निषेध करतात (पण या बाबतीत शाकाहारी लोकांचे युरोपमध्ये थोडे हाल होतात हेही तितकंच खरं). बरेच लोक परक्या भाषेला, अन्नाला थोडे बिचकून असतात. तरीही सगळं बघून घ्यायचा किंवा 'करायचा' मोह असतोच. अशा वेळी मग एखाद्या काचेच्या बुडबुड्यातून प्रवास करवून देणाऱ्या व्यवस्था उभ्या राहतात. भारतीयांनी परकीय देशातल्या खाण्याबद्दल आत्मचरित्रांतून केलेल्या तक्रारवजा नोंदी अनेक सापडतील. पण त्याला उतारा म्हणजे पॅरिसमध्ये जाऊन पुरणपोळी खाता येणं नव्हे. ज्या देशात आपण आहोत त्या देशातील अन्न चाखून बघितलं नाही तर प्रवास पूर्ण झाल्याची भावना येत नाही. या दोन्ही पुस्तकांत खाद्यपदार्थांच्या आणि मद्यसंस्कृतीच्या अनेक नोंदी आहेत. स्कॉटलंडमधल्या डिस्टिलरी आहेत, ग्रीसमध्ये रस्त्यावरच्या प्रत्येक कॅफेमध्ये मिळणाऱ्या हाऊसवाइन्स आहेत, लिस्बनचा (रांगेत ताटकळत उभं राहून विकत घ्यावा लागणारा) टार्ट आहे, पॅरिसचा क्रोसाँ आहे (आणि तो कसा पॅरिसचा नाही याची एक कथा आहे!). बुयाबेस आहे आणखीन बरंच काही आहे.

पण या झाल्या 'नेहमीच्या' गोष्टी. हॅम्बर्गच्या कौन्सेलऑक्वा नावाची सरकारी कंपनी, शहरातल्या सांडपाण्याचं शुद्धीकरण करून ते पुन्हा पिण्यायोग्य करते. या कंपनीबद्दलचे प्रकरण फारच रोचक आहे. गटाराचं पाणी शुद्ध करून पुन्हा पिण्यायोग्य करणं हे किती अवघड आहे याचा अंदाज बांधता येऊ शकेल. पण या कंपनीनं ते करून दाखवलं.

पाण्याची अजिबात टंचाई नसलेलं, कमी लोकसंख्या असलेलं शहर, केवळ पाणी जपून वापरावं एवढ्या एकाच हेतूनं असे प्रकल्प उभे करते हे वाचून आपल्याकडच्या पाणीटंचाई आणि जलप्रदूषणाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. पण याला चंदेरी किनार म्हणजे या कंपनीनं भारताशी करार केलाय आणि त्याचे प्रयोग चालू आहेत. कुबेरांच्या तंत्रज्ञान पर्यटनात मर्सिडीज, मायबाह (Maybach), पोर्शा (Porche), बीटल या सगळ्या एकापेक्षा एक महागड्या गाड्या जिथे जन्माला आल्या ते स्टुटगार्टही आहे.

चित्रांसाठी या दोन्ही पुस्तकांत विशेष जागा आहे. एकात क्लोद मोने या चित्रकाराच्या गिव्हरनीतल्या (फ्रान्स) निवासस्थानाला दिलेली भेट आहे. तर दुसऱ्या पुस्तकात एडिंबराच्या नॅशनल म्युझियममध्ये भेटणारा तोच, पण जरा वेगळ्या ढंगातला मोने आहे. लुव्र वारीबद्दल लिहिलेलं एक संबंध प्रकरण आहे. पिकासोचं घर आहे आणि त्याच्या चित्रांबद्दल आणि आयुष्याबद्दल काही नोंदी आहेत. युरोपमधली काही ठिकाणं आणि विशेषतः स्कॉटलंड किती निसर्गरम्य आहे हे वाचताना मात्र कुबेरांच्या बदललेल्या भाषेची महती कळते. या बाबतीत कदाचित 'साहेबाच्या' देशात थोडं उजवं आहे. कदाचित त्या आसपासचं कुबेरांचं वास्तव्य याला कारणीभूत असावं.

प्रवासवर्णन म्हणून ही दोन्ही पुस्तकं संग्राह्य आहेतच. पण वाचत असताना एक जाणीव सतत होत राहिली. ९/११ नंतर भारताबाहेर पडलेल्या माझ्या पिढीतल्या अनेकांना युरोप, इंग्लंड किंवा अमेरिका इतकं रम्य वाटलं नाही. कदाचित आम्ही विद्यार्थिदशेतच या देशांत गेलो त्यामुळेही असेल, पण तिथल्या संस्कृतीत होणारे सूक्ष्म बदल आम्हाला सतत या ना त्या कारणाने जाणवत राहिले. कधी ते वर्णद्वेषाची ग्रॅफिटी म्हणून दिसले, तर कधी ठरावीक देशांचा पासपोर्ट असेल तर हळूहळू अधिकाधिक कडक होणारे व्हिसाचे नियम म्हणून दिसले. नव्वदीत आलेल्या जागतिकीकरणाच्या लाटेत आम्ही मोठे झालो तेव्हा आमच्या डोळ्यासमोर युनायटेड कलर्स ऑफ बेनेटनच्या जाहिराती असायच्या. सगळ्या वंशांचे लोक बेनेटनचे कपडे घालून खेळीमेळीने हसताना दिसायचे. पण आम्हाला जे बदल सूक्ष्मपणे जाणवत होते त्यांनी आता सगळीकडेच रौद्र रूप घेतलं आहे. आणि बेनेटनची जाहिरातही आता फारशी कुठे दिसत नाही. एवढा प्रचंड सांस्कृतिक वारसा असलेला युरोपही हळूहळू उजवीकडे जाताना दिसतो आहे. आणि आता या पुस्तकात जसं वर्णन आहे तसा प्रवास सहज करता येईल किंवा नाही यावरही प्रश्नचिन्ह आलं आहे. तरीही, पुन्हा त्या जगात जाता यावं आणि मनसोक्त फिरून परत येता यावं असं एक स्वप्न ही पुस्तकं वाचताना बघता येतं इतकं नक्की.

◆ saeekeskar@gmail.com



''साहेबी' जगात', गिरीश कुबेर, राजहंस प्रकाशन, पाने- १६४, किंमत- ४०० रुपये.



'साहेबाच्या देशात', गिरीश कुबेर, राजहंस प्रकाशन, पाने-११२, किंमत- ३७० रुपये.



कडू कारलं गोड हसलं

माधवी वागेश्वरी

सगळ्या भाज्या एकदा खेळायला जमल्या. त्यांचं हसणं खिदळनं सुरू होतं. तितक्यात तिकडून कारलंदेखील आलं, तसं सगळ्या भाज्यांनी नाकं मुरडली. मेथी म्हणाली, ''काय गं बाई कशाला आलं हे कडू कारलं. खेळ सुरू होण्याअगोदर खेळाची सगळी चवच गेली.'' सगळ्यांच्या आवडत्या भेंडीच्या भाजीलादेखील तेच वाटलं आणि ती जरा कारल्यापासून बाजूला सरकली. फुलकोबी रागानं आणखीनच फुगून बसली. वांगी हळूच दोडक्याला कानात म्हणाली, ''हळूच काटे टोचू का कारल्याला, म्हणजे तो जाईल आणि आपल्याला आपला खेळ एकदाचा सुरू करता येईल.'' कारल्याला काहीच कळेना. सगळ्या भाज्या अशा का करत आहेत? आपल्याला त्यांच्यात घेत का नाहीत?

हे सगळं काही शेपू दुरून पाहत होता आणि शांत उभा होता. कारण त्याची चवदेखील कोणाला आवडत नव्हती. पण निदान त्याला पालकताईमुळे खेळायला मिळणार होतं. पालकताईला सोडून कुठे जाण्याची त्याची हिंमत नव्हती. शेपूला अगदीच ठाऊक होतं की कारल्याला किती वाईट वाटत असेल.

आता खेळच असा निवडला गेला की ज्यात प्रत्येकाला जोडी लागेल. सगळ्या जोड्या जमल्या, नवीन आलेल्या ब्रोकोलीकडे सगळ्या भाज्या अशा पळत होत्या की विचारू नका. काय तर ती बाहेरून आली होती म्हणून. कारल्याची कोणाशीच जोडी जमली नाही. कारल्याचे डोळे भरून आले, आपलं अंग खडबडीत आहे, आपल्याला चव नाही, आपला काहीच उपयोग नाही. आपण कोणालाच आवडत नाही, आपण वाईट आहोत असं सगळं काही कारल्याच्या मनात दाटून आलं.

एकदम कोणीतरी कारल्याचा हात धरला... जोडीसाठी ती होती सगळ्यांची आवडती बटाटा भाजी. शरीराने लठ्ठ, पण मोठ्या मनाच्या बटाट्याने पाहिलं की कारलं रडत आहे, त्यानं त्याबद्दल विचारलं आणि त्याला झालेला प्रकार समजला. खेळाचा एक डाव संपला तसं बटाट्यानं सगळ्यांना आपल्या जवळ बोलवलं आणि सांगितलं, '' तुम्ही असं का वागलात कारल्याशी? निसर्गानं आपल्याला किती वेगळ्या वेगळ्या चवी दिल्या आहेत. प्रत्येक चवीचं स्वतःचं एक महत्त्व आहे. प्रत्येक चव माणसाच्या आरोग्यासाठी आवश्यक असते. त्याचप्रमाणे कारल्याची कडू चवदेखील महत्त्वाची आहे आणि छानच आहे. कारल्याचा वेल तर किती सुंदर दिसतो. 'कडू कारलं तुपात तळलं, साखरेत घोळलं, तरी ते कडूच' अशी एक म्हण त्या माणसांनी बनवली आहे, ज्या माणसांना कारलं उत्तम सत्त्व देतं. उलट कारल्याचं कौतुक करावं तितकं कमी, कारण ते आपली चव कधीही सोडत नाही आणि कधीही दुसऱ्यासारखा बनण्याचा प्रयत्न करत नाही.''

भाज्यांना आपली चूक उमगली. शेपू आता न घाबरता कारल्याजवळ गेला आणि लालबुंद टोमॅटोनंदेखील कारल्याचा हात धरला. आणि मग सगळ्यांनी एकच दंगा केला... शेवटी कडू कारलं गोड हसलं.

◆ madhavi.wageshwari@gmail.com



डोकॅलिटी


मनाली रानडे

दिलेल्या सूचक माहितीवरून सोबत दिलेल्या चौकटीत योग्य त्या संख्या भरायच्या आहेत.

सूचक माहिती :

आडवे :- B. मुलाचे लग्नाचे किमान कायदेशीर वय C. त्रिकोणाच्या आंतरकोनांची बेरीज अंशांमध्ये D. इंडियन नॅशनल काँग्रेसचे स्थापना वर्ष G. सामान्यतः विश्रांतीच्या वेळी निरोगी प्रौढ व्यक्तीच्या हृदयाच्या ठोक्यांची संख्या H. पहिले भारतीय स्वातंत्र्ययुद्ध क शिवाजी महाराजांचे जन्मवर्ष K. मानवी शरीरातील प्रौढ व्यक्तीच्या हाडांची संख्या L. सामान्यतः मानवी डोळ्याच्या स्पष्ट दृष्टीचे अंतर सेंटिमीटरमध्ये.

उभे :- A. निरोगी प्रौढ व्यक्तीचा सिस्टोलिक रक्तदाब C. आधुनिक आवर्त सारणीतील एकूण मूलद्रव्ये D. भारताला स्वातंत्र्य मिळाले ते वर्ष E. आठाचा घन F. भारतात मतदाराचे किमान वय G. एक हॉर्सपॉवर म्हणजे - ---- वॅट्स H. पाण्याचा उत्कलनांक (सेल्सियसमध्ये) J. राष्ट्रपतीपदाच्या उमेदवाराचे किमान पूर्ण वय K. राज्यसभेची कमाल सदस्यसंख्या.



manaliranade84@gmail.com



उत्तर :
आडवे :- B. २१ C. १२० D. १२७५ G. ७२ H. १२५७ I. १३६७० K. २०६ L. २५
उभे :- A. १२७० C. १२१२ D. ११४७ E. १२१६ F. १२ G. ७४६ H. १००

गुण घेईन आवडी!

मेघना जोशी

सध्या सगळीकडे उन्हाची काहिली आहे. अगदी वैशाख वणवा पेटलाय जणू. बालमित्रांनो, आपण सगळेच या उन्हाने त्रस्त होत असतो. या त्रस्ततेमुळेच त्याच्या गुणाकडे डोळेझाक होते म्हणून आज त्याबद्दल थोडंसं. हे चकचकीत ऊन कानाकोपऱ्यात जाऊन मन प्रसन्न करत असतं. त्याची पिवळी झिलई मनालाही तशीच झालर लावते. निसर्गालाही या दिवसांत बहरण्याची, फुलण्याची, फळण्याची शक्ती मिळते. हीसुद्धा त्याचीच देणगी असावी. हे दिवस मौजमजेचे, भेटीगाठींचे, पर्यटनाचे असतात याला कारण ही प्रसन्नताच असते. जशी प्रसन्नता तसाच एक प्रकारचा निर्धास्तपणा यात जाणवतो.

लवकर येणारा सूर्यनारायण जास्त काळ आपल्या समवेत राहतो, त्यामुळे आपला खेळण्याबागडण्याचा, खाण्यापिण्याचा काळ वाढतो. अरे, तिकडे अंधार असेल. पूर येईल बरं का? वगैरेंसारखी भीती नसतेच मुळी. आपल्यापाशी जे आहे ते भरभरून देत जावं हेही सूर्यनारायण चहूअंगांनी उन्हाची उधळण करत सांगत असतो. आणि महत्त्वाचं म्हणजे, दिवस बदलत असतात याची जाणीव या काळात होतेच होते. ज्यांना ऊन आवडत नाही,

सूर्याचे देणे...



त्याचा त्रास होतो; त्यांच्यासाठी ढगांना आमंत्रण या दिवसांतच पाठवलं जातं. कारण आपण सगळ्यांचे आवडते असणार नाही, त्यामुळे त्यांच्या आवडत्या पावसाच्या ढगांना आमंत्रण देण्याचा मोठेपणा याचाच. आहे की नाही सगळंच अद्भुत!

◆ joshimeghana.23 @gmail.com



कोकणची निळी निळी खाडी...

उर्वी जोशी

कोकणातले लालमातीचे नागमोडी रस्ते... रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असलेली दाट हिरवीगार झाडी... फेसाळता निळा समुद्र आणि लाल कौलारू टुमदार घरं हे सगळं मी एका व्हिडीओमध्ये पाहिलं. मग मी मनाशी ठरवलं की दिवाळीच्या सुट्टीत कोकणात जायचंच. बाबांना तसं सांगितलं.

मग मी आणि आबांनी कोकणात कुठं जायचं यावर बराच सर्च केला. शेवटी ठरलं की दापोलीला जायचं. दुसऱ्या दिवशी मला पहाटेच जाग आली. कारण आम्हाला सकाळी ८ वाजताच निघायचं होतं. सगळं आवरून मी आई, बाबा, आजी, आबा गाडीत बसलो. पुणं सोडलं अन् घाटाचा वळणा वळणाचा रस्ता लागला. मोबाइलवर माझी आणि आजीची आवडती गाणी लावली होती. गाणी ऐकत आम्ही आमच्या स्वप्नातल्या गावात म्हणजेच कोकणातल्या दापोलीला पोहोचलोसुद्धा! आमचा होम स्टे छान होता. आसपास हिरवीगार झाडी होती. तिथे खूप शांतता होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही नाष्टा करून जवळच असलेली काजू फॅक्टरी पाहायला निघालो. काजू फॅक्टरीच्या भोवती भरपूर झाडं होती व समोर सुंदर बाग होती. झाडावरून काजू काढतात मग वाळवतात, भाजतात नंतर त्याच्यावरील तपकिरी साल काढतात व पांढऱ्या काजूंचे वर्गीकरण करतात. मग पॅकिंग करून ते काजू विकायला पाठवतात असं आम्हाला तिथल्या गाइड काकांनी सांगितलं. तिथं आम्ही कोकम सरबत प्यायलो. दोन आमरसाच्या बाटल्याही विकत घेतल्या.

त्यानंतर आम्ही दाभोळ जेट्टी पाहायला गेलो. दाभोळ-धोपावे अशी बोट चालू असते. आम्ही बोटीत बसून एक फेरी मारली. बोट खूप मोठी होती. आम्ही बोटीतल्या एका बाकावर बसलो. एका बाजूला अथांग पसरलेलं समुद्राचं फेसाळतं पाणी दिसत होतं. आणि दुसऱ्या बाजूला खाडीचं पाणी. काठावर हिरवीगार नारळाची खूप झाडं होती.

दुपारी जेवण करून आम्ही लाडघरचा समुद्रकिनारा पाहायला गेलो तेव्हा रिमझिम पाऊस पडत होता, त्यामुळे खूप मजा वाटली. आम्ही लगेच स्वीमिंग ड्रेस घातले आणि पळतपळतच समुद्राकडं गेलो. पायाला मऊशार पुळण लागत होती. पांढऱ्या शुभ्र फेसाळत्या लाटा येत होत्या. आम्ही त्या लाटांवर स्वार झालो. मोठी लाट येऊन धडकून पुढे जायची. आमच्या डोक्यावरून पाणी जात होतं. पायाखालची रेती सरकत होती. मी, बाबा आणि आबा मनसोक्त डुंबलो. माझे आबा तर उंच लाटेबरोबर पुढे पुढे जात होते. माझा बाबा लाटा अंगावर घेत बसला होता. मी पण मस्त पोहत होते, कारण मी रोज पोहायला जाते नं! लांबून आजी आणि आई 'आता पुरे, बाहेर या' असं म्हणत हातवारे करत होत्या.




दुसऱ्या दिवशी सकाळी सगळं आवरून आम्ही कड्याचा गणपती पाहायला गेलो. आंजर्ले गावातून समुद्राकडेने एक छोटा चढाचा रस्ता उंच कड्यावर असलेल्या गणपतीच्या मंदिराकडं जात होता. त्या रस्त्याने आम्ही गेलो. वरती दगडी बांधकाम असलेलं मोठं गणेश मंदिर होतं. पाय धुवून आम्ही श्रीगणेशाचं दर्शन घेतलं. तिथून मग मुरुड गावात पोहोचलो. मुरुड हे महर्षी धोंडो केशव कर्वे यांचं गाव. त्यांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार केला. कर्वे यांचा सुंदर पुतळा आहे. पुतळ्याला वंदन करून आम्ही मुरुड बीच पाहायला गेलो. बीच सुरेख आहे, पण अचानक पाऊस सुरू झाला म्हणून मग आम्ही गाडीत बसलो आणि पुढे कर्दे बीचला गेलो. तिथं अजिबात पाऊस नव्हता. आणि तिथं गर्दीसुद्धा नव्हती म्हणून मग आम्ही बीचवर गेलो. तिथं शंख - शिंपले वेचले. माझ्याकडे असे खूप शंख - शिंपले गोळा झालेत. मी ते चिकटवून चित्र बनवते.

दुसऱ्या दिवशी सकाळी सगळं आवरून बॅगा घेऊन निघालो. दापोली जवळ ८ कि.मी.वर आसूद इथलं सुंदर असं केशवराज मंदिर बघितलं. मंदिराचा परिसर निसर्गरम्य आहे. दुतर्फा झाडी, कौलारू घरं, घरांवर सुपाऱ्या वाळत घातलेल्या दिसल्या इथं खूप सुंदर सुंदर झरे आहेत. ते पाहून आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो.

इयत्ता- पाचवी, होम स्कूलिंग

राजकीय हत्यांचा मागोवा



'गाजलेल्या जागतिक राजकीय हत्या', धनंजय राजे, नावीन्य प्रकाशन, पाने- ३८४, किंमत- ६५० रुपये.

उन्मेष अमृते

खुनासारखे गुन्हे विकृत मानसिकतेतून घडत असावेत, हे नाकारता येणार नाही. पण या हत्यांच्या मागे विकृत मनोवृत्ती नव्हती तर विकृत राजकीय हेतू होते हेच स्पष्ट करणारं पुस्तक म्हणजे धनंजय राजे यांचं 'गाजलेल्या राजकीय हत्या'.

अब्राहम लिंकन, महात्मा गांधी, जॉन एफ. केनेडी, सोलोमन बंदरनायके, ओलॉफ पाल्मे, राजीव गांधी, बेनझीर भुत्तो यांच्या हत्यांमागे केवळ विकृत मनोवृत्ती नक्कीच नव्हती. या हत्या योग्य नियोजन करून, पूर्वनियोजित कटकारस्थान रचून केलेल्या होत्या. या हत्या एकट्या मारेकऱ्याने केलेल्या नव्हत्या. त्याच्या मागे अत्यंत नियोजनबद्ध संघटन, सूत्रबद्ध पद्धती अमलात आणल्याचं लक्षात येतं. हेच या पुस्तकात लेखकाने दाखवून दिलं आहे. या हत्या जरी मानसिक वैफल्यग्रस्ततेतून वा विकृतीतून झाल्या असल्या तरी त्यांच्या शोधयात्रेत कुठे ना कुठे समग्र राजकीय विकृती लपलेली दिसते. लेखकाने राज्यकर्त्यांविरोधात क्रांतीच्या नावाखाली झालेल्या हत्यांचा परामर्श या पुस्तकात घेतलेला आहे.

बांगलादेशाचे अध्यक्ष शेख मूजीबुर रहेमान यांची अमानुष हत्या ही एक कलंकित हत्या होती. इजिप्तच्या अन्वर सादत यांची हत्याही अशाच प्रकारे लष्कराच्या तुकडीने केली. चिलीचे अध्यक्ष सॅलव्हादोर अॅलांदे यांच्याविरोधात लष्कराने उठाव करून त्यांची हत्या केली. अब्राहम लिंकन यांची हत्या एका नाट्य अभिनेत्याने केली. जॉन एफ. केनेडी यांच्या खुनाला अमेरिकेतील काळ्या-गोऱ्याची किनार होती. अमेरिकेतील कृष्णवर्णीय नेते मार्टिन ल्युथर किंग ज्यु. हे एक सच्चे गांधीभक्त होते आणि महात्मा गांधींच्या अहिंसा मार्गाचे पुजारी होते. त्यांचादेखील वर्णभेदाने बळी घेतला. महात्मा गांधींचा खून ही हिंदुस्थानातील दारुण शोकांतिका होती. रॉबर्ट केनेडी, बेनझीर भुत्तो आणि आपले राजीव गांधी हे तिन्ही नेते त्या त्या वेळचा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक आढावा लेखकाने घेतला आहे असून, त्या परिस्थितीचा आणि झालेल्या हत्येचा मेळ घालण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. त्यामुळे हे पुस्तक गाजलेल्या हत्यांचं असलं तरी त्यासह त्या देशांचे सामाजिक, सांस्कृतिक स्तर, पैलू या पुस्तकाद्वारे आपल्यासमोर लेखक मांडतो.

आपापल्या देशाला वेगळी दिशा देण्याची उमेद घेऊन निवडणूक आखाड्यात उतरले होते, असे निरीक्षण लेखकाने पुस्तकात मांडले आहे. या पुस्तकाचं आणखी एक वैशिष्ट्य नमूद करणं गरजेच आहे. या पुस्तकात नमूद केलेल्या हत्या कशा प्रकारे झाल्या याचा अत्यंत बारकाईने लेखकाने शोध घेतला आहे. पण त्याबरोबर त्या त्या देशाचा







जाहिरात

रोज सकाळी नियमित चालायचा व्यायाम...

हृदयासाठी सोपा आणि प्रभावी मार्ग



डॉ.रोहित साने, MD & CEO माधवबाग

आजच्या धावपळीच्या आणि ताणतणावाच्या जीवनात हृदयविकाराचे प्रमाण झपाट्याने वाढताना दिसत आहे. पूर्वी हा आजार फक्त वयस्करांपुरता मर्यादित होता, पण आज 40–50 वयोगटातील लोकांमध्येही हार्ट अटॅकचे प्रमाण वाढले आहे. अशा परिस्थितीत एक साधी सवय - रोज सकाळी नाश्त्याआधी अर्धा तास व्यायाम - आपल्या हृदयाचे संरक्षण करू शकते.

हार्ट अटॅक नेमका कशामुळे होतो?

सामान्य समज असा आहे की "ब्लॉकेज" म्हणजेच हार्ट अटॅक. पण वैद्यकीय विज्ञान यापेक्षा वेगळे चित्र दाखवते.

आपल्या रक्तवाहिन्यांमध्ये वर्षानुवर्षे चरबीचा थर (अॅथेरोमा) साचत असतो. ही प्रक्रिया अचानक होत नाही—American Heart Association आणि European Society of Cardiology यांच्या संशोधनानुसार, हा थर अनेक वर्षे शांतपणे वाढत राहतो.

परंतु हार्ट अटॅक प्रामुख्याने रक्ताच्या गुठळीमुळे (ब्लड क्लॉट) होतो. रक्तवाहिनीच्या आत एक अतिशय नाजूक थर असतो—त्याला एंडोथेलियम म्हणतात. सोप्या भाषेत सांगायचे तर, ही रक्तवाहिनीची आतील गुळगुळीत अस्तर आहे. ताण, राग, चुकीचा आहार, धूम्रपान यामुळे हा थर कमकुवत होतो. जणू एखाद्या पाईपमध्ये छोटा क्रॅक पडतो तसे.

जेव्हा हा थर फुटतो (rupture होतो), तेव्हा त्या ठिकाणी लगेच रक्ताची गुठळी तयार होते. ही गुठळी रक्तप्रवाह थांबवते—आणि तेव्हाच हार्ट अटॅक होतो.

महत्त्वाची बाब म्हणजे:

प्रत्येक ब्लॉकेज असलेल्या व्यक्तीला हार्ट अटॅक येतोच असे नाही

आणि प्रत्येक हार्ट अटॅकमध्ये मोठा ब्लॉकेज असतोच असे नाही

(Lancet, Circulation Journal मधील निष्कर्ष)

ताणतणाव आणि चुकीच्या सवयींचा परिणाम

आजचा असंतुलित जीवनक्रम- उशिरापर्यंत जागरण, जंक फूड, व्यायामाचा अभाव. हे सर्व रक्तवाहिनीच्या आतील थराला हळूहळू इजा करतात. त्यामुळे तो कमकुवत होतो आणि फुटण्याचा धोका वाढतो.

डॉक्टरांना प्रश्न विचारण्यासाठी
QR Code स्कॅन करून WhatsApp करा
किंवा 7391084448 वर कॉल करा.

व्यायाम – नैसर्गिक संरक्षण कवच

रोज सकाळी नाश्त्याआधी व्यायाम करण्याचे अनेक फायदे आहेत:

- **रक्त पातळ ठेवतो** – त्यामुळे गुठळी तयार होण्याची शक्यता कमी होते
- **फायब्रिनोलिटिक एन्झाइम्स सक्रिय करतो** – ही शरीरातील नैसर्गिक एन्झाइम्स गुठळी विरघळवण्याचे काम करतात
- **ताण कमी करतो** – मन शांत राहते
- **डायबेटीस, कोलेस्टेरॉल, ट्रायग्लिसराइड्स नियंत्रणात ठेवतो.**

सकाळी रिकाम्या पोटी व्यायाम केल्याने शरीरातील मेटाबॉलिझम अधिक चांगल्या प्रकारे सक्रिय होतो. चालणे, प्राणायाम, सूर्यनमस्कार किंवा हलका योग—कोणताही व्यायाम नियमितपणे केला तरी मोठा फरक पडतो.

एक प्रेरणादायी अनुभव

माधवबागमध्ये एक रुग्ण आले होते - वय 50 वर्षे. त्यांना व्यायामाची अजिबात सवय नव्हती आणि ते सुरुवातीला तयारही नव्हते. समजावून सांगून त्यांनी हळूहळू चालणे सुरू केले. पहिल्या 15–20 दिवसांतच त्यांना हलके वाटू लागले. पुढे त्यांनी नियमित व्यायामाची सवय लावली.

आज ते 70 वर्षांचे आहेत - पण अजूनही दररोज व्यायाम करतात. त्यांचे शुगर, कोलेस्टेरॉल आणि ट्रायग्लिसराइड्स पूर्णपणे नियंत्रणात आहेत. ते आजही उत्साही आणि सक्रिय जीवन जगत आहेत.

आयुर्वेद आणि आधुनिक वैद्यक – एकत्रित उपाय

आधुनिक वैद्यक हार्ट अटॅकचे कारण स्पष्ट करते, तर आयुर्वेद जीवनशैली सुधारण्यावर भर देतो. माधवबाग या दोन्हींचा समन्वय साधून, औषधोपचारांसोबत आहार, दिनचर्या आणि व्यायाम यावर भर देतो. या नॉन-इन्वेसिव्ह पद्धतीमुळे अनेक रुग्णांना शस्त्रक्रिया टाळून आरोग्य सुधारता आले आहे.

हृदयविकार अचानक होत नाही—तो वर्षानुवर्षे तयार होतो.

पण त्यापासून बचाव करण्यासाठी मोठे बदल करणे आवश्यक नाही.

फक्त रोज सकाळी 30 मिनिटे स्वतःसाठी द्या.

आजची ही छोटी सवय उद्याचे मोठे संकट टाळू शकते.

तुमचे हृदय सुरक्षित ठेवणे-तुमच्या हातात आहे.

माधवबाग™ अॅडव्हान्स्ड आयुर्वेदा क्लिनिक्स आणि हॉस्पिटल्स

आमच्या जवळच्या माधवबाग क्लिनिकला भेट द्या
अधिक माहितीसाठी संपर्क : 7391084448
info@madhavbaug.org • www.madhavbaug.org

350+ Clinics • 5 Hospitals • 650+ Ayurvedic Doctors • 10L+ Happy Patients

जाहिरात



सफरनामा

▪ सुनिला पाटील
Founder, CPO & CNO, Veena World
sunila@veenaworld.com

तू बन जा गली बनारस की...

...मंद आचेवर हे दूधाचं मिश्रण सतत ढवळत राहावं लागतं. ते घट्ट होऊ नये, याची काळजी घ्यावी लागते. केशरामुळे त्याला सुगंध येतो आणि सोनेरी...



अहाहा! त्याचा स्वाद अवर्णनीय होता. मऊशार, पांढऱ्याशुभ्र ढगासारखा पोत आणि केशरामुळे आलेलं तेज... कुल्हडमधून मी त्याचा आस्वाद घेतला आणि माझी ब्रह्मानंदी टाळी लागली. तो स्वाद क्षणात तोंडात विरघळला. त्याची चव माझ्या रंध्रारंध्रात जाणवली. क्या बात है! हवेत चांगलाच गारवा होता. आम्ही शहरात भटकंतीसाठी निघालो होतो आणि चौकात आलो तोवर सूर्य चमकायला लागला होता. रस्त्याच्या कडेला कुल्हडांची आरास होती. कढईत दूध रटरटत होतं. एके ठिकाणी थांबून आम्ही अखेर त्या स्वर्गीय पदार्थाचा आस्वाद घेतला. आमचा गाईड म्हणाला, याला मलाईयो म्हणतात. आम्ही वाराणसीत होतो. हे देवांचं शहर मानलं जातं, त्यामुळे हा त्यानांच आवडणारा पदार्थ असावा, असा विचार त्यावेळी माझ्या मनात चमकून गेला. वाराणसीच्या त्या गजबजलेल्या गल्ल्या, सतत उत्सवांच्या निमित्ताने भाविकांच्या गर्दीने फुललेले घाट, आणि यांच्या साथीने नांदणारा मलाईयो म्हणजे या शहराच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचं प्रतीकच जणू! दूध, साखर आणि केशर यांच्यापासून बनवलेली ही मिठाई एकदम परिपूर्ण आहे. ती तोंडात अक्षरशः विरघळते. शिवाय तो हलकासा स्वाद नंतरही बराच काळ जिभेवर रेंगाळतो. थंडीच्या मौसमात मलाईयो मिळते. ही मिठाई बनवणं हे मोठं कसबी काम आहे. त्यासाठी तंत्र अवगत हवं आणि भरपूर संयमही हवा. मंद आचेवर हे दूधाचं मिश्रण सतत ढवळत राहावं लागतं. ते घट्ट होऊ नये, याची काळजी घ्यावी लागते. केशरामुळे त्याला सुगंध येतो आणि सोनेरी छटाही मिळते. त्यामुळे ही मिठाई एकदम प्रिमियम होऊन जाते. मलाईयो ही वाराणसीच्या पाककलेच्या वारशाची एक झलक आहे. शहराच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वातावरणाच्या जोडीला मलाईयोचा आस्वाद घेणं म्हणजे एकदम अद्भुत आनंद.

वाराणसीला जाण्याचा भाग्ययोग माझ्या आयुष्यात तीन वेळा आला आहे. वाराणसी म्हणजे पवित्र भूमी, मंदिरांची भूमी. हे प्रत्येक श्रद्धाळू व्यक्तीच्या आयुष्यातील अतिशय महत्त्वाचं तीर्थक्षेत्र आहे. नुसतं इथे येऊन राहणाऱ्यालाही निर्वाण आणि मोक्ष प्राप्ती होते, अशी या स्थानाची महती आहे. वाराणसी, बनारस किंवा काशी या नावांनी ओळखलं जाणारं हे शहर जगातील सर्वात प्राचीन शहरांपैकी एक आहे. ख्यातनाम इंग्रजी साहित्यिक मार्क ट्वेन यांना वाराणसीचं पावित्र्य आणि त्या शहराबद्दलच्या कथा, आख्यायिका यांची जबरदस्त मोहिनी पडली होती. त्यांनी एके ठिकाणी लिहून ठेवलंय की, "वाराणसी शहर इतिहासापेक्षाही प्राचीन आहे. परंपरेपेक्षाही जुनं आहे, अगदी दंतकथांना सुद्धा मागे टाकणारं आहे. आणि प्रत्यक्षात ते या सगळ्यापेक्षा दुप्पट प्राचीन भासतं." असं असलं तरी नव्याने बांधण्यात आलेल्या काशी विश्वनाथ कॉरिडोरमुळे वाराणसीचं रुप बदलून गेलं आहे. या कॉरिडॉरमुळे शहराचा पूर्ण कायापालट झाला आहे. आता काशी विश्वनाथ मंदिर गंगेवरील घाटांशी जोडलं गेलं आहे. कॉरिडॉर तयार होण्यापूर्वी मी काशीला गेले होते. बदललेल्या काशीचं रूप पाहण्याची माझ्या मनात उत्सुकता होती. माझ्या दृष्टीने वाराणसी हे मुख्यतः आध्यात्मिक केंद्र आहे. पहिल्या भेटीत मी तिथल्या सुमारे २००० पेक्षा जास्त मंदिरांमधली काही निवडक मुख्य मंदिरं पाहण्याचं ठरवलं होतं. त्यासाठी काशी प्रसिद्ध आहेच, पण मला तिथे जाणवलं ते आध्यात्मिक वातावरण. त्या सगळ्या वातावरणात अध्यात्म भरून राहिलेलं आहे. त्याची आपल्याला अनुभूती येते. मी वाराणसीच्या प्रत्येक भेटीत ते अनुभवलंय. या सगळ्यावर कडी आहे ती सुप्रसिद्ध गंगा आरती! ही आरती म्हणजे जणू निसर्गाची प्रार्थनाच. तोही एक मोठा, भव्य दिव्य असा आध्यात्मिक सोहळा असतो. पापांपासून मुक्ती देणाऱ्या, आध्यात्मिक शुद्धीकरण करणाऱ्या गंगेची ही आरती म्हणजे एका अर्थाने नदीची केलेली पूजाच. दशाश्वमेध घाटावर होणाऱ्या या गंगा आरतीची भव्यता बोटीतून पाहण्यासारखी असते. आरती सुरू होताना मी देखील एक पणती पाण्यात सोडली आणि सगळ्यांच्या क्षेमकुशलाची प्रार्थना केली. सगळे पुजारी अतिशय नेटकेपणाने आणि तल्लीनतेने गंगा आरतीत मग्न झाले होते. त्यांच्या मंत्रोच्चारणामुळे सगळं वातावरणच बदलून गेलं होतं. तेव्हा जे काही आध्यात्मिक वातावरण निर्माण झालं होतं त्याचं वर्णन मी शब्दांत करू शकत नाही. माझ्या मनात ते कोरलं गेलंय, स्मृतीत साठवलं गेलंय. कधीही पुसली जाणार नाही अशी ती अद्वितीय अनुभूती होती.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटेच मी पुन्हा घाटावर आले. काल संध्याकाळी मला गंगेतून मनसोक्त फेरफटका मारता आला नव्हता. मी थोड्याच वेळात बोटीवर आले आणि गंगेच्या पात्रात फिरायला निघाले. सूर्योदयाच्या आधीच आमचा प्रवास सुरू झाला. गंगेच्या पार्श्वभूमीवरील त्या जादुई सूर्योदयाचा आनंद घेण्याआधी मला आकाश आणि नदीच्या पाण्यावर गुलाबी, केशरी सूर्यकिरणांची सुंदर कलाकुसर तयार झालेली पाहता आली. सोबतीला होते नदीकाठी वस्तीला आलेले स्थलांतरित पक्षी. 'वीणा वर्ल्ड'च्या टूरमध्ये आम्ही पर्यटकांना अशा प्रसन्न सकाळी अस्सी घाटावर ही शांतता आणि सौंदर्य अनुभविण्यासाठी नेतो. वाराणसीतील इतर गोष्टींप्रमाणेच या अस्सी घाटाशी निगडितही एक पौराणिक कथा आहे. देवी दुर्गेने शुंभ आणि निशुंभ या राक्षसांचा वध केल्यानंतर हातातील खड्ग एके ठिकाणी फेकून दिलं. तिथेच अस्सी नदीचा उगम झाला. त्या नदीवरचा हा घाट. 'सुबह-ए-बनारस' हा सुंदर कार्यक्रम या घाटावर होतो. तिथे गंगेची सकाळची आरती केली जाते.

अस्सी घाटाप्रमाणेच दशाश्वमेध हा वाराणसीतील मुख्य घाट. या घाटाची निर्मिती ब्रह्मदेवाने (रचयिता) शंकरासाठी (संहारक) केली. तेथे त्याने यज्ञ करून त्यात दहा अश्वांची आहुती दिली, अशी कथा सांगितली जाते. हा घाट आणि त्याचा परिसर अतिशय प्रेक्षणीय आहे. इथेच संध्याकाळची प्रसिद्ध गंगा आरती होते. आरतीच्या वेळी या घाटाचं विलोभनीय रुप पाहायला मिळतं. या घाटांप्रमाणेच, मणिकर्णिका घाट, बाजीराव पेशवा घाट हेही लोकप्रिय आणि उल्लेखनीय घाट आहेत. यापैकी अनेक घाटांची पुनर्बांधणी १८व्या शतकात मराठ्यांनी केलीये, हे विशेष! हे सर्व घाट पाहणं, त्यावर वावरणं म्हणजे वाराणसीतील मंदिरांत दर्शन घेण्यासारखंच आहे.

बनारस, काशी, वाराणसी अशा अनेक नावांनी या शहराला ओळखतात. या शहराविषयीच्या आकर्षणातून युगानुयुगे देशविदेशातील, दूरदूरच्या लोकांना इथे यावंसं वाटलं. आजही त्यात खंड पडलेला नाही. हे सतत आकर्षणाचं केंद्र राहिलं आहे. काशीला जाऊन येणं हा अनेकांच्या परंपरेचा, श्रद्धेचा भाग आहे. हिंदू धर्मातील ऐतिहासिक आणि पौराणिक महत्त्वामुळे वाराणसीला काशी असं म्हणतात. 'काशी' हे नाव 'कास' या संस्कृत शब्दावरून आलं आहे. 'कास'चा अर्थ चमकणे किंवा प्रकाशमान होणे. या नावातून आध्यात्मिक उन्नती आणि ज्ञान यांचं अधिष्ठान या शहरात असल्याचं सूचित होतं. वाराणसी हे शिक्षणाचंही केंद्र आहे. त्यामुळे स्वाभाविकच माझ्या भेटीचं पुढचं ठिकाण बनारस हिंदू विद्यापीठ होतं. बीएचयू हे आशियातील सर्वांत मोठं विद्यापीठ आहे. याच शहरात आयुर्वेदाचा उगम झाला अशी मान्यता आहे. आयुर्वेद आणि योगशास्त्राचे गुरू महर्षी पतंजली हे याच पवित्र शहराशी निगडित होते. उत्कृष्ट दर्जाचं रेशीम, सोनं आणि चांदीच्या ब्रोकेडच्या व्यापारासाठीही वाराणसी ओळखलं जातं. त्यामुळे माझ्या भेटीतील पुढील टप्पा हा सुंदर बनारस ब्रोकेड आणि सिल्क साड्यांच्या खरेदीचा होता. तिथे मी विणकरांना भेटले. त्यांची कलाकुसर जाणून घेतली.

दुसऱ्या दिवशी मी सारनाथला गेले. वाराणसीपासून अवघ्या १० किमी अंतरावर सारनाथ आहे. ज्ञानप्राप्तीनंतर गौतम बुद्धांनी इथेच पहिला उपदेश केला होता. सारनाथ हे हिंदू नवजागरणाचे प्रतीक आहे. इथे ज्ञान, तत्त्वज्ञान, संस्कृती, भक्तीमार्ग, भारतीय कला आणि हस्तकला या सर्वांचा विकास झाला. त्यांचा प्रसार झाला. तसंच जैन धर्मीयांसाठीही वाराणसी हे एक तीर्थक्षेत्र आहे. त्यांचे तेविसावे तीर्थंकर पार्श्वनाथ यांचं वाराणसी हे जन्मस्थान मानलं जातं. वाराणसीमध्ये वैष्णव आणि शैव पंथ एकत्र अस्तित्वात आहेत. हे या शहराचं आणखी एक वैशिष्ट्य आहे. अशी सर्वस्पर्शी असलेली मोजकीच शहरं असतात. सगळ्यांनाच ते भाग्य लाभत नाही. वाराणसीला तर साक्षात ब्रह्मदेवाची कृपादृष्टी आणि शंकराचे सान्निध्य लाभले आहे. त्यामुळे हे शहर वेगळं ठरतं यात आश्चर्य नाही. काशी विश्वनाथ, कालभैरव, दुर्गा यांच्या मंदिरांबरोबरच इतर अनेक मंदिरांत मी दर्शनासाठी गेले. तिथले वातावरण मनात साठवून घेतले.

त्याशिवाय आवर्जून सांगण्यासारखी एक गोष्ट म्हणजे वाराणसी ही खवय्यांचीही नगरी आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत प्रत्येक वेगवेगळ्या प्रहरासाठी या शहरात खास पदार्थ आहेत. त्यात पुरी-भाजी, समोसे, कचोरी, चाट... असं बरंच काही समाविष्ट आहे. या स्वादिष्ट पाककृतींचा आस्वाद घेणं म्हणजे वाराणसीचा प्रवास सर्वार्थाने पूर्ण करणं. याची मजा हिवाळ्यात अधिक घेता येते, पण असं असलं तरीही मी जेव्हा जेव्हा वाराणसीला गेले आहे तेव्हा तेव्हा मला नवीन काही अनुभवायला मिळालंय. आणि माझ्या लक्षात आलंय की वाराणसीला भेट देण्यासाठी काळवेळेचं काही बंधन नाही.

माझ्या वाराणसीच्या त्या भेटीत सगळी फिरस्ती आटपून मी शेवटच्या दिवशी संध्याकाळी दशाश्वमेध घाटावर, हातात गरम वाफाळणाऱ्या कॉफीचा कप घेऊन बसले आणि माझ्या मनात विचार आला... वाराणसी हा एक समग्र अनुभव आहे. इथे प्रत्येकासाठी काही ना काहीतरी आहे. आणि मला अचानक आठवलं ते गीतकार शकील आझमी यांनी अलीकडेच रचलेलं, वाराणसीची सगळी खासियत अचूक टिपणारं एक सुंदर हिंदी गाणं. गीतकाराने त्यात एका तरुणाच्या प्रेमाची वाराणसीशी तुलना केली आहे. तो म्हणतो,

''तू बन जा गली बनारस की
मैं शाम तलक भटकू तुझमें
तेरी बातें चटपटी चाट सी हैं
तेरी आँखे गंगा घाट सी हैं
मैं घाट किनारे सो जाऊं
फिर सुबह सुबह जागू तुझमें
तू बन जा गली बनारस की
मैं शाम तलक भटकू तुझमें''

हे गाणं वाराणसीमधील पर्यटकांसाठी गाईडचं काम करतं. मी तर वाराणसीला परत जाण्यास उत्सुक आहेच. तुम्ही कधी येताय?



